नि
143
७२९

...शास्त्री चापटकृत

# गद्यरत्नमाला.

पांडुरंग महादेव गुर्जर बुकसेलर आणि पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

आवृत्ति सातवी.

सन १९१५ इसवी.

किंमत १० आणे.

शांताश्रम. मु॰ पापुंड पो॰ पनवेल जि॰ कुलाबा.


# आर्यौषधि कारखाना.

लहान मुलांस व थोरांस

यांतील

REGD.

वनराज



छापाचें

TRADE MARK.

## कासशमनामृत.

अर्थात् खोकला, दमा आणि कफ यांजवर रामबाण औषध. लहान मुलांस व थोरांस याचा उपयोग चांगला होतो. यांत अस्सल वनस्पतीचे रस आहेत तरी एकवार जरूर खात्री करून पहावी. बा. औं. ४ किं. ०१२ आणे.

मुंबईस मिळण्याचें ठिकाणः—

**जनार्दन महादेव गुर्जर, बुकसेलर—रामवाडी,**

मुंबई नंबर २.

# GADYARATNAMALA

OR

## MARÂTHI PROSE READINGS

BY

GOVIND SHANKAR SHÂSTRÎ BAPAT

Published By

TRIMBAK JANÂRDAN GURJAR,
BOOK-SELLER AND PUBLISHER,
RAMWADI, BOMBAY.

SEVENTH EDITION.

Printer:–K. R. Gondhalekar, Jagadhitechu
Press 432 Shanwar, Poona city.

( *Registered according to Act XXV of 1867.*
[ All rights reserved by the publisher. ]

Bombay.

1915.

*Price 10 Annas.*

# गद्यरत्नमाला.

हें पुस्तक

गोविंद शंकरशास्त्री बापट

यांनीं

तयार केलें.

प्रकाशक,

त्र्यंबक जनार्दन गुर्जर,

बुकसेलर आणि पब्लिशर, रामवाडी, मुंबई.

---

मुद्रक,

केशव रावजी गोंधळेकर, ' जगद्धितेच्छु ' प्रेस

४३२ शनवार पेठ, पुणें–सिटी.

---

आवृत्ति सातवी.

---

सन १९१५ इसवी.

ह्या पुस्तकासंबंधी सर्व अधिकार प्रसिद्धकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

---

किंमत १० आणे.

हिंदुस्थान सरकारच्या सन १८६७ च्या २५ व्या आक्टा-
प्रमाणें पब्लिशरनें कापीराईट राखला आहे.

# प्रस्तावना.

संस्कृत व इंग्लिश पुस्तकें वाचतांना ज्या विषयांवर मराठींत कांहीं थोडेंबहुत लिहावें असें वाटलें, त्या विषयांवर वेगळ्या वेगळ्या वेळीं लिहिलेले निबंध एकत्र करून मराठी वाचकांकरितां हें पुस्तक तयार केलें आहे. यांत कांहीं निबंध भाषांतररूपानें लिहिले आहेत, कांहीं मुळाचा आधार धरून विस्तारानें लिहिलेले आहेत, व कांहीं स्वतः लिहिलेले आहेत. या पुस्तकापासून वाचकांस बराच फायदा होईल अशी आशा आहे. ती परमेश्वर सफल करो. अहमदनगर, तारीख ८ नोव्हेंबर १८७५.

## आवृत्ति दुसरी.

भाषोत्पत्ति, संस्कृतभाषा, प्राचीन आर्यांचा इतिहास, हे तीन निबंध पहिल्या आवृत्तीपेक्षां या आवृत्तींत अधिक घातले आहेत.

मुंबई तारीख १५ जुलई १८८८ } गो० शं० शा० बा०

## आवृत्ति चवथी.

चवथ्या आवृत्तींत 'आरोग्य' हा निबंध वाढविला आहे, व प्रश्नोत्तरमालिका हें प्रकरण नवीन घातलें आहे.

मुक्काम वाई जिल्हा सातारा, तारीख १ आगष्ट १९०२ } गो० शं० शा० बा०

## आवृत्ति सातवी.

ही सातवी आवृत्ति मे. डायरेक्टरसाहेब बहादूर यांचे सूचनेबरहुकूम दुरुस्त करून छापिली आहे.

प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ ज्ञान ... ... | १ |
| २ वाचन ... ... | ५ |
| ३ धर्म आणि ईश्वर ... | ९ |
| ४ पुण्य आणि पाप ... | १२ |
| ५ क्रोध ... ... | १६ |
| ६ लोभ ... ... | १९ |
| ७ मोह ... ... | १९ |
| ८ महत्त्वाकांक्षा ... | २१ |
| ९ आरोग्य ... ... | २५ |
| १० राज्यसुख ... ... | २९ |
| ११ स्तुति आणि निंदा... | ३० |
| १२ दैव आणि उद्योग ... | ३२ |
| १३ संवय आणि चाल... | ३४ |
| १४ उच्चस्थिति... ... | ३६ |
| १५ न्यायाधीश आणि वकील | ४० |
| १६ सुधारणा ... ... | ४३ |
| १७ भर्तृहरि ... ... | ५१ |
| १८ वैराग्यशतक ... | ६१ |
| १९ प्रश्नोत्तरमालिका ... | ६४ |
| २० यक्षप्रश्न ... ... | ६८ |
| २१ पितापुत्रसंवाद ... | ७२ |
| २२ मनुस्मृति ... ... | ७६ |
| २३ शकुंतलेची गोष्ट ... | ८७ |
| २४ इतिहास ... ... | १०० |
| २५ प्राचीन इतिहास ... | १०२ |
| २६ चीन देशाविषयीं थोडी माहिती ... ... | १०७ |
| २७ कानफ्युशस ... | ११२ |
| २८ चीन देशांतील मोठी भिंत ... ... | ११५ |
| २९ सुखाचें साधन ... | ११७ |
| ३० राजा आणि पंडित... | ११९ |

| विषय. | पृष्ठ |
|---|---|
| ३१ मातापितरांविषयीं प्रीति ... ... | १२० |
| ३२ असत्य भाषण ... | १२१ |
| ३३ दुर्दैव ... ... | १२२ |
| ३४ शांति ... ... | १२५ |
| ३५ क्षमा ... ... | १२७ |
| ३६ सद्गुण ... ... | १२८ |
| ३७ सभ्यपणा... ... | १२९ |
| ३८ भाषण आणि लेखन | १३१ |
| ३९ मर्यादा ... ... | १३२ |
| ४० कालव्यय... ... | १३४ |
| ४१ संतोष ... ... | १३६ |
| ४२ साक्रेतीस आणि लिआन्दर ... ... | १४० |
| ४३ जोनाथन् स्विफ्त... | १४२ |
| ४४ सर विल्युम जोन्स् | १४७ |
| ४५ एदमंद् वर्क् ... | १५२ |
| ४६ सुख आणि दुःख... | १५६ |
| ४७ आळस ... ... | १५८ |
| ४८ नम्रता ... ... | १६३ |
| ४९ बालाभ्यास... ... | १६४ |
| ५० परमेश्वरावर भरंवसा | १६८ |
| ५१ सृष्टिनिरीक्षण ... | १६९ |
| ५२ भूरचना ... ... | १७० |
| ५३ समुद्र ... ... | १७२ |
| ५४ जनावरांची भाषा... | १७४ |
| ५५ भाषोत्पत्ति ... | १७६ |
| ५६ संस्कृत भाषा ... | १७९ |
| ५७ प्राचीन आर्यांचा इतिहास ... | १८५ |
| ५८ परमेश्वरस्तोत्र ... | १९४ |

# गद्यरत्नमाला.

## ज्ञान.

आहारनिद्राभय***नि सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ॥
ज्ञानं हि तेषामधिको विशेषो ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः १

—भर्तृहरि.

अर्थ.—खाणें, झोंप घेणें, भीति बाळगणें, विलास करणें, या गोष्टी मनुष्य करितात, त्याप्रमाणें पशुहि करितात; परंतु मनुष्यांस ज्ञान आहे, व पशूंस तें नाहीं, हा मनुष्य व पशु यांमध्यें भेद होय; याकरितां ज्या मनुष्यांस ज्ञान नाहीं, ते पशुतुल्य होत.

हा वरील अर्थ इतका स्पष्ट आहे कीं, तो सर्वांस सहज समजतो. तो प्रमाणानें सिद्ध करून दाखवावा लागत नाहीं. ज्ञानाच्या योगानें मनुष्यांस ईश्वरानें मोठें केलें आहे, आणि त्यांच्या हातीं सर्व पृथ्वीचें राज्य दिलें आहे. ईश्वरानें मनुष्याच्या अंगीं जन्मतः ज्ञान ठेविलें नाहीं. जन्मतः मनुष्य पशूसारखाच आहे. ज्ञान प्राप्त करून घेण्याची शक्ति अंगीं जगन्नियंत्यानें ठेविली आहे; ती मात्र इतर प्राण्यांमध्यें नाहीं. मनुष्याचें ज्ञान हें कांहीं अंशीं रबरासारखें आहे. रबर पाहिलें तर इतर पदार्थांप्रमाणेंच दिसतें; पण ओढिलें असतां लांब होण्याचा जो गुण त्यामध्यें आहे तो इतर पदार्थांमध्यें नाहीं. त्याप्रमाणें मनुष्य व पशु जन्मतः सारखे असले तरी मनुष्यास शहाणा करितां येतें; पण पशूस ती योग्यता नाहीं; म्हणून हत्तीसारखे बलवान् पशु मनुष्यांच्या स्वाधीन झाले आहेत. ज्ञान काहीं अंशीं रबरासारखें आहे, असें म्हणण्याचें कारण कीं, रबराचा दृष्टांत सर्वांशीं ज्ञानास लागू होत नाहीं. रबर कांहीं नियमित प्रमा-

णापर्यंत वाढतें, पुढें ओढिलें तर तें तुटतें; परंतु ज्ञान पाहिजे तितकें वाढवितां येतें. ज्ञानाची वाढ कधीं खुंटत नाहीं. ज्ञान अनंत आहे.

जगाचें ज्ञान सर्वकाळ वाढत चाललें आहे, यास पुष्कळ प्रमाणें आहेत. त्यांतून कांहीं लिहितों:—प्राचीनकाळच्या लोकांस समुद्र ही पृथ्वीची मर्यादा होय, असें वाटत होतें; परंतु त्याच समुद्राच्या पलीकडे अलीकडच्या लोकांस अमेरिकाखंड व दुसरीं पुष्कळ बेटें सांपडलीं. ज्या समुद्रांत कोस दोन कोस जाण्यास सुद्धां कोणी धजत नसे, त्यांत पाहिजे तेथें लोक जाऊं लागले; हें कशाचें फल ? ज्ञानाचें, असें कोण ह्मणणार नाहीं? ज्या विद्युल्लतेपासून हजारों अनर्थ प्राप्त होतात, इतकें मात्र लोकांस माहीत होतें, त्याच विद्युल्लतेच्या योगानें क्षणांत हजारों कोस लांब बातमी पाठवितां येते; हा ज्ञानवृद्धीचा परिणाम नव्हे काय? कांहीं दिवसांनीं लोक विमानांतून मोठाले प्रवास करणार नाहींत कशावरून? कांहीं नियमित अंतरावर तर हल्लीं लोक विमानांत बसून जातात. पंचमहाभूतें मनुष्यांची सेवा करूं लागलीं, हा केवढा मनुष्यांच्या ज्ञानाचा अद्भुत प्रभाव आहे? जसजसें जगांत ज्ञान वाढतें, तसतशीं पुढल्या लोकांस ज्ञान संपादन करण्याचीं साधनें अधिक होतात. लेखनकला हें प्राचीनकाळीं ज्ञान वाढविण्याचें मुख्य साधन होतें. कारण, कोणतीही गोष्ट एकदा ग्रंथांत लिहिली गेली म्हणजे इतर लोकांस ती समजण्याचा मार्ग असे. परंतु पुस्तकें प्रसिद्ध करण्याचीं साधनें नसल्यामुळें कित्येक कल्पना उत्पन्न होऊन नाश पावत. छापण्याची कला हें अर्वाचीन काळीं ज्ञानप्राप्तीचें मोठें साधन आहे. पृथ्वीच्या कोणत्याही भागांत कांहीं नवीन कल्पना निघाली तर, सर्व देशांत ती लवकर प्रसिद्ध होते. छापण्याची कला आपल्या देशांत नव्हती यामुळें पुष्कळ उपयुक्त कला व विद्या लुप्त झाल्या. एका देशांतून दुसऱ्या देशांत जातां येत नसे, हा एक ज्ञानप्राप्तीस मोठा प्रति-

बंध होता. सांप्रत आगगाडी व आगबोट यांच्या योगानें पाहिजे त्या सुधारलेल्या देशांत जातां येतें. हें ज्ञानवृद्धि करण्यास मोठें साधन झालें आहे. घरकोंबड्याप्रमाणें जो मनुष्य घरांतून बाहेर पडत नाहीं, तो अज्ञानी राहतो, त्याप्रमाणेंच देशांचें आहे. ज्या देशांतील लोक परदेशांत जात नाहींत, तो देश कधीं सुधारणार नाहीं. ज्ञानाच्या योगानें जनावरें जशीं मनुष्याच्या स्वाधीन झालीं आहेत, तसेच सज्ञान लोक अज्ञानी लोकांच्या देशांत येऊन त्यांवर अंमल करूं लागतात. याचें उदाहरण पांच हजार कोसांवरच्या लांबीच्या पल्ल्यावरील बेटांतल्या थोड्याशा पण ज्ञानी इंग्लिश लोकांनीं अफाट हिंदुस्थान देशावर निष्कंटक राज्य स्थापिलें यापेक्षां आणखी दुसरें ढळढळीत उदाहरण कशास पाहिजे! मुसलमान लोकांप्रमाणें नुसत्या तरवारीनें इंग्लिश लोकांनीं राज्य स्थापिलें नाहीं त्यांच्या राज्याचा पाया ज्ञानावर आहे, म्हणून तो मुसलमान लोकांच्या राज्याप्रमाणें अल्पायु न होतां, चिरस्थायी झाला आहे.

गुरू व पुस्तकें हीं ज्ञान वाढविण्याचीं मुख्य साधनें होत, तथापि त्यांवरच अवलंबून राहूं नये. ज्या पुस्तकांपासून आपण ज्ञान संपादितों, तीं पुस्तकें ज्यांनीं केलीं, त्यांस ज्ञानसंपादनास पुस्तकें नव्हतीं, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे, कदाचित् त्यांस शिकविण्यास गुरु देदेखील नसेल. जगाची साधारण स्थिति पाहतां, असें लक्षांत येतें कीं, ज्या पूर्वजांपासून पुस्तकरूप ज्ञानभांडारें आपणांस मिळालीं आहेत, ते सर्वज्ञ नव्हते. किंवा विधात्यानें त्यांस जन्मतः ज्ञानी केलें नाहीं. त्यांनीं रात्रंदिवस श्रम करून आपलें ज्ञान वाढविलें असावें यांत संशय नाहीं. सांप्रतकाळचे लोक दुर्बिणीच्या वगैरे सहाय्यानें आकाशांतील ताऱ्यांविषयीं अनेक प्रकारचे शोध लावितात, परंतु भास्कराचार्य, गालिलिओ, इत्यादि प्राचीनकाळच्या लोकांस हीं साधनें नव्हतीं. त्यांनीं केलेल्या सिद्धांताची अद्याप लोक वाखाणणी करितात. ज्ञान वाढविण्याचीं साधनें मिळालीं तर त्यांचा उपयोग अवश्य करावा; परंतु साधनें नाहींत म्हणून

अडून बसूं नये. कोणत्या तरी रीतीनें आपलें ज्ञान वाढविणें हें मनुष्याचें कर्तव्य होय. सर्व पुस्तकांत सृष्टि हें मोठें पुस्तक होय. इतर पुस्तकांत नियमित विषय असतात. परंतु या पुस्तकांत सर्वज्ञ ग्रंथकारानें मोठ्या चातुर्यानें सर्व विषयांचा संग्रह केला आहे. कालिदास, शेक्स्पियर[१] वगैरे कवि; गौतम, कणाद, प्लेतो[२] व आरिस्तातल, यांसारखे तर्कशास्त्रवेत्ते, याच पुस्तकावरून शिकले. ज्योतिःशास्त्र, रसायनशास्त्र, दर्शनानुशासन-शास्त्र, वैद्यशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रें जाणणारे या जुन्या पुस्तकावरूनच शिकले. सृष्टींतील एकाद्या मोठ्या वस्तूपासूनच ज्ञान प्राप्त होतें, असें नाहीं; कितीहि हलकी वस्तु असली तरी शहाण्या मनुष्यास तिजपासून कांहीं तरी शिकतां येईल. झाडावरून फळ पडतांना कोट्यावधि मनुष्यांनीं पाहिलें; पण त्याचें आश्चर्य कोणास वाटलें नाहीं. याच गोष्टीचा विचार करून सर ऐझाक न्यूतन यानें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढिला. आधणावरचें भांडें कां उडतें याचा विचार करून एका चतुर पुरुषानें वाफेचें यंत्र शोधून काढिलें. पश्चिमेकडून लांकडाचा ओंडा वाहात आला, हें पाहून कोलंबसानें तिकडे जमीन आहे, असा सिद्धांत करून तो खरा करून दाखविला. अशीं उदाहरणें शेंकडों सांगतां येतील. शेवटीं इतकें सांगणें पुरे आहे कीं, मनुष्यांस आपलें ज्ञान, सर्व कालीं, सर्व ठिकाणीं, पाहिजे तितकें वाढवितां येईल. ज्ञानसंपादनाच्या उद्योगांत मनुष्य असला तर, तो सर्वदा स्वस्थ राहील. त्याचे हातून कोणतेंही दुष्कर्म होणार नाहीं. दुसऱ्यांस निरुत्तर करण्याकरितां अथवा त्यांपेक्षां श्रेष्ठ होण्याकरितां आपलें ज्ञान संपादण्याचा उद्योग करूं नये. ईश्वरानें या सृष्टिरूप यंत्रांत, किती चातुर्य दाखविलें आहे,हें जाण्याकरितांच आपलें ज्ञान वाढवीत असावें; म्हणजे त्याची सर्वकाल भक्ति घडून मनुष्य त्यास प्रिय होतो.

---

१ इंग्लंडांत १६ व्या शतकांत उत्तम कवि होऊन गेला.

२ हे प्राचीन काळीं ग्रीस देशांत उत्तम तत्त्ववेत्ते होते.

# वाचन.

श्रम केल्याशिवाय कोणाचें पोट भरत नाहीं, असा जगांत सामान्य नियम आहे, तथापि ह्या जगांत कित्येक हरीचे लाल असे आहेत कीं, त्यांच्या पूर्वजांनीं पुष्कळ मेहनत करून द्रव्य-संचय करून ठेविल्यामुळें, त्यांस उदरनिर्वाहाकरितां शरीर झिजवावें लागत नाहीं. यामुळें, त्यांचा सर्व वेळही मोकळा असतो. अशा लोकांस वाचनाचें व्यसन अवश्य पाहिजे; नाहीं तर ते दुर्गुणी होऊन आपला व कदाचित् आपल्याशीं ज्यांचा संबंध आहे, अशा लोकांचा नाश करतील. कारण, मनुष्याचा स्वभाव ईश्वरानें असा केला आहे कीं, त्याच्यानें निश्चल बसवत नाहीं. कांहीं तरी त्याच्या ज्ञानेंद्रियांस अथवा कर्मेंद्रियांस व्यवसाय पाहिजे.

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥

**अर्थ.**—कोणी कधींही कांहीं केल्याशिवाय राहत नाहीं. मायेपासून झालेले जे सत्त्व, रज, तम गुण यांच्या स्वाधीन मनुष्य असल्यामुळें ते त्याकडून कर्म करवितात.

यामुळेंच बहुधा श्रीमान् लोकांची संतति दुर्गुणी निघते. कारण, श्रीमंतांच्या मुलांस निर्वाहाकरितां काम करण्याची गरज नसते. ह्मणून ते गाणें, बजावणें, नाच, तमाशे, खाणें, पिणें, यांत सर्व काळ घालवूं लागतात. त्यामुळें इतर लोकांशीं संघटण होऊन मनुष्यांस ज्ञान प्राप्त व्हावयाचें तें त्यांस होत नाहीं. कधीं कधीं सुखोपभोगाच्या नादीं लागून गरीबांची मुलेंही त्यांच्या योगानें बिघडतात. तेणेंकरून त्या गरीब मुलांच्या आईबापांची हानि होते. श्रीमंतांचे दुर्गुण लोकांस व पदरच्या मनुष्यांस समजतात, तथापि आपणांवर गैरमर्जी होईल ह्मणून ते त्यांचे दुर्गुण प्रगट करीत नाहींत. यासाठीं श्रीमंतांच्या मुलांस लहानप-

णापासून वाचनाची संवय लावून देणें आवश्यक आहे. पुस्तकें वाचून कालक्रमण करण्याची त्यांस संवय लागली तर त्यांच्या हातून काळ घालविण्याकरितां दुष्कृत्यें होतात तीं नाहींतशीं होतील. त्यांस आपलें कर्तव्य काय, हें समजूं लागेल. ऐश्वर्य हें जलतरंगाप्रमाणें क्षणिक आहे, क्षणांत मनुष्य रावाचा रंक होतो तीच स्थिति मला उद्यां प्राप्त होणार नाहीं कशावरून? असें कित्येक नीचस्थितींत आलेल्या थोर पुरुषांचीं चरित्रें वाचून त्यांस वाटूं लागतें; त्यामुळें ते आपल्या ऐश्वर्याच्या मदानें लोकांस दुःख देत नाहींतसे होतात. मोठ्या स्थितींत जन्मास येऊन त्या स्थितीस योग्य अ ीं कृत्यें करून जो मनुष्य कीर्ति संपादन करणार नाहीं तो ऐश्वर्यरूप पुष्पांतला किडाच केवळ होय. असें त्यांनीं वाचल्यास सत्कृत्यांविषयीं त्यांची प्रवृत्ति होण्याचा संभव आहे. श्रीमंतांपुढें लोक तोंडासारखें बोलतात, असें श्रीमंतांस समजल्यास ते सावध राहतील. एकादा मनुष्य लहानशा कुटुंबाचा संसार करीत असला, तरी त्यास हजारों विघ्नें येतात. यावरून मोठाल्या राज्यांचे कारभार करणाऱ्यांस किती आणीबाणीचे प्रसंग येत असतील, याचें सहज अनुमान करितां येईल. अशा लोकांस, प्राचीनकाळच्या राज्यकारस्थानी लोकांस कसकशा अडचणी आल्या, व त्यांनीं त्यांचें कोणत्या उपायांनीं निवारण केलें, याचें ज्ञान अवश्य पाहिजे. हें प्राचीन इतिहास वाचल्याशिवाय कसें प्राप्त होईल! युरोपांत अलीकडे जे मोठमोठाले राज्यकारस्थानी पुरुष झाले, ते सर्व प्राचीन इतिहासाच्या माहितीनें झाले आहेत. म्हणूनच इतिहासाच्या ज्ञानास युरोपखंडांत एवढें महत्त्व आलें आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, श्रीमंतांनीं ऐषआरामांत अथवा सोंगट्या खेळून दुरंग्या करण्यांत काळ व्यर्थ न घालवितां, कांहीं तरी ग्रंथ वाचावे; व आपल्या मुलांस लहानपणापासून विद्या शिकवून वाचण्याचा छंद त्यांस लावावा, हें त्यांचें प्रथम कर्तव्य होय.

इंग्लंदांतील श्रीमान् लोकांचीं मुलें बहुशः आपल्या देशांतील श्रीमान् लोकांच्या मुलांपेक्षां शाहाणीं असतात, असें म्हणतात, याचें कारण त्यांचें वाचन होय. इंग्लंडांत पुस्तकें पुष्कळ असणें हा एक ऐश्वर्याचा भाग समजतात. सर्व श्रीमान् लोकांच्या घरीं अनेक विषयांवरील पुष्कळ चांगले चांगले ग्रंथ असतात. त्यामुळें लहानपणापासून त्यांस सर्व गोष्टी माहीत होऊन ते स्वदेशहित करण्याविषयीं योग्य असे होतात. राज्यरीति माहीत नाहीं असा इंग्लंडांत एक सुद्धां बडा लोक सांपडणें कठीण. थोडेसे इंग्लिश लोक इतक्या लांबून येऊन, ज्यांची भाषा भिन्न, ज्यांचा धर्म भिन्न, रीति भाति भिन्न अशा हिंदुलोकांवर कोणत्या कारणानें राज्य करूं लागले? स्वराज्यें कां नष्ट झालीं असा आपल्या संस्थानिकांस अथवा बडे लोकांस प्रश्न केला तर याचें ऐतिहासिक रीतीनें समर्पक उत्तर देणारे किती निघतील ? इतिहास वाचून, याचा एकानें तरी विचार केला असेल काय ! इंग्लिशांची सद्दी मोठी, एवढें ठरींव उत्तर सर्वांस माहीत आहे. हा वाचण्याची संवय नसण्याचा परिणाम होय. श्रीमंतांस वाचनाचा किती उपयोग आहे याचा बराच विचार केला, यावरून तें त्यांसच अवश्यक आहे, गरीबांस नाहीं, असें कोणीं समजूं नये.

श्रीमंतांस वाचनाकडे अधिक वेळ लावण्याचा संभव असतो, म्हणून त्यांविषयीं प्रथम विचार केला. गरीबांस तर वाचन श्रीमंतांपेक्षांही सुखकारक व आवश्यक आहे. सगळा दिवस श्रम केले तरी, विश्रांतीची गरज नाहीं, असा कोणीच नाहीं. मानसिक श्रम करणारे न्यायाधीश वगैरे व शारीरश्रम करणारे मजूरदार या उभयतांसही विसावा पाहिजे. काम आवडतें म्हणून कोणी काम करीत नाहीं, पण विसाव्यासाठीं करितात. अशा विसाव्याच्या वेळेस गरीब मनुष्य उगाच हातपाय जोडून बसला तर त्यास काय सुख होणार? काम करण्याच्या वेदनेनें तो मानसिक दुःखें विसरून गेला होता, तीं सर्व त्याच्या पुढें उभीं राहतील. त्यास वाटेल हर हर! काय मी

केवढा दुःखी प्राणी ! माझें सर्व अयुष्य लोकांची गुलामगिरी करण्यांत जाणार ! मला स्वतंत्रता कधीं तरी मिळेल काय? माझ्या बायकोच्या व मुलांच्या वस्त्रपात्रांच्या, दागिन्यादुगिन्यांच्या हौसा मजकडून पूर्ण व्हाव्या, एवढें माझें भाग्य कोठें आहे ? असे अनेक तरंग मनांत येऊन विसावा न होतां त्यास दुःख मात्र होणार. पण अशा वेळेस तो एकादें चांगलें पुस्तक वाचीत बसला तर त्याच्या मनांतील दारिद्र्यादिकांचे दुःखकारक विचार एकीकडे राहून त्यास अनुपम आनंद होईल; तो शब्दांनीं काय वर्णावा! एकाद्या राजभुवनांत मोठमोठ्या श्रीमान् व शहाण्या लोकांत मी बसलों आहें, असें त्यास वाटणार आहे. कितीहि विपत्ति आल्या तरी नीति न सोडल्यामुळें पांडवांसारख्यांचा शेवटीं जयच झाला, असें त्यानें वाचिलें तर तो नीति कधींहि सोडणार नाहीं. व कधीं तरी ईश्वर आपणास साहाय्य करील असें मानून आनंदानें काळ दवडील. एकंदरीनें पाहतां वाचना-सारखें सुखकारक व सद्गुणवर्धक कांहीं नाहीं म्हटलें तरी चालेल. लहान, मोठा, गरीब, श्रीमंत, या सर्वांस वाचन हितकारक आहे. जेथें पुरुषांपेक्षां स्त्रियांस काम थोडें असतें, तेथें त्यांस वाचनाची संवय लागल्यास त्या सद्गुणी होऊन आपला काळ चांगल्या रीतीनें घालवितील.

छापण्याची कला निघण्यापूर्वी पुस्तक हा दुर्मिळ पदार्थ होता. श्रीमानांस मात्र तो मिळत असे. परंतु सांप्रत पुस्तकें राजापासून रंकापर्यंत सर्वांस मिळतात. पुस्तकें फार झाल्यापा-सून एक लहानसा तोटा झाला आहे, तो नफ्याच्या मानानें पाहिला तर तोटा नाहीं म्हटला तरी चालेल, व थोडें जपलें असतां तो टाळण्यासारखा आहे. तो हा कीं, पूर्वी लोक ग्रंथ करून पैसा मिळवीत नसत, यामुळें ग्रंथ करण्याची खरी ज्यांची योग्यता असे तेच ग्रंथ करीत. पण हल्लीं ग्रंथ करणें हें पैसा मिळविण्याचें साधन झाल्यामुळें पाहिजे तो ग्रंथ करून छापितो.

यामुळें वाईट ग्रंथांचा भरणा फार होतो. याकरितां वाचणाऱ्यांची बुद्धि चांगलें वाईट समजण्याजोगी परिपक्व होईपर्यंत, त्यांस कोणतीं पुस्तकें वाचावयास द्यावीं याविषयीं आईबापांनीं व गुरूंनीं तजवीज ठेविली पाहिजे.

---

## धर्म आणि ईश्वर.

ह्या अफाट पृथ्वीवर अनेक देश आहेत, त्यांपैकीं कित्येक सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेले आहेत; कित्येक मध्यमावस्थेंत आहेत; आणि कित्येक अगदीं निकृष्ट स्थितींत आहेत. या सर्व देशांत कांहीं ना कांहीं तरी धर्माचा प्रकार असतोच. कोलंबसानें प्रथमतः अमेरिका खंडांत प्रवेश केला; त्या वेळेस तेथील लोक इतके अडाणी होते कीं, ते पशुतुल्य होते असें म्हटलें तरी चालेल. पशुतुल्य म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, बुद्धि म्हणून जो पदार्थ ईश्वरानें केवळ मनुष्यप्राण्यांतच ठेविला आहे, तो त्यांमध्यें गारगोटींत अथवा पिंपळाच्या लांकडांत अग्नि असतो त्याप्रमाणें बीजरूपानें मात्र होता. अशा लोकांत सुद्धां कांहींएक प्रकारचें धर्माचें ज्ञान होतें. कारण, स्पेनदेशचे लोक त्यांच्या दृष्टीस पडले तेव्हां, त्यांचीं उत्तम वस्त्रें वगैरे पाहून हे प्राणी देवाकडून आले आहेत असें त्यांस वाटलें. त्यांस बोलतां वगैरे आलें नाहीं, तरी त्यांच्या कृतीवरून असें दिसलें कीं, नवीन लोकांस ते अनन्यभावानें शरण आले. उत्तम, मध्यम, लोकांत धर्म आहेत हें सांगणेंच नको.

यावरून असें वाटतें कीं, धर्माची कल्पना सर्व मनुष्यांच्या मनांत येण्याचें कारण एकच असावें. कारण, सुवर्णाचे कितीही चांगले वाईट अनेक अलंकार बनविले तरी सर्वांत सुवर्ण सारखेंच आहे; तसें मनुष्य कितीही अडाणी अथवा सुधारलेले असले तरी, सर्वांचे ठिकाणीं मनुष्यस्वभाव सारखाच आहे. धर्माची

कल्पना सर्वांचे मनांत येण्याचें कारण काय असावें ? असा प्रश्न सहज मनांत येतो. याचें निश्चित समाधान करणें फार कठीण आहे. परंतु सामान्यतः असें वाटतें कीं, कार्यकारणभाव जाणण्याची उत्सुकता हें धर्माची कल्पना मनांत येण्याचें कारण असावें. जगांत कोणतीहि क्रिया किंवा वस्तु कर्त्याशिवाय होत नाहीं, हें आपण पाहतों. हाच नियम सृष्टीस सर्व लोक लागू करितात. सूर्याचे उदयास्त, चंद्राचे वृद्धिक्षय, ऋतूंची बदल, इत्यादि गोष्टी नियमानें होतात; असें सर्वांस समजतें. त्यावरून असें अनुमान करितात कीं, या सर्व गोष्टी कर्त्याशिवाय कशा होतील; यांस कोणी तरी कर्त्ता अवश्य असला पाहिजे. व तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् "कर्तुं अकर्तुं अन्यथाकर्तुं समर्थ" असाच असला पाहिजे. असा जो अनुमित कर्ता तोच परमेश्वर होय. हें अनुमान मनुष्य कांहींसा सुधारल्याशिवाय होत नाहीं. असें अनुमान होण्यास मनुष्यास कांहीं तरी सृष्टपदार्थविज्ञानशास्त्राची माहिती पाहिजे.

अडाणी देशांतील मनुष्यें कर्त्याचें अनुमान करितात; तथापि तीं सूर्य, चंद्र, वायु, जल, पृथ्वी वगैरे जेवढ्या मोठ्या वस्तु पाहतात, त्या सर्वांसच वेगळाले देव समजून त्यांचें भजनपूजन करितात. हीं सर्व पंचमहाभूतें अचेतन असून एका ईश्वराच्या इच्छेनें चलनवलनादि व्यापार करितात हें त्यांस माहीत नसतें. अमेरिकन लोक सूर्यास ईश्वर समजतात, त्याशिवाय दुसरा निराकार ईश्वर त्यांस माहीत नाहीं. असें कोलंबसाच्या दृष्टीस पडलें.

कोणत्याही प्राचीन धर्माची स्थिति पाहिली तरी पंचमहाभूतांसच देव मानलें आहे, असें आढळतें. हेंच अनेक देव मानण्याचें कारण आहे. सर्व धर्मांत आर्यधर्म प्राचीन आहे, व पृथ्वीवर पहिला ग्रंथ प्रगट झाला ती ऋग्वेदसंहिता होय, असें, युरोपांतीलही कित्येक विद्वानांचें मत आहे. त्या ऋग्वेदसंहितेमध्यें पंचमहाभूतांच्याच पूजेचें वर्णन आहे. वैदिकधर्माच्या आ-

रंभीं सृष्टपदार्थांचीच पूजा होती, तथापि लोक त्यांस ईश्वराच्या शक्ति मानून भजत असें दिसतें. कारण, लोकांस अद्वितीयज्ञानस्वरूप ईश्वराचें ज्ञान होतें; याविषयीं 'एकं सतं बहुधा कल्पयंति ( एक असून यास अनेक प्रकारें कल्पितात. ) इत्यादि अनेक प्रमाणें आहेत. हल्लीं पृथ्वीवर जे धर्म आहेत, त्यांत कांहींमध्यें अनेक देवांची पूजा सांगितली आहे, ती नामभेदानें एकाच ईश्वराची पूजा होय. यास्तव बहुशः एक देव श्रेष्ठ, कर्ता, करविता, हा सांप्रत सर्वांचा सिद्धांत आहे.

सृष्टपदार्थांचें ज्ञान वाढून जसजशी जगांत अधिक सुधारणा होते त्या मानानें धर्माचें स्वरूप पालटत जातें. ज्या लोकांत, सृष्टपदार्थांच्या ज्ञानाचा प्रसार झाला नाहीं, ते लोक असें समजतात कीं, देव हवी ती गोष्ट पाहिजे तेव्हां करतो. त्याचे नियम सर्वदा सारखे आहेत, असें ते समजत नाहींत. त्या देशांत ध्यानधारणादि मानसिक भक्तीपेक्षां भजनपूजनादि शारीर भक्तीचें माहात्म्य फार असतें. कित्येक, देवा, मला मुलगा होऊं दे, म्हणजे अमुक करीन; देवा, माझा रोग बरा होऊं दे, म्हणजे तमुक करीन; असे नवस सुद्धां करितात! ज्या लोकांत सृष्टिज्ञानाचा प्रसार होतो, त्या लोकांचें असें मत होतें कीं, ईश्वर अद्वितीय, सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ असून त्याचे नियम निश्चित ह्मणजे सर्वदा सारखे आहेत. ते मनुष्यांच्या कृतीनें अथवा इच्छेनें बदलत नाहींत. अशा लोकांत भजनादि शारीर भक्तीचा व्यापार बंद होतो. (कधीं कधीं अशा लोकांत उलट परिणामहि उत्पन्न होतो. ) ते पंचमहाभूतांपासूनच सृष्टि झाली आहे, असें मानतात. त्यांचा चेतनकर्ता कोणी वेगळा आहे, व त्यानें आत्मा आणि देह हे दोन पदार्थ एकत्र जुळले आहेत, असें ते मानीत नाहींत. हें मत कितपत खरें करितां येईल याचा आम्ही येथें विचार करीत नाहीं. तथापि, इतकें खास आहे कीं, एकंदरीनें हें मत मनुष्यांस दुखःकारक होतें. कारण, या मताच्या मनुष्याचा

स्वाभाविक परिणाम असा होतो कीं, तो पापास भीत नाहीं. आपल्या सुखाचा नाश होईल म्हणून तो प्रगटपणें दुष्कर्म करीत नाहीं, तथापि आपणास यापासून कांहीं धोका नाहीं, असें त्यास माहीत असेल तर तो कोणतेंही घातुक कर्म करण्यास मागें हटणार नाहीं.

ईश्वराची भीति बाळगून धर्मानें वागणें यासारखें मनास व शरीरास सुखकारक कोणतेंच नाहीं. धर्माची स्थिति चांगली करणें हा सुधारणेचा पाया होय. लोक देहात्मवादी झाले ह्मणजे त्यांच्या हातून कांहीं चांगलें कृत्य होणार नाहीं. कारण, आपण मेल्यावर सुद्धां आपल्या सत्कृत्याचें फळ आपणास मिळावें ह्मणून मरणाचें भय देखील कधीं कधीं एकीकडे ठेवून लोक चांगलीं कृत्यें करितात. देहरूप आत्मा नष्ट झाल्यावर मागें कांहीं उरत नाहीं असें समजल्यावर, लोक सत्कृत्याकरितां दुःख कां भोगतील ? धर्माचीं मतें सर्व पृथ्वींत सारखीं असतीं तर केवढा लाभ झाला असता ! धर्माच्या संबंधानें आजपर्यंत कोट्यावधि मनुष्यांच्या हत्या झाल्या, हें मनुष्यजातीस किती लज्जास्पद आहे ! असो, या गोष्टींचें वाईट वाटून उपयोग नाहीं, सर्व मनुष्य शहाणे व न्यायी असते तर कायद्यांची गरज न लागती असें ह्मणण्यासारखेंच हें आहे. एक धर्म बहुतकरून पृथ्वीवर होणें नाहीं. तथापि सर्वांनीं, अज्ञानस्थितींत स्थापित झालेलीं अशीं आपापल्या धर्मांतील मतें टाकून, ईश्वरावर भरंवसा ठेवून, स्वधर्मानें वागावें, यांतच प्रत्येकाचें व सर्वांचें हित आहे.

---

## पुण्य आणि पाप.

पुण्य आणि पाप हे शब्द सर्वांस माहीत आहेत, व त्यांचा विवक्षित अर्थ सर्व लोक सारखाच समजतात. तथापि या दोन्ही पदार्थांचें लक्षण सांगणें कठीण आहे. पुण्य, पाप ह्मणजे काय ? असा प्रश्न केला तर साधारण लोक असें ह्मणतील कीं, यांत

काय सांगावयाचें ? पुण्य ह्मणजे पुण्य आणि पाप ह्मणजे पाप. कोणास दुसऱ्या भाषा येत असल्या तर, तो त्या त्या भाषेंतले या अर्थाचे शब्द सांगेल. परंतु हें वरील प्रश्नाचें उत्तर होत नाहीं. विद्वानांस हा प्रश्न केला तरी, एक ह्मणेल चांगलें तें पुण्य आणि वाईट तें पाप. दुसरा ह्मणेल, सत्कर्मांचा परिणाम ह्मणजे पुण्य व दुष्कर्मांचा परिणाम तें पाप. या उत्तरांनीं सुद्धां प्रश्नाचा उलगडा होत नाहीं. कारण, चांगलें, वाईट, सत्कर्म, दुष्कर्म हे शब्द कांहीं अंशीं वर, खालीं, उणा, अधिक, वगैरे शब्दांप्रमाणें सापेक्ष आहेत. पाप, पुण्य हे शब्द धर्माच्या संबंधाचे आहेत. अग्नीवर हात ठेविल्यानें भाजला, अथवा शस्त्रानें कापला तर यास कोणी दुष्कर्म म्हणत नाहीं. यामुळें पापपुण्याचें लक्षण बांधण्याचें कठीण पडतें. कारण, पृथ्वीवर धर्म पुष्कळ आहेत. त्यांत इतका मतभेद आहे कीं, एकांत जें कर्म पुण्यकारक सांगितलें असतें, त्याची दुसऱ्यांत फार निंदा असते. पहा, मद्यमांस भक्षण करणें यास आपल्या धर्मांत मोठें पाप मानिलें आहे, व मूर्तीच्या ठायीं देवाची पूजा करणें हा आपण एक पुण्याचाच प्रकार समजतों. ख्रिस्ती धर्मांत पाहूं गेलें तर याच्या अगदीं उलट आढळतें. ते मद्यमांस भक्षण करणें हें पुण्य समजत नाहींत तरी यांत कांहींएक तिळमात्रहि पाप नाहीं, असें मानितात. मद्यमांस हे अपवित्र पदार्थ आहेत असें ते समजत नाहींत, असें ह्मटलें तरी चालेल. कारण त्यांच्या कित्येक संस्कारांस मद्याची गरज लागते. मूर्तिपूजा करणें हें तर ते पाप समजतात, इतकेंच नव्हे, ख्रिस्ती धर्म न स्वीकारणें हेंच मोठें पाप आहे असें ते समजतात. मुसलमानी धर्माचें अशा प्रकारचें एक मत आहे कीं, काफर ह्मणजे जे मुसलमानी धर्मावर भरंवसा ठेवीत नाहींत, त्यांचें स्त्री, धन, वगैरे सर्व हरण करावें. आतां पाप, पुण्य, हे शब्द धर्मसंबंधाचे असून धर्मांत जर इतका भेद आहे तर सर्व मनुष्यांस अनुकूल होईल असें अव्याप्ति, अतिव्याप्ति, यांनीं र-

हित पापपुण्याचें लक्षण कसें करितां येईल? कोणी ह्मणेल कीं, जें कृत्य केलें असतां, मनास वाईट वाटतें तें पाप व जें केलें असतां मनास चांगलें वाटतें तें पुण्य. परंतु यांतही कांहीं अर्थ नाहीं. युरोप खंडांत रोमन क्याथोलिक व प्रातेस्तंत मताच्या लोकांत भांडणें होत असत तेव्हां, विरुद्ध मताच्या लोकांस त्रास देणें हें कोणास पाप वाटत नसे, परंतु ज्यांस तें दुःख सोसावें लागे ते हें महत्पाप आहे असें समजत. कित्येक विद्वानांचें असें मत आहे कीं, सत्य, भूतदया, क्षमा, अस्तेय, इत्यादिक सर्व धर्मांत ज्यांस गुणच मानिलें आहे, त्यांस पुण्य ह्मणावें व त्यांच्या उलट ज्यांस सर्व धर्मांत दोष मानिलें आहे, त्यांस पाप असें ह्मणावें. हें लक्षण बहुतांशीं निर्दुष्ट असावेंसें वाटतें. वरील गुणांपासून सद्गुणांची वृद्धि होऊन एकंदर सर्वांस सुख होतें. त्याच्या उलट दुर्गुणांपासून जगास दुःख होतें. याच अर्थानें एकानें सर्व पुराणांचें सारभूत असें वचन केलें आहे, तें पापपुण्यांचें पूर्ण लक्षण आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तें वचन येणेंप्रमाणेः—

अष्टादशपुराणानां व्यासस्य वचनद्वयम् ।
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥ १ ॥

यावरून कोणी म्हणेल कीं, राजानें चोरांस शासन करणें हें पाप होय, कारण त्यापासून परपीडन होतें. तसेंच शौर्य हें पाप होय, कारण, त्यामुळें हत्या होतात. तसेंच लहान मुलांस स्वेच्छाचार करूं देणें हें पुण्य होय. कारण, त्यापासून त्यांस बरें वाटतें. परंतु या शंका असमंजस आहेत. कारण परोपकार म्हणजे एकाचें किंवा दोघांचें हित करणें नव्हे. तर एकंदर जगांतील पुष्कळ मनुष्यांस ज्यापासून सुख होईल तें पुण्य, व ज्यापासून दुःख होईल तें पाप. असा अर्थ समजावयाचा. नाहीं तर, सर्व प्रकारच्या पापांस पुण्य म्हणावें लागेल. कारण कोणी तरी पाप करितो तो आपल्या अथवा आपल्या कुटुंबांतील मनु-

ष्यांच्या हिताकरितांच करितो. तसेंच कित्येक प्रकारच्या पुण्यांस पापपणा येईल. कारण दुसऱ्याचें बरें करणें म्हणजे, अंशतः तरी आपणांस तोटा सोसावा लागतोच. जेथें आपणांस खार लागत नाहीं, तेथें कोणी उपकार केला असें म्हणत नाहीं. राजानें चोरास शिक्षा केली नाहीं तर तो अधिक चोऱ्या करून आपलें हित करील, पण शेकडों मनुष्यांचा तोटा करील, म्हणून त्यास शिक्षा करणें हें त्यास दुःख देणें आहे, तरी पुष्कळांवर उपकार करणेंच आहे. म्हणून त्यास पुण्यच म्हटलें पाहिजे. तसेंच आपलें बळ दाखविण्याकरितां हजारों मनुष्यांचा प्राण घेणें हें वाईट आहे, म्हणून असें करणाऱ्या मनुष्यास कोणी शूर न म्हणतां महत्त्वाकांक्षी असें म्हणतात; व महत्त्वाकांक्षा हा एक मोठा दुर्गुण समजतात. याकरितांच शिकंदर बादशहा, जुलियस सीझर, नेपोलिअन बोनापार्त, या युरोप खंडांतील पराक्रमी पुरुषांस मनुष्यांचे शुत्रु मानिलें आहे. परंतु असा एखादा शत्रु केवळ आपली शक्ति दाखविण्याकरितां सैन्य घेऊन आपले देशावर स्वारी करून लोकांस त्रास द्यावयास आला तर धैर्यानें पुढें होऊन त्याचा व त्याच्या सेनारूप शक्तीचा नाश करणें यांत शत्रूचा तोटा होईल, परंतु ते विजयी झाले असतां देशांत शिरून शेकडों निरपराध लोकांस व त्यांच्या मुलांबाळांस विनाकारण दुःख देतील, तें टाळणें हा त्यांजवर मोठा उपकारच आहे म्हणून त्यास पुण्यच म्हटलें पाहिजे. याकरितां शौर्य हा मोठा गुण आहे असें लोक समजतात. तसेंच मुलांस स्वेच्छाचार करूं दिला तर तीं अज्ञान होऊन आपलाच नाश करून घेतील, याकरितां त्यांस पाहिजे तें करूं देणें हें त्यांचें प्रिय करणें नव्हे, तर अप्रिय करणेंच होय, म्हणून त्यांस परपीडन अथवा पाप असेंच म्हटलें पाहिजे. हा विषय इतका लांबविण्याचें कारण कीं, कधीं कधीं मनुष्याचा उद्देश पुण्य करण्याचा असून भलत्याच कृत्यास पुण्य समजून त्याचें आचरण करितात, याकरितां वरील संस्कृत श्लोकांत

दिल्याप्रमाणें पापपुण्याचें लक्षण मनांत ठेवून त्याप्रमाणें आचरण करणें यांत सर्वांचें हित आहे. येथें सर्वांस लागू असा साधारण पापपुण्याचा विचार केला आहे. दुसऱ्या मनुष्यांशीं संबंध नसणारे वेगळाल्या धर्मांत पापपुण्याचे जे भिन्न भिन्न मार्ग सांगितले आहेत त्यांचा उल्लेख यांत केलेला नाहीं.

---

## क्रोध.

नकोरे मना क्रोध हा खेदकारी ।

रामदास.

कामादिक सहा मनोविकार, ज्यांस मनुष्याचे रिपु असें मानिलें आहे, त्यांपैकींच क्रोध हा एक आहे. वनस्पतींमध्यें अशा कांहीं विषारी आहेत कीं, त्या खाल्ल्यास मनुष्य मरतो, पण, त्याच कित्येक औषधांच्या उपयोगीं पडतात. असेंच क्रोधाचें आहे. क्रोध हा मनुष्याचा शत्रू आहे यांत संशय नाहीं. यानें हजारों मनुष्यांचे घात केले आहेत. शत्रूला ठार मारण्यापेक्षां त्यास जेर करून आपल्या ताब्यांत आणून त्यापासून आपलीं कामें करून घेणें यांतच मोठें सामर्थ्य व भूषण आहे. तसेंच जो मनुष्य कधींही क्रोध न येण्याची संवय करूं पाहतो, त्यापेक्षां जो क्रोधाच्या स्वाधीन न होतां त्यापासून कांहीं हित व्हावयाची वेळ आली तरच योग्य कारणानें योग्य वेळीं क्रोध यावा, अशी संवय करितो तो अधिक शहाणा होय. क्रोध समूल नाहींसा करण्यास मनुष्यानें झटणें व्यर्थ आहे, कारण, तसें होणें नाहीं. कदाचित् तसें झालें असतां संसारी मनुष्यास तें उपयोगीही नाहीं. भारवि कवीनें ह्मटलें आहे 'अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन च विद्विषादरः' ज्यास क्रोध नाहीं तो मनुष्य तृणवत् होय, त्याच्या स्नेहापासून संतोष नाहीं व द्वेषापासून भयहि नाहीं. जिवाची आशा सोडून मरण्यास तयार झालेल्या तपस्व्यानें क्रोध समूल नाहींसा केला तर चालेल. पण जगांत घरदार करून राहणा-

त्यांस थोडासा क्रोध पाहिजेच; मात्र तो स्वाधीन असला पाहिजे; नाहीं तर नाश करील. स्वदेशप्रीति, शौर्य, इत्यादि गुणांचा क्रोधाशीं संबंध आहे. परदेशच्या राजांनीं आपल्या देशांत राज्य करून आपल्या लोकांस गुलामासारखें वागवावें, याचा राग आला नसता तर शिवाजी राजासारख्या पुरुषांच्या हातून एवढाल्या शौर्याचीं व स्वदेशप्रीतीचीं कृत्यें कशीं झालीं असतीं ? विशेष काय; पण ज्या मनुष्यास योग्य कालीं क्रोध येत नाहीं त्याच्यानें खरा न्याय देखील होणें नाहीं. एकादा वाईट मनुष्य गरिबांस विनाकारण त्रास देतांना आपण पाहिला आणि आपणांस वाईट वाटून क्रोध न आला तर, त्या गरीब मनुष्यास सोडवून वाइटास राजाकडे नेऊन शासन करवावें असें अक्रोध मनुष्यास वाटेल काय ? अक्रोध व्हा, असें ह्मणण्यापेक्षां एका साधूचें वाक्य आहे, तें फार चांगलें आहे. ‘ क्रोध येऊं द्या, पण पाप करूं नका.’

क्रोधापासून अहित न होण्याकरितां मनुष्यानें तीन गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत.

१. कारणाशिवाय क्रोध येतो तो न येऊं देण्याची संवय केली पाहिजे.

२. क्रोध आला असला तर एकदम थांबवून धरतां येण्याची संवय केली पाहिजे.

३. क्रोधाशिवाय काम होत नाहीं असें वाटलें तर कामापुरता बळेंच क्रोध आणून तो लागलाच सोडतां आला पाहिजे. या संबंधाचें हें वचन आहे.

खरीं कारणें राग येण्यास थोडीं।ह्मणूनी सदा शांतता आंगिं जोडी

पहिली संवय होण्याकरितां असें केलें पाहिजे कीं, अंतःकरण स्वस्थ असेल तेव्हां क्रोधाचा परिणाम किती भयंकर आहे,किती चांगल्या मनुष्यांच्या हातून क्रोधामुळें दुष्कृत्यें घडलीं आहेत, ह्याचा वारंवार विचार केला पाहिजे. क्रोधाचा स्वभाव विजे-

सारखा आहे. ती ज्यावर पडते त्याचा नाश करिते; त्याप्रमाणें क्रोध अंतःकरणाचा नाश करूं पहातो. जो मनुष्य क्रोधांत असतो तो बेशुद्ध असतो. क्रोधानें मनुष्याचा हलकेपणा बाहेर पडतो. मुलें, बायका, रोगी, यांस लवकर राग येतो याचें कारण हेंच होय.

दुसरी संवय अशाकरितां केली पाहिजे कीं, मनुष्यास गैर समजुतीनें क्रोध पुष्कळ वेळां येत असतो; मग क्रोध आल्यावर त्याची चूक त्याचे पदरांत पडली तरी रागाच्या अमलांत तो भलतेंच कृत्य करतो. कित्येक कोमल अंतःकरणाचे मनुष्य असतात त्यांस सहज कोणी थट्टेनें कांहीं बोललें तरी क्रोध येतो. अशा मनुष्यास ही संवय अवश्य पाहिजे. कित्येक मनुष्य असे असतात कीं, दुसऱ्यांनीं त्यांस क्रोध आणण्याचा बेत केला तरी ते सहसा रागावत नाहींत. पण एकदा रागावले म्हणजे फारच रागावतात. त्यांनींही ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

तिसरी संवय अशाकरितां पाहिजे कीं, आपलीं आवडतीं मुलें वगैरे एकाद्या वेळेस विद्यावगैरे करण्याचें सोडून भलतेंच काम करतात, त्या वेळेस आपले मनांत त्यांविषयीं प्रीति असते तरी बाहेरून क्षणभर रागें भरलें पाहिजे. अशा वेळेस क्रोधाचें पुरतें सोंग आलें नाहीं तर त्याचा कांहीं इष्ट परिणाम व्हावयाचा नाहीं. असें आहे तरी क्रोधाचें काम होतांच तो सोडून दिला पाहिजे.

इतर मनोवृत्तींचेंहि असेंच आहे. त्यांच्या स्वाधीन मनुष्य झाला तर त्याचा नाश होतो, तथापि त्या यत्किंचित् तरी संसारी मनुष्याच्या अंगीं असणें अवश्य आहे. काम म्हणजे जिव्हा, कर्ण नेत्र, त्वचा घ्राण, या ज्ञानेंद्रियांस तृप्त करण्याची इच्छा. ही इच्छा मनुष्याच्या जीवनास व सुधारणेस अवश्यक आहे. केवळ खाण्याकरितांच मनुष्यानें वांचूं नये; पण ऐहिक व पारलौकिक सुखाचें साधन जें शरीर तें चांगले पदार्थ खाऊन दृढ ठेवणें हें मनुष्याचें कर्तव्यच आहे. एका साधूनें म्हटलें आहे ' खा-

ण्याकरितां जगूं नको, जगण्याकरतां खा.' याप्रमाणें इतर इंद्रियांच्या विषयांचेंहि आहे. मनुष्यांस गोड शब्द ऐकण्याची, चांगली वस्तु पाहण्याची, मऊ वस्त्रें पांघरण्याची व चांगला वास घेण्याची इच्छा नसली तर, चांगल्या कविता, उत्तम चित्रें, काश्मिरी शालजोड्यांसारखीं वस्त्रें, गुलाबी अत्तरासारखे वासाचे पदार्थ, लोक कशाकरितां उत्पन्न करतील? ईश्वरानें सृष्टीमध्यें उत्पन्न केलेले उत्तम उत्तम पदार्थ सोडून अंगास राख लावून पशूसारखें फिरण्यापेक्षां त्यांचे स्वाधीन न होतां त्यांचें मर्यादित सेवन करून विरक्त असतो तोच पुरुष शहाणा होय.

---

## लोभ.

'लोभः पापस्य कारणम्.'

मनुष्यांस लोभ नसला तर जगांत मोठाले व्यापार चालावयाचे नाहींत, व मोठाल्या इमारती व्हावयाच्या नाहींत. फार तर काय, पण कोणत्याच प्रकारची सुधारणा व्हावयाची नाहीं. याकरितां संसारी मनुष्यांस लोभ असणें अवश्यक आहे; मात्र तो दुर्गुणरूपानें असूं नये. म्हणजे दुसऱ्या कोणाचेंही नुकसान न करितां आपलें वैभव वाढविण्याची इच्छा मनुष्यांनीं केली तर तीस दुर्गुण म्हणतां येणार नाहीं. तसेंच हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपण जें वैभव मिळवितों तें केवळ संचय करण्याकरितां नव्हे, तर त्याचा योग्य वेळीं आपणास व्यय करितां यावा यासाठीं होय. यास्तव तसा प्रसंग येतांच मोठ्या श्रमानें संपादित केलेल्या वैभवाचा तृणाप्रमाणें व्यय करण्यास संपादकानें सिद्ध असावें; म्हणजे त्याच्या संपादक स्वभावास दुर्गुण म्हणतां येणार नाहीं.

---

## मोह.

मोठें वैभव असलें, स्त्री, पुत्र, व मित्र इत्यादि कितीही

आप्तवर्ग असले, तथापि या साडेतीन हात देहाची मृत्तिका होण्याची वेळ आली ह्मणजे यांपैकीं कांहीं उपयोगीं पडत नाहीं; असें असून संसारी मनुष्य या सर्वांस भुलून अक्षय्यसुखसाधनाच्या मार्गास विसरतो; आणि यांच्या रक्षणाकरितां अनेक प्रकारचीं पातकें करितो, अशी जी मनुष्यांची मनोवृत्ति तिला मोह म्हणतात. या मोहजालांतून सुटून पारलौकिक सुखास पात्र होण्याचा प्रत्येकानें यत्न करणें हें त्याचें कर्तव्यच आहे. याकरितां वर सांगितलेले कनकादिक पदार्थ आपल्या पारलौकिक मार्गास अंतरायभूत होणार नाहींत अशा रीतीनें त्यांचा उपभोग घ्यावा एवढाच, मोह घालविणें याचा खरा अर्थ होय.

कित्येक अज्ञानानें असें समजतात कीं, संसार हा सर्व दुःखांचें मूळ होय, म्हणून त्याचा एकदम त्याग करून लंगोटी नेसून व अंगास राख लावून जगांत भटक्या मारीत फिरावें. यासच मोहांतून सुटणें असें ते सजतात. परंतु ईश्वराच्या सृष्टिरचनेवरून पाहतां जगाच्या स्थितीस हें योग्य आहे, असें दिसत नाहीं. कारण, सर्वांस जर क्षुधा लागते तर सर्वांनीं निर्वाहाचे पदार्थ उत्पन्न करण्यास श्रम करण्याकरितां आपला कांहीं तरी काल खर्चिला पाहिजे. तसेंच दुसऱ्याच्या ममतेपासून आपलें रक्षण झालें आहे तर आपणहि दुसऱ्याचें रक्षण करून ईश्वरापाशीं ऋणमुक्त झालें पाहिजे.

ज्ञानासारखें परलोकसाधनास दुसरें कोणतेंहि साधन नाहीं, असें आपण म्हणतों व तें ज्ञान शरीर स्वस्थ असल्याशिवाय प्राप्त होत नाहीं, याकरितांच 'शरीरमाद्यं खलु धर्मकारणं' असें एका कवीनें म्हटलें आहे. शरीर स्वस्थ राहण्यास अन्नादि सामुग्री जगांत असली पाहिजे, ती मनुष्यांच्या सामाजिक श्रमाशिवाय उत्पन्न होत नाहीं, याकरितां मनुष्यांनीं एकमेकांवर प्रीति करून एकत्र राहिलें पाहिजे, हाच ईश्वरी न्याय असावा असें दिसतें. परलोक अंतरेल म्हणून ऐहिक सर्व सुख सोडून देणें हें अजीर्ण होईल म्हणून

उपोषण करण्यासारखें आहे. मनुष्यें स्त्री पुत्रादिकांवर वाजवीपेक्षां फाजील ममता करितात, त्याचा मृत्यूच्या योगानें वियोग झाला असतां आपल्या हातीं कांहीं नाहीं असें ठाऊक असतां दुःखी होऊन स्वहितास अंतरतात, हें त्यांचें अज्ञान होय. योग्य रीतीनें संसाराचा उपभोग घेतां येत नाहीं, म्हणून लोक त्यास वाईट म्हणतात. एरव्हीं संसारांत राहून स्त्रीपुत्रांवर ममता केल्यानें परलोक अंतरेल असें म्हणतां येत नाहीं. परलोक अंतरण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे दुराचरण होय. मोहाच्या योगानें जो दुराचरण करणार नाहीं तो संसारसागर तरून जाईल यांत संशय नाहीं.

---

## महत्त्वाकांक्षा.

मोठेपणाची इच्छा सर्वांस आहे. विद्या, ज्ञान संपादून व न्यायानें वागून मोठेपणा मिळविणें हें मनुष्याचें कर्तव्यच आहे. परंतु आपल्या अंगबलानें लोकांस जेर करून महत्त्व संपादणें हें पाप होय. अशा प्रकारानें मोठें होण्याची इच्छा हा दुर्गुण होय. ईश्वरानें मनुष्यांस शक्ति दिली आहे ती दुसऱ्यांस पीडा करून स्वहित करण्याकरितां दिली नाहीं, तर दुसऱ्याचें रक्षण करण्याकरितां दिली आहे. महत्त्वाकांक्षेमुळें मनुष्य नेहमीं उद्योगी असतो, हें चांगलें आहे. पण जी आपणास लोकांचीं मनें दुखविल्याशिवाय प्राप्त होणार नाहीं, व प्राप्त झाली असतां लोकांस चांगलें वाटणार नाहीं, अशी वस्तु मिळविण्याविषयीं कोणी इच्छा करूं नये. साधारण मनुष्य महत्त्वाकांक्षी असला तर त्यापासून लोकांस विशेष पीडा होत नाहीं, परंतु त्याचें मन मात्र नेहमीं दुःखी असतें. जो मनुष्य वर्तमानस्थितींत सुखी नसून नेहमीं मोठेपणाची इच्छा करीत बसतो, तो कधींच सुखी होत नाहीं. कारण, जगांत जसा एक हा मोठेपणा मिळविण्यास यत्न करितो, तसे दुसरे लोकहि करित असतात. मग ह्याच एकटा

मोठा कशानें होणार? एकाद्या देशांतील सर्व लोकांपेक्षां यास मोठी स्थिति मिळेल अशी आपण क्षणभर कल्पना करूं. असें होऊन तरी हा सुखी होईल काय? अधाशी भुकेल्या मनुष्यापुढें पक्वान्नाचीं ताटें भरून ठेविलीं असतां, त्याचें पोट भरल्यावर अधिक खाववत नाहीं म्हणून जसें त्यास वाईट वाटतें तसेंच या अधाशी महत्त्वाकांक्षी मनुष्यास वाटणार आहे. अशीं उदाहरणें पुष्कळ आहेत.

राजकीय मनुष्याचे अंगीं महत्त्वाकांक्षा असली म्हणजे फारच भयंकर परिणाम होतात. साधारण मनुष्याच्या मनांत लोकांस पीडा देऊन मोठें व्हावें असें वाटलें तरी तसें करण्याचें त्यापाशीं सामर्थ्य नसतें. कदाचित् त्यानें कांहीं पीडा केली तरी त्यास राजाकडून शिक्षा करवितां येते. परंतु ज्याच्या हातीं फौज आहे, असा मनुष्य महत्त्वाकांक्षी झाला म्हणजे काय विचारावें? लोकांस 'दे माय धरणी ठाय,' असें होऊन जिकडे तिकडे रक्ताच्या नद्या वाहूं लागतात. ग्रीस देशाचें निष्कंटक राज्य आणि इतर पुष्कळ देशांचीं राज्यें मिळवून शिकंदर बादशाहाची तृप्ति झाली नाहीं. एवढें राज्य असून व तें चालविण्यास शहाणपणा असून, स्वदेशांत स्वस्थपणानें दहा पांच वर्षें या पुरुषानें राज्य केलें नाहीं. काय दैव हें! नेहमीं श्रम केल्यामुळें यास परदेशांत अकालीं मरण आलें. मृत्यूपढें कोणाचें चालत नाहीं. पण हें खचीत आहे कीं, जर हा अप्रतिम बुद्धिमान् पुरुष मिळालेल्या वैभवानें तृप्त असून स्वदेशांत राहून चांगले कायदेकानू करून राज्याची व्यवस्था ठेवता तर याच्या पाठीमागें पुष्कळ दिवस सतत चांगलें राज्य चालून अकबर, *शार्लेमन, यांप्रमाणें त्याची चांगलेपणाविषयीं अक्षय कीर्ति राहिली असती.

शिकंदर बादशाहाप्रमाणेंच जुलियस सीझर हा पुरुष मोठा

---

* हा खिस्ती शकाच्या आठव्या शतकांत युरोपखंडांत नामांकित राजा होऊन गेला.

बुद्धिमान् होता. हा उत्तम विद्वान्, उत्तम ग्रंथकार्ता, उत्तम वक्ता असून मोठा शूर होता. यानें युरोपखंडांतील पुष्कळ देश जिंकून रोमच्या राज्यास जोडले, व शेवटीं ग्रेटब्रितन या बेटांतसुद्धां रोमन लोकांचे विजयध्वज उभारिले. रोमन लोकांच्या राज्यांत जुलमी राजे फार झाल्यामुळें त्यांस राजा हा शब्दसुद्धां अप्रिय झाला होता. लोकसत्ताक राज्याची त्यांस आवड असे. सीझरानें मोठाले पराक्रम केल्यामुळें त्यास आपण राजा व्हावें असें वाटत होतें, त्यामुळें रोमन लोकांतील कांहीं बडे लोकांनीं भर सभेंत त्याचा वध केला. या कामांत त्याचे मित्रसुद्धां होते. सीझर स्वभावतः फार दयाळू असे; पण महत्त्वाकांक्षेमुळें त्यानें लढाया फार केल्या. सीझराच्या सर्व लढाया मिळून एकंदर सुमारें दहा लक्ष मनुष्यें प्राणास मुकलीं असें म्हणतात. काय हा महत्त्वाकांक्षेचा भयंकर परिणाम !

शिकंदर व सीझर यांचीं उदाहरणें फार प्राचीन काळीं घडलीं. पण हल्लींच्या शतकांतील नेपोलिअन बोनापार्त बादशाहाचें उदाहरण त्यांपेक्षांहि चमत्कारिक आहे. शिकंदर बादशाहा गर्भश्रीमंतच होता. तो ज्या स्थितींत जन्मास आला ती मोठी करण्याची त्यास इच्छा झाली, असें म्हटलें तरी चालेल. बोनापार्तांचें तसें नाहीं. हा कार्सिका बेटांत इसवी सन १७६९ या वर्षीं जन्मला असून, प्रथम फ्रान्स देशांत लष्करी खात्यांत तोफखान्यावर अंमलदार होता. या वेळेस फ्रान्स देशांत राजाविरुद्ध बंड झालें होतें. शेवटीं बंडवाले लोकांनीं सोळावा लुई राजा याचा वध केला. नंतर फ्रान्सांत फार बंडाळी झाली. ती नेपोलियन यानें मोडून टाकिली; त्या वेळेस हा मुख्य सेनापति होता. याची कीर्ति सर्व युरोपांत पसरली. कांहीं दिवसांनीं हा फ्रान्सांतील लोकसत्ताक राज्याचा मुख्य अधिकारी झाला. ( १७९९. ) शेवटीं १८०४ या वर्षीं यास फ्रेंच लोकांनीं बादशहा केलें. एवढ्यानें त्याची तृप्ति न होऊन त्यानें सर्व यूरोप-

खंड जिंकण्याचा निश्चय केला. याच्या हाताखालीं लाख फौज नेहमीं असे, असें ह्मणतात. लढाईच्या कामांत हा फारच चतुर होता. यूरोपांतील लोक याच्या नांवाससुद्धां भिऊं लागले होते. यानें थोड्या श्रमानें नेपल्स, हॉलंद, वेस्तफालिया, एथील राज्यें जिंकून तितके ठिकाणीं आपले भाऊ गादीवर बसविले. शेवटीं स्पेन देशच्या राजास पदच्युत करून तें राज्यहि त्यानें आपल्या भावास दिलें! एवढ्यानें तृप्त न होऊन त्यानें रशिया देशावर मोठी फौज घेऊन स्वारी केली. रशियन लोकांनीं मास्को शहर जाळून फ्रेंचांचा पराभव केला, शिवाय थंडीनें नेपोलियन याचे फार लोक मेले, तेव्हां तो परत आला. पुढें त्यानें तीन लक्ष पन्नास हजार फौज घेऊन आस्ट्रिया, प्रशिया व रशिया या तिघांच्या जमलेल्या सैन्याबरोबर लढाई केली. या लढाईंत तो पराभव पावून पदच्युत झाला (१८१३). त्यास एल्बा बेटांत राहण्याची परवानगी दिली. पुढें (१८१५) नेपोलियन एकाएकीं पळून फ्रान्स देशांत आला आणि अठरावा लुई यास पळावयास लावून आपण गादीवर बसला; आणि पुनः यूरोपांतील राजांशीं लढाया करूं लागला. शेवटीं तारीख १८ जून रोजीं वातर्लु एथें मोठी लढाई झाली. तींत ड्यूक ऑफ वेलिंगतन इंग्लिश सैन्याचा अधिकारी, ज्यानें हिंदुस्थानांत पुष्कळ लढाया जिंकिल्या, त्यानें नेपोलियन याचा पूर्ण पराभव केला. नंतर त्यास सेंट हेलीना या बेटांत नेऊन ठेविलें. तेथें तो इ० स० १८२१ सांत मरण पावला.

शिकंदर व सीझर यांच्या मानानें पाहिलें तर नेपोलिअन याचे पराक्रम फारच मोठे असें म्हटलें पाहिजे. सीझरानें देश जिंकिले, ते सर्व अडाणी होते. पण नेपोलिअन यानें सर्व सुधारलेलें यूरोपखंड गाजवून दिलें होतें. अहाहा! काय हें शौर्य! काय हा पराक्रम! काय ही बुद्धि! नेपोलिअन बादशहाचे सर्व उद्देश सिद्धीस जाते तर त्यास लोकांनीं अवतारी मानिलें असतें.

यांत संशय नाहीं. फ्रान्स देशाच्या आधिपत्यानें तृप्त असून नेपोलिअन यानें देशसुधारणेकडे ही बुद्धि लाविली असती तर फ्रान्स देशाची आज किती उत्तम स्थिति असती ! नेपोलिअन या नांवास किती मान मिळाला असता ! नेपोलिअन याची बुद्धि इतकी चांगली होती कीं, त्यानें जे कायदे केले आहेत ते अद्याप फ्रेंच लोकांस फार आवडतात. नेपोलिअन स्वभावानें व सद्गुणांनीं चांगला होता, पण दुष्ट महत्त्वाकांक्षेमुळें त्याच्या सर्व चांगुलपणावर पाणी पडलें.

---

## आरोग्य.

शरीरप्रकृति चांगली राखण्यास प्रत्येक मनुष्यानें जपलें पाहिजे. ज्यास आरोग्य नाहीं, त्याच्यानें स्वहित किंवा परहित कांहीं व्हावयाचें नाहीं. तो कितीही बुद्धिमान् असला तरी त्यास विद्या व्हावयाची नाहीं. सुखोपभोगाची साधनें असलीं तरी, त्यास सुख व्हावयाचें नाहीं. सर्व संपत्तींमध्यें शरीरसंपत्ति मोठी होय. प्रकृति निरोगी राहण्यास वैद्य नेहमीं जवळ बाळगिले पाहिजेत, अथवा रसायनें व मात्रा यांचा संग्रह केला पाहिजे असें नाहीं. आपल्या प्रकृतीस काय मानवतें, व काय बाधतें, हें बहुशः सर्वांस समजतें. जे पदार्थ आपल्या प्रकृतीस मानतील त्यांचेंच सेवन करावें. एकादा पदार्थ आवडत असून प्रकृतीस मानत नसेल तर त्याचा त्याग करावा. बाळपणीं आपण धिटाईनें वागतों, तसें मोठेपणीं वागलें तर बाधक होईल. आरोग्य राहण्याकरितां खाण्यापिण्याचा बेत नेहमीं ठेविला पाहिजे. मुलांस समजत नसतें तेव्हां आईबापांनीं त्यांस नियमित राखण्याविषयीं तजवीज ठेवावी. समजूं लागल्यावर ज्याचें त्यानें स्वतां जपलें पाहिजे. कधीं न पाहिलेला पदार्थ आपणांस मिळाला तर त्याचें फार सेवन करूं नये. झोंपेचा बेत राखिला पाहिजे. दिवसास कधींहि निजूं नये व रात्रीस फार जागूं नये. दिवसास निद्रा व रात्रीस जागरण

हीं दोन्ही रोगांचीं मुळें आहेत. नेहमीं व्यायाम केला पाहिजे. व्यायाम केला नाहीं तर, अन्नपचन न होऊन प्रकृति बिघडते. आपल्या देशांतील श्रीमंत लोक अगदीं अशक्त असतात, याचें मुख्य कारण ते व्यायाम करीत नाहींत हें होय. परदेशांत प्रवासांत असतां आपल्या नेहमींच्या संवयी सोडून तेथील हवेच्या मानानें वागलें पाहिजे.

आरोग्य इच्छिणाऱ्यानें शरीर, वस्त्र, पात्र, यांस स्वच्छ ठेविलें पाहिजे. सर्वकाल असंतुष्ट असून कपाळास आंठ्या घालणें, व नेहमीं क्रोधांत असणें, यांपासून प्रकृति बिघडते; म्हणून सर्वदा संतुष्ट व शांत असण्याची संवय करावी. दुःखाचा प्रसंग गुदरल्यास त्रास करून शरीरास इजा करून घेऊं नये. शरीरप्रकृति नीट असतां, व्यायाम करून जशी ती नीट राखिली पाहिजे; त्याप्रमाणें दुखणें आलें असतां पथ्यास फार जपावें. औषधांपेक्षां पथ्यच मुख्य, अशाविषयीं वैद्यशास्त्राचें मत आहे तें खालीं लिहितों.

[1]पथ्ये सति गदार्तस्य किमौषधनिषेवणम् ॥
पथ्येऽसति गदार्तस्य किमौषधनिषेवणम् ॥

सांप्रत परकीय शिक्षणानें अर्धसंस्कृत झालेल्या कित्येकांस असें वाटतें कीं धर्माचरणाचा आणि आरोग्याचा काय संबंध आहे ? तथापि हें त्यांचें म्हणणें चुकीचें आहे. सतत आरोग्य राहण्यास धर्माचरण आवश्यक आहे असें आर्य वैद्यशास्त्रकारांनीं सांगितलें आहे. प्रसिद्ध 'आष्टांगहृदयकार' वाग्भट यांनीं आपल्या ग्रंथांत आरोग्याविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें लिहिलें आहे.

---

१ पथ्यानें वागेल तर रोग्यास औषध कशाला पाहिजे? पथ्य करणार नाहीं तर रोग्यास औषध देऊन काय उपयोग? मनुष्य पथ्यानें वागेल तर औषधाशिवाय देखील बरा होईल, पथ्य करणार नाहीं तर औषध फुकट जाईल. असें तात्पर्य.

जीर्णे हितं मितं चाद्यान्न वेगानीरयेद्बलात्
न वेगितोन्यकार्यः स्यान्नाजित्वाऽसाध्यमामयम्॥ १ ॥

पूर्वी खाल्लेलें अन्न जिरल्यावर चांगलें परिमित अन्न खावें. क्षुधादिकांचा वेग मुद्दाम उत्पन्न करूं नये, व स्वाभाविक वेग उत्पन्न झाला असतां त्यास दाबून दुसरें काम करूं नये. तसेंच असाध्य रोगाकडे दुर्लक्ष करून दुसरा उद्योग करूं नये.

सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः ॥
सुखं च न विना धर्मात्तस्माद्धर्मपरो भवेत् ॥ २ ॥

सर्व प्राण्यांच्या सर्व प्रवृत्ति सुखाकरतां आहेत आणि सुख तर धर्मावांचून प्राप्त होत नाहीं, याकरतां सर्वदा धर्माचरण करावें.

हिंसास्तेयान्यथाकामं पैशून्यं परुषानृते ॥
संभिन्नालापव्यापादमभिध्यादृग्विपर्ययम् ॥
पापं कर्मेति दशधा कायवाङ्मनसैस्त्यजेत् ॥ ३ ॥

१ परपीडा, २ चोरी, ३ वाईट इच्छा, ४ पैशून्य, ५ कठोरता, ६ असत्य, ७ कपटोक्ति, ८ द्रोह, ९ अनिष्टचिंतन, १० क्रूरदृष्टि, हीं दहा पापकर्मे शरीर, वाणी आणि मन यांनीं वर्ज्य करावीं.

अवृत्तिव्याधिशोकार्तानुनुवर्तेत शक्तितः ॥
आत्मवत्सततं पश्येदपि कीटपिपीलिकम् ॥ ४ ॥

दरिद्री, रोगी, शोकपीडित यांस यथाशक्ती मदत करावी. किडामुंगीवर सुद्धां आपल्याप्रमाणेंच सुखदुःख होतें हें ध्यानांत ठेवावें.

अर्चयेद्देवगोविप्रवृद्धवैद्यनृपातिथीन् ॥
विमुखान्नार्थिनः कुर्यान्नावमन्येत नाक्षिपेत् ॥ ५ ॥

देव, गाई, ब्राह्मण, वृद्ध, वैद्य, राजा, अतिथि यांचा संतोष ठेवावा. याचकांस विमुख परत लावूं नये, कोणाचाहि अपमान किंवा निंदा करूं नये.

उपकारप्रधानः स्यादपकारपरेप्यरौ ॥
संपद्विपत्स्वेकमना हेतावीर्ष्येत्फले न तु ॥ ६ ॥

अपकार करणाऱ्या शत्रूवरहि उपकार करावा. संपत्ति आणि विपत्ति या दोहोंत सारखा स्वाधीनपणा ठेवावा. सत्कर्मांच्या हेतूची चढाओढ ठेवावी, फलाची ठेवूं नये.

काले हितं मितं ब्रूयादविसंवादि पेशलम्
न कंचिदात्मनः शत्रुं नात्मानं कस्यचिद्रिपुम् ॥
प्रकाशयेन्नापमानं न च निःस्नेहतां प्रभोः ॥ ७ ॥

योग्य वेळीं हितकारक, खरें, सुंदर असें मित भाषण करावें. आपला कोणी शत्रु आहे किंवा मित्र आहे हें प्रसिद्ध करूं नये. अपमान झाला किंवा धन्याची अवकृपा झाली तर सांगूं नये.

न पीडयेदिंद्रियाणि न चैतान्यतिलालयेत् ॥
त्रिवर्गशून्यं नारंभं भजेत्तं चाविरोधयन् ॥ ८ ॥

इंद्रियांला पीडा देऊं नये व त्यांचे लाडहि करूं नये. धर्म, अर्थ, काम हे पुरुषार्थ ज्यांत नाहींत असें काम आरंभूं नये. परस्पर विरोध होणार नाहीं अशा रीतीनें यांचें सेवन करावें.

आचार्यः सर्वचेष्टासु लोक एव हि धीमतः ॥
अनुकुर्यात्तमेवातो लौकिकेऽर्थे परीक्षकः ॥ ९ ॥

बुद्धिमानाला सर्व व्यवहारांमध्यें चांगले लोक हाच गुरु होय. याकरतां लौकिक गोष्टींत शहाण्यानें त्यांचेंच अनुकरण करावें.

आर्द्रसंतानता त्यागः कायवाक्चेतसां दमः ॥
स्वार्थबुद्धिः परार्थेषु पर्याप्तमिति सद्व्रतम् ॥ १० ॥

सर्व भूतांवर दया करणें, यथाशक्ति दान करणें,शरीर,वाणी, मन, हीं स्वाधीन ठेवणें, स्वकार्याप्रमाणें परकार्यास झटणें, हें संपूर्ण सज्जनांचें व्रत होय.

नक्तं दिनानि मे यांति कथंभूतस्य संप्रति ॥
दुःखभाङ् न भवत्येवं नित्यं संनिहितस्मृतिः ॥ ११ ॥

सांप्रत रात्रंदिवस माझा काळ कोणत्या रीतीनें जातो याची जो नेहमीं आठवण ठेवितो त्याला दुःख व्हावयाचें नाहीं.

## राज्यसुख.

मृत्युलोकीं सर्वांत मोठें सुख म्हणजे राज्यसुख होय, असें लोक समजतात. मनुष्याचा स्वभाव असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, शहाणपण नसल्यास त्यास कोणत्याच स्थितींत सुख व्हावयाचें नाहीं. फार दारिद्र्य असलें म्हणजे जसा मनुष्य घोंटाळून जातो त्याचप्रमाणें ज्या मनुष्यास सर्व गोष्टी अनुकूल आहेत, कोणत्याही गोष्टीची गरज राहिली नाहीं, तो मनुष्यहि अगदीं कामांतून जातो. या गोष्टीस पुष्कळ राजांचीं उदाहरणें आहेत. स्वदेशाचें राज्य निष्कंटक प्राप्त झालें म्हणजे राजास वास्तविक कोणतीहि दधात नसते. पण दुसरा कांहीं उद्योग नसल्यामुळें, परदेशावर स्वाऱ्या कराव्या, असें पुष्कळ राजांस वाटतें. अंगांत पराक्रम नसला म्हणजे परदेशावर स्वाऱ्या होत नाहींत, तेव्हां भलभलत्या दुष्कृत्यांत राजेलोक काळ घालवितात; यास उदाहरण, महमद तघलख, धाकटा बाजीराव, यांसारखे आजपर्यंत पुष्कळ राजे झाले. राज्य मिळालें तरी तें संभाळण्याचें काम फार कठीण आहे. बायका, मुलगे, आप्त, प्रधान, प्रजा, शत्रु, या सर्वांपासून राजास फार भय असतें. इंग्लंदचा राजा दुसरा एडवर्ड याचा वध होण्यास त्याची राणी कारण झाली. दिल्लीचा बादशहा शहाजहान व इंग्लंदचा राजा दुसरा हेनरी यांस त्यांच्या पुत्रांनीं पदच्युत केलें. आपल्या पुत्रास गादी प्राप्त व्हावी म्हणून आनंदीबाईनें नारायणराव पेशव्यास ठार मारविलें. इंग्लंदचा राजा पहिला चार्लस याचा लोकांनीं शिरच्छेद केला. फ्रान्स देशाचा बादशाहा नेपोलिअन यास शत्रूंनीं धुळीस मिळविलें. अशीं उदाहरणें इतिहासांत शेकडों सांपडतील.

लहानशा कुटुंबांतील मनुष्यांवर दाब बसवून संसार सुरळीतपणें करण्याचेंच बहुतेकांस कठीण पडतें, मग वर सांगितलेल्या सर्वांवर दाब बसवून सुरक्षितपणें राज्यकारभार चालविणें किती

कठीण आहे! केवढा मोठा राजा असला तरी, तो नेहमीं धाकांत असतो. विशेष काय, कित्येकांस स्वस्थ झोंपसुद्धां येत नाहीं. 'गरीब लोक आपल्या लहानशा झोंपडींत सुखानें झोंप घेतात; ते आम्हांपेक्षां किती सुखी आहेत!' असें पुष्कळ राजांच्या मुखांतून निघालें आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं राज्यसुख जेवढें मोठें आहे, म्हणून इतरांस वाटतें त्याच्या शतांशाचासुद्धां राजास अनुभव नाहीं.

---

## स्तुति आणि निंदा.

स्तुति सर्वांस आवडते. स्तुति न आवडणारा मनुष्य जगांत एकसुद्धां सांपडणें कठीण. स्तुति आवडणें हा सर्वांशीं दोषच आहे असें नाहीं. अंशतः हा गुणच आहे, म्हटलें तरी चालेल. कारण, आपणांस लोकांनीं चांगलें म्हणावें म्हणून बहुतेक लोकांची सद्गुणाकडे प्रवृत्ति होते. तथापि लोकांनीं स्तुति करावी, एवढ्याकरितांच चांगल्या कृत्याकडे तत्परता नसावी; असें असलें तर स्तुतिप्रिय मनुष्य लोकांनीं चांगलें म्हणावें म्हणून वाईट कृत्यें करील. जगांत लोक चांगल्यास चांगलें व वाईटास वाईट म्हणतात. असा नियम नाहीं. म्हणून जें कृत्य चांगलें आहे, त्यास अज्ञान लोकांनीं वाईट म्हटलें तरी, तें करण्यास शहाण्यानें मागें हटूं नये. तसेंच एकादी वाईट गोष्ट दहा वीस अज्ञान लोकांनीं चांगली म्हटली म्हणून ती करूं नये. निंदेस न भिणारे जगांत पुष्कळ आहेत, तरी ती कोणास आवडत नाहीं, हें खचित आहे. कधीं कधीं लोक उगाच निंदा करितात तरी साधारणपणें लोकनिंदेस भिऊन चालणें चांगलें.

सद्गुण आणि स्तुति ही बहुशः उलट प्रमाणानें रहातात. हलक्या प्रतीच्या सद्गुणांची लोकांत स्तुति फार होते. एकंदर लोकसंख्येंत अडाणी लोक फार, त्यांस मोठ्या सद्गुणाची योग्यता कळत नाहीं. लढाईंत शत्रूंचा पराभव करणाऱ्या वीरांपेक्षां

शहाणपणानें राज्य चालवून शत्रूंवर दरारा ठेवणाऱ्या प्रधानाची लोकांत स्तुति कमी होते. वक्तृत्वानें व इतर अनेक कुलुंगडीं करून खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करणाऱ्या वकिलांची लोकांत प्रतिष्ठा होते; तशी न्यायानें चाळणाऱ्या माणसांची होत नाहीं. गुन्हे न करण्यापेक्षां गुन्हे करून जे सांपडत नाहींत, त्यांस लोक हुशार म्हणतात. इष्टमित्रांचें हित करितो त्याची जशी चौघांत वाहवा होते, तशी देशकल्याणाकरितां झटणारांची होत नाहीं. काव्यालंकार शिकलेल्या व्युत्पन्नाची प्रतिष्ठा, न्याय, मीमांसा शिकलेल्या विद्वानांपेक्षां साधारण लोकांत अधिक असते. महालकरी, मामलेदार, वगैरे यःकश्चित् सरकारी कामदारांस लोक रावसाहेब म्हणून मोठा मान देतात; परंतु मुलांस शिकविणाऱ्या गुरूचें नांव निघालें म्हणजे अः पंतोजीचना ? असें म्हणतात. यावरून असें दिसतें कीं, साधारण लोकांच्या स्तुतीकडे अथवा निंदेकडे लक्ष देऊं नये. खरे विद्वान् लोक ज्यास चांगलें म्हणतील तें करावें; व वाईट म्हणतील तें वर्जावें. हजारों अडाणी लोकांपासून चांगलें म्हणून घेण्यापेक्षां दहा पांच शहाण्या लोकांनीं चांगलें म्हणावें यांतच भूषण आहे.

लोकांच्या निंदेस न भिऊन मनुष्यानें स्वहिताकरितां कोणतेंही वाईट कृत्य करूं नये. परंतु जेथें हट्टानें व मूर्खपणानें लोक निंदा करितील, तेथें निंदेकडे लक्ष न देतां खरेपणानें वागावें हेंच योग्य होय. नवीन कल्पना काढणाऱ्यांनीं व नवी चांगली रीति स्थापन करणाऱ्यांनीं ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. जोंपर्यंत त्यांच्या कल्पनेच्या खरेपणाविषयीं लोकांची खात्री झाली नाहीं तोंपर्यंत त्यांची निंदा व्हावयाचीच. अशा प्रसंगीं निंदेस मागें सारून धैर्यानें पुढें सरसावलें पाहिजे. *गालिलिओ, कोलंबस, †लूथन

*१६ व्या शतकांत इताली देशांत मोठा ज्योतिषशास्त्रवेत्ता होऊन गेला. † ख्रिस्ती धर्माच्या प्रातेस्तंत मताचा स्थापनकर्ता.

यांची पहिल्यानें पुष्कळ निंदा झाली; परंतु त्यांनीं झटून आपलें बोलणें खरें करून दाखविलें म्हणून आतां त्यांची अक्षय कीर्ति गाजत आहे. देशाची सुधारणा करूं इच्छिणाऱ्यांनीं ही गोष्ट नेहमी लक्षांत ठेविली पाहिजे. क्षणिक निंदेस भिऊन अक्षय कीर्तीचा लाभ सोडणें हें मर्दाचें काम नव्हे. तसेंच राजादिकांपासून मान मिळाल्यामुळें लबाड लोकांच्या क्षणिक स्तुतीस भुलून असत्पक्षाचें मंडन करणें हाहि मोठाच नीचपणा होय, हेंहि विसरूं नये.

---

## दैव आणि उद्योग.

सर्व लोक दैव आहे असें मानितात. दैव ह्मणून कांहीं भावरूपी वस्तु आहे किंवा नाहीं, हें सिद्ध करण्याचें कठीण आहे, तथापि त्याच्या अस्तित्वाची कोणास शंका येत नाहीं. कार्यावरून कारणाचें अनुमान करण्याचा मनुष्याचा स्वभाव आहे मनुष्य आपल्या सत्कर्मानें व उद्योगानें सुखी होतो; दुष्कर्मानें व आळसानें दुःखी होतो, हें आपण नेहमीं पाहतों. परंतु एकाद्या ठिकाणीं याच्या उलट दृष्टीस पडलें म्हणजे आपण तेथें दैव असें ह्मणतों. आपण असें मानतों कीं, पूर्वजन्मीं मनुष्य जें पापपुण्य करितो, त्याचें फळ त्या जन्मीं भोगिलें नसल्यास या जन्मीं भोगावें लागतें. याकरितां, जगांत कित्येकांस आचरणाविरुद्ध फलप्राप्ति होते. कित्येक साधूंच्या हातून दुष्कृत्य झालें नसतें तथापि त्यांस दुःख होतें. तसेंच कित्येक दुष्टांच्या हातून सत्कृत्य कधींही घडत नाहीं, पण ते सुखीच असतात. याचें कारण त्यांचें जन्मांतरीय पापपुण्य होय, असें शास्त्राचें मत आहे. यावरून आपण पूर्वजन्मीं संचित पापपुण्यासच दैव असें म्हणतों. कित्येक धर्मांतील लोक मनुष्यास पूर्वजन्म असतें, असें मानीत नाहींत. जगांत आचरणाविरुद्ध सुखदुःखें प्राप्त होतात, त्याचें कारण ते असें सांगतात कीं, मनुष्यांच्या अंतःकरणाची परीक्षा पाहण्या-

करितां, देव एकाएकीं त्यांजवर असे प्रसंग आणितो. खरें काय असेल तें असो, पण या मतानें ईश्वराकडे कमीपणा येतो असें दिसतें.

अकस्मात् एकाद्या श्रीमान् मनुष्याची गरिबावर कृपा झाली, अथवा एकाद्या मोठ्या मनुष्याचे मरणानें त्याची संपत्ति कोणास प्राप्त झाली, वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजे, आपण त्या मनुष्यास दैववान् म्हणतों. परंतु वास्तविक पाहिलें तर दैव चांगलें अथवा वाईट करणें बहुशः उद्योगाच्या हातीं आहे असें दिसतें. जसा उद्योग करावा, तसें फल प्राप्त होतें. दैव केवळ पंगु आहे, तें उद्योगाशिवाय उदयास येत नाहीं. उद्योग न करितां दैवावर भरंवसा ठेवणें मूर्खपणाचें काम होय. कधीं कधीं एकाचें मूर्खपण अथवा आळस हें दुसऱ्याचें सुदैव होतें. कारण एकाद्यास एकाएकीं विपुल संपत्ति मिळते ती एकदम आकाशांतून धार पडून मिळत नाहीं; परंतु भोंवतालच्या मनुष्यांपेक्षां अंगीं उद्योग व शहाणपण हीं जास्त असल्यामुळें इतरांपेक्षां याची भरभराट होते. लोकांशीं गोडीगुलाबीनें वागलें म्हणजे ते स्तुति करितात; पण भरभराट होण्याचे गुण वेगळेच आहेत. नीति न सोडतां प्रसंग पडेल तसें वागण्याचें चातुर्य, नम्रता, आर्जव, सतत उद्योग, इत्यादि सुखप्राप्तीचीं साधनें अनेक आहेत. ज्यास आपली स्थिति चांगली करून दैववान् ह्मणवून घ्यावयाचें असेल त्यास आपल्या बोलण्याचालण्यांत वगैरे सर्व लहानसहान गोष्टींत दक्षता ठेविली पाहिजे. उद्योग दैवाचा उत्पादक व रक्षक आहे. अगदीं नीच स्थितींत असून उद्योगानें महत्त्वास आलेल्या पुरुषांचीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. बाळाजी विश्वनाथ पेशवा यःकश्चित् कोंकणचा ब्राह्मण होता; पण उद्योगानें त्यानें आपल्या वंशास पेशवाई मिळविली. बेंजामिन् फ्रांक्लिन एका गरीब मनुष्याचा मुलगा होता, परंतु उद्योगानें वाढत वाढत मोठा श्रीमान् व कीर्तिमान् झाला.

एकाएकीं पैसा मिळवून एकाद्याची भरभराट झाली तरी तो आळशी असला तर, पूर्वस्थितीवर येतो. यास उदाहरणें श्रीमंतांच्या घराण्यांत पुष्कळ सांपडतील.

उद्योगानें महत्त्वास आलेले दूरदर्शी लोक दैवानें आम्हांस ही स्थिति प्राप्त झाली, असें म्हणतात, हें त्यांचें शहाणपण होय. परंतु ते दैवावर भरंवसा ठेऊन चालतात, असें लोकांनीं समजूं नये. कित्येक कृत्यें आरंभितेवेळेस जयच मिळेल अशी खात्री नसते, तेथें दैवावर भरंवसा ठेऊन उद्योग करावा. कार्यसिद्धि न झाली तर, दैवास बोल लावून चित्त समाधानयुक्त ठेवावें. अशा प्रसंगींच दैव मानण्याचा थोडा बहुत उपयोग आहे म्हटलें तर चालेल. बाकी सतत उद्योग करणें हेंच मनुष्यांचें कर्तव्य होय. मनुष्यांच्या प्रयत्नाशिवाय प्राप्त होणारीं सुखसाधनें ईश्वरानें फारच थोडीं ठेविलीं आहेत. त्यानें पंचमहाभूतें मनुष्यांस दिलीं आहेत; त्यांपासून मनुष्यांनीं आपलें हित करून घ्यावें, असा त्याचा उद्देश दिसतो. केवळ दैवावर भरंवसा ठेवून चालल्यानें हित झाल्याचें जगांत उदाहरण सांपडत नाहीं, परंतु तारायंत्र, आगगाडी, सुताचीं वगैरे यंत्रें, अमेरिका खंडाचा शोध, सुएज संयोगीभूमीचा कालवा, हिंदुस्थानांत इंग्लिशांचें साम्राज्य, इत्यादि उद्योगानें अनेक अतर्क्य कृत्यें झाल्याचीं उदाहरणें आहेत.

---

## संवय आणि चाल.

ज्या गोष्टी मनुष्याला करावयाच्या असतात त्यांचा तो नेहमीं विचार करितो; ज्या गोष्टी तो बालपणापासून शिकलेला असतो त्या सर्वदा त्याच्या बोलण्यांत येतात. मनुष्याची वागणूक त्याच्या संवयीवर आहे. त्यास लहानपणापासून संवय लावावी तशी लागते. संवय हा सर्वांत मोठा गुरु होय. संवयीनें स्वभाव सुद्धां बदलतो. संवयीसारखा दुसरा जुलमी राजा कोणीच नाहीं.

शरीर व मन या दोहोंवरहि संवयीचा अंमल चालतो. संवयीनें मनुष्यास चांगलें वाईट वाटतें, व वाईट चांगलें वाटतें. संवय हा मोठा कायदा आहे; याकरितां देशांत, गांवांत, व घरांत चांगल्या चाली पाडणें हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय. ज्या तंबाखूचा वास आला असतां वांति होते, तीच तंबाखू एकदां व्यसन लागल्यावर क्षणभर खावयास मिळाली नाहीं तर चैन पडत नाहीं. चोरांस दुसऱ्याची वस्तु चोरणें वाईट वाटत नाहीं. खाटकास भराभर जनावरांचे गळे कापण्यास दिक्कत वाटत नाहीं. हे सगळे संवयींचे परिणाम होत.

स्त्रियांस विद्या शिकविणें वस्तुतः चांगलें असून कित्येकांस तें वाईट वाटतें, हा संवयीचा परिणाम होय. बॉलाची ( नाचाची ) चाल इंग्लिश लोकांत वाईट आहे; परंतु ती त्यांस संवयीनें चांगली वाटते. ढेंकूण पायांखालीं चिरडला असतां ज्यांच्या आंगावर कांटा येतो त्यांस देवतेस प्राण्याचा बली देण्याची चाल वाईट वाटत नाहीं. शरीरदंडानें ईश्वर प्रसन्न होतो, असें कित्येक लोकांस वाटतें, हा एक संवयीचाच प्रकार होय. मागले लोक करीत आले तें आपण करावें असा जगांत बहुशः पुष्कळांचा कल असतो. याकरितां एकादी वाईट चाल मोडून टाकण्याचें अथवा चांगली चाल पाडण्याचें कोणीं मनांत आणलें तर त्यास पुष्कळ लोक अडथळा करतात. जगांत खऱ्याखोट्याचा अथवा चांगल्यावाइटाचा विचार करण्याची योग्यता फारच थोड्यांस असते. अंधपरंपरेनें चालणारे लोक फार. मुलांस लहानपणापासून चांगली चाल लावणें याचेंच नांव सुशिक्षितपणा. फक्त पुष्कळ भाषा अथवा शास्त्रें शिकून मनुष्य सुशिक्षित होत नाहीं. मुलांस चांगल्या संवयी लावण्याकरितां आईबापांनीं आपलें वर्तन चांगलें ठेविलें पाहिजे. मुलें बिघडण्याचें मुख्य कारण वाईट चालीच्या मनुष्याची संगति होय. कित्येक आईबापें मुलांशीं लघळपणा करतात, त्यामुळेंहि मुलें

बिघडतात. आईबापांनीं मुलांशीं नेहमीं गांभीर्यानें वागलें पाहिजे. थट्टेनें सुद्धां त्यांच्याशीं खोटें बोलूं नये. याचप्रमाणें गुरूनें विद्यार्थ्यांवर पहिल्यापासून आपला दाब ठेविला पाहिजे. गांवांत पहिल्या पिढीचे लोक चांगले असले म्हणजे पुढल्या पिढीचें आचरण सहज चांगलें होतें. देशांतील लोक चांगले होण्यास राजा व बडे लोक यांनीं चांगलें वागलें पाहिजे. एऱ्हीं देशांतील लोकांची सुधारणा होणार नाहीं. सुधारणारूप नदीचा उगम राजदरबार होय. तेथेंच पाणी गढूळ असलें तर, मग खालीं स्वच्छ कोठून होणार? चांगल्या चाली पाडणें ह्मणजे चांगले कायदे करणेंच आहे. चाल व संवय यांच्या योगानें मनुष्यांस कोणतीहि गोष्ट वाईट वाटावयाची नाहीं.

---

## उच्चस्थिति.

मनुष्यस्वभाव सर्वकाळीं सर्व देशांत सारखाच आहे. ज्या स्थितींत ईश्वरानें आपणास ठेविलें आहे, तींत संतोषानें राहणारा जगांत एक सुद्धां मनुष्य सांपडणें कठीण. कोणत्याहि देशांत गेलें तरी हीच गोष्ट आढळते. ज्यांस वेळेस अन्न मिळण्याची भ्रांति अशा लोकांनीं खात्यापित्या मनुष्याकडे पाहून, त्याची स्थिति आपणास असावी, अशी इच्छा केली, तर ती गोष्ट वेगळी. पण ज्यांपाशीं व्यवस्थेनें राहिलें असतां, दोनच्यार पिढ्यांपर्यंत चांगल्या रीतीनें निर्वाह होईल, इतकें द्रव्य असतें, असे मनुष्य सुद्धां अधिक मोठ्या पदाची इच्छा धरून अस्वस्थ अंतःकरणानें काळ घालवितात, हें केवढें आश्चर्य आहे! मनुष्यांनीं मोठेपणाची इच्छा धरूं नये असें ह्मणणें नाहीं. कारण ती तर मनुष्यांत असणें आवश्यक आहे. ही स्तुत्य इच्छा मनुष्यांमध्यें नसती तर जगांत शेंकडो मनुष्यांच्या हातून अक्षय सत्कृत्यें झालीं आहेत तीं झालीं नसतीं. आपल्या हातून सत्कृत्यें व्हावीं याकरितां मोठेपणाची इच्छा धरून न्याय्य रीतीनें

ती तृप्त करण्याकरितां, नेहमीं उद्योगी असणें हें योग्यच आहे. पण केवळ द्रव्यसंचयाच्या अथवा विषयसुखाच्या इच्छेनें मोठ्या पदाची इच्छा करणें व ती तृप्त करण्यासाठीं हवे ते अन्याय करणें किती वाईट आहे !

मोठेपण प्राप्त होण्यापूर्वीं त्यापासून जें सुख होईल ह्मणून वाटत असतें, त्याच्या शतांश देखील तें प्राप्त झाल्यावर अनुभवास येत नाहीं. गरिबींत मनुष्य पोट भरण्यापुरता एकाचाच चाकर असतो, परंतु श्रीमंताचें तसें नाहीं. तो पुष्कळांचा चाकर होतो. श्रीमंत मनुष्य राजाचा चाकर आहे. राजाची मर्जी कोणत्या गोष्टीनें फिदा राहील, त्या तजविजी योजण्याच्या काळजींत त्याचें मन दिवसभर घोंटाळत असतें. इतकेंहि करून ज्या उपायांनीं आपली कीर्ति लोकांत कमी होणार नाहीं, ते उपाय योजावे लागतात. यासाठीं तो कीर्तीचा चाकर होऊन बसतो. एकादें मोठें राजकीय काम त्याजकडे असलें म्हणजे हजारों मनुष्यांचीं कामें त्याजकडे येणार. त्यांपैकीं कांहींच्या तरी इच्छेविरुद्ध त्यांच्या कामांचा उलगडा होणार. तेव्हां अर्थातच ते त्याचे शत्रु होणार. तेव्हां अर्थात सर्वांस खुष ठेवून आपलें काम न्याय्य रीतीनें बजावण्याविषयीं काळजी वहावी लागते, व हें करणें फार दुर्घट असल्यामुळें रात्रंदिवस मन तिकडे असतें. विशेष काय, पण चाकरांपासून सुद्धां मोठ्या पदवीच्या मनुष्यांस भय असतें. त्याच्या पदरीं पुष्कळ मनुष्यें असणार. त्यांत कांहीं चांगलीं व कांहीं वाईट असावयाचींच. वाईट मनुष्यें बहुशः लबाड असतात. तीं यजमानाच्या तोंडासारखें बोलून, आपण यजमानाचें हित करण्यांत तत्पर आहों असें दाखवीत असतात. ह्यामुळें यजमानास खरी स्थिति कांहींच कळेनाशी होते, व त्याची अशा मनुष्यांवर प्रीति बसली, म्हणजे खरे इमानी चाकर असतात ते उदासीन होतात. यासाठीं नेहमीं कोण कसा आहे हें मोठ्या मनुष्यांस पाहावें लागतें. अशीं उ-

च्चस्थितींत अनेक संकटें असून, तींत मनुष्य अगदीं पराधीन होतो.

स्वतंत्रता सोडून परतंत्रतेची इच्छा करणें ही विलक्षण इच्छा आहे. दुसऱ्यांवर अम्मल करण्याच्या आशेनें लोक पराधीन होतात, हें केवढें आश्चर्य आहे! मनुष्यांस श्रम आवडत नाहींत, परंतु श्रम करून जींत अधिक श्रम आहेत, अशी स्थिति ते आपणास प्राप्त करून घेतात. मनुष्यांस सन्मान आवडतो; म्हणून तो मिळविण्याकरितां ते अपमान सोसून घेतात. 'चढेल तो पडेल,' ह्या म्हणीप्रमाणें मोठ्या मनुष्यास हलकी स्थिति येण्याचें भय असतें, व ती आली म्हणजे, पहिल्यापासून हलक्या स्थितींत असलेल्या मनुष्यापेक्षां याचे शरीरास व मनास अधिक दुःख होतें. श्रीमंतींत असतांना चांगले पदार्थ खाऊन व उंची वस्त्रें पांघरून जें शरीर सुखावलेलें असतें, त्यास अन्न व वस्त्र या दोहोंचीहि दधात पडली म्हणजे काय अवस्था होत असेल हें सांगावयास नको. जो नेहमीं जन्मापासून परांच्या गादीवर निजणारा व उंची आंबेमोहर तांदूळ खाणारा त्यास निजावयास घोंगडी, व खावयास राळ्यांचा भात, हीं प्राप्त झालीं म्हणजे किती वाईट वाटेल? तसेंच जे लोक यास मोठेपणांत मान देत होते, किंवा ज्यांस यापासून साहजिक किंवा बुद्धिपुरःसर, उच्च स्थितींत असतां, पीडा झाली असेल, तेच लोक त्याचा उपहास करूं लागले म्हणजे, मनास किती दुःख होईल?

श्रीमंतीचें सुख कांहीं अंशीं सौंदर्याच्या सुखासारखें आहे. कारण, अमुक मनुष्य फार सुंदर आहे, असें लोक म्हणतात; किंवा त्यास पाहून आनंदित होतात, म्हणून सुंदर मनुष्य मनांत सुख मानितो. वस्तुतः पाहिलें तर याशिवाय त्यास दुसरें साक्षात् सुख नाहीं. तसेंच ऐश्वर्याच्या मालकांशीं लोक हांजी हांजी करितात, आपण मोठे दैववान् आहां असें म्हणतात, म्हणून श्रीमंत आपणांस सुखी मानतात. पण खरोखर ते आपल्या मनांत आपल्या सुखाचा विचार करतील, तर लोक समजतात

तितके आपण सुखी आहों असें ते मानणार नाहींत. गरीब मनुष्याकडून चूक झाली तर लोक त्याचे पदरांत ती लागलीच घालितात, त्यामुळें तो ती सुधारितो. पण श्रीमंतांचें तसें नाहीं. सर्वांस त्यांची चूक कळली असली तरी त्यांस वाईट वाटेल म्हणून ते ती त्यांस सांगत नाहींत, त्यामुळें ती त्यांकडून पुनः पुनः होते. तसेंच गरीबांचें दुःख सर्वांस कळतें, म्हणून त्यांस सांत्वन करणारा कोणी तरी मिळतोच. पण श्रीमंतांचें तसें नाहीं. आपणांस दुःख आहे, असें लोकांस कळलें असतां आपला मान कमी होईल, असें समजून श्रीमंत लोक दुःख कोणास सांगत नाहींत. यामुळें सर्व दुःखाचा भार स्वतः सोसावा लागतो.

परहित करण्याकरितां, कित्येक लोक उंच स्थितीची इच्छा करितात. खरोखर पाहिलें तर सर्व स्थितींत परहित करण्याची सवड सारखीच असते. पण जसजशी मनुष्यास उंच स्थिति प्राप्त होईल, तसतशी त्याची दुसऱ्याचें वाईट करण्याची शक्ति वाढते. त्याप्रमाणें त्यानें केलें म्हणजे अर्थातच परहित, त्या मानानें त्याचे हातून कमी होतें. यास उदाहरण न्यायाधीशाचें घेऊं. न्यायाधीशाच्या जाग्यावर कोणी मनुष्य असला, तर तो न्याय करील तसा आपण करूं. आपणांस ती जागा मिळाली म्हणजे न्याय अधिक होईल असें नाहीं. ज्या कामाकरितां आपणांस सरकारांतून पगार मिळतो, तें काम आपण न्याय्य रीतीनें बजाविलें तर त्यांत दुसऱ्याचें बरें केलें असें कोणी म्हणणार नाहीं, तेव्हां अर्थातच बरें करण्याची शक्ति वाढली, असें म्हणतां येत नाहीं. अधिकारी आपल्या अधिकाराच्या जोरानें पक्षपात करून आपल्या एकाद्या मित्राचें हित किंवा शत्रूचें अहित करील, परंतु तें त्यास तितक्या मानानें दुसऱ्याचें अहित किंवा हित केल्याशिवाय कधींहि करितां येणार नाहीं. न्यायाधीशास लाच खाऊन लोकांपासून पैसा उपटण्याची सवड असते, तसें लोकांचें चांगलें करण्याचें त्याच्या हातांत कांहीं नाहीं म्हटलें तरी चालेल. चोरी

करणें हा दुर्गुण आहे, ती केली असतां राजा शासन करतो, म्हणून चोरी न करणें हा मोठा विलक्षण अप्रतिम गुण नाहीं; व याबद्दल कोणी कोणाची स्तुति करीत नाहीं, व राजा चोरी न करणाऱ्यास बक्षीस देत नाहीं. कारण, चोरी न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे. इतर न्यायाधीश लांच घेऊन अन्याय करतात, त्यांच्या मानानें लांच न घेतां न्याय करणारे चांगले हें खरें; तथापि चांगले न्यायाधीश लोकांचें बरें करतात असें म्हणतां येत नाहीं. कारण, मनुष्य आपल्या वेळेचा अथवा वित्ताचा व्यय आपणांस कांहींएक नफा नसतां करतो, तेव्हांच दुसऱ्याचें तो हित करतो असें होतें. असो, हें ऐहिकदृष्ट्या झालें. परमार्थदृष्टीनें पाहिलें तर मोठ्या स्थितीपासून एक मोठा तोटा आहे; तो असा. श्रीमंतींत खाण्यापिण्याच्या सुखांत चैनीनें दिवस जात असले, म्हणजे ईश्वराची मनुष्यास आठवण न होऊन तो त्याचें भजन करीत नाहीं. मग वार्धक्यांत इंद्रियें विगलित होऊन अनुकूल असतांहि सुखोपभोग करण्याची शक्ति रहात नाहीं; तेव्हां पश्चात्ताप होऊन ईश्वरभक्ति करणार तों मरूनाहि जातो.

एकंदर सर्व गोष्टींचा विचार करितां असें सिद्ध होतें कीं, ईश्वर सर्वज्ञ आहे, आपणांस कोणती स्थिति योग्य हें आपणांपेक्षां त्यास अधिक समजतें, असें मानून ज्या स्थितींत तो ठेवील, तींत आपलें कर्तव्य करून, होईल तितकें परहित करून स्वस्थ व आनंदित अंतःकरणानें काळ घालविणें हेंच मनुष्यांस ऐहिक व पारमार्थिक सुखाचें साधन आहे.

---

## न्यायाधीश आणि वकील.

कायद्याप्रमाणें न्याय करणें न्यायाधीशाचें काम आहे. कायदा नवा करणें अथवा चालू कायद्यांत फेरफार करणें हें न्यायाधीशाचें काम नाहीं. म्हणजे साक्षीदारांच्या व इतर प्रासंगिक

पुराव्यावरून जी गोष्ट सिद्ध होते, ती लिहिलेल्या कायद्याप्रमाणें अथवा सर्वानुमतें देशांत स्थापित झालेल्या संप्रदायाप्रमाणें आहे किंवा नाहीं, हें सांगणें त्याचें काम आहे. अमुक गोष्ट अमुक प्रकारची असावी, असें म्हणण्यास त्यास अधिकार नाहीं.

केवळ कायद्याचें ज्ञान चांगलें असलें तरी न्यायाधीश चांगला होत नाहीं. तो जात्या विद्वान् असून लोकव्यवहार जाणणारा असला पाहिजे. न्यायाधीशाचा स्वभाव गंभीर व शांत पाहिजे. न्यायाधीश थट्टेबाज असला तर त्याचें वजन पडत नाहीं. तो उतावीळ असला, तर लोकांचें नुकसान होतें. मला वाटेल तेंच योग्य असा भरंवसा धरून न्यायाधीशानें चालूं नये. पक्षकारांचीं बोलणीं ऐकून व कायद्यांतील प्रमाणें पाहून त्यानें न्याय करावा. न्यायाधीशाच्या सर्व गुणांमध्यें प्रामाणिकपणा हा मुख्य गुण होय. कायद्याच्या गैरसमजानें वगैरे न्यायाधीशाच्या हातून चूक झाली तर, एकंदर लोकांचें विशेष नुकसान नाहीं; परंतु तो प्रामाणिक नसला तर लोकांच्या शरीराचें व मालमत्तेचें संरक्षण होणार नाहीं. अज्ञानतः एकाद्याच्या हातानें वाईट गोष्ट घडली, तर तो विशेष दंड्य नाहीं. पण समजून उमजून वाईट गोष्ट करणारा अथवा करावी ह्मणणारा यांस मोठी शिक्षा पाहिजे.

न्यायाधीश न्यायी असला तरी, खरा न्याय होण्यास पुष्कळ अडचणी असतात. पक्षकारांशीं, किंवा त्यांच्या वकिलांशीं न्यायाधीशाच्या नात्याचा वगैरे संबंध असतो. कधीं कधीं एकाद्या पक्षकाराचा न्यायाधीशाच्या वरिष्ठांशीं संबंध असतो. अशा ठिकाणीं न्यायाधीश धैर्यवान् असला तरच खरा न्याय होतो.

अमुक मनुष्यानें अन्याय केला, ह्मणून त्याचा सूड उगविणें हा न्यायाचा अथवा कायद्याचा उद्देश नाहीं. एकास अपराधाबद्दल शिक्षा झाली, हें पाहून इतरांनीं तसें करूं नये, हाच शिक्षा देण्याचा मूळ उद्देश होय. अपराध्यांस शिक्षा करण्यापेक्षां, अपराध कमी होण्याची तजवीज करणें हें कायद्याचें मुख्य

काम आहे. घोंटाळ्याचे खटले असतील त्या वेळेस न्यायाधीशानें कायद्याचा अर्थ फार जपून केला पाहिजे. कायद्याप्रमाणें शारीरदंड करण्याचा प्रसंग आल्यास, तो बेताबाहेर जाऊं न देण्याविषयीं न्यायाधीशानें जपलें पाहिजे. देहांत शिक्षा देण्याचे खटले न्यायाधीशानें मोठ्या काळजीनें व किंचित् दयार्द्र अंतःकरणानें तपासले पाहिजेत. कायदे स्वरूपतः चांगले असून, काल, देश, वर्तमान यांस विपरीत असतील तर आवश्यक फेरफार करण्याविषयीं कायदे करणाऱ्यांस सुचविणें न्यायाधीशाचें काम आहे. पक्षकारांचीं बोलणीं न्यायाधीशानें शांतपणें ऐकिलीं पाहिजेत. पक्षकारांचें बोलणें संपण्यापूर्वीं, एकाद्या गोष्टीविषयीं न्यायाधीशानें आपलें मत स्थापित करूं नये. पुरावा पुष्कळ असला तरी, ऐकण्यास न्यायाधीशानें कंटाळा करूं नये. आमचा पुरावा ऐकिला नाहीं, असें ह्मणण्याचा प्रसंग कधींहि येऊं देऊं नये. उभयपक्षांचें बोलणें ऐकून, त्यांतील मुद्दे धरून न्यायाधीशानें न्याय करावा. न्यायाधीशानें केलेले निवाडे प्रसिद्ध झाले पाहिजेत. त्यांवर टीका करण्यास लोकांस अधिकार असावा. आपल्या हाताखालचे लोक, भय दाखवून पक्षकारांपासून पैसा वगैरे घेतात किंवा काय याकडे न्यायाधीशानें कडक नजर ठेविली पाहिजे.

केवळ कायद्यांच्या आधाराकडे लक्ष देऊन न्याय करणें नेहमीं चालत नाहीं. लोकांच्या रीतिभातींचा विचार केला पाहिजे. गुन्ह्याचा तपास करतेवेळीं कोणत्या स्थितींत असतां गुन्हेगारानें गुन्हा केला याचा विचार केला पाहिजे. देशांत व्यवहार वाढला म्हणजे कायदे बदलतात. आपल्या देशांत पूर्वीं धर्मशास्त्राप्रमाणें न्याय होत असे, पण आतां तसें चालत नाहीं. इंग्लिश लोकांचें राज्य झाल्यापासून देशस्थिति अगदीं बदलत चालली आहे. मनु वगैरे यांचे कायदे सर्वांशीं सरकारानें रद्द केले नाहींत; तथापि एकंदर कायद्याचें स्वरूप अगदीं भिन्न झालें आहे. प्रजेस खरा न्याय मिळावा, ह्मणून सरकारानें पुष्कळ तजविजी योजिल्या पाहिजेत.

वकील हे न्यायाचे खांब आहेत. न्यायाधीश चांगला असूनही वकील गैरहुशार अथवा अप्रामाणिक असेल तर न्याय होत नाहीं. वकील कायद्यांत हुशार असून बोलण्यांत हुशार पाहिजेत. घोंटाळ्याचा खटला असला, म्हणजे खरें इंगित काढण्यास वकिलांनीं झटलें पाहिजे. परंतु कित्येक वेळां असें होतें कीं वकील आपल्या पक्षाचा कमीपणा छपविण्याकरितां, आपल्या हुशारीनें न्यायाधीशांच्या डोळ्यांत धूळ घालतात. यामुळें न्याय बरोबर होत नाहीं. प्राचीन काळीं, युरोपांत रोमन लोकांच्या राज्यांत वकिलांची फार प्रतिष्ठा असे. याचें कारण असें सांगतात कीं, कायद्याचे कचाटींत सांपडून एकाद्या मनुष्यास उगाच पीडा होत असली, तर ते निरपेक्षबुद्धीनें आपल्या विद्येच्या व वक्तृत्वाच्या बलानें त्याचें रक्षण करीत. सांप्रत, वकिली हा पोट भरण्याचा धंदा झाला आहे. पैसे मिळाले म्हणजे खटला खोटा असला तरी, तो खरा करून दाखविण्यास वकील मागें पुढें पहात नाहींत. श्रीमंत आणि गरीब यांमध्यें वाद असला म्हणजे, गरीबाजवळ हुशार वकिलांस देण्यास पुष्कळ पैसा नसल्यामुळें त्यास न्याय मिळण्याची पंचाईत असते. खरा न्याय व्हावा, अशी इच्छा बाळगणारे वकील असल्याशिवाय न्याय व्हावयाचा नाहीं. लोकांच्या जीवांचें व मालमत्तेचें रक्षण व्हावें ह्या कायद्याच्या उद्देशाप्रमाणें न्यायाधीश व वकील या उभयतांनींहि वागलें पाहिजे, तरच तो सिद्धीस जाईल.

## सुधारणा.

आलीकडे मराठी भाषेंत सुधारणा हा शब्द प्रचारांत आला आहे. नव्या व जुन्या सर्व लोकांच्या मुखांतून सुधारणा हा शब्द निघतो, तथापि उभयतांचा त्याच्या अर्थाविषयीं वेगळा समज आहे. याकरितां त्याच्या सामान्य अर्थाविषयीं थोडासा विचार करूं.

सुधारणा म्हणजे चांगल्या स्थितीस येणें. एकादी बिघडलेली वस्तु नीट झाली, म्हणजे ती सुधरली असें ह्मणतात. जसें

एकादें घड्याळ वगैरे बिघडलेलें यंत्र नीट झालें, म्हणजे त्यास सुधारलें अथवा सुधरलें असें आपण म्हणतों, तसेंच एकादा मनुष्य व्यसनानें वगैरे बिघडलेला असून, मूलस्थितीस आला म्हणजे तो आतां सुधारला असें ह्मणतात. तसेंच एकादा देश अडाणी स्थितींत असून त्यांत विद्या, कलाकौशल्य, मनुष्याच्या सुखसाधनांचे पदार्थ पुष्कळ झाले, म्हणजे त्या देशास सुधारलेला देश असें म्हणतात; यावरून असें लक्षांत येईल कीं, प्रत्येक गोष्टीस सुधारणा आहे. परंतु हल्लीं, सुधारणा ह्मणून जो शब्द मराठी भाषेंत प्रचारांत पडला आहे, तो विशेषेंकरून देशाची सुधारणा या अर्थानें बहुशः सर्व लोक समजतात.

वरील लिहिण्यावरून देशाची सुधारणा म्हणजे काय ? असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. त्याविषयीं थोडासा विचार करणें आवश्यक आहे.

ज्या देशांत विद्येचा प्रसार पुष्कळ झाला आहे, ज्यांत मनुष्याच्या सुखाचीं साधनें पुष्कळ वाढलीं आहेत, ज्यांतील लोक विद्वान् असून आपले व दुसऱ्याचे हक्क समजतात व पाळतात, ज्या देशांत राज्यव्यवस्था चांगली असून, गरीब व श्रीमान् यांस न्यायाचें रक्षण सारखें मिळतें, ज्यांतील पुष्कळ लोक एकमतानें वागून मोठाले व्यापार करतात आणि देशांतील संपत्ति वाढवितात अशा देशास सुधारलेला देश असें म्हणतात. ज्या देशांत वरील गोष्टी नाहींत, त्यास रानटी देश असें म्हणतात. सुधारलेल्या देशांतील सर्वच मनुष्यें चांगलीं असतात आणि रानटी देशांतील सर्व वाईट असतात असें नाहीं. परंतु सुधारलेल्या देशांत वर सांगितलेले गुण एकंदरींत पुष्कळांच्या अंगीं व रानटी देशांत त्यांच्या विरुद्ध दोष पुष्कळांच्या अंगीं, असें समजावयाचें. रानटी देशांतील लोक लहान लहान टोळ्या करून लांब लांब राहतात. कित्येक नेहमीं प्रवासच करीत फिरतात. कदाचित् लहान सहान खेडीं असलीं तरी, देशां-

तील लांबलांबच्या लोकांचें परस्परांशीं दळणवळण नसतें. मोठालीं शहरें तर मुळींच नसतात. व्यापार अथवा विद्या हीं मुळींच नसतात, अर्थात् त्यांत स्वदेशप्रीतीची कल्पनाहि नसते. आफ्रिकाखंडांतील पुष्कळ देश, अमेरिकाखंडांतील मूळच्या लोकांचे देश हे रानटी होत. ज्या देशांत वसाहात पुष्कळ, मोठालीं शहरें, व्यापारी लोक पुष्कळ, संपत्ति व कलाकौशल्य फार, विद्वान् लोक बहुत, लोक स्वदेशाभिमानी, असे देश सुधारलेले होत. जसे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे यूरोपखंडांतील देश; व अमेरिकाखंडांतील स्वतंत्र संस्थानें ( युनैतेद्स्तेत्स् ) हे देश पूर्ण सुधारलेले आहेत.

मनुष्यांस जशा बाल्य, तारुण्य व वार्धक्य, ह्या अवस्था आहेत, तशाच देशाच्या सुधारणेंत दृष्टीस पडतात. इंलंद वगैरे कितीएक देश जे पूर्वीं अगदीं रानटी स्थितींत होते, ते हल्लीं सुधारणेच्या शिखरास पोहोंचले आहेत. मिसर, ग्रीस वगैरे जे देश प्राचीनकाळीं सुधारणेच्या शिखरास पोहोंचले होते, ते सांप्रत इतक्या नीच स्थितींत आहेत कीं, ते पूर्वीं सुधारलेले होते, असें देखील कोणास वाटणार नाहीं. आशियाखंडांत हिंदुस्थान व चीन हे देश प्राचीनकाळापासून फार सुधारलेले आहेत. हल्लीं यूरोपांतील देशांनीं यांस मागें टाकिलें आहे, यांत संशय नाहीं. तथापि हें वरील नियमास कांहींसें अपवादक म्हटलें तरी चालेल. कारण, हे देश अमुक वेळीं सुधारले असें इतिहासकर्त्यांस सुद्धां ठरवितां येत नाहीं. इतक्या प्राचीनकाळापासून सुधारलेले असून अद्याप ते सुधारलेले या विशेषणास पात्र होतात. कलाकौशल्य व विद्या यांचा हिंदुस्थानांत प्राचीनकाळापासून फैलाव फार झाला आहे. या देशांत जुनीं शहरें पुष्कळ आहेत. शिवाय मुसलमानांनीं किती मोडलीं असतील याचा तर ठिकाणच नाहीं. चिनी लोकांचें कौशल्य इतकें पूर्णतेस आलें आहे कीं, कित्येक कामांत यूरोपियन लोकांच्यानें सुद्धां त्यांस मागें सारवत नाहीं.

होकायंत्र व बंदुकीची दारू हीं चिनी लोकांस पूर्वींपासून माहीत आहेत. चिनी लोक स्वदेशाभिमानी आहेत, पण ते इतर देशाशीं संबंध ठेवीत नाहींत, व त्यांच्यामध्यें विद्यावृद्धि नाहीं, ह्मणून ते पूर्वींपासून आहेत तसेच आहेत. त्यांची सुधारणा वाढत नाहीं. हिंदुलोकांत विद्या व कलाकौशल्य या दोहोंचा प्रसार होता; तथापि त्यांमध्यें ऐक्य व स्वदेशप्रीति हीं नाहींत; ह्मणून त्यांची सुधारणा चिनी लोकांप्रमाणें स्थायिक न राहतां दिवसेंदिवस नष्ट होऊं लागली. तथापि आशियाखंडांतील सर्व देशांपेक्षां हा देश अधिक सुधारलेला आहे. यूरोपांतील प्राचीन व अर्वाचीन सर्व सुधारलेल्या लोकांस विद्या, कला, वगैरे सुधारणेचीं साधनें हिंदुलोकांपासून प्राप्त झालीं, असें कित्येक जर्मन देशांतील अर्वाचीन विद्वानांचें मत आहे.

रानटी देशांतील लोकांत श्रमविभाग नाहीं. प्रत्येक मनुष्यास आपल्या निर्वाहाचे सर्व पदार्थ मिळविण्यास श्रम करावे लागतात. पुष्कळ मनुष्यें एकत्र जमून कोणतेंच काम करीत नाहींत, त्यामुळें त्यांची सुधारणा होत नाहीं. देशाची सुधारणा होण्यास श्रमविभाग हें मुख्य कारण होय. श्रमविभाग म्हणजे, मनुष्यांनीं जुटीनें राहून प्रत्येकानें स्वतःच्या निर्वाहाचीं सर्व कामें न करतां सर्वांच्या निर्वाहाचें एकेक काम केलें पाहिजे. असें झालें म्हणजे सर्वांच्या श्रमांचें फल प्रत्येकास प्राप्त होतें. ह्मणून प्रत्येक सुखी होतो. रानटी देशांत तसें होत नाहीं, ह्मणून सर्व दुःखी होतात. रानटी देशांत कायदा अथवा न्याय मुळींच नसतो. ‘ बळी तो कान पिळी ’ या ह्मणीचा येथें पूर्ण अम्मल असतो. तेथें सत्ता ह्मणून कांहीं पदार्थ नाहीं. कुरणांत गुरें चरण्यास सोडिलीं म्हणजे बळकट असेल तें इतरांस दूर करून आपण पाहिजे त्या ठिकाणीं चरूं लागतें, तसें रानटी देशांत ज्याच्या अंगीं बळ तो सर्वांवर अंमल करतो.

सुधारलेल्या देशांत प्रत्येक मनुष्याची आपल्या शरीरावर व

मालमत्तेवर सत्ता असते. बळकटापासून पीडा होऊं लागली, तर तो कायद्याच्या योगानें आपलें रक्षण करतो. सुधारणेच्या योगानें बळकट व अशक्त कांहीं अंशीं सारखेच होतात. दुर्बळ आणि अशक्त यांस एका योग्यतेस आणणें हा एक सुधारणेचा मुख्य उद्देश होय.

देशांत सुधारणा वाढण्याचीं कारणें अनेक आहेत. प्रथम शरीर आणि मालमत्ता यांचें संरक्षण पाहिजे. हीं दोन्हीं सुरक्षित असलीं म्हणजे, शेतकी वाढून सुबत्ता होते. सुबत्तेमुळें लोकसंख्याहि वाढते. लोक पुष्कळ झाले म्हणजे त्यांच्या देशांतील शेतकी वगैरेवर निर्वाह होत नाहीं; म्हणून ते परदेशांशीं व्यापार करूं लागतात. व्यापारामुळें देशांत संपत्ति वाढून एकंदरींत सर्व लोकांचें सुख वाढतें.

या वरील गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ इंग्लंद देशाचेंच उदाहरण पुरे आहे. पहा, एवढेंसें लहान बेट असून त्यांतील जमीन सुद्धां फार सुपीक नाहीं असें म्हणतात, तथापि तेथील लोक आज किती सुखी व पराक्रमी आहेत! विद्या, कलाकौशल्य, स्वदेशप्रीति, सुखकारक राजसत्ता, या सर्व गोष्टींत पृथ्वींतील सर्व देशांस इंग्लंदानें मागें टाकिलें आहे, असें म्हटलें तरी चालेल.

जे देश सुधारलेले नाहींत, तेथील लोक, राजा करील तें प्रमाण असें समजतात. शरीर व मालमत्ता या दोहोंवरहि राजाची सत्ता असते. राजाच्या विरुद्ध लोकांस जातां येत नाहीं. परंतु लोक सुधारूं लागले म्हणजे राजास मनास वाटेल तसें वागूं देत नाहींत. राजाच्या इच्छेस कायद्याचा आळा असतो. एकट्या राजाचें समुदायापुढें कांहीं चालत नाहीं. कायदेकानू सर्व प्रजेच्या अनुमतानें होतात. म्हणून ज्या देशांत लोकसत्ताक राज्य फार दिवस सुरळीत चालतें, तो देश पूर्ण सुधारलेला होय.

ज्या देशांत अगदीं थोडी सुधारणा असते, तेथील मजूरदार वगैरे गरीब लोकांची नीच स्थिति असते. श्रीमंत लोक वाटेल

ती मजुरी देऊन त्यांपासून पाहिजे तें काम करून घेतात. सुधारलेल्या देशांत इच्छेप्रमाणें मजुरी मागण्यास मजुरांस मोकळीक असते. यामुळें मजूरलोक सुखी असतात.

रानटी देशांतील लोक बळकट व धैर्यवान असतात, पण त्यांच्यांत जमाव नसल्यामुळें त्यांत समुदायानें होणारें कोणतेंहि मोठें काम करतां येत नाहीं. सुधारलेल्या देशांतील लोक पाहिजे तेवढीं मोठालीं कामें करतात. रानटी लोकांत जो तो आपणास मुखत्यार समजतो. सुधारलेल्या देशांत पुष्कळ लोक जमून मोठालीं कामें करतात, तसें रानटी लोकांत होत नाहीं. ज्यांपासून शेंकडों वर्षांनीं नफा मिळणार, असे व्यापार करण्यास हजारों मनुष्यांचा जमाव पाहिजे. इंग्लिश लोकांच्या व्यापारी मंडळ्यांनीं आपल्या देशांत आगगाडीचे रस्ते बांधिले आहेत, हेंच केवढें मोठें उदाहरण आहे ! पहा, हजारों मनुष्यें कंपनीच्या कारखान्यांत वेगळाल्या अधिकारावर आहेत. त्यांचे मुख्य कारखाने इंग्लंडांत आहेत. तथापि तेथें काम कसें सुरळीत चालतें ! सर्व लोक कंपनीच्या हिताकरितां मनापासून झटतात. आपणापेक्षां ज्याचा अधिकार मोठा आहे, त्यानें कशीहि आज्ञा केली तरी आपली इच्छा एकीकडे ठेवून ते लोक ती पाळतात. आपल्या लोकांमध्यें अशी गोष्ट होईल काय ? कदाचित् पांच पन्नास लोक एके ठिकाणीं कांहीं काम करण्यास जमले तर सर्वांचीं मतें वेगळालीं पडून कांहींएक निकाल न होतां, सर्व उठून चालते होतील. अशी स्थिति फ्रेंच लोकांत असती तर, त्यांच्यानें सुएज संयोगीभूमि खणून कालवा करवला असता काय ? अमेरिकेंतील लोकांत ऐक्य नसतें तर एवढें अफाट लोकसत्ताक राज्य कसें चालतें ? प्लासीच्या लढाईत थोड्याशा इंग्लिश लोकांनीं सुराजउद्दवला ह्याच्या प्रचंड सैन्याचें निर्दलन केलें, याचें कारण काय ? पुण्यास एल्फिन्स्टन साहेबाच्या थोड्याशा लोकांनीं बाजीरावाच्या सैन्यास कसें पळविलें ? ह्याचें कारण हेंच होय कीं, इंग्लिश लोक सुधारलेले होत.

त्यांच्यांत ऐक्य आहे म्हणून, ते फुटाफूट झालेल्या लोकांवर अम्मल करतात. शेवटले बाजीराव पेशवे यांनीं पॉट्र या नांवाचा एक साहेब दापोली येथें सैन्याच्या अधिकारावर नेमिला होता. त्यानें सैन्य चांगलें तयार ठेविलें होतें. इंग्लिश लोक पुणें घ्यावयास आले तेव्हां पेशव्यांनीं साहेबास फौज घेऊन लढाईस बोलाविलें. साहेब येईना तेव्हां त्याकडे पेशव्यांनीं मनुष्य पाठविला. त्यास साहेबानें जबाब सांगितला कीं "मी पेशव्यांचा नोकर आहें याकरितां त्यांच्या दुसऱ्या कोणत्याहि शत्रूबरोबर लढेन, परंतु इंग्लिश लोकांच्या अंगावर जाणार नाहीं. दुसऱ्याकडे नोकर राहून आपल्या लोकांचा पराजय करणें ही गोष्ट आह्मी कधींहि करणार नाहीं." आपले लोक परक्याचे गुलाम होतील पण दोघांत कलह लागला असतां दोघे थोडें थोडें नुकसान सोसून एकंदर देशाच्या हिताकरितां झटणार नाहींत. पूर्वींपासून परकी लोक आपल्या देशावर राज्य करितात याचें कारण हेंच होय.

ज्या कुटुंबांतील माणसांमध्यें एक विचार नाहीं, तीं कधींहि ऊर्जित दशेस यावयाचीं नाहींत त्याप्रमाणेंच देशाची गोष्ट आहे. ज्या देशांतील लोकांचें कोणत्याहि कामांत एक मत नाहीं, तो देश कधीं सुधारणार नाहीं. सुकाणू धरणारा आणि वल्हें मारणारा या दोघांनीं मिलाफानें काम केलें, तरच नाव नीट चालेल, नाहीं तर भलतीकडेच जाऊन आदळेल. तसेंच देशाचें आहे. देशांत कितीएक मोठे असतात व कितीएक गरीब असतात. पण सर्वांनीं देशाच्या कल्याणाकरितां एकमतानें झटलें पाहिजे तरच देशाची सुधारणा होईल.

सांप्रत देशांतील लोकांचें ऐकमत्य होण्यास अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं चांगलीं वर्तमानपत्रें हें एक होय असें म्हटलें तरी चालेल. आपल्या देशांत वर्तमानपत्रें सुरू झाल्यापासून सुधारणेस पुष्कळ मदत होत आहे. हल्लीं प्रत्येक मनुष्यास लोकांचें मत काय आहे हें कळतें. कोणतें काम काढलें असतां आपल्यास

लोक अनुकूळ होतील, हें प्रत्येक मनुष्यास कळतें. यामुळें लोकांस आवडतील अशींच मतें बाहेर येतात. कोणीं भलतेंच एकादें मत काढिलें तर, त्याचें लागलींच खंडन होतें, म्हणजे तो तें टाकून देतो. आपल्या लोकांस वर्तमानपत्रांची योग्यता कळूं लागल्यामुळें दरसाल त्यांची संख्या वाढत चालली आहे. आगगाडीसारखीं साधनें असल्यामुळें व सर्व ठिकाणीं इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू असल्यामुळें लोकांस पाहिजे तेथील वर्तमान समजतें, हा एक सुधारणेपासून केवढा लाभ आहे ! वर्तमानपत्रें व आगगाडी यांच्या प्रसारामुळेंच राष्ट्रीयसभेसारख्या संस्था उत्पन्न होणें शक्य झालें.

आपल्या देशांत सुधारणा हा शब्द सर्वतोमुखीं झाला आहे. पण त्याचा युरोपांतील सुधारलेले लोक अर्थ काय समजतात हें स्पष्ट कळण्याकरितां, लार्ड मेकाले म्हणून एक विद्वान् इंग्रजी ग्रंथकार आहे, त्याच्या ग्रंथांतील कांहीं ओळींचा सारांश खालीं लिहिला आहे.

"इंग्लंदाचा इतिहास म्हणजे, खरोखर सुधारणेचा इतिहास होय. हा, लोकांच्या मनांची स्थिति सतत कशी बदलते, देशांतील रीतिभाती कशा सुधारतात, याचा इतिहास होय. ह्यावरून आपणांस असें समजतें कीं, विद्यमानकाळीं आशिया खंडांतील कांहीं देश जसे अगदीं रानटी स्थितींत आहेत, त्यापेक्षां अधिक वाईट स्थितींत इंग्लंदांतील लोक बाराव्या शतकांत होते. तेव्हां, ते थोड्याशा परकी लढाऊ लोकांच्या जुलमी अमलाखालीं चिरडलेले होते. त्या वेळेस विजयी नार्मन लोक व जिंकलेले साक्सन लोक यांच्यामध्यें पराकाष्ठेचा भेद होता. बहुतकरून सर्व प्रजेची स्थिति गुलामांप्रमाणें होती. बहुशः सर्व लोक पशूप्रमाणें अज्ञानांत निमग्न होते. थोडेसे आपणास विद्वान् ह्मणवीत, त्यांच्या ज्ञानास विद्या हें नांव सुद्धां शोभत नाहीं. तेव्हां पासून आज सातशें वर्षांत ते,अज्ञानी,भिकार,रानटी लोक सर्व पृथ्वी-

तील सुधारलेल्या लोकांत श्रेष्ठ झाले आहेत. भूगोलाच्या सर्व प्रदेशांत आपली सत्ता त्यांनीं पसरली आहे! मोठाल्या देशांत राजसत्ताक व लोकसत्ताक राज्यें त्यांनीं स्थापिलीं आहेत. अशीं राज्यें *तालमी व *स्त्राबो यांच्या स्वप्नींही आलीं नसतील. त्यांनीं एवढें आरमार जमविलें आहे कीं, तें एका अर्ध्या घटकेंत ‡तायर, ‡आथेन्स, ‡कार्थेज, ‡वेनिस व ‡जिनोआ या सर्व शहरांच्या एकंदर आरमारांचा विध्वंस करून टाकील. वैद्यशास्त्र, प्रवास व पत्रव्यवहार यांचीं साधनें, यांत्रिक कलाकौशल्य, शिल्प, किंबहुना मनुष्यांच्या सुखाचीं सर्व साधनें, त्यांनीं इतकीं पूर्णतेस आणलीं आहेत कीं, पूर्वींच्या इंग्लिश लोकांस हा सर्व जादूचाच चमत्कार वाटला असता. भाषा इतकी उत्तम स्थितीस आणिली आहे, कीं तींतील ग्रंथ ग्रीक भाषेंतील ग्रंथांची सुद्धां बरोबरी करतील. ताऱ्यांच्या गतींचे वगैरे ज्योतिषशास्त्रांतील पुष्कळ नियम यांनीं शोधून काढिले आहेत. मानसशास्त्रावर यांनीं पुष्कळ चातुर्ययुक्त विचार केले आहेत. राजकीय सुधारणेच्या कामांत इंग्लिश लोकांस सर्व लोक पुढारी मानतात."

---

## भर्तृहरि.

प्राचीन काळीं आपल्या देशांत जीं पुरुषरत्नें होऊन गेलीं, त्यांपैकींच भर्तृहरि हें एक होय. थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिलेलीं नाहींत ही एक हानिच आहे, याचें मोठें एक ठळक उदाहरण भर्तृहरिराजा होय. भर्तृहरिराजासारखे पुरुष आपल्या देशांतच काय, पण सर्व भूमंडळाचा इतिहास धुंडाळून पाहिला तरी, फारच थोडे सांपडतील. लक्ष्मी आणि विद्या ह्या

---

*या उभयतांचे ग्रीकभाषेंत उत्तम ग्रंथ आहेत. ‡ हीं प्राचीनकाळीं वेगवेगळाल्या वेळीं यूरोपांत आरमाराविषयीं प्रख्यात शहरें होतीं.

दोन्ही एकत्र वास करीत नाहींत, अशी ह्मण आहे; तिला भर्तृहरि हा मोठाच अपवाद होय. श्रीमंतांच्या अंगीं थोडीशी विद्या असली तरी गरीबाच्या अंगच्या मोठ्या विद्येपेक्षां तिचा मोठा लौकिक होतो; अशा प्रकारचा भर्तृहरि विद्वान् होता असें नाहीं. व्याकरणशास्त्रासारख्या गहन विषयावरचेहि ज्याचे ग्रंथ ऋषिप्रणीतग्रंथांसारखे शेंकडों वर्षें प्रमाणभूत झाले आहेत. अशा पुरुषाची विद्वत्ता किती वर्णावी! भर्तृहरीच्या चरित्राचा राजांस व इतरांस फार उपयोग झाला असता. त्याचें चरित्र साद्यंत लिहिलेलें नाहीं इतकेंच नाहीं, तर त्य विषयीं ज्या दंतकथा आहेत त्याही परस्परांस फार विरुद्ध असल्यामुळें सर्वच संशयार्ह झाल्या आहेत. लक्ष्मी आणि सरस्वती यांप्रमाणें तत्त्वज्ञता आणि रसिकता एकत्र वास करीत नाहींत, असा सामान्य नियम लोक समजतात; तोही भर्तृहरीच्या नांवानें बाधित करून टाकिला. भर्तृहरि जसा उत्तम शास्त्रज्ञ तसा पहिल्या प्रतीचा कविहि होता. त्यानें केलेले काव्यग्रंथ बहुतेक नाहींतसे झाले. शृंगार, नीति, आणि वैराग्य या नांवाचीं तीन शतकें मात्र लोकप्रसिद्ध आहेत. या शतकांनीं या राजकवीचें नांव अमर केलें आहे ह्मटलें तरी चालेल. नीतिशतकाच्या आरंभीं एक श्लोक आहे त्याचा अर्थ येणेंप्रमाणें:—

" जिचें मी मनांत चिंतन करितों, ती मजविषयीं विरक्त, ती दुसऱ्याच माणसाची इच्छा करिते. त्याचेंही मन तिसरीवरच, कोणी एक स्त्री मजकरितां उत्सुक आहे. याकरितां तिला, त्याला, मदनाला, हिला, मला, सर्वांस धिक्कार असो.

ह्या श्लोकावरून भर्तृहरिविषयीं एक चमत्कारिक गोष्ट सांगतात. ती अशी—एका समयीं एका तपस्व्यानें भर्तृहरिराजास प्रासादिक फळ आणून दिलें. राजाची बायकोवर फार प्रीति असे, म्हणून त्यानें तें तिला दिलें. तिचीहि एका पुरुषाचे ठायीं प्रीति जडली होती, त्यास तिनें तें फळ दिलें. त्याचें एका स्त्रीवर मन

गेलें होतें, यामुळें तिला संतुष्ट करण्याकरितां, त्यानें तें फळ तिला दिलें. ह्या स्त्रीचें राजावर मन गेलें होतें, म्हणून राजाची प्रीति संपादण्याकरितां, तिनें तें फळ राजास नजर केलें. फळ पाहतांच राजा चकित झाला. शोध केल्यावर वरील हकीकत त्यास कळली. तेव्हां राजा खिन्न होऊन सर्वसंगपरित्याग करून, वैराग्य धारण करून मोक्षमार्गाचें साधन करूं लागला. या गोष्टींत तथ्यांश किती असेल तो असो; परंतु दंतकथेचा भागहि पुष्कळ असावा असें वाटतें. नीति आणि वैराग्य या शतकांवरून पाहिलें तर, भर्तृहरि मोठा नीतिमान् आणि विरक्त असावा, असें दिसतें.

अत्यंत रूपवान् पुरुष सर्व अलंकारांनीं युक्त पाहिला, आणि तोच पुनः अलंकारविरहित पाहिला तर त्याच्या सौंदर्याच्या आल्हादजनकतेंत पुष्कळ भेद पडेल. तथापि आल्हादजनकता नाहींशी होणार नाहीं. कवितेचें जीवित अर्थ होय. तोच अर्थ अलंकारांनीं भूषित असला म्हणजे, फारच आनंद देतो. गद्यरूपानें तो लिहिला म्हणजे त्याचें सर्व कृत्रिमसौंदर्य नाहींसें होतें, तथापि त्याच्या स्वाभाविक सौंदर्यापासून वाचकांस आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं; असें वाटून त्या शतकांतील थोडे मासलेदार विचार येथें गद्यरूपानें लिहितों:--

ज्यास समजत नाहीं, अशाचें समाधान सहज होतें. जो चांगला सुजाण आहे, त्याचें समाधान फारच लौकर होतें. पण जो थोड्याशा ज्ञानानें करपटलेला ( आपणास शहाणा समजणारा ) त्याचें समाधान ब्रह्मदेवाच्यानेंहि होत नाहीं.

मगराच्या दाढेंत गेलेलें रत्न बलात्कारानें काढितां येईल; प्रचंड लाटांनीं भरलेला समुद्र तरून जातां येईल; रागावलेल्या सापास फुलाप्रमाणें डोक्यावर धारण करितां येईल; परंतु दुराग्रही मूर्ख मनुष्याचें समाधान व्हावयाचें नाहीं.

मौन हें विद्वान् लोकांच्या मंडळीमध्यें अज्ञान झांकण्यासाठीं मूर्ख जनाकरितां, ब्रह्मदेवानें ज्याचा गुण निश्चित आहे, व जें

( सर्वांच्या ) स्वाधीन आहे, असें एक साधन निर्माण केलें आहे.

जेव्हां मला थोडें कळत होतें, तेव्हां एक हत्तीसारखा मदांध झालों, व सर्व मला समजतें असा मनांत गर्व वहात होतों. परंतु जेव्हां विद्वानांपासून थोडथोडें शिकत गेलों, तेव्हां मी मूर्ख आहें, अशी खातरी होऊन अंगांतला जसा ताप जावा तसा माझा ताठा नाहींसा झाला.

जलाच्या योगानें अग्नीचें निवारण करितां येईल. उन्हाचें छत्रीनें निवारण करितां येईल; माजलेल्या हत्तीचें तीक्ष्ण अंकुशानें; बैल, गाढव, यांचें सोट्यानें निवारण करितां येईल; रोग औषधांनीं बरा करितां येईल; मंत्राच्या योगानें विष काढतां येईल; सर्वांला शास्त्रांत औषध सांगितलें आहे; परंतु मूर्खाला मात्र औषध नाहीं.

विद्या, संगीत, कला, हीं ज्यांस नाहींत तो पुच्छशृंगरहित असा प्रत्यक्ष पशुच होय. तो गवत न खातां वांचतो; हें पशूंचें मोठें दैव समजलें पाहिजे.

ज्यांस विद्या नाहीं, तप नाहीं, दान नाहीं, ज्ञान नाहीं, चांगला स्वभाव नाहीं, गुण नाहीं व धर्म नाहीं, ते पृथ्वीस भारभूत असे पशुच मनुष्याच्या रूपानें फिरतात.

अरण्यें, गुहा, यांत पशूंबरोबर राहणें बरें, परंतु इंद्राच्या घरीं राहूनहि मूर्खांशीं सहवास नसावा.

राजे हो, जें चोराला दिसत नाहीं, सर्वकाळ जें उत्तम सुख देतें, याचकांस दिलें तरी वाढतें, कल्पांतींही नाहींसें होत नाहीं; असें जें विद्यारूप धन तें ज्यांपाशीं आहे त्यांस मान द्या. त्यांशीं कोण स्पर्धा करील ?

बाहुभूषणें, चन्द्रासारखे प्रकाशित हार, स्नान, चंदन, पुष्पें, चांगले केश, हीं पुरुषांस शोभवीत नाहींत; संस्कारयुक्त अशी वाणी जवळ असली, तर ती एकटीच पुरुषांस शोभा आणिते. इतर भूषणें नेहमीं झिजतात, वाणी हें मात्र खरें भूषण होय.

विद्या हेंच मनुष्याचें उत्तम सौंदर्य होय. विद्या हेंच सुरक्षित धन, विद्या उपभोग देणारी, कीर्ति करणारी, सुख करणारी, विद्या गुरूंचा गुरु, परदेशीं जाण्यास विद्या हाच मित्र होय. विद्या मोठी देवता होय, विद्येचा मान राजांमध्यें सुद्धां होतो, धनाचा होत नाहीं. विद्याविहीन मनुष्य केवळ पशु होय.

स्वजनांविषयीं दक्षता, दुसऱ्याविषयीं दया, दुर्जनांचे ठायीं निष्ठुरता, साधूंविषयीं प्रीति, राजाचे ठायीं नीति, विद्वानांचे ठायीं सरळपणा, शत्रूंच्या ठायीं शौर्य, वडिलांविषयीं सहनशीलता, स्त्रियांविषयीं धूर्तता, हे गुण ज्या कुशल पुरुषांमध्यें असतात, त्यांमुळेंच जगाची राहाटी चालते.

बुद्धीचा जडपणा हरण करिते, खरें बोलण्यास शिकविते. मान वाढविते, पाप घालविते, चित्त प्रसन्न ठेविते, लोकांत कीर्ति वाढविते. याप्रमाणें सत्संगति पुरुषांचें काय करीत नाहीं ?

सदाचरणी पुत्र, पतिव्रता बायको, कृपा करणारा धनी, प्रीति करणारा मित्र, प्रामाणिक सेवक, स्वस्थ अंतःकरण, सुन्दर शरीर, निश्चल ऐश्वर्य, विद्येनें उज्ज्वलित असें मुख, हीं सर्व, स्वर्गात क्रीडा करणारा देव प्रसन्न झाला असतां, मनुष्यांस प्राप्त होतात.

हिंसेपासून निवृत्ति, परधन न घेण्याचा नियम, सत्य भाषण, योग्य काळीं शक्तीप्रमाणें दान, परस्त्रीभाषणाविषयीं मुकेपणा, निर्लोभ, वडिलांच्या ठायीं नम्रता, सर्व प्राण्यांवर दया, हा सर्व शास्त्रांमध्यें सांगितलेला असा श्रेयःसंपादनाचा सामान्य मार्ग आहे. यापासून कोणत्याहि धर्माचें आचरण करण्यास बाध येत नाहीं.

विघ्नें येतील म्हणून हलके लोक काम आरंभीतच नाहींत, मध्यम असतात ते विघ्नें आलीं म्हणजे सोडून देतात; उत्तम असतात ते विघ्नें पुनः पुनः आलीं तरी आरंभिलेलें कार्य सोडीत नाहींत.

प्रिय आणि न्याय्य आचरण, प्राण गेला तरी पाप न करणें, दुष्टांजवळ याचना न करणें, स्नेही असूनहि गरिबींत असला तर

त्यापाशीं न मागणें, संकटकाळीं धैर्य धरणें, थोर जातील त्या मार्गानें जाणें, हें तरवारीच्या धारेसारखें कठीण व्रत साधूंला कोणीं सांगितलें ?

चक्राप्रमाणें भ्रमण करणाऱ्या संसारामध्यें कोण मरून उत्पन्न होत नाहीं ? ज्याच्या योगानें कुल उदयास येतें त्यासच जन्मला असें म्हणावें.

सर्व इंद्रियें तींच, कर्म तेंच, अकुंठित अशी बुद्धि तीच, बोलणें तेंच, मनुष्य तोच, परंतु द्रव्याचा उबारा नाहींसा झाला म्हणजे क्षणांत बदलून जातो, हें मोठें आश्चर्य आहे !

वाईट प्रधान असले म्हणजे राजा नाश पावतो; साधु विषयसंगानें नाश पावतो; मुलगा लाडांनीं नासतो; ब्राह्मण विद्याभ्यास न केल्यानें नासतो; कुल वाईट मुलगा निपजल्यानें नासतें; दुष्टांच्या सहवासानें स्वभाव बिघडतो; मद्याच्या योगानें लज्जा नाहींशी होते; देखरेख न केल्यानें शेतकी बिघडते; प्रवासास गेल्यानें प्रेम नाहींसें होतें; अप्रीतीनें मित्रत्व नाहींसें होतें; उधळेपणा व उन्मत्तपणा यांच्या योगानें द्रव्य नाहींसें होतें.

दान, उपयोग, नाश, ह्या धनाच्या तीन अवस्था आहेत. जो देत नाहीं, व उपभोगहि घेत नाहीं, त्याच्या धनाची तिसरी अवस्था होते.

निर्दयपणा, कारणाशिवाय भांडण, परधन आणि परस्त्री यांची इच्छा, सज्जन आणि भाऊबंद यांचा हेवा, हे दुर्जनांचे स्वाभाविक दुर्गुण आहेत.

दुर्जन विद्वान् असला तरी त्याचा त्याग करावा. सर्प रत्नानें भूषित असला तरी, तो भयंकर नाहीं काय ?

नम्र असला म्हणजे मूर्ख, व्रत करणारा असला म्हणजे ढोंगी, स्वच्छ वागणारा असला म्हणजे लुच्चा, शूर असला म्हणजे निर्दय, सरळ असला म्हणजे अप्रबुद्ध, वक्ता असला तर बडबड्या, शांत

असला म्हणजे अशक्त, याप्रमाणें गुणवानांचा असा कोणता गुण आहे कीं, ज्यास दुर्जनांनीं नांव ठेविलें नाहीं ?

लोभ असेल तर दुसरा दुर्गुण कशास पाहिजे ? पिशुनता असल्यावर दुसरीं पातकें कशास पाहिजेत ? सत्य असेल तर तपाचें काय करावयाचें आहे ? मन शुद्ध असेल तर तीर्थास जाण्याची काय गरज ? अंगीं भलेपणा असला तर दुसरे गुण काय करावयाचे ? कीर्ति असली तर अलंकाराची काय गरज ? चांगली विद्या असली म्हणजे आतांचें काय कारण ? अपकीर्ति असेल तर मरण कशास पाहिजे ? आहाराचा नियम असला तर वैद्य कशास पाहिजे ?

बोलला नाहीं तर मुका, बोलला तर बडबड्या, सहनशील असला तर भित्रा, नाहीं तर हलकट, जवळ उभा राहिला तर दांडगा, नाहीं तर भेकड. एकंदर तात्पर्य इतकेंच कीं, दुसऱ्याची चाकरी करणें फार कठीण आहे. मोठ्या योग्यांना देखील तें साधावयाचें नाहीं.

सकाळच्या सावलीप्रमाणें पहिल्यानें मोठी व मग कमी होत जाणारी अशी दुष्टांची मैत्री असते. सज्जनांची सन्ध्याकाळच्या सावलीप्रमाणें पहिल्यानें कमी व मग वाढत जाणारी अशी असते.

हरिण तृणावर उपजीविका करतात, मासे जलप्राशन करून राहतात, साधु सर्वदा संतोष धारण करून राहतात, तथापि पारधी, कोळी आणि दुर्जन हे त्यांचे विनाकारण शत्रु बनले आहेत.

सत्संगाची इच्छा, दुसऱ्यांच्या गुणांवर प्रीति, गुरुविषयीं नम्रता, विद्येचें व्यसन, स्वस्त्रीची आवड, लोकापवादाचें भय, ईश्वरावर भक्ति, मनाचा निग्रह करण्याविषयीं शक्ति, कुसंगतिचा त्याग, हे निर्मळ गुण ज्याचे ठायीं वास करितात, त्या पुरुषांस नमस्कार असो.

विपत्तींत धैर्य, भरभराटीच्या वेळेस क्षमा, सभेमध्यें वाक्पटुत्व,

युद्धांत पराक्रम, कीर्तीची आवड, विद्येचें व्यसन, हीं मोठ्यांच्या अंगीं स्वभावसिद्ध असतात.

गुप्तपणें दान करणें, कोणी घरीं आला असतां आदरसत्कार करणें, दुसऱ्याचें बरें केलें तरी न बोलणें, आपल्यावर कोणीं उपकार केला तर तो मात्र चौघांत सांगणें, लक्ष्मी असतांहि गर्व नसणें, दुसऱ्याची वाईट गोष्ट न बोलणें हें तरवारीच्या धारेसारखें तीव्र व्रत साधूंस कोणी सांगितलें?

हस्ताच्या ठायीं दातृत्व, शिराच्या ठायीं थोरांविषयीं नम्रता, मुखामध्यें सत्य भाषण, बाहूंमध्यें मोठा पराक्रम, अंतःकरणांत स्वस्थता, कर्णांनीं शास्त्रश्रवण, हीं संपत्तीशिवाय स्वभावतःच जे मोठे आहेत, त्यांचीं भूषणें होत.

ऐश्वर्यांत असतां थोरांचें अंतःकरण कमलपत्रासारखें कोमल असतें; तेंच विपत्कालीं पाषाणासारखें कठीण होतें.

तापलेल्या लोखंडावर पाणी पडलें तर त्याचा मागमूस देखील राहत नाहीं. तेंच कमलपत्रावर पडलें तर मोत्यांसारखें शोभतें. स्वाती नक्षत्राच्या वेळेस समुद्रांत शिंपीमध्यें पडलें तर तेंच मोतीं बनतें. यावरून असें दिसतें कीं, उत्तम, मध्यम, कनिष्ठ, हे गुण संगतीच्या योगानें उत्पन्न होतात.

आपल्या सदाचरणानें बापास संतुष्ट करतो तोच पुत्र, जी भर्त्याचें हित इच्छिते तीच बायको, संपत्तींत आणि विपत्तींत सारखा असतो तोच मित्र, हीं तीन जगांत पुण्यवान् असतात त्यांस मिळतात.

लवून उंच होतात, दुसऱ्यांच्या गुणांचें वर्णन करून आपले गुण प्रसिद्ध करतात, दुसऱ्यांसाठीं अनेक प्रकारचे यत्न करून स्वार्थ साधितात, न बोलतां सहन करून निंदायुक्त कठोर भाषण करणाऱ्या दुष्टांस दोष लावितात, अशा साधूंचें आचरण आश्चर्यकारक होय; हे जगांत कोणांस पूज्य नाहींत?

फळें आलीं ह्मणजे वृक्ष लवतात, पाण्याच्या योगानें ढग लोंबूं

लागतात, सत्पुरुष समृद्धीनें नम्र होतात; परोपकारी जे आहेत, त्यांचा स्वभावच हा आहे.

कान शास्त्रश्रवण केल्यानेंच शोभतो, भिकबाळीनें शोभत नाहीं. दानानें हात शोभतो, कड्यानें शोभत नाहीं. कृपाळू मनुष्याचें शरीर परोपकाराच्या योगानें शोभतें,चंदनाच्या उटीनें शोभत नाहीं.

पापापासून निवारण करणें ( पाप करूं न देणें ), हिताकडे वळविणें, दुर्गुण गुप्त ठेवणें, गुण प्रसिद्ध करणें, विपत्ति आली तरी न सोडणें, प्रसंगीं देणें; हें सन्मित्रांचें लक्षण होय, असें सज्जन ह्मणतात.

स्वार्थ टाकूनहि परहित करतात, ते सत्पुरुष होत. स्वार्थहानि न करितां परोपकार करतात, ते सामान्य मनुष्य होत. स्वकार्य साधण्याकरितां दुसऱ्यांचा नाश करतात, ते मनुष्यांतले राक्षस समजावयाचे. जे स्वहित नसतांहि दुसऱ्यांचा नाश करितात, ते कोण, हें आह्मी समजत नाहीं.

साधूंची मैत्री दूध आणि पाणी यांसारखी असते. दूध पहिल्यानें पाण्यास आपले सर्व गुण देतें. दुधाचा ताप पाहून पाणी आपणास जाळून घेतें. मित्राची विपत्ति पाहून दूधहि अग्निप्रवेश करण्यास तयार होतें. परंतु पाण्याची गांठ पडतांच शान्त होतें.

लोभ सोडून दे, क्षमा धारण कर, उन्मत्तपणा टाक, पापवासना धरूं नको, खरें बोल, साधूंच्या मार्गाचें अनुसरण कर, विद्वानांची सेवा कर, मान देण्यास योग्य असतील त्यांस मान दे, शत्रूंवर कृपा कर, आपल्या अंगचे गुण वर्णूं नको, कीर्तीचें रक्षण कर, दुःखितांवर दया कर, हें सर्व साधूंचें लक्षण आहे.

ज्यांचीं मनें, वाणी, शरीर, हीं पुण्यरूप अमृतानें भरलीं आहेत, जगावर शेंकडों उपकार करणारे,दुसऱ्याचा लेशमात्र गुण पर्वतासारखा करून अंतःकरणांत आनंद पावणारे,असे कितीएक साधु आहेत.

कधीं भूमीवर निजतो, कधीं पलंगावरहि पडतो, कधीं घोंगडी पांघरतो, कधीं उंची वस्त्रें वापरतो, कधीं भाजी खाऊन राहतो,

कधीं शाल्योदन भक्षण करतो, कार्यसिद्धीविषयीं उत्सुक असा शहाणा मनुष्य सुख किंवा दुःख यांस मोजीत नाहीं.

ऐश्वर्याचें भूषण सौजन्य, शौर्याचें भूषण वाक्संयम, ज्ञानाचें भूषण शांति, विद्येचें भूषण विनय, द्रव्याचें भूषण सत्पात्रीं व्यय, तपाचें भूषण अक्रोध, समर्थाचें भूषण क्षमा, धर्माचें भूषण निष्कपटपणा, सर्वांचें कारण सुस्वभाव आहे. सुस्वभाव हाच उत्तम अलंकार होय, ही गोष्ट सर्वांस लागू आहे.

नीति जाणणारे निंदा करोत, किंवा स्तुति करोत, लक्ष्मी येवो किंवा जावो, मरण आज येवो किंवा दुसऱ्या युगीं येवो, न्याय्य मार्गापासून शहाणे लोक पाऊल हालवीत नाहींत.

आळस हाच मनुष्याच्या अंगांत मोठा रिपु आहे, उद्योगासारखा दुसरा बंधु नाहीं, ज्याच्या योगानें मनुष्य नाश पावत नाहीं.

झाड तोडलें तरी पुनः फुटतें, चंद्र क्षीण झाला तरी पुनः वाढतो, असा विचार करून साधुजन विपत्ति आली तरी दुःखी होत नाहींत.

दैवाप्रमाणें फलप्राप्ति होते, दैवानेंच बुद्धि होते, हें खरें असलें तरी शहाण्यानें चांगला विचार करून कर्म करावें.

टक्कल पडलेल्या एका मनुष्याचें डोकें उन्हानें तापलें, याकरितां सावलींत बसावें म्हणून तो एका झाडाखालीं गेला. दुर्दैवानें तें झाड ताडाचें होतें. तेथें बसणार तों इतक्यांत झाडावरून एक फळ पडलें तें ताडदिशीं त्याच्या डोक्यावर आपटलें. दुर्दैवी मनुष्य कोठें गेला तरी तेथें विपत्ति ठेविली आहेच.

चांगलें, वाईट, कोणतेंहि काम करण्यापूर्वीं शहाण्यानें त्याचा परिणाम मनांत आणावा. उतावळीनें केलेल्या कामाचा पश्चात्ताप मरणापर्यंत मनास टोंचीत असतो.

| | |
|---|---|
| लाभ कोणता ? | गुणिजनांचा समागम. |
| दुःख कोणतें ? | मूर्खांची संगत. |
| नाश कोणता ? | प्रसंगावधान नसणें. |

| | |
|---|---|
| कौशल्य कोणतें ? | धर्मतत्त्वावर प्रीति. |
| शूर कोण ? | जितेंद्रिय. |
| आवडती स्त्री कोणती ? | पतिव्रता. |
| धन कोणतें ? | विद्या. |
| राज्य कोणतें ? | आज्ञाभंग न होणें. |

अप्रियभाषणाविषयीं दरिद्री, प्रियवचनाविषयीं संपन्न, स्वस्त्रीनें संतुष्ट, परनिंदेपासून निवृत्त, अशा पुरुषांच्या योगानें पृथ्वी कोठें कोठें भूषित आहे.

मशाल खालीं केली तरी अग्निज्वाळा वर यावयाच्याच, त्याप्रमाणेंच धैर्यवानास कितीहि विपत्ति आल्या तरी, त्यांचें धैर्य नाहींसें व्हावयाचें नाहीं.

कांताकटाक्षबाण ज्याच्या चित्तास जखम करीत नाहींत, जो क्रोधानें संतप्त होत नाहीं, ज्यास लुब्ध करण्यास विषय समर्थ होत नाहींत; असा धैर्यवान् मनुष्य सर्व त्रैलोक्य जिंकतो.

साधूंचा परिचय करावा, त्यांनीं उपदेश केला नाहीं तरी हरकत नाहीं; त्यांचें सहज भाषण हेंच शास्त्र होय.

दैवगतीनें सरोवरांत कमळें नाहींतशीं झालीं तरी कोंबड्यांप्रमाणें हंस उकिरडा उकरूं लागतील काय ?

उंच पर्वताच्या शिखरावरून वाळवंटावर पडून शरीर मोठमोठ्या दगडांनीं फुटलेलें बरें, तसेच तीव्र आहेत दांत ज्याचे अशा सर्पाच्या मुखांतहि हात घातलेला बरा, तशीच अग्नीमध्यें उडी टाकलेली बरी तथापि सदाचार सोडणें ठीक नाहीं.

---

## वैराग्यशतक.

अनेक घोर भयंकर देश फिरलों, तथापि कांहीं मिळालें नाहीं. जात्याभिमान व कुलाभिमान सोडून लोकांची चाकरी केली ती व्यर्थ; कावळ्याप्रमाणें अभिमान सोडून संकोचानें परान्नग्रहण

केलें, तरी हे तृष्णे, अजून वाढतेस; हे चांडाळिणी, तूं अद्याप संतुष्ट होत नाहींस.

दुष्टांचीं बोलणीं सोसलीं, त्यांस संतुष्ट करण्याकरितां कसेंहि करून रडें मनांत दाबून मनांत कांहीं नसतां हंसलों. मन स्थिर करून त्यास हातहि जोडले. तथापि हे आशे, अजून तूं मला कां नाचवितेस?

सूर्याच्या उदयास्तांनीं आयुष्य क्षीण होत आहे; ज्यांत पुष्कळ मोठमोठ्या खटपटी आहेत, अशा अनेक व्यापारांच्या योगानें काल कसा जातो हें समजत नाहीं; जन्म, जरा, मरण पाहून त्रास उत्पन्न होत नाहीं; तस्मात् मोहरूप मद्य प्राशन करून सर्व जग उन्मत्त झालें आहे, असें म्हटलें पाहिजे.

उपभोगाची इच्छा निवृत्त झाली; अभिमान गेला; बरोबरचे जिवलग मित्र स्वर्गास गेले; काठी धरून सुद्धां उभें राहण्याची पंचाईत पडूं लागली; तथापि हा निर्लज्ज देह मरणाला भितोच.

तोंडाला सुरकुत्या पडल्या, केश पिकले, इंद्रियें शिथिल झालीं, एक तृष्णा मात्र तरुण आहे.

बहुत काळपर्यंत उपभोग केला तरी विषय जावयाचेच; मग लोक स्वतःच कां टाकीत नाहींत? स्वतः टाकण्यास कोणती हरकत आहे? इतकाच भेद कीं, नाहींतसे झाले म्हणजे मनास फार दुःख देतात आणि आपण होऊन टाकिले असतां अनंत असें शांतिसुख देतात.

प्रभाव ठाऊक नसल्यामुळें शलभ दिव्यांत पडतो, मासा अज्ञानानें गळांत सांपडतो, तेंहि असो; परंतु आह्मी शहाणे म्हणविणारे अनेक विपत्तींनीं युक्त अशा विषयांप्रत टाकीत नाहींत. तस्मात् मोहाचा महिमा अगाध आहे.

खाण्यास फळें, पिण्यास गोड पाणी, निजण्यास जमीन, आणि पांघरण्यास वल्कलें पुरे; पण धनरूप मद्यानें ज्यांचीं सर्व इंद्रियें

मत्त झालीं आहेत, अशा दुर्जनांचा दांडगेपणा माझ्यानें सोसवत नाहीं.

कोणी पंडित राजास म्हणतो—तूं द्रव्याचा मालक आहेस, आह्मांजवळ सरस्वती आहे. तूं शूर आहेस, वाद करणाऱ्यांचा गर्वरूप ज्वर घालविण्याविषयीं आह्मीहि कुशल आहों. मोठमोठे श्रीमान् लोक तुझी सेवा करितात, बुद्धीचा मळ घालविण्याकरितां जिज्ञासु आमचीहि सेवा करतात. आमची तुला गरज नसेल तर तुझीहि आह्मांला नाहीं, हा मी चाललों.

कोणी साधु राजास म्हणतो—आह्मी वल्कलांनीं संतुष्ट आहों, तूं वस्त्रांनीं संतुष्ट आहेस, तुझा आमचा संतोष सारखाच. मग भेद कोठें आहे? ज्याचा लोभ मोठा तो दरिद्री. मन संतुष्ट असल्यावर धनवान् कोण आणि भिकारी कोण?

धन्याची चाकरी करणें कठीण, राजाचें चित्त फार चंचल, आमची इच्छा तर मोठी, मोक्षाकडे आमचें मन लागलें आहे, जरा देहाचा नाश करते, मृत्यु सर्व जीवित हरण करतो, याकरितां मित्रा, विद्वानांला तपाशिवाय दुसरें कांहीं श्रेयस्कर नाहीं.

विषय, मेघाच्या आच्छादनांत हालणाऱ्या विजांप्रमाणें चंचल; आयुष्य, वायूनें फाटलेल्या अभ्रांतील पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर; तारुण्यहि फार चंचल; असें मनांत आणून बुधहो, धैर्य आणि समाधि यांच्या योगानें सुलभ असा जो योग त्याकडे मन लावा.

कोणीएक आपल्या पूर्वींच्या मित्रास ह्मणतो, तुह्मी आह्मी, आह्मी तुह्मी, अशी आपली बुद्धि होती; आतां काय झालें? जेणेंकरून तुह्मी तुह्मी, आह्मी आह्मी असें झालें.

आयुष्य जलतरंगाप्रमाणें चंचल, तारुण्यहि थोडे दिवस राहणारें, धनहि क्षणभंगुर, विषयोपभोग पावसांतल्या विद्युल्लतेप्रमाणें चंचल, स्त्रीसुखहि क्षणिक, याकारितां जनहो, संसार हाच कोणी भयसमुद्र, हा तरण्याकरितां ब्रह्माकडे चित्त लावा.

ही वेळ नाहीं, महाराज रंगमहालांत निजले आहेत. बरें, उठल्यावर भेट होईल? छे, रावसाहेब रागावतील. अशीं ज्या दारांत भाषणें होतात, त्यांस टाकून हे चित्ता, विश्वेश्वर जो देव त्याच्या घरीं जा, तेथें द्वारपालाचीं निर्दय कठोर भाषणें नाहींत. तें घर अनंत कल्याण करणारें आहे.

जरा वाघिणीसारखी भय दाखवीत उभी आहेच, शत्रूप्रमाणें रोग शरिरावर प्रहार करितातच आहेत, फुटलेल्या भांड्यांतून पाणी पाझरतें त्याप्रमाणें आयुष्य क्षीण होतच आहे; तथापि लोक दुराचरण करतात, हें मोठें आश्चर्य आहे!

जो जितेंद्रिय, शान्त, समचित्त, ज्याचें मन सदा संतुष्ट, तो दरिद्री असला तरी सर्व ठिकाणीं त्याला सुखच आहे.

लक्ष्मी चंचल, आयुष्य चंचल, तारुण्य चंचल; अत्यंत चंचळ अशा संसारामध्यें एक धर्म मात्र स्थिर आहे.

---

## प्रश्नोत्तरमालिका.

प्रश्नोत्तररूपानें उपदेश करणें ही पद्धति भरतखंडांत प्राचीन कालापासून आहे. वेदांतहि अनेक ठिकाणीं प्रश्नोत्तररूपानें कित्येक विषय वर्णिले आहेत. या वेदांतील प्रश्नोत्तरांस 'वाकोवाक्य' असें प्राचीन संस्कृत ग्रन्थकार ह्मणतात. जगन्मान्य परमपूज्य वेदधर्मरक्षक श्रीमच्छंकराचार्यांनीं प्रश्नोत्तरमालिका या नांवाचें एक लहान उपदेशप्रकरण गुरुशिष्यसंवादरूपानें लिहिलें आहे, त्यांतील प्रश्नोत्तरें फारच उत्तम आहेत, तीं वाचकांच्या उपयोगाकरतां येथें देतों.

शिष्य गुरूस ह्मणतोः—

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| १ महाराज, घ्यावें काय ? | गुरूचें वचन. |
| २ टाकावें काय ? | वाईट कृत्य. |

| | | |
|---|---|---|
| ३ | गुरु कोण ? | तत्त्वज्ञ असून सर्वदा प्राण्यांच्या हिताकरितां उद्योग करतो तो. |
| ४ | शहाण्यानें लवकर काय करावें ? | मोक्षप्राप्ति. |
| ५ | मोक्षवृक्षाचें मुख्य बीज काय? | सदाचरणसहित उत्तम ज्ञान. |
| ६ | हितरकारक काय ? | धर्म. |
| ७ | शुद्ध कोण ? | ज्याचें मन शुद्ध तो. |
| ८ | पंडित कोण ? | विचारी. |
| ९ | विष कोणतें ? | श्रेष्ठांचा अवमान करणें. |
| १० | संसारांत सार असें काय ? | परहित करून जन्माचें सार्थक्य करावें हेंच. |
| ११ | मदिरेसारखें मोहक काय ? | प्रेम[1]. |
| १२ | चोरटे कोण ? | विषय[2]. |
| १३ | संसारवल्ली कोणती ? | तृष्णा. |
| १४ | वैरी कोण ? | आळस. |
| १५ | भय कशापासून ? | मरणापासून[3]. |
| १६ | आंधळ्यापेक्षां अधिक अंध कोण ? | विषयांध. |
| १७ | शूर कोण ? | ललनांच्या नेत्रकटाक्षांनीं पीडित होत नाहीं तो. |
| १८ | अमृतासारखें कर्णरूप ओंजळीनें काय प्यावें ? | सदुपदेश. |
| १९ | मोठेपणाचें मूळ काय ? | याचना न करणें. |
| २० | दारिद्र्य कोणतें ? | असंतोष. |

---

१ अति प्रेमानें मनुष्य वेडा होतो. २ विषय विवेकास चोरतात ह्मणूनच शहाणे सुद्धां दुराचरण करतात. ३. इतर भयें टळ. तात, मरणाचें भय टळत नाहीं.

| | | |
|---|---|---|
| २१ | हलकेपणा कोणता ? | नेहमीं दुसऱ्याजवळ याचना करणें |
| २२ | जीवित कोणतें ? | जें निष्पाप तें. |
| २३ | मूर्खपणा कोणता ? | बुद्धि असून अभ्यास न करणें. |
| २४ | जागा कोण ? | विवेकी. |
| २५ | निद्रा कोणती ? | मूढता. |
| २६ | कमलाच्या पाकळीवरील पाण्याप्रमाणें चंचल काय? | तारुण्य, संपत्ति आणि आयुष्य. |
| २७ | चंद्रकिरणासारखे शीतळ कोण? | सज्जन. |
| २८ | नरक कोणता ? | परवशता. |
| २९ | सौख्य कोणतें ? | वैराग्य. |
| ३० | साध्य काय करावें ? | भूतहित. |
| ३१ | सर्वांला प्रिय काय ? | प्राण. |
| ३२ | दान कोणतें ? | प्रत्युपकाराची आकांक्षा न करतां दिलेलें तें. |
| ३३ | मित्र कोण ? | पापापासून निवृत्त करतो तो. |
| ३४ | अलंकार कोणता ? | सुस्वभाव. |
| ३५ | वाणीचें भूषण काय ? | सत्य. |
| ३६ | अनर्थ कशानें होतो ? | गर्वानें. |
| ३७ | सुसंगति कोणती ? | सुखावह होईल ती. |
| ३८ | सर्व दुःखांच्या नाशाविषयीं दक्ष कोण ? | विरक्त. |
| ३९ | आंधळा कोण ? | अकार्य करतो तो. |
| ४० | बहिरा कोण ? | हितवचन ऐकत नाहीं तो. |
| ४१ | मुका कोण ? | योग्य वेळीं प्रिय भाषण करतां येत नाहीं तो. |
| ४२ | मृत्यु कोणता ? | मूर्खत्व. |
| ४३ | अमोलिक काय ? | वेळेवर दिलें तें. |

| | | |
|---|---|---|
| ४४ | मरेपर्यंत टोंचणारें शल्य काय ? | गुप्त केलेलें पाप. |
| ४५ | यत्न कशाविषयीं करावा | विद्याभ्यासाविषयीं, चांगलें औषध घेण्याविषयीं व दान करण्याविषयीं. |
| ४६ | तिरस्कार कशाचा करावा ? | दुष्ट आणि परद्रव्य यांचा. |
| ४७ | नेहमीं ध्यानांत काय ठेवावें? | संसाराची असारता. |
| ४८ | आवडतीं कोण असावीं ? | दीनदया आणि सज्जनमैत्री. |
| ४९ | जीव जाण्याचा प्रसंग आला तरी कोणाचें मन स्वाधीन होत नाहीं ? | मूर्ख, संतापी, गर्विष्ठ आणि कृतघ्न यांचें. |
| ५० | पूज्य कोण ? | सदाचरणी. |
| ५१ | नीच कोण ? | अस्थिरबुद्धि. |
| ५२ | जग कोणीं जिंकिलें ? | सत्यशील, क्षमाशील जो त्यानें. |
| ५३ | रहावें कोठें ? | सज्जनाजवळ किंवा काशींत. |
| ५४ | देव देखील कोणाला नमस्कार करतील ? | दयाशीलास. |
| ५५ | भय कशाचें बाळगावें ? | संसाररूप अटवीचें. |
| ५६ | इहलोकीं चांगलें व्हावें ह्मणून वागावें कसें ? | न्यायमार्गानें. |
| ५७ | विजेच्या चमकण्याप्रमाणें चंचल कोण ? | दुर्जनसंगति आणि युवती. |
| ५८ | कलीमध्येंहि कोणाची कुलीनता आणि सुशीलता ढळत नाहीं ? | सत्पुरुषांची. |
| ५९ | कशाचें वाईट वाटावें ? | कृपणपणाचें. |
| ६० | ऐश्वर्य असलें तर स्तुत्य काय ? | औदार्य. |

| | | |
|---|---|---|
| ६१ | गरिबास किंवा समर्थास स्तुत्य काय ? | सहिष्णुत्व ( सोशिकपणा ] |
| ६२ | चिंतामणीसारखें दुर्लभ काय ? | गोड बोलून दान करणें, ज्ञान असून गर्व नसणें, आंगीं शौर्य असून क्षमा असणें, संपत्ति असून-खर्च करणें. ह्या कल्याणकारक चार गोष्टी दुर्लभ आहेत. |

---

## यक्षप्रश्न.

महाभारतांत वनपर्वाच्या शेवटीं यक्षानें धर्मराजास प्रश्न विचारिले आणि धर्मराजानें त्यांचीं समर्पक उत्तरें दिलीं त्यांतील कांहीं प्रश्नोत्तरें येथें सांगतों.

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| विद्वान् कशानें होतो ? | शास्त्रांच्या योगानें. |
| ब्रह्मप्राप्ति कशानें होते ? | तपानें. |
| साहाय्य कशानें प्राप्त होतें ? | धैर्यानें. |
| बुद्धिमान् कशानें होतो ? | वृद्धांचा सहवास केल्यानें. |
| सुखोपभोग घेणारा, बुद्धिमान्, लोकांमध्यें मान्य, असा असून जिवंत असतां मेलेला कोण ? | देव, अतिथि, आप्तवर्ग, वडील व आत्मा, यांस जो संतुष्ट ठेवीत नाहीं तो. |
| भूमीपेक्षां मोठें काय ? | माता. |
| आकाशापेक्षां उंच कोण ? | पिता. |
| वायूपेक्षां चंचल कोण ? | मन. |
| तृणापेक्षां पुष्कळ काय ? | चिंता. |
| प्रवाशाचा मित्र कोण ? | समुदाय. |
| घरांत राहणाऱ्याचा मित्र कोण ? | भार्या. |

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| रोग्याचा मित्र कोण ? | वैद्य. |
| मरणाऱ्याचा मित्र कोण ? | दान. |
| सनातन ( म्हणजे त्रिकालाबाधित ) असा धर्म कोणता ? | जो मोक्ष देतो तो. |
| थंडीचें औषध काय ? | अग्नि. |
| कशाच्या योगानें कीर्ति अवश्य प्राप्त होते ? | दातृत्वाच्या योगानें. |
| स्वर्गप्राप्ति कशाचे योगानें हटकून प्राप्त होते ? | सत्यानें. |
| सुख हटकून कशाचे योगानें प्राप्त होतें ? | चांगल्या स्वभावाच्या योगानें |
| देवानें मनुष्यास दिलेला मित्र कोणता ? | भार्या. |
| मनुष्याचें उपजीविन काय ? | पर्जन्य. |
| मनुष्याचें आवश्यक कृत्य कोणतें ? | दान. |
| धन मिळविण्यास मुख्य साधन कोणतें ? | दक्षता. |
| धनांमध्यें श्रेष्ठ धन कोणतें ? | विद्याधन. |
| उत्तम लाभ कोणता ? | आरोग्यलाभ. |
| उत्तम सुख कोणतें ? | संतोष. |
| मुख्य धर्म कोणता ? | पीडा न करणें. |
| काय स्वाधीन ठेविलें असतां शोक होत नाहीं ? | मन. |
| कोणाची मैत्री कमी होत नाहीं ? | साधूंची. |
| काय टाकिल्यानें लोकप्रिय होतो ? | अभिमान. |

| प्रश्न. | उत्तर. |
|---|---|
| काय टाकिल्यानें शोक होत नाहीं ? | क्रोध. |
| काय टाकिल्यानें धनवान् होतो ? | विषयवासना. |
| काय टाकिल्यानें सुखी होतो ? | लोभ. |
| नटनर्तकांस कशाकरितां द्यावें ? | लौकिकाकरितां. |
| राजास कां द्यावें ? | भयनिवृत्तीकरितां. |
| लोक कशानें आच्छादित आहे ? | अज्ञानानें. |
| मनुष्य मित्रांचा त्याग कशाचे योगानें करितो ? | लोभानें. |
| मनुष्य कशाच्या योगानें स्वर्गास जात नाहीं ? | विषयसंगानें. |
| मेलेला पुरूष कोण ? | दरिद्री. |
| मेलेलें राष्ट्र कोणतें ? | ज्यांत राजा नाहीं तें. |
| विष कोणतें ? | याचना. |
| तप म्हणजे काय ? | स्वधर्माचरण. |
| दम म्हणजे काय ? | मनाचा निग्रह. |
| लाज कशाची धगवी ? | वाईट काम करण्याची. |
| ज्ञान म्हणजे काय ? | परमेश्वरतत्व समजणें. |
| शम म्हणजे काय ? | चित्ताची शांति. |
| दया म्हणजे काय ? | सर्वांस सुख व्हावें असें इच्छिणें. |
| सरळपणा म्हणजे काय? | समदृष्टि. |
| मनुष्याचा दुर्जय शत्रु कोण ? | क्रोध. |
| मोठा रोग कोणता ? | लोभ. |
| साधु कोण ? | सर्वांस हितकारक जो तो. |
| असाधु ( म्हणजे दुष्ट ) कोण ? | निर्दय ( ज्यास दया नाहीं तो ) |
| मोह कोणता ? | धर्म न समजणें. |
| मान म्हणजे काय ? | मीच मोठा असें समजणें. |

| प्रश्न. | उत्तर, |
| --- | --- |
| आळस कोणता ? | शास्त्रांत सांगितलेलें आचरण न करणें. |
| शोक कोणता ? | अज्ञान. |
| कोणत्या गोष्टीस ऋषींनीं स्थैर्य म्हटलें आहे. | स्वधर्माच्या ठायीं निश्चय असणें याचें नांव स्थैर्य. |
| धैर्य म्हणजे काय ? | इंद्रियनिग्रह हेंच धैर्य. |
| स्नान कशास म्हणावें? | मनाचा मळ घालविणें हें स्नान होय. |
| दान म्हणजे काय ? | प्राण्यांचें रक्षण करणें. |
| पंडित कोण ? | धर्म जाणतो तो. |
| मूर्ख कोण ? | नास्तिक. |
| काम म्हणजे काय ? | संसारवासना. |
| मत्सर कोणता ? | मन:क्षोभ. |
| अहंकार म्हणजे काय ? | मोठें अज्ञान, म्हणजे माया;(देहात्मवाद) हाच अहंकार. |
| दंभ म्हणजे काय ? | धर्माचा बाहेरून डौल घालणें. |
| दैव म्हणजे काय ? | दिलें असेल त्याप्रमाणें प्राप्त होणें याचेंच नांव दैव. |
| पैशून्य म्हणजे काय ? | दुसऱ्यांस दोष लावणें. |
| धर्म, अर्थ, काम, हे तिन्ही परस्परविरुद्ध आहेत, हे कशाचे योगानें एकत्र राहतात ? | स्त्रीपुरुषें उभयतां धर्मानें वागणारीं असलीं म्हणजे हे तिन्ही एके ठिकाणीं राहतात. |
| अक्षय नरक कशाच्या योगानें प्राप्त होतो ? | धन जवळ असून दान, उपभोग, करीत न हीं आणि जवळ कांहीं नाहीं म्हणून सांगतो, या योगानें. हा एक अक्षय नरकांत जाणाऱ्यांपैकीं आहे. |

| प्रश्न. | उत्तर. |
| --- | --- |
| गोड बोलणाऱ्यास काय लाभ होतो? | तो लोकप्रिय होतो. |
| विचार करून काम करणाऱ्यास काय प्राप्त होतें? | त्याचा इतरांपेक्षां अधिक जय होतो. |
| पुष्कळ मित्र असणाऱ्यास काय मिळतें? | तो सुखानें राहतो. |
| धर्माविषयीं तत्पर असणाऱ्यांस काय प्राप्त होतें? | मोक्ष. |
| आश्चर्य कोणतें? | रोजरोज प्राणी मरून यमाचे घरीं जातात असें असून बाकी राहिलेले आपणांस चिरंजीव समजतात यापेक्षां दुसरें आश्चर्य कोणतें? |
| मार्ग कोणता? | पुष्कळ तर्क केले तरी निर्णय होत नाहीं; शास्त्रांतही भिन्न भिन्न प्रकारचीं वचनें, असा कोणताच शास्त्रप्रकार ठरलेला नाहीं कीं, त्याचेंच वचन सर्वांपेक्षां प्रमाण मानावें; धर्माचें तत्त्व तर फारच खोल असें आहे; या करितां थोर लोक जिकडून जातील तोच मार्ग समजावा. |

---

## पितापुत्रसंवाद.

पिता—मुला, ईश्वराचें ज्ञान प्राप्त करून घेणें हें तुझें प्रथम कर्तव्य होय.

पुत्र—बाबा, ऱ्यां ईश्वराचें ज्ञान कसें संपादावें ?

पिता—सृष्टिरचनेवरून व शास्त्रावरून. मुला, कोणतीहि वस्तु आपणांस चार प्रकारांनीं समजते. या चार प्रकारांस प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शाब्द, असे ज्ञानाचे चार प्रकार, म्हटले आहेत. नेत्रादि ज्ञानेंद्रियांपासून जें ज्ञान होतें, तें प्रत्यक्ष ज्ञान होय. व्याप्यव्यापकभाव मनांत येऊन जें ज्ञान होतें, तें अनुमान. एक वस्तु असतां दुसरी वस्तु तेथें अवश्य असावयाचीच असा जो संबंध त्यास व्याप्यव्यापकभाव असें म्हणतात. जसें अग्नि आणि धूम यांचा व्याप्यव्यापकभावसंबंध आहे, म्हणून दुरून धूम पाहिल्याबरोबर तेथें अग्नि आहे असा पाहाणाऱ्याचा निश्चय होतो. सादृश्यापासून जें ज्ञान होतें, त्यास उपमान म्हणतात. गाईसारखा गवा असतो, हें वाक्य ज्यास गाय माहित आहे, व गवा माहित नाहीं, अशा मनुष्यानें ऐकिलें. नंतर कांहीं दिवसांनीं गवा त्याच्या दृष्टीस पडला असतां, गाईसारखा गवा हें पूर्वोक्त वाक्य त्याला आठवलें. गाईचीं कित्येक लक्षणें गव्याचे ठिकाणीं दिसलीं त्यावरून तो हाच गवा असें आपल्या मनांत ठरवितो; या ज्ञानास उपमान असें म्हणतात. शब्दापासून झालेलें जें ज्ञान तें शाब्दज्ञान. जसे देव आहेत, प्राचीन काळीं रामानें रावणाचा पराभव केला, इत्यादि. या ज्ञानापैकीं पहिल्याची म्हणजे प्रत्यक्षाची योग्यता मोठी आहे. कारण, मनुष्याचीं इंद्रियें कामिला ( कामीळ ) वगैरे सत्यज्ञानप्रतिबंधक रोगांनीं युक्त नसल्यास जें ज्ञान होतें त्यांत संशयास कांहींच जागा राहत नाहीं. व्याप्यव्यापकभाव खरा मनांत आल्यास अनुमानज्ञानहि प्रत्यक्षाच्या बरोबरीचें आहे, परंतु तोच व्याप्यव्यापकभाव खोटा मनांत आल्यास हें अगदीं खोटें ठरतें. जसें पुष्कळ ठिकाणीं अग्नि आणि धूम यांस एकत्र पाहून जेथें अग्नि असेल तेथें धूम असावयाचाच; असा व्याप्यव्यापकभाव मनांत आणिला असतां, तप्तायोगोलकाच्या ( तप्तलोखंडाच्या लाल गोळ्याच्या ) ठिकाणीं अव्याप्ति येईल. म्हणून तापून

लाल झालेल्या लोखंडाच्या गोळ्याजवळ धूम पाहूं लागला तर त्यास सांपडणार नाहीं. तेव्हां त्यास आपलें ज्ञान खोटें असें कळेल. सर्व ब्राह्मणांच्या गळ्यांत जानवीं असतात ह्मणून ज्याच्या गळ्यांत जानवें असेल तो ब्राह्मण असें कोणीं ह्मटलें तर तें खोटें आहे. सृष्टीमध्यें कोणत्याही दोन पदार्थांत पूर्ण सादृश्य नाहीं. म्हणून उपमानज्ञान खोटें होण्याचा संभव फार. याकरितां तें अगदींच लटपटीत होय. तसेंच जगांत खोटें बोलणारे फार, यामुळें शाब्दज्ञान पुष्कळ वेळां खोटें होतें.

वरील चार प्रकारांपैकीं प्रत्यक्ष आणि उपमान या दोहोंनीं ईश्वराचें ज्ञान होण्याचा मुळींच संभव नाहीं. ईश्वर निरवच्छिन्न, निर्गुण, निराकार, निर्विकार असल्यामुळें अवच्छिन्न, सगुण, साकार व सविकार अशा इंद्रियांनीं त्याचें ज्ञान होणें ही गोष्ट असंभवनीय होय. तसेंच ईश्वरासारखी दुसरी कोणतीच वस्तु नसल्यामुळें सादृश्यानें त्याचें ज्ञान व्हावयाचें नाहीं. आतां बाकी राहिले दोन प्रकार, अनुमान आणि शब्द. या दोहोंनीं ईश्वराचें ज्ञान होतें तें असें. जगांत कोणतेंहि कार्य कर्त्याशिवाय होत नाहीं. तर या जगद्रूप कार्यास कोणी तरी कर्ता अवश्य असला पाहिजे; असा जो कर्ता तोच ईश्वर. जगांतील कोणत्याहि वस्तूंमध्यें न्यूनाधिक कौशल्य पाहिलें म्हणजे कर्त्याच्या आंगच्या कमजास्त चातुर्याची कल्पना मनांत येते. तसेंच अनंत चमत्कारांनीं युक्त हें पंचमहाभूतात्मक विश्व पाहून त्याचा कर्ताहि सकलगुणसंपन्न अनंतशक्ति असला पाहिजे असें सहज मनांत येतें. तसेंच शास्त्राच्या ग्रंथांतून जें ईश्वराच्या स्वरूपाचें वर्णन केलें आहे, त्यावरून आपणांस ईश्वराचें ज्ञान प्रत्यक्ष होतें; व असे ग्रंथ ज्यांस अतींद्रिय ज्ञान नाहीं, त्यांस लिहितां यावयाचे नाहींत, अशी खातरी असल्यामुळें हें शब्दज्ञान खोटें असण्याचा संभवच नाहीं.

पुत्र—बाबा, असें अनुमान प्राचीन काळीं कोणीं केलें? व शाब्दज्ञानानें ईश्वर कोणास कळला?

पिता—मुला, प्राचीन काळीं गौतम, काणाद, इत्यादि ऋषींनीं सृष्टिज्ञानापासून ईश्वराचें अनुमान केलें. तसेंच व्यासादि ऋषींस शाब्दज्ञानानें ईश्वरज्ञान झालें. या सर्वांनीं मनुष्यांस ईश्वरप्राप्ति व्हावी ह्मणून परोपकारार्थ अत्युत्तम ग्रंथ लिहून ठेविले आहेत.

पुत्र—बाबा, सृष्टिरचनेचा विचार करून काय होईल?

पिता—मुला, त्यापासून मोठा लाभ व आनंद आहे. परमेश्वरानें पांचभौतिक जग उत्पन्न करून त्याचें सौंदर्य अनुभाविण्यास पांच ज्ञानेंद्रियें व सहावें मन हीं त्यानें मनुष्यांस दिलीं आहेत.

पुत्र—बाबा, सृष्टिरचनेचा विचार करून विद्वानांस मात्र आनंद होत असेल.

पिता—मुला, सृष्टिरचनेवरून ईश्वराचें महत्त्व मनांत येण्यास मोठी विद्या पाहिजे असें नाहीं. तिकडे लक्ष मात्र पाहिजे. सूर्योदय झाला ह्मणजे सर्व विश्व प्रकाशित होतें, पर्जन्य पडून पृथ्वी फलपुष्पयुक्त होऊन सर्व प्राण्यांचें रक्षण होतें, या गोष्टी पंडित आणि शेतकरी या उभयतांच्याही मनांत येतात व त्यांपासून दोघांच्याही अंतःकरणांत ईश्वराचा महिमा उभा राहतो, अनंतशक्ति ईश्वरानें सर्व वस्तु अपरिमित चातुर्यानें मनुष्यांस हितकारक अशा केल्या आहेत.

पुत्र—बाबा, सर्व वस्तूंमध्यें ईश्वराचा कृपाळूपणा, चातुर्य, आणि शक्ति, हीं दिसतात काय?

पिता—मुला, बहुतेक ठिकाणीं दिसतात. कित्येक ठिकाणीं दिसणार नाहींत, तर ही आमची पाहाणारांची न्यूनता होय. आंधळ्यास दिसत नाहीं म्हणून सूर्य कमी प्रकाशित आहे, असें नाहीं.

## मनुस्मृति.

एकादा मनुष्य विद्वान्, श्रीमान्, नीतिमान्, शूर, असला म्हणजे त्याच्या विद्या, ऐश्वर्य, नीति, शौर्य, इत्यादि गुणांनीं अनेक मनुष्यांस मोठा लाभ होऊन त्याची कीर्ति देशोदेशीं पसरते, व ती त्याच्या पाठीपागें चिरकाल राहते. असेंच देशाचें आहे, देशांत विद्वान्, श्रीमान्, सदाचरणी, शूर असे पुरुष झाले म्हणजे तो देश सर्व पृथ्वीस भूषण होतो. असे प्राचीन काळीं, भिन्न भिन्न वेळीं पुष्कळ देश झाले, व त्यांत वर सांगितलेल्या प्रकारचे बहुत पुरुष उत्पन्न झाले. सांप्रतकाळींहि असे बहुत देश आहेत, व त्यांत वर सांगितलेल्या प्रकारचे मनुष्य आहेत. आपला देश हें भरतखण्डही प्राचीनकाळीं विद्या, कला, संपत्ति यांचें अधिष्ठान होऊन वर सांगितलेल्या विशेषणांस पात्र होऊन पृथ्वीवर आपलें वर्चस्व मिरवीत होतें. त्याच्या सौंदर्यास भुलून दूर देशांतील लोक इकडे येत. अशा या देशांत विद्या, कला, ऐश्वर्य, यांची वृद्धि प्रारंभापासून कशी कशी होत गेली याचा इतिहास असता तर आज जगास केवढा उपयोग झाला असता? सांप्रत गुणज्ञ लोकांच्या राज्यसत्तेंत भरतभूमि असल्यामुळें तिच्या पुनरुज्जीवनास अशा इतिहासाचा उपयोग झाला असता. तसेंच जे मनु, व्यास, कपिल, पाणिनि, कात्यायन, पतंजलि, इत्यादि हजारों विद्वान् प्रतापी पुरुष या देशांत उत्पन्न झाले, कीं ज्या कालकटाहांत मोठमोठ्या सार्वभौम नृपांचीं राज्यें नष्ट झालीं त्या कालचक्रांतून निभावून ज्यांचे विचार जगांत अद्यापि आपला प्रकाश पाडीत आहेत, त्या पुरुषांचीं चरित्रें साद्यंत लिहिलेलीं असतीं तर आज जगास केवढा उपयोग झाला असता? हजारों वर्षें लोटलीं तरी ज्यांचे ग्रंथ आज सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतील विद्वानांस मान्य होत आहेत, असे ग्रंथ लिहिणाऱ्यांचें ज्ञान केवढें असेल? एवढें ज्ञान संपादन करण्यास त्यांस किती श्रम करावे लागले असतील? काय अडचणी आल्या असतील? स्वसुखाकडे लक्ष न देतां परहि-

ताकरितां ते कसे झटले असतील ह्या गोष्टी लिहिलेल्या असत्या, तर किती उपयोग झाला असता! किती सत्पुरुष देशांत उत्पन्न झाले असते? किती लोकांचीं मनें सुधारलीं असतीं? शेंकडों लोक आळस व कुमार्ग टाकून उद्योग व सन्मार्ग यांकडे वळले असते, किंबहुना यवनादि परकीय लोकांनीं जी देशाची दुर्दशा केली, ती होण्याचा प्रसंगदेखील आला नसता. प्राचीन काळच्या भरभराटीच्या वेळेचा इतिहास व वर सांगितलेल्या पुरुषांचीं चरित्रें नसणें ही एक दुर्दैवाची गोष्ट समजली पाहिजे.

मनुष्यांपाशीं संपत्ति असली तर दुसऱ्यास लाभ होतो खरा; पण विद्येपासून इतरांस जो लाभ होतो, तो त्या लाभापेक्षां अनंतपट मोठा आहे. संपत्तीचा लाभ तात्कालिक व इष्टमित्रांस मात्र; परंतु विद्येची गोष्ट तशी नाहीं. ज्ञानाचा लाभ; शत्रु व मित्र, तात्कालिक व पुढें उत्पन्न होणारे, या सर्वांस सारखाच होतो. पहा, भोजविक्रमादि अत्युत्तम राजांच्या औदार्यादि गुणांपासून लाखों प्रजेचें हित झालें असेल यांत संशय नाहीं, तथापि कालिदासादि नवरत्नांच्या ज्ञानानें जो आजपर्यंत एतद्देशीय व परदेशीय लोकांस आनंद होत आहे, त्यांशीं त्या हिताची कितपत तुलना होईल ?

इतिहास व सत्पुरुषांचीं चरित्रें नाहींत. ही एक हानिच आहे असें वर म्हटलें. तशीच दुसरी एक गोष्ट आहे, ती ही कीं, जी पूर्ण सुधारलेली संस्कृत भाषा आज जगांतील अनेक जुन्या व नव्या भाषांच्या मातृस्थानीं होऊन वंद्य झाली आहे, तिचा इतिहास आज किती हितावह झाला असता! वेदापासून अलीकडील काव्यें, नाटकें, यांपर्यंत जे भाषेमध्यें अनेक भेद दृष्टीस पडतात ते कसकसे व कोणकोणत्या कारणानें होत गेले, धर्मशास्त्र, वेदांतशास्त्र, व्याकरणशास्त्र, न्यायशास्त्र वगैरे शास्त्रांवर जे जे उत्तम ग्रंथ झाले ते केव्हां झाले, हे ग्रंथ होण्यापूर्वीं त्या शास्त्रांचा अभ्यास कोणत्या रीतीनें चालत असे, वगैरे गोष्टी इतिहासरूपानें लिहि-

लेल्या असत्या तर फार उपयोग झाला असता, व हजारों अत्युत्तम ग्रंथ बुडाले त्यांचा कांहीं मागमूस तरी राहिला असता.

देशाची पूर्वस्थिती कळण्यास दोन साधनें असतात. एक कलाकौशल्य आणि दुसरें विचार. आमच्या देशाची पूर्वस्थिति कळण्यास इमारती, जयस्तंभ, वगैरे पुष्कळ गोष्टी होत्या, परंतु त्यांपैकीं कित्येक यवनादि परकीय दुष्ट राजांनीं विध्वस्त केल्या, व कित्येक अग्नि, वायु, आप् इत्यादि महाभूतांच्या सपाट्यांत सांपडून कालांतरानें नाहींतशा झाल्या. दुसरें साधन ह्मणजे विचार, हे मात्र कांहीं आजपर्यंत राहिले आहेत. तेहि नष्ट व्हावयाचे, परंतु सांप्रतच्या गुणज्ञ राजकर्त्यांच्या योगानें ते चिरस्थायी होतील असें वाटतें. परदेशस्थ लोक तीस तीस चाळीस चाळीस वर्षें खर्चून संसारसुखाची पर्वा न करून अहोरात्र श्रम करून संस्कृत भाषेंतील ज्या सत्पुरुषांचे ग्रंथ शिकतात, त्यांचेच वंशज जर आपल्या पूर्वजांचे विचार कळण्याचा यत्न न करतील तर यापेक्षां अधिक शोचनीय गोष्ट कोणती? अस्तु.

व्याकरण, न्याय, वेदांत, वगैरे सर्व शास्त्रांची थोडथोडी माहिती देणें म्हटलें तरी एक स्वतंत्रच पुस्तक होईल. तें काम मोठ्या श्रमाचें व विद्वत्तेचें असल्यामुळें सहज होईल असें नाहीं. परंतु सर्वांस अवश्य असें जें धर्मशास्त्र व ज्याचा नाश अथवा रूपांतर होत चाललें आहे, त्यांतील निवडक गोष्टी मासल्यादाखल येथें लिहिल्या आहेत. प्राचीन काळीं भिन्नभिन्न देशांचें परस्परांत दळणवळण नव्हतें त्या वेळेस सर्व देशांत आचार, व्यवहार, न्याय, वगैरे सर्व गोष्टींचा समावेश धर्मशास्त्रांत करीत. अर्वाचीन काळीं एका देशांत अनेक धर्मांचे लोक, राजा व प्रजा यांचे धर्म भिन्न वगैरे गोष्टींमुळें आचार, व्यवहार, वगैरे गोष्टींचे पृथक्करण करून शरीर आणि मालमत्तेचें रक्षण होऊन देशांत शांति राहण्यास जेवढा आवश्यक भाग तेवढा मात्र राजांनीं आपल्याकडे ठेविला आहे.

आपल्या देशांत धर्मशास्त्रप्रवर्तक ऋषि पुष्कळ झाले. या सर्वांस स्मृतिकार म्हणतात; व त्यांच्या ग्रंथांस स्मृति असें म्हणतात. सर्व धर्माचें मूळ वेद, त्यांतील धर्म स्मरून स्मरून जे ग्रंथ लिहिले त्यांचें नांव स्मृति, असा अर्थ शास्त्रज्ञांनीं केला आहे. अलीकडील विद्वान असा अर्थ करतात कीं, स्मृति म्हणजे ध्यानांत ठेविलेले ग्रंथ. यावरून स्मृतिकाळाच्या वेळेस लेखनकला नव्हती, असें तें अनुमान करतात. यांत सत्य किती असेल तें असो. परंतु सामान्यतः स्मृतिशब्दाच्या अर्थाचें जुन्या ग्रंथकारानींच जर वर सांगितल्याप्रमाणें विवरण केलें आहे, तर तो लेख नकलेच्या अभावाचा द्योतक आहे असें म्हणतां येत नाहीं. सुमारें पन्नास साठ स्मृतिकारांचीं नांवें आढळतात. कित्येकांचीं नांवें व वचनें इतर ग्रंथांत मात्र आढळतात, परंतु ग्रन्थ उपलब्ध नाहींत. इतरांचे ग्रंथ उपलब्ध आहेत. त्या सर्वांत **मनु** मुख्य होय.

मनूला अमुक वर्षें झालीं, असें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. तो सर्व ऋषींमध्यें प्राचीन आहे इतकें मात्र प्रत्यक्ष प्रमाणासारखें उघड आहे, कारण, जें कांहीं मनु बोलला तें ग्राह्य असा वेदांत सुद्धां मनूचा उल्लेख आढळतो. भरतखण्डाच्या इतिहासांतील इतर गोष्टींप्रमाणें मनूच्या उत्पत्तीचा काळ ठरविण्याविषयीं अलीकडील विद्वानांनीं अनेक अनुमानें केलीं आहेत; त्यांत कित्येक स्थलीं सत्याचा आभास दिसतो, तरी एकंदरींत कल्पनातरंग फार. कारण, कित्येक वेळां एखाद्या गोष्टीच्या काळाचें अनुमान करतेवेळेस परस्परांमध्यें चार पांचशें वर्षांचें अंतर पडतें. त्यामुळें हीं अनुमानें सत्याची स्थापना न करितां, परस्परास खोडून मात्र टाकितात.

आचार, व्यवहार, हे नेहमीं देशकालभेदानें बदलतात. एका देशांत जो आचार, तोच दुसऱ्या देशांत अनाचार. एका देशांत न्याय्य तेंच दुसऱ्या देशांत अन्याय्य. अशी अव्यवस्था सर्व काळीं सर्व देशांत आहे, व मन्वादिकांच्या काळापासून आपल्या

देशांतहि आहे. याकरितांच कित्येक गोष्टींस मनूनें सनातन ह्मटलें आहे. याकरितां त्रिकालाबाधित म्हणजे कधींहि ज्या धर्मास दोष देतां येणार नाहीं, असे मनुस्मृतींतले धर्म मात्र येथें लिहिले आहेत.

विषयाच्या संबंधानें मनुस्मृतीचे बारा भाग केले आहेत, व प्रत्येकास अध्याय असें म्हटलें आहे.

अतिभोजन हें आरोग्य नष्ट करणारें, आयुष्य कमी करणारें, स्वर्गप्राप्तीस प्रतिकूल, पुण्यहानि करणारें, लोकविद्विष्ट असें आहे, याकरितां त्याचा त्याग करावा.

सारथी घोड्यांस जसा स्वाधीन ठेवितो त्याप्रमाणें विद्वानानें आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवावीं. कारण, तीं आपणांस विषयांकडे नेणारीं आहेत.

इंद्रियांच्याच संबंधानें मनुष्यांस दोष लागतो. तींच स्वाधीन ठेविलीं तर मनुष्यांस सिद्धि ( ह्म० धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे चार पुरुषार्थ ) प्राप्त होते.

विषयांची इच्छा उपभोगानें शांत होत नाहीं. होमद्रव्यानें अग्नि प्रज्वलित होतो तशी ती आणखी वाढते.

ज्यास विषयसुख प्राप्त होईल व जो तें अनित्य आहे म्हणून सोडून देईल या दोहोंमध्यें सोडून देणारा श्रेष्ठ व अधिक सुखी होय.

केवळ विषयोपभोग सोडिल्यानें इंद्रियें स्वाधीन होतात असें नाहीं, तर ज्ञानानें (नित्यानित्यवस्तुविवेकानें) तीं सहज जिंकतां येतात.

अनुकूल किंवा प्रतिकूल शब्द ऐकिल्यानें, स्पर्श झाल्यानें, पदार्थ भक्षण केल्यानें किंवा वास घेतल्यानें, जो आनंद किंवा दुःख यांत मग्न होत नाहीं तो जितेंद्रिय होय.

भांड्याला भोंक पडलें म्हणजे जसें सर्व पाणी गळून जातें

त्याप्रमाणें सर्व इंद्रियांतून एक जरी विषयासक्त झालें तरी तद्वारा मनुष्याचें सर्व ज्ञान नष्ट होतें.

शरीराला पीडा न देतां इंद्रियसमुदाय स्वाधीन ठेऊन व मनाचा निग्रह करून सर्व पुरुषार्थ प्राप्त करून घ्यावे.

जो कोणी थोडी बहुत विद्या शिकवील त्यास तेवढ्याच उपकारानें गुरु असें मानावें.

केंस पिकले म्हणजे मनुष्य म्हातारा झाला असें नाहीं. तरुण असूनहि जो विद्वान् त्यास देवहि वृद्ध समजतात.

आपणास पीडा झाली तरी दुसऱ्याचें मर्म काढूं नये. ज्या भाषणानें दुसऱ्यास पीडा होते तें भाषण स्वर्गगतीस प्रातिकूल होय, तें बोलूं नये.

आपल्या गुरूचे दोष कोणी बोलत असेल अथवा त्यांची उगाच कोणी निन्दा करील तर त्या ठिकाणीं कानावर हात ठेवावे, अथवा तेथून उठून जावें.

कोणत्याही स्त्रीपाशीं एकांतीं बसूं नये. कारण इंद्रियें बळकट आहेत, तीं विद्वानांस सुद्धां ओढितात.

आईबाप मुलांच्या कल्याणाविषयीं जे क्लेश भोगितात त्यांबद्दल त्यांचे उपकार शंभर वर्षांनींसुद्धां फिटणार नाहींत.

शहाण्या माणसानें कन्येचा पैसा थोडाहि घेऊं नये, पैसा घेतल्यानें तो मुलें विकणारा होतो.

बाप, भाऊ, पति, दीर वगैरे जे आपलें कल्याण इच्छिणारे त्यांनीं स्त्रियांस मान द्यावा, व त्यांस अलंकारभूषणें द्यावीं. जेथें स्त्रियांचा मान राहतो, तेथें देवता संतुष्ट राहतात. जेथें स्त्रियांचा मान राहत नाहीं, तेथें सर्व क्रिया निष्फळ होत. जेथें कुलस्त्रिया दुःखित असतात तें घराणें लवकर नष्ट होतें. जेथें त्यांस पीडा होत नाहीं त्या घराण्याची नेहमीं भरभराट होते. याकरितां कल्याण इच्छिणाऱ्या लोकांनीं लग्नकार्य, उत्साह, इत्यादिकांच्या प्रसंगीं स्त्रियांचा मान ठेवावा, व त्यांस वस्त्रालंकार द्यावे.

घरीं अतिथि आला असतां, त्यास आसन उदक द्यावें; व यथायोग्य सत्कार करून यथाशक्ति खाऊं घालावें. सायंकाळीं अतिथि आला असतां, गृहस्थानें त्यास जा म्हणून सांगूं नये. वेळीं अवेळीं केव्हांहि अतिथि आला तरी त्यास गृहस्थानें आपल्या घरीं उपाशी ठेवूं नये.

जे मूर्ख आपण गृहस्थाश्रमी असून लोभानें परान्नाचें सेवन करतात ते मेल्यानंतर अन्नदात्याचे पशु होतात.

तृण, राहण्यास जागा, पाणी, गोड बोलणें, हीं चार कुलीन मनुष्य कोणासहि नाहीं म्हणत नाहींत.

सुखाची इच्छा करणाऱ्यानें संतोष धारण करून जितेंद्रिय व्हावें. सुखाचें मूळ संतोष होय. तसेंच दुःखाचें मूळ असंतोष. आपल्या वयाला, कर्माला, द्रव्याला, विद्येला, कुलाला, बोलण्याला, बुद्धीला योग्य असें आचरण करावें.

जसजसें मनुष्यास शास्त्र अधिक समजूं लागतें, तसतसें त्याचें ज्ञान वाढतें आणि ज्ञान त्यास आवडूं लागतें.

दरिद्री आहों ह्मणून आपला आपण अवमान कधीं करूं नये. शेवटपर्यंत लक्ष्मीची इच्छा करावी. ती दुर्लभ आहे असें मानूं नये.

खरें बोलावें, गोड बोलावें, खरें असलें तरी कडू बोलूं नये. गोड असलें तरी खोटें बोलूं नये. हा सनातन म्हणजे नित्य धर्म होय.

व्यंग, अधिकांग ( अंगावर अवाळू वगैरे असलेले ), विद्याहीन, म्हातारे, कुरूप, दरिद्री, नीचकुलांत जन्मलेले, यांची निंदा करूं नये.

दुराचारी माणसांची लोक निंदा करतात, त्यास दुःख प्राप्त होतें, रोग होतात, त्याचें आयुष्य कमी होतें.

शहाण्यानें जें परस्वाधीन तें यत्नानें सोडून द्यावें, जें स्वाधीन असेल तें करावें.

जें परस्वाधीन तें दुःख, जें स्वाधीन तें सुख. हें थोडक्यांत सुखदुःखांचें लक्षण समजावें.

जें कर्म करितांना मनाचा संतोष होईल तें यत्नानें करावें, याच्या विपरीत असेल तें टाकावें.

पुत्र, शिष्य, यांशिवाय इतरांवर काठी उगारूं नये. राग आला तरी मारूं नये. शिक्षणापुरतें मात्र पुत्र व शिष्य यांचें ताडन करावें.

जो मनुष्य धार्मिक नाहीं, लबाडी हेंच ज्याचें भांडवल, हिंसा करणारा, त्यास सुखप्राप्ति होत नाहीं.

अधार्मिक, पापी, यांचा नाश होतो, हें पाहून धर्माचरण करितांना दुःख प्राप्त झालें तरी अधर्म मनांत आणूं नये.

जमिनींत बीज पेरलें असतां लागलेंच उगवतें, तसें अधर्माचरण फल लागलेंच येतें असें नाहीं, तर हळूहळू परिपक्क होऊन कर्त्यांचा समूळ नाश करतें.

सत्यधर्म, साधूचें आचरण, स्वच्छपणा, यांची आवड धरावी. शिक्षेस पात्र असतील त्यांस शिक्षा करावी. वाणी, हात, उदर हीं स्वाधीन ठेवावीं. ( भाषणानें, हातानें, अथवा भक्षणाकरितां कोणास पीडा देऊं नये. )

ज्यांत धर्म नाहीं, असे अर्थ आणि काम असतील ते टाकावे, ज्यापासून पुढें दुःख होईल, अथवा जो लोकविद्विष्ट असेल ( उदाहरण—दरिद्र्यानें आपल्या बायकामुलांची पर्वा न करितां दुसऱ्यास सर्वस्व देणें, इत्यादि ) असा धर्महि करूं नये.

ज्या मार्गानें बाप, आजा वगैरे पूर्वज चालत आले, असा जो साधूंचा मार्ग त्यानें चाललें असतां दोष लागत नाहीं.

मुंग्या ( थोडथोडी माती आणून ) वारूळ करितात त्यांप्रमाणें हळूहळू नेहमीं प्राणिमात्रांस दुःख दिल्याशिवाय परलोकीं उपयोगाकरितां धर्माचा ( पुण्याचा ) संचय करावा.

परलोकीं उपयोगाकरितां आईबाप कोणी येत नाहींत. मुलगा

नाहीं, बायको नाहीं, भाऊबंद नाहींत, केवळ धर्म मात्र उभा राहतो.

जीव गेला म्हणजे मातीच्या ढेकळांप्रमाणें अथवा लांकडाच्या धलपीप्रमाणें शरीर जमिनीवर फेंकून देऊन भाऊबंद परत जातात. धर्म मात्र बरोबर राहतो. याकरितां सोबती मिळावा म्हणून सर्वकाळ थोडथोडा धर्मसंचय करावा. धर्मरूप मित्राचे योगानें भयंकर दुःखांतून मनुष्य पार पडतो.

ज्यास आपल्या कुळाचा उत्कर्ष करणें असेल, त्यानें नेहमीं उत्तमांशीं संबंध ठेवावे. हलक्याशीं संबंध ठेवूं नये.

निश्चयाचा बळकट, स्वभावानें मृदु, जितेंद्रिय, दुष्टांशीं सहवास न करणारा, हिंसा न करणारा, असा होऊन, मनुष्यानें इंद्रियजय व दान यांचें व्रत धरून स्वर्ग जिंकावा.

सर्व व्यवहार वाणीपासून उत्पन्न झाले आहेत. वाणींतच ते राहतात. वाणीमुळेंच ते नियामित चालतात. अशा वाणीप्रत जो चोरतो, ( असत्य भाषण करतो, ) तो सर्व वस्तु चोरणारा होय. स्त्रीनें सर्वदा आनंदित असावें, गृहकार्यामध्यें दक्षता ठेवावी, घरांतील वस्तूंची व्यवस्था नीट ठेवावी, कृपणपणा करूं नये.

मन, वाणी, शरीर, इत्यादिकांनीं जी पतीचें उल्लंघन करीत नाहीं, ती भर्त्याबरोबर स्वर्गास जाते, आणि पतिव्रता अशी तिची लोकांत कीर्ति होते.

लोक अपशब्द बोलले तरी आपण सोसावे. कोणाचा अपमान करूं नये; देह क्षणभंगुर आहे. असें समजून कोणाशीं वैर करूं नये.

इंद्रियें स्वाधीन ठेविल्यानें, विषयवासनांच्या क्षयानें, आणि प्राण्यांच्या अहिंसेनें मनुष्य मोक्षास पात्र होतो.

हाडांनीं फुगलेलें, स्नायूंनीं बांधलेलें; मांस आणि रक्त यांनीं लेपटलेलें; कातड्यानें गुंडाळलेलें; दुर्गंधि, मूत्रपुरीषानें भरलेलें, जरा आणि शोक यांनीं युक्त; रोगांचें घर; क्षुधादिकांनीं पीडित, घाणेरडें; अनित्य, असें हें शरीर सोडावें. ( म्हणजे ह्या पंच-

महाभूतात्मक देहावर आत्मत्व न धरतां मोक्षप्राप्ति करून घ्यावी असें तात्पर्य. )

संतोष, क्षमा, मनोनिग्रह, अस्तेय, शुचिर्भूतपणा, इंद्रियनिग्रह, शास्त्रज्ञान, आत्मज्ञान, सत्य, अक्रोध, हीं दहा धर्माचीं चिन्हें होत.

राजदंडाच्या योगानें स्थिरचर सर्व प्राणी स्वस्थ राहतात, स्वधर्माचा त्याग करीत नाहींत, असा जो दण्ड त्याची योजना राजानें अन्यायानें वागणाऱ्यांच्या ठायीं, देश, काल, शक्ति, विद्या हीं योग्य रीतीनें पाहून करावी. हा राजदंड विचारानें धारण केला असतां सर्व प्रजेस संतोष देतो. अविचारानें धारण केला असतां सर्व प्रजांचा नाश होतो.

राजानें आळस टाकून दंडास योग्य अशा मनुष्यांस दंड केला पाहिजे; नाहीं तर कोणी खिळयावर मासे भाजून खातात त्याप्रमाणें बळकट लोक दुर्बळांस मारून टाकतील. सर्व लोकांस राजदंडानें जिंकलें आहे; एरव्हीं नीतिमान् मनुष्य मिळणें कठीण. दंडाच्या भयानें जग सुखोपभोगास पात्र होतें. विचार करून दंडाची योजना करणारा; सत्य भाषण करणारा; धर्म, अर्थ, काम, यांस जाणणारा; त्यासच प्राज्ञ म्हणजे शहाणा असें म्हणतात. जो राजा उत्तम प्रकारेंकरून दंडाची योजना करतो, त्याचे धर्म, अर्थ, काम, वाढतात. परंतु जो राजा विषयासक्त, पक्षपाती, रागीट असतो तो नाश पावतो.

राजदंड मोठा कठीण आहे; तो भलत्याच अशास्त्रज्ञास चालवितां येणार नाहीं. तो ( राजदंड ) अधर्मानें वागणाऱ्या राजांचा बंधुमित्रांसहित नाश करतो. ज्यास कोणी सहाय नाहीं, जो मूर्ख, लोभी, अशिक्षित, विषयासक्त, अशा मनुष्यास राजदंड धरतां येणार नाहीं. नीतिमान्, सत्य न सोडणारा, शास्त्राप्रमाणें आचरण करणारा, ज्यास सहाय आहेत, जो बुद्धिमान् आहे अशा मनुष्यास राजदंड उत्तम प्रकारें चालवितां येतो.

रात्रंदिवस इंद्रियांचा जय करण्यास यत्न करावा. जितेंद्रिय

राजास प्रजा आपल्या ताब्यांत ठेवितां येते. जो राजा मूर्खपणानें प्रजेच्या हिताकडे न पाहतां तिला पीडा देतो, तो राज्यापासून च्युत होऊन पुत्रबांधवांसहवर्तमान नष्ट होतो. शरीरास पीडा झाली म्हणजे मनुष्याच्या जीवास पीडा होते, तसेंच राष्ट्राच्या दुःखानें राजाचा नाश होतो.

धर्म एवढाच एक खरा मित्र होय; कारण, तो मरणानंतरहि बरोबर येतो; बाकी सर्व शरीराबरोबर नाश पावतें.

आपला आत्मा हाच आपला साक्षी, हाच आपणास वाट दाखविणारा, मनुष्याचा उत्तम साक्षी हाच होय. याकरितां( असत्य भाषणादि करून ) त्याचा अपमान करूं नये.

पाप करणाऱ्यांस वाटतें कीं आपलें पाप कोणी पहात नाहीं, परंतु त्यांस देव पहात असतो; व त्यांचा आत्माहि पहात असतो. बोलत असतां ज्याचा अंतरात्मा भीत नाहीं, तो सर्वांमध्यें श्रेष्ठ असें देव समजतात.

दुःखितांनीं निंदा केली असतां जो सहन करतो, तो स्वर्गलोकीं मान्य होतो. जो ऐश्वर्यमदानें क्षमा करीत नाहीं तो नरकास जातो.

नदी समुद्रास मिळाली म्हणजे त्यासारखी होते त्याप्रमाणें जसा नवरा मिळेल त्याप्रमाणें बायकोचा स्वभाव बनतो. मुलेंबाळें व त्यांचें रक्षण, रोजचें जेवणखाण, वगैरे या सर्वांस बायका मुख्य कारण होत.

अहिंसा, सत्य, अस्तेय ( चोरी न करणें ), शुचिर्भूतपणा, इंद्रियनिग्रह, हा सामान्यतः सर्व वर्णांचा धर्म होय, असें मनु ह्मणतो.

विहित ( म्हणजे योग्य कर्म ) न करणारा, व निंदित कर्म करणारा, इंद्रियार्थ म्हणजे विषय यांचे ठिकाणीं तत्पर असा जो मनुष्य तो प्रायश्चित्तास पात्र होतो.

पाप केलें असतां ज्यास पश्चात्ताप होतो, तो त्या पापापासून

मुक्त होतो. पुनः असें करणार नाहीं असा निश्चय करून जर तो त्यापासून निवृत्त झाला तर तो शुद्ध होतो. असा विचार करून मरणानंतर शुभदायक असेल तें सत्कर्म, मन, वाणी, शरीर यांनीं सर्वदा करीत असावें.

न समजून अथवा कदाचित् समजूनहि निंद्य कर्म केलें असतां त्यापासून सुटण्याची ज्याची इच्छा असेल, त्यानें पुनः दुसऱ्यानें तसें करूं नये.

इंद्रियांच्या संबंधानें आणि अधर्माचरणानें मूर्ख लोक संसार-यातना भोगितात. वाणीचा निग्रह, मनाचा निग्रह आणि शरीराचा निग्रह, हे तीन निग्रह सर्व भूतांविषयीं धारण करून काम आणि क्रोध यांचें आकलन केलें असतां मनुष्य परमार्थाप्रत पावतो.

---

## शकुंतलेची गोष्ट.

भरतखंडाचा प्राचीन काळापासून विश्वसनीय इतिहास नाहीं. तथापि आर्यलोकांची पूर्वस्थिति कळण्यास बहुत साधनें आहेत. त्यांपैकीं मुख्य म्हटलें म्हणजे संस्कृत भाषेंतील ग्रंथ, वेद, स्मृति, पुराणें, यांपासून प्राचीन काळची स्थिति कळते. तथापि प्राचीन इतिहासाचें ज्ञान होण्यास महाभारतासारखा दुसरा ग्रंथ उत्तम नाहीं. कारण, या ग्रंथांस इतिहास हें नांव दिलेलें आहे. पुष्कळ काळ गेल्यामुळें यांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी अत्युक्तीसारख्या वाटतात, यांत आश्चर्य नाहीं. तथापि प्राचीन आर्य लोकांची धर्मसंबंधानें स्थिति, त्यांची विद्वत्ता, त्यांची गृहस्थिति, त्यांची संपत्ति, त्यांचें युद्धकौशल्य, त्यांच्या रीतिभाती इत्यादि गोष्टी कळण्यास श्रीमहाभारत ग्रंथ फार उत्तम आहे यांत संशय नाहीं. त्यांत कित्येक गोष्टी मनोवेधक आहेत. शकुंतलेची प्रसिद्ध गोष्ट मूळ महाभारतांतच आहे. ती प्रसिद्ध कवि कालिदास यानें केलेल्या शाकुंतलनाटकामुळें फार प्रसिद्ध आहे. यांत ही गोष्ट मुख्य ध-

रून नाटकास विशेष शोभा येण्यास कवीनें दुसऱ्या बाहेरच्या पुष्कळ गोष्टी घातल्या आहेत. यासाठीं मूळची गोष्ट कशी आहे. हें मराठी वाचकांस कळावें याकारितां ती भारतावरून यांत लिहिली आहे. हींत कित्येक ठिकाणीं अत्युक्ति आहे, तथापि त्या वेळच्या ऋषींच्या व राजांच्या चाली व स्त्रियांची स्थिति, इत्यादि गोष्टी कळतील.

जनमेजय राजा वैशंपायन ऋषींस ह्मणतो—महाराज ब्राह्मणश्रेष्ठ, आपण देवादिकांच्या अवतारांचें कथन केलें तें श्रवण करून फार आनंद झाला.आतां कुरुवंशाचें मुळापासून श्रवण करावें अशी माझी इच्छा आहे.

वैशंपायन म्हणतात—कौरवांचा मूळपुरुष प्रतापी दुष्यंत राजा होय. हा युद्धामध्यें फार कुशल असून समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य एकटा करीत असे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, म्लेच्छ इत्यादि अनेक जातींचें तो यथाशास्त्र पालन करीत असे. हा राजा राज्य करीत असतां सर्व ज्ञातींतील कोणाहि मनुष्यास पाप करण्याची इच्छा होत नसे. सर्व लोक नेहमीं धर्मतत्पर असत. चोर, रोग, क्षुधा यांचें तिलप्रायहि कोणास भय नसे. आपापलीं कर्तव्यकर्मे करून लोक कालक्रमणा करीत. पर्जन्य वेळच्या वेळीं पडे. धान्यें उत्तम प्रकारचीं पिकत. राज्यांत सर्व ठिकाणीं द्रव्य, पशु, वगैरे संपत्ति फार असे. ब्राह्मण स्वधर्माचरण करून सत्यानें वागणारे होते. राजा स्वतः फार बलाढ्य असून बाहुयुद्ध, गदायुद्ध, यांत फार निपुण होता. तसाच घोड्यावर व हत्तीवर बसण्यांत फार वाकबगार होता. विष्णूप्रमाणें बलिष्ठ, सूर्याप्रमाणें तेजस्वी, समुद्राप्रमाणें गंभीर, पृथ्वीप्रमाणें सहनशील, असा असून सर्वांस अतिप्रिय होत्साता आनंदानें राज्य करीत असे.

जनमेजय ह्मणतो—महाराज मुनिश्रेष्ठ, भरत व शकुंतला यांची उत्पत्ति, तसेंच दुष्यंतास शकुंतला कशी प्राप्त झाली हें सर्व मी विस्तारानें ऐकण्यास इच्छितों.

वैशंपायन ह्मणतो—कोणा एका काळीं दुष्यंतराजा हस्ति, अश्व, रथ, आणि पदाति, अशी चतुरंग सेना व गदा, खड्ग, बाण, इत्यादि नानाप्रकारचीं शस्त्रें बरोबर घेऊन हजारों पशूंनीं युक्त अशा मोठ्या अरण्यांत मृगयेकरितां गेला. राजा अरण्यांत जावयास निघाला त्या वेळेस वीरांच्या सिंहनादानें, रथांच्या घडघड आवाजानें, घोड्यांच्या खिंकाळण्यानें, नगाऱ्यांच्या आवाजानें, तसेंच नानाप्रकारच्या वाद्यघोषांनीं, फारच मोठा कलकलाट होऊन गेला. राजवाड्याच्या गच्च्यांवर व माड्यांवर बसून स्त्रिया राजाच्या स्वारीची शोभा पाहून परस्पर बोलूं लागल्या कीं, दैत्यांशीं युद्ध करण्यास ज्या वेळेस इंद्राची स्वारी निघते, त्याप्रमाणें आजचा थाट आहे. आज दैत्य जरी राजाबरोबर युद्ध करण्यास आले, तरी त्यांचें कांहीं एक चालणार नाहीं. याप्रमाणें पुष्कळ स्तुति करून त्यांनीं राजाच्या मस्तकावर पुष्पवृष्टि केली. त्याचप्रमाणें मोठमोठे ब्राह्मणहि स्वारी पाहून खुश झाले, आणि राजाची स्तुति करूं लागले. अशा मोठ्या थाटानें सुवर्णाच्या रथांत बसून राजाची स्वारी चालली. त्या वेळेस ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, इत्यादि सर्व राजाच्या मागून चालले. परंतु नगराबाहेर गेल्यावर राजानें सर्वांस परत जाण्यास सांगितलें आणि आपण सैन्यासहवर्तमान पुढें चालला. सैन्याच्या शब्दानें सर्व आसपासचा प्रदेश दणाणून गेला.

अशा समारंभानें राजा चालला असतां, इंद्राच्या नंदनवनाप्रमाणें सुशोभित असें एक अरण्य त्यानें पाहिलें. त्यांत बेल, खैर, कवठ वगैरे वृक्षांची दाट झाडी होती. जिकडे तिकडे पर्वतांचे कडे तुटलेले आहेत; कोणी मनुष्य दृष्टीस पडत नाहीं; कोठें पाणी सांपडत नाहीं; जिकडे तिकडे सिंह, वाघ, लांडगे, हरिण, इत्यादि वनपशु मात्र फिरत आहेत; असें पाहून चोहोंकडून त्या वनास वेढा घातला. तेव्हां सर्व पशूंची त्रेधा उडून गेली. ते जिकडे जिकडे वाट सांपडेल तिकडे तिकडे पळूं ला-

गले. भयानें नानाप्रकारचे शब्द करूं लागले. राजा व इतर वीर एकमेकांस शिकारीचें कौशल्य दाखविण्याकरितां पुष्कळ हिंसक पशूंचा नाश करीत तेव्हां हत्ती वगैरे मोठाले भयंकर पशुसुद्धां भिऊन पळूं लागले. कांहीं तर भयानें रक्त ओकून जागच्याजागींच मेले. कांहींनीं पिसाळून पुष्कळ योद्धेहि मारले. याप्रमाणें पारधीची गर्दी चालली असतां राजा एका चपल मृगाच्या पाठीमागें लागून फार लांब जातां जातां दुसऱ्या एका अरण्यांत गेला. तेथेंहि चोहोंकडे ओसाडी पाहून राजा अगदीं थकून गेला. क्षुधा, तृषा, यांनीं अगदीं व्याकूळ झाला. हरिणामागें धांवत आहे इतक्यांत त्यानें एक दुसरें सुशोभित वन पाहिलें. तें पाहून राजाचें मन गार झालें. दृष्टि शांत झाली. जिकडे तिकडे सुगंध शीतळ वारा झुळझुळ वाहत आहे, अनेक प्रफुल्लित वृक्षांवर बसून कोकिलादि पक्षी सुस्वर शब्द करीत आहेत; वृक्षांच्या विस्तीर्ण छायेंत स्वस्थ बसून पशु रवंथ करीत आहेत. सर्व ऋतूंतील पुष्पांनीं भरलेल्या वृक्षांची जिकडे तिकडे गर्दी असल्यामुळें किंचित् वाऱ्याच्या झुळुकेनें पुष्पवृष्टि चोहोंकडे चालली आहे; एके बाजूनें नदी वाहत आहे. ही सर्व शोभा पाहून राजाचे सर्व श्रम दूर झाले. इतक्यांत वनाच्या मध्यभागीं एक सुंदर आश्रम राजाच्या दृष्टीस पडला. आश्रमाच्या भोंवतालीं वृक्षांची शोभा केली आहे; आंत अग्निहोत्राचे अग्नि प्रज्वालित झाले आहेत; संन्यासी, ऋषि, चोहोंकडे स्वकर्में करीत बसले आहेत; मोठेमोठे क्रूर पशुहि पाळलेल्या पशूंप्रमाणें शांत होऊन बसले आहेत; आश्रमाच्या समीपभागींच मालिनी नदी वाहत आहे; व तिच्या वाळवंटावर चक्रवाकादि अनेक पक्षी क्रीडा करीत आहेत, तीरावर बसून ऋषि वेदाध्ययन करीत आहेत; असा आश्रम पाहून साक्षात् स्वर्गच आपल्या दृष्टीस पडला कीं काय, असें राजास वाटून आश्रमांत जाऊन महर्षि काश्यप यांचें दर्शन घेण्याची त्यास इच्छा झाली.

सेना व इतर राजचिन्हें एकीकडे ठेवून राजा, प्रधान व पुरोहित यांस बरोबर घेऊन आश्रमांत गेला. आंत जाऊन पाहतो तों जिकडे तिकडे यज्ञयागादि कर्में चाललीं आहेत; वेदघोष व सामगायन चाललें आहे, व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि विषयांवर वादविवाद होत आहेत. असें पाहून राजा केवळ स्वर्गसुखांत निमग्न झाला. आश्रमांत पुष्कळ सुंदर देवालयें होतीं त्यांत जाऊन देवतांची राजानें पूजा केली; आणि प्रधान व पुरोहित यांस बाहेर ठेवून साक्षात् काश्यपाच्या राहण्याच्या आश्रमांत राजानें प्रवेश केला. आंत गेल्यावर राजास महर्षींचें दर्शन झालें नाहीं; व इकडे तिकडे पाहतो तों कोणी मनुष्य दृष्टीस पडेना. तेव्हां 'येथें कोण आहे?' अशी राजानें मोठी आरोळी मारिली. राजाचा शब्द ऐकून एक स्वर्गस्त्रीसारखी सुंदर ऋषिकन्या बाहेर आली; आणि राजास पाद्य, आसन वगैरे देऊन चालीप्रमाणें राजाचा सत्कार करून खुशाल आहांना ? आगमनाचें कारण काय ? असें तिनें राजास विचारिलें. तिचें मधुर भाषण ऐकून राजा म्हणाला, " हे सुंदर ऋषिकन्ये, भगवान् कण्वऋषींचें दर्शन घेण्यास आलों आहें, तो कोठें आहे तें मला सांग. "

शकुंतला म्हणते, माझा पिता फळें आणण्याकरितां गेला आहे. आपण दोन घटका वाट पहावी; तो लवकरच येईल.

असें ती बोलल्यावर राजा कांहीं वेळ स्तब्ध बसला, परंतु ऋषीच्या आश्रमांत ही सुंदर स्त्री तपस्वी होऊन राहिली आहे, असें पाहून राजास आश्चर्य वाटलें आणि त्यानें तिला विचारिलें, " हे तपस्वीकन्ये, तुजकडे पाहिलें असतांच मनोहरण करणारी रूपवती व गुणवती अशी तूं कोणाची आहेस हें सांग. "

असें राजाचें भाषण ऐकून शकुंतला किंचित् हंसून म्हणाली— तपस्वी, धैर्यवान, धर्मज्ञ, असा जो महात्मा कण्व त्याची मी कन्या आहें.

दुष्यंत—सर्व लोक ज्यास मान देतात, असा जो भगवान्

कण्व तो तर ब्रह्मचारी आहे असें म्हणतात, साक्षात् धर्मसुद्धां आपलें व्रत सोडील, परंतु हा सोडणार नाहीं. असें असून तूं त्याची मुलगी म्हणवितेस हें कसें ?

**शकुंतला**—'माझ्या जन्माविषयीं मागें एका ऋषीनें विचारिलें, तेव्हां ऋषिश्रेष्ठानें त्यास सांगितलें तेंच मी तुम्हांस सांगतें.'

**कण्व**—"पूर्वीं विश्वामित्रानें फार भयंकर तपश्चर्या केली तेव्हां, हा आपणापेक्षां तेजस्वी होऊन कदाचित् आपलें पदसुद्धां घेईल असा इंद्रास धाक पडला. तेव्हां मेनकानामक स्वर्गांतील अप्सरेस इंद्रानें विनंति केली कीं, तूं जाऊन ऋषीला भुलवून त्याची तपश्चर्या भग्न करून टाक."

**मेनका**—"महाराज, विश्वामित्र महातेजस्वी व रागीट हें आपणासहि माहित आहे. ज्यानें एवढ्या मोठ्या वसिष्ठाचे सुद्धां शंभर पुत्र मारविले, जो क्षत्रिय असतां बलात्कारानें ब्राह्मण झाला; नीच जातीच्या घरीं यज्ञ करीत असतांहि त्याच्या भयानें आपण सोमपान करण्यास गेलां; ज्यानें प्रतिसृष्टि केली; गुरूचा शाप झाला असतांहि ज्यानें त्रिशंकूचें रक्षण केलें अशीं ज्याचीं कृत्यें व ज्यास आपण भितां त्याच्यापुढें माझें सामर्थ्य काय चालणार? तो मला कोपानें जाळून टाकील. तो आपल्या प्रभावानें त्रैलोक्यसुद्धां कांपवील. त्याकडे माझ्यासारख्या बायकोनें जाणें म्हणजे केवळ अग्नींत उडी घातल्याप्रमाणें आहे. यम, सोम, इत्यादि देव महान् महान् ऋषिहि ज्यास भितात त्याचें माझ्यासारख्या बायकोस किती भय वाटावें? तथापि आपण सांगितलें त्या अर्थीं मला जाणें प्राप्त आहे. परंतु माझ्या रक्षणाची तजवीज करावी. मी त्याजवळ जाऊन खेळूं लागेन म्हणजे वनांतून सुगंधी वायु यावा; असें झाल्यास ऋषीस भुलविण्याची तजवीज करितें." इंद्रानें इतकें साहाय्य देण्याचें कबूल केल्यावर मेनका विश्वामित्राच्या आश्रमास गेली.

मेनका तिकडे गेल्यावर इंद्रानें वायु व मदन यांस तिजबरो-

वर जाण्यास सांगितलें. मेनका भयानें कांपत कांपत महापुण्यवान् विश्वामित्राच्या जवळ गेली; आणि त्याला वंदन करून कंदुकक्रीडा करूं लागली. इतक्यांत वायु आणि मदन यांनीं मेनकेनें इंद्रापाशीं मागितल्याप्रमाणें साहाय्य केलें; तेव्हां विश्वामित्र ऋषि भुलून गेला. नंतर उभयतांची प्रीति जमल्यावर मेनका गर्भिणी होऊन प्रसूत झाली. तेव्हां मालिनी नदीच्या तीरीं बालक ठेऊन इंद्राच्या सभेस गेली.

इकडे सिंहव्याघ्रांनीं युक्त अशा भयंकर अरण्यांत टाकलेल्या बालकास पाहून पक्ष्यांनीं भोंवतीं जमून त्याचें रक्षण केलें. एके दिवशीं मी नदीवर ब्रह्मयज्ञ करण्यास गेलों तेव्हां ओसाड अरण्यांत हिला पाहून घरीं आणून आपल्या मुलीप्रमाणें बाळगिली. कारण, उत्पन्न करणारा, प्राण देणारा, आणि अन्न घालणारा, हे तिन्ही बापच आहेत. निर्जनवनांत शकुंतांनीं ( पक्ष्यांनीं ) हिचें रक्षण केलें म्हणून हिचें नांव शकुंतला असें ठेविलें. यावरून मला हिचा बाप व ही माझी मुलगी असें म्हणतात.

**शकुंतला**--हे राजा, याप्रमाणें महर्षींनीं सांगितलें, तें मीं तुम्हांस विदित केलें. मला माझा पिता कोण तें ठाऊक नाहीं. मी कण्वासच आपला पिता मानितें.

**दुष्यंत**—हे राजपुत्रि शकुंतले, त्वां सर्व वृत्तांत सांगितला हा खरा आहे. ( कारण मनुष्यापासून असें रूपयुक्त अपत्य होणें कठीण. ) आतां तूं माझी बायको हो. सर्व मनोरथ तुझे पूर्ण करीन. सुवर्णाचे अलंकार, रत्नें, उत्तम उत्तम वस्त्रें, तुला देईन. फार काय, पण सर्व राज्य तुझें आहे. गांधर्वविवाह हा सर्वांत श्रेष्ठ आहे. तर त्या विधीनें आज तूं माझी पत्नी हो.

**शकुंतला**—राजा, माझा पिता फळें आणण्याकरितां आश्रमापासून बाहेर गेला आहे; याकरितां दोन घटिका वाट पहा, तो आल्यावर मला तुला देईल.

**दुष्यंत**—मी तुजकरितां येथें थांबलों आहें; माझें मन तुज-

कडे लागलें आहे. याकारितां माझी इच्छा पूर्ण कर. आपला बंधु, मित्र सर्व आपणच, याकारितां त्वां आत्मदान केलें तर अधर्म होणार नाहीं. ब्राह्म, दैव इत्यादि आठ विवाह मनूनें सांगितले आहेत. त्यांत गांधर्वविवाह क्षत्रियांस अगदीं प्रशस्त आहे; तर त्याप्रमाणें आज त्वां माझा स्वीकार करावा.

**शकुंतला**—आपण सांगतां हा धर्म आहे, व मी आपलें दान करण्यास स्वतंत्र आहें. तर मी आपलें म्हणणें मान्य करितें. परंतु माझी एक विनंति आहे, ती आपण कबूल केली पाहिजे. ती विनंति ही कीं, मला जो पुत्र होईल तोच आपल्या मागें गादीचा मालक व्हावा.

हें तिचें मागणें राजानें कबूल करून गांधर्वविधीनें तिचें पाणिग्रहण केलें. कांहीं कालपर्यंत तिशीं क्रीडा करून तुला आपल्या नगरांत नेईन, तुला पट्टराणी करीन, तुझ्या योग्यतेप्रमाणें तुझा मान ठेवीन, तुला न्यावयास चतुरंग सेना पाठवीन, अशीं पुष्कळ विश्वासाचीं वचनें बोलून आपण मागें असें कृत्य केलें, याबद्दल कण्व आपणास काय ह्मणेल? अशी मोठी भीति मनांत आणून राजा आपल्या नगरास परत गेला.

इकडे राजा गेल्यावर कांहीं वेळानें ऋषि आश्रमास आला; परंतु शकुंतला लाजून रोजच्याप्रमाणें पुढें गेली नाहीं. तेव्हां दिव्य दृष्टीनें लज्जेचें कारण पाहून ऋषि आनंदित झाला, आणि शकुंतलेस म्हणाला,—

क्षत्रियांस गांधर्वविवाहच श्रेष्ठ आहे. तुम्हा उभयतांची परस्पर प्रीति जमून विवाह झाला, हें फार चांगलें झालें. दुष्यंत मोठा धर्मात्मा व पराक्रमी आहे. त्यापासून तुला पुत्र होईल तो मोठा विजयी होईल. समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य एकटा करील. त्यास कोणी शत्रु होणार नाहीं."

याप्रमाणें कण्व बोलल्यावर शकुंतलेनें पाय धुऊन त्याची पूजा केली, आणि म्हणाली.

शकुंतला—मी आज दुष्यंत राजा पति वरिला, तर त्याचें व त्याच्या इष्टमित्रांचें सर्वदा कल्याण असो, एवढाच वर मागतें.

कण्व—मुली, तुजकरतां माझी त्याजवर पूर्ण कृपा आहे. जें जें तूं इच्छितेस तें तें सर्व होईल.

नंतर कांहीं दिवसांनीं शकुंतला प्रसूत झाली. तिला अति सुंदर रूपवान् पुत्र झाला. कण्वऋषीनें दुष्यंताच्या मुलाचे सर्व जातकर्मादि संस्कार केले. मुलगा फार भराभर वाढूं लागला, तेव्हां अतिशय बलाढ्य व अधिकाधिक सुंदर दिसूं लागला. सर्व राजचिन्हें त्याच्या अंगावर होतीं. सहा वर्षांचा झाला नाहीं तोंच सिंह, वाघ, हत्ती, वगैरे मोठाल्या पशूंस झाडाशीं बांधूं लागला. सर्वांस दमविणारा म्हणून ऋषींनीं त्याचें नाम 'सर्वदमन' ठेविलें. मुलगा किंचित् वयांत आल्यावर त्याचें अलौकिक शहाणपण पाहून, हा राज्यकारभार करण्यास योग्य झाला असें कण्वानें शकुंतलेस सांगितलें आणि शिष्यांस आज्ञा केली कीं आतां शकुंतलेस नवऱ्याचे घरीं पोहोंचती करा. बायकांनीं फार दिवस बापाच्या घरीं राहणें ठीक नाहीं, त्यापासून दुष्कीर्ति, दुर्वर्तन, अधर्म हीं होण्याचा संभव असतो.

याप्रमाणें ऋषिचें भाषण ऐकून शिष्य शकुंतलेस पोहोंचविण्यास तयार झाले. शकुंतलाहि मुलास घेऊन त्याबरोबर निघाली. नगरांत गेल्यावर, राजास वर्दी दिली. राजाच्या आज्ञेनें सर्वांनीं राजवाड्यांत प्रवेश केला. राजानें चालीप्रमाणें सत्कार केल्यावर शिष्य शकुंतलेस तेथें ठेवून परत गेले, तेव्हां शकुंतला राजास म्हणते, राजा, कण्वाश्रमीं येऊन पूर्वीं त्वां मजबरोबर गांधर्वविवाह केला, त्याचें स्मरण तुला आहेच. तुजपासून मला हा पुत्र झाला आहे, तर याचा स्वीकार करून पूर्वींच्या नियमाप्रमाणें यास राज्यकारभार सांगून त्वां हा आपल्या मागें गादीचा मालक करावा.

हें ऐकून राजास स्मरण असतांहि आपणांस हें कांहीं माहीत

नाहीं. असें दाखवून म्हणतो, हे दुष्टे, तपस्व्याची मुलगी तूं कोण ? तुजशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध केलेला मला स्मरत नाहीं. रहा, जा यथेच्छ तुला पाहिजे तें कर.

राजाचें भाषण ऐकून शकुंतला दुःखानें मूर्च्छित पडली. रागानें तिचे डोळे लाल झाले. रागानें राजाकडे पाहून त्यास ती म्हणाली, ' महाराज ' आपणास सर्व ठाऊक असून, अज्ञान्यासारखें कांहीं आठवत नाहीं असें कां म्हणतां ? याविषयीं तुमच्या अंतःकरणास माहीत आहे, त्याचीच साक्ष घ्या. जो सत्य स्मरून त्याचा अपलाप करितो, त्या चोरानें कोणतें पाप केलें नाहीं ? आपण मोठे ज्ञानी म्हणवितां, पण सर्वांतर्यामी परमेश्वर तुमच्या हृदयांत आहे त्याच्या समक्ष पाप करण्यास तुम्हास कां शंका वाटत नाहीं ? मनुष्य मी गुप्तपणें काम करितों हें कोणास समजणार नाहीं असें मानितो; परंतु सूर्य, चंद्र, पृथ्वी, वायु, अग्नि इत्यादि त्याचें कृत्य पाहणारे पुष्कळ आहेत. हृदयस्थ परमेश्वर संतुष्ट असला म्हणजे मनुष्यांचीं सर्व पातकें नष्ट होतात, तोच संतुष्ट नसला ह्मणजे महायातना भोगाव्या लागतात. आपण होउन मी तुजकडे आलें एवढ्यावरूनच तूं माझा अपमान करूं नको. मी येथें एकटी रडतें याची तुला करुणा येत नाहीं. काय ? मी इतकी याचना करत असतां तूं ऐकणार नाहीं. आज तुझें कपाळ फुटलें समज. पति स्त्रीच्या उदरांत पुत्ररूपानें आपणासच पुनः उत्पन्न करतो. याकरतां तिला मोठमोठे प्राचीन विद्वान् 'जाया' असें म्हणतात. तसेंच पुन्नामक नरकापासून पूर्वजांचें त्राण (रक्षण) करतो, म्हणून मुलास पुत्र असें म्हणतात. जी गृहकृत्याविषयीं दक्ष, जिला मुलें होतात, जी नवऱ्यास प्राणापलीकडे समजते, जी पतिव्रता तिलाच बायको म्हणावें. बायको ही पुरूषाचें अर्धांग आहे. बायकोसारखा खरा मित्र दुसरा कोणी नाहीं. धर्म, अर्थ, काम, हे तीन पुरुषार्थ प्राप्त होण्यास भार्याच कारण आहे. ज्यांस भार्या असते त्यांसच गृहस्थाश्रमाच्या

क्रिया घडतात, तेच यज्ञयाग करूं शकतात; त्यांसच लक्ष्मी प्राप्त होते. एकांतीं असतां मधुर भाषणांनीं स्त्रिया पतीस संतुष्ट करतात; धर्मकार्याविषयीं बापाप्रमाणें साह्य करतात; दुखणें आलें तर आईप्रमाणें पालन करतात; अरण्यांत, मार्गांत, कोठेंहि श्रम झाले तरी बायको परिहार करते. ज्यास बायको आहे, त्यावरच लोक विश्वास ठेवितात. भार्या असली तरच स्वर्ग सुलभ होतो. याप्रमाणें ऐहलौकिक व पारलौकिक हितें बायको असल्यानें होतात याकरितां सुज्ञांनीं तिचें आईप्रमाणें पालन करावें. भार्येच्या ठायीं झालेला पुत्र हें केवळ पित्याचेंच प्रतिबिंब आहे. उन्हानें मनुष्याचें अंग तापलें म्हणजे जशी उदकानें शांति होते, त्याप्रमाणें मनुष्यास कितीहि दुःखें झालीं तरी स्त्रियांपासून सुख होतें. याकरितां कितीहि संताप आला तरी स्त्रियांचें अप्रिय करूं नये. कारण, सर्व आपलें सुख, धर्म, वगैरे त्यांच्या स्वाधीन आहे. स्त्रिया अनुकुल नसत्या तर पूर्वीं ऋषींच्यानें सृष्टी कशी करवली असती? मुलगा इकडे तिकडे खेळत असतां धुळीनें अंग भरून बापाच्या मांडीवर बसतो, यापेक्षां अधिक सुख काय आहे? तुझा मुलगा तुजकडे आला असतां वांकड्या दृष्टीनें पाहून, त्याचा अपमान करतोस हें योग्य काय? मुंग्यासुद्धां मोठ्या काळजीनें आपल्या अंड्यांचें पालन करतात; असें असून तूं मोठा धर्मज्ञ ह्मणविणारा आपल्या पुत्राचा त्याग कां करतोस? पुत्रास आलिंगन करून पित्यास जें सुख होतें, तें उंच वस्त्रें, स्त्रिया, उदक, यांच्या स्पर्शापेक्षांदेखील अधिक आहे. पुत्रस्पर्शापेक्षां अधिक स्पर्शसुख कोणतेंच नाहीं. याकरतां याला मांडीवर घे. मी ज्या वेळेस प्रसूत झालें त्या वेळेस, ‘ हा पुत्र दुष्यंत राजास फार सुख देईल, अश्वमेध करील ’ अशी आकाशवाणी झाली. आतां माझें सर्व जीवित तुझ्या हातीं आहे. हरिणाच्या मागें लागून आलास तेव्हां कण्वाच्या आश्रमांत शिरून त्वां माझ्याशीं गांधर्वविवाह केला. ऊर्वशी, पूर्वचित्ति, सहजन्या, मेनका, विश्वाची,

घृताची या सर्व अप्सरांत श्रेष्ठ; त्यांपैकीं मेनकेच्या ठायीं विश्वामित्रापासून मी उत्पन्न झालें. मला तिनेंहि टाकिलें, भावाबंदांनीं सोडिलें, आतां तूंहि माझा त्याग करणार, तेव्हां जन्मांतरचें पाप समजलें पाहिजे. बरें त्वां त्याग केला तर मी परत जाईन, परंतु एवढा आपला पुत्र तरी संभाळ.

**दुष्यंत**—मला तुजशीं गांधर्वविवाह केलेला आठवत नाहीं. बायका ह्मणजे बहुशः खोटसाळ, तेव्हां तुझ्या बोलण्यावर भरंवसा कसा ठेवावा? मेनका निर्दय, लबाड बायको: जिनें पोटच्या पोरास निर्माल्याप्रमाणें टाकून दिलें. तुझा बाप तर तपस्वी असून बायकांस भुलणारा. वा! मेनका अप्सरेमध्यें श्रेष्ठ, तर मग तूं तिची मुलगी असून अशी लबाड बायकोसारखी काय बडबडतेस? माझ्यासमोर असें बोलण्यास तुला लाज वाटत नाहीं? चल, जा येथून निघून. विश्वामित्र केवढा! मेनका कोणीकडे! आणि तूं भिकारीण त्यांची मुलगी कशी शोभशील? हा एवढा थोरला तुझा मुलगा थोड्या वेळांत कसा वाढेल? तुझी जातच वाईट आहे. तूं लबाड बायकोप्रमाणें बडबडतेस, तूं काय ह्मणतेस यांतलें मला कांहींएक माहीत नाहीं, तुला पाहिजे तिकडे जा.

**शकुंतला**—राजा, दुसऱ्याचा तिळाइतका उणेपणा काढतोस; परंतु आपला नारळाएवढा असून देखील तुला दिसत नाहीं. मेनकेची स्वर्गीं देवांतसुद्धां प्रतिष्ठा आहे. तुझ्यापेक्षां माझेंच जन्म श्रेष्ठ आहे. दृष्टांताकरतां खरें आहे तें बोलतें, त्याचा आपणास राग नसावा. कुरूप मनुष्य आरशांत आपलें तोंड पाहत नाहीं, तोंपर्यंत मी मोठा रूपवान असें त्यास वाटतें. परंतु एकदां आरसा पाहिला ह्मणजे लोकांत व आपल्यांत अंतर काय, हें त्यास समजतें. वस्तुतः खरा चांगला आहे तो कोणाचा अपमान करीत नाहीं. स्वतः वाईट असतो तो मात्र बडबड करून लोकांची निंदा करतो. चांगले पदार्थ असले तरी डुकराची

जशी विष्ठेवर प्रीति असते, त्याप्रमाणें मूर्खानें लोकांचीं बोलणीं ऐकिलीं ह्मणजे तो वाईट असेल तेवढ्याचेंच ग्रहण करतो; परंतु विद्वान असेल तो, हंस जसा पाण्यापासून दूध काढून घेतो, त्याप्रमाणें कोणी कांहीं बोललें तरी चांगलें असेल तेवढेंच घेतो. साधूला दुसऱ्याच्या निंदेपासून सुख होतें, परंतु दुर्जनास तिजपासून आनंद होतो. थोराला नमस्कार केला ह्मणजे सज्जनास समाधान वाटतें, परंतु त्यास शिव्या देण्यांत दुष्टाला मौज वाटते. दुर्जनानें सज्जनास दुर्जन ह्मणणें यापेक्षां जगांत दुसरें अधिक आश्चर्य काय आहे ? असत्य भाषण करणारा मनुष्य हा केवळ सर्पच होय. नास्तिकास देखील त्याचें भय वाटतें, मग धार्मिकास कां वाटणार नाहीं ? आपल्या पुत्राचा जो त्याग करितो त्याची सर्व लक्ष्मी जाते, त्यास स्वर्गप्राप्ति होत नाहीं; पुत्र सर्व कुलाचा उद्धार करतो, याकरतां राजा, पुत्राचा त्याग करणें हें तुला योग्य नाहीं. हजारों आड व विहिरी बांधणें, हजारों यज्ञ करणें, या सर्वांपेक्षां सत्याचें पुण्य फार आहे. सत्यापेक्षां मोठा धर्म नाहीं, सत्यापेक्षां श्रेष्ठ व्रत नाहीं, मजपाशीं केलेला करार तडीस न्यावा, नाहींतर खोटें बोलण्याचें पाप लागेल. तुझी इच्छा नसेल तर मी जातें. त्वां दिलें नाहीं तरी माझ्या मुलास सर्व पृथ्वीचें राज्य मिळेल. असें बोलून शकुंतला जावयास निघाली. इतक्यांत आकाशवाणी झाली ! ‘ दुष्यंतराजा, शकुंतलेचा अपमान करूं नको. पुत्राचें पालन कर. आई केवळ भात्यासारखी आहे. पुत्राचें पालन बापानेंच केलें पाहिजे. तुजपासूनच याची उत्पत्ति आहे. ’ याप्रमाणें देवांचें भाषण ऐकून गुरु, प्रधान, वगैरे सर्व सभेंत होते त्यांस राजानें सांगितलें कीं, मला हें सर्व माहित होतें; परंतु लोकांस संशय येईल ह्मणून एकाएकीं मी हिचें ग्रहण केलें नाहीं. नंतर राजानें मोठ्या आनंदानें पुत्रास आलिंगिलें. आणि देवांनीं ‘ भरस्व ’ ( पालन कर ) असें ह्मटलें ह्मणून भरत असें नांव ठेविलें. राजानें शकुंतलेचेंहि

प्रीतीनें सांत्वन केलें. तो म्हणाला, लोकांस तुझा माझा गांधर्व-विवाह अशास्त्र वाटेल ह्मणून मीं असें केलें. तूंहि रागानें बोललीस त्याचा मला राग नाहीं. नंतर दुष्यंतराजानें भरतास राज्यकारभार सांगितला. भरतानें सर्व राजे जिंकिले, कण्वऋषीच्या साहाय्यानें यज्ञ केले, ब्राह्मणांस असंख्य द्रव्य दिलें, त्याच्या पराक्रमामुळें त्याच्या वंशास " भारतवंश " असें नांव पडलें. पुढें याच वंशांत मोठाले पराक्रमी राजे झाले. यांच्याच नांवावरून या देशास भारतवर्ष किंवा भरतखण्ड असें नांव पडलें, असें विद्वानांचें मत आहे.

---

## इतिहास.

इतिहास हें हल्लीं नवीन शास्त्र उत्पन्न झालें आहे, असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थान, चीन, मिसर इत्यादि प्राचीन महाद्वीपांतील प्राचीनकाळीं सुधारलेल्या देशांच्या आपण पुष्कळ गोष्टी ऐकतों, परंतु त्यापैकीं कोणत्याहि देशांत इतिहास ही एक मोठी विद्या मानीत होते, असें आपणास कोठें आढळत नाहीं.

इतिहास हा शब्द इति, ह, हीं दोन अव्ययें आणि, अस् " ह्मणजे असणें " या धातूपासून झाला आहे. या प्रकारची पूर्वस्थिति, एवढाच याचा मूलार्थ आहे. त्यावरूनच कोणत्याहि देशाची अथवा मनुष्याची मागील हकीगत लिहिलेल्या ग्रंथास इतिहास ह्मणतात. साधारण लोकांस वाटेल कीं, अशा लिहिलेल्या गोष्टी वाचून काय करावयाचें आहे ? त्यांत मोठी विद्या ती कोणती ? अमुक राजा अमक्या शकांत जन्मला व अमुक वर्षीं मरण पावला, हें ध्यानांत ठेवून काय फळ; असे प्रश्न अज्ञान लोकांच्या मनांत येतील यांत संशय नाहीं. पण सुज्ञांनीं याचा थोडासा विचार केला तर त्यांस असें दिसेल कीं, इतिहासासारखी दुसरी उपयुक्त विद्या कोणतीच नाहीं. ज्यांस मनुष्य असणें हें मोठें भाग्य वाटतें त्यांस अल्पस्वल्प तरी इतिहा-

याचें ज्ञान असणें आवश्यक आहे. पहा, मनुष्य जन्मास येतांच त्यास अरण्यांत नेऊन सोडलें आणि फक्त त्याच्या उपजीवनाचे मात्र उपाय योजिले तर तो पशु होईल किंवा मनुष्य होईल? मनुष्याचा शब्दहि त्याच्या कानीं पडला नाहीं तर त्यास मनुष्य-वाणीसुद्धां फुटणार नाहीं. मग तो पशूच राहील यांत काय संशय? यावरून सिद्ध होतें कीं, ईश्वरानें मनुष्यास बुद्धि दिली आहे, परंतु सर्व शहाणपण त्याच्या अंगीं स्वभावतःच उत्पन्न व्हावें असें न करितां त्यानें सर्व गोष्टी अनुकरणानेंच शिकाव्या अशी तजवीज त्यानें केली आहे, असें दिसतें. असें आहे तर मनुष्यास अनुकरण करण्यास जितक्या गोष्टी चांगल्या व अधिक असतील तितक्या चांगल्याच. उत्तरोत्तर जगांत अधिक सुधारणा होत चालली आहे. नवीन नवीन कल्पना निघत आहेत, हें एक अनुकरणानें मनुष्य शहाणा होतो यास मोठें प्रमाण होय.

कित्येक अविचारी अज्ञान लोक मागल्या लोकांस हंसतात; पण त्यांनीं हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं आपण मागल्या लोकांस हंसतों त्याप्रमाणेंच पुढील प्रजा आपणांस हंसणार आहे. वास्तविक पाहतां कोणी कोणास हंसणें ठीक नाहीं. मागील लोकांच्या अनुभवाच्या मानानें जे शहाणे होते, त्यांजपेक्षां हल्लीं अनुभव जास्त आहे म्हणून अधिक सुधारणा झाली. यावरून होईल तितका आपल्या व पुढल्या प्रजेच्या उपयोगाकरतां इतिहाससंग्रह करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यच आहे. प्राचीन काळीं लोक इतिहास लिहीत नसत. यास दोन तीन कारणें दिसतात. देशांचें परस्परांशीं दळणवळण नसल्यामुळें इतर देशांच्या गोष्टी समजण्याचा प्रसंग येत नसे. तसेंच स्वदेशाचाहि स्मरणांत न राहण्यासारखा फार वृत्तांत नसे. त्यामुळें कोणी इतिहास लिहिण्याची पर्वा करीत नसे. शिवाय सर्व देशांत लेखनकलाहि पूर्णपणें माहित नसे. त्यामुळें इतिहासास कधीं महत्व

आलें नाहीं. परंतु सांप्रत सर्व गोष्टी त्याच्या उलट आहेत. दुसऱ्या देशाशीं अगदीं संबंध नाहीं असा जगांत एक देखील देश नाहीं ह्मटलें तरी चालेल. तसेंच कांहीं कांहीं देशांत सुधारणा होऊन फार दिवस झाल्यामुळें त्यांचा इतिहास इतका वाढला आहे कीं, तो ग्रंथांत लिहिल्याशिवाय ध्यानांत राहणेंच नाहीं. तसेंच लिहिण्याची कला पूर्णतेस आली इतकेंच नाहीं; पण छापण्याच्या कलेमुळें केवढाहि ग्रंथ असला तरी त्याच्या लाखों प्रती फारच थोड्या खर्चांत थोड्या वेळांत तयार होतात.

वर लिहिलें आहे कीं, मनुष्यास अनुकरणानेंच शहाणपण येतें; यावरून कोणी ह्मणेल कीं, पहिल्यानें मनुष्यास बोलणें वगैरे कसें आलें? त्यांनीं कोणाचें अनुकरण केलें? असे प्रश्न पुष्कळ आहेत व त्याचें योग्य रीतीनें समाधान झालें नाहीं, ह्मणून अनुकरणानें मनुष्य शहाणा होतो यास बाध येतो असें नाहीं. पहा. वृक्ष अगोदर झाला, अथवा बीज अगोदर झालें? याचा निर्णय करतां येत नाहीं; तथापि बीज नष्ट झालें तर वृक्ष करतां येणार नाहीं हें उघड आहे. तसेंच पहिल्या मनुष्यास कसेंहि शहाणपण येवो, परंतु आतां उदाहरणांनींच मनुष्यांनीं शिकलें पाहिजे हें उघड आहे. ईश्वर कोणास आजपर्यंत दिसला नाहीं व पुढें दिसेल असेंहि ह्मणवत नाहीं, परंतु मनुष्यांस प्रथम वाणी वगैरे कशी प्राप्त झाली, याचा ऐतिहासिक रीतीनें विचार करूं लागलें ह्मणजे ईश्वराचें अस्तित्व स्वीकारावेंच लागतें व हेंच सर्व धर्मांचें बीज आहे. यावरून इतिहासाच्या अभ्यासाचा किती उपयोग आहे, हें थोडक्यांत लक्षांत येईल.

---

## प्राचीन इतिहास.

जगाच्या इतिहासाचा विचार करूं लागलों ह्मणजे असे प्रश्न उत्पन्न होतात कीं, त्यांचा उलगडा होणेंच कठीण. ज्या देशांत

सुधारणा नाहीं, तेथील लोक बहुशः जग वर्तमान कालीं आहे तसेंच अनादिकालापासून आहे व पुढेंहि असेंच राहणार असें मानीत असतात. पण लोक विद्या शिकून शहाणे झाले, आणि सृष्टीचा विचार करूं लागले ह्मणजे मनुष्याच्या, जन्मास आल्यापासून जशा दररोज स्थिति बदलतात, तशी जग ही एक ईश्वराची सतत बदलणारी वस्तु आहे, असें त्यांस स्पष्ट दिसतें. आलीकडे सुधारणा होऊन इतिहासाकडे लोकांचें मन लागल्यापासून, जगाच्या सुधारणेच्या कामांत नेहमीं पुढें पाय आहे, हें आबालवृद्धांस कळत चाललें आहे. याकरतां पृथ्वी कशी उत्पन्न झाली, तिची पूर्वस्थिति कशी असावी, याचा शोध करण्याकडे हल्लीं पुष्कळ विद्वानांचें मन लागलें आहे. पृथ्वीचा आकार नारिंगासारखा असावा असें हल्लीं सर्व पृथ्वींतील विद्वानांचें मत आहे. नारिंगासारखा दोहीं ध्रुवांकडे पृथ्वीचा आकार चपटा असण्याचें कारण विद्वान् लोक असें सांगतात कीं, पृथ्वी उत्पन्न झाली तेव्हां हल्लीप्रमाणें घनीभूत ह्मणजे घट्ट नव्हती, तर लोण्याच्या गोळयाप्रमाणें लबलबीत असल्यामुळें तिला गति प्राप्त झाल्याबरोबर मध्यें मोठी होऊन दोहीं बाजूंस चापट झाली. प्राचीन काळीं सुधारलेल्या देशांतील ज्योतिषी पृथ्वी स्थिर, व सपाट आहे, असें मानीत होते; परंतु सांप्रत सर्व पृथ्वींतील ज्योतिःशास्त्रवेत्त्यांचा वर सांगितल्याप्रमाणें निश्चय झाला आहे.

अशा गोष्टींचें ज्ञान पृथ्वीवरील मनुष्यांस प्रत्यक्ष होणें नाहीं, हें तर सिद्धच आहे, तथापि पूर्वींपेक्षां नूतन अनुमानें पुष्कळ अंशीं खरीं ह्मणण्यास बहुत आधार आहेत. पृथ्वीचा वर्तुलाकार कायम आहे तरी तिच्या बाह्यस्वरूपांत नेहमीं अन्तर पडतें! हें भूगोलशास्त्रवेत्त्यांच्या अनुभवास आलें आहे. जेथें पूर्वीं मोठमोठीं नगरें होतीं तेथें हल्लीं जंगलें वाढून नद्या, ओढे व अरण्यें झालीं आहेत व जेथें मनुष्यांची गति देखील नसे व सिंहव्याघ्रादि हिंसक पशु संचार करीत, तेथें हल्लीं मोठमोठीं शहरें झालीं

आहेत. अशी अदलाबदल आजपर्यंत किती वेळ किती ठिकाणीं झाली असेल हें कोण सांगेल?

मनुष्याच्या उत्पत्तीचा विचार केला तरी, त्याचा कांहींच ठिकाण लागत नाहीं, अशी व्यवस्था होते. प्रत्येक धर्माच्या पुस्तकांत वेगवेगळी उत्पत्तीची रीति सांगितली आहे. त्यामुळें सर्वांची एकवाक्यता होत नाहीं. कोणी ह्मणतात पंचमहाभूतांपासून सृष्टि उत्पन्न झाली. कोणी ह्मणतात प्रथम स्त्रीपुरुषांचा जोडा ईश्वरानें उत्पन्न केला. या सर्वांची एकवाक्यता न होतां उत्पत्तींच्या रीतीचा निश्चय करण्यास कठीण पडतें. तथापि प्राचीन काळापासून आजपर्यंत अनेक देशांतील अनेक विद्वानांनीं प्राचीन उत्पत्तीच्या रीतीचें अनुमान करण्यास पुष्कळ यत्न केले आहेत, यांपैकीं कित्येकांचे विचार फार सूक्ष्म व मनोरम आहेत.

उत्पत्तीचा प्रकार कांहीं असो, ईश्वरानें जगांत मनुष्यें उत्पन्न केलीं असें मानून चाललों तरी अनेक प्रश्न उत्पन्न होतात. कारण पृथ्वींतील सर्व मनुष्यें पाहिलीं तर एकसारखीं दिसत नाहींत. परस्परांच्या शरीररचनेंत थोडाबहुत भेद दृष्टीस पडतो. तसेंच बुद्धीविषयीं विचार केला तरी वेगळाल्या जातींत अतिशय भेद आहे. पहिल्यानें मनुष्यें सारखीं असून पश्चात् हवेच्या वगैरे बाह्य कारणांनीं त्यांच्या बांध्यांत व बुद्धींत अंतर पडलें याचा निश्चय करितां येत नाहीं. हिंदु, युरोपियन वगैरे जाती पाहिल्या तर बुद्धीविषयीं फारच श्रेष्ठ आहेत. तसेच अमेरिकेंतील मूळचे लोक अगदीं पशुतुल्य असतात. कोणी तत्ववेत्ते ह्मणतात कीं, प्रथम मनुष्यें सर्व चांगलीं होतीं पण कांहीं बाह्य योगानें, त्यांस अशी पशुतुल्यावस्था प्राप्त झाली असावी. कांहींचें ह्मणणें असें आहे कीं, सर्व मनुष्यें अमेरिकेंतील मुळच्या लोकांसारखींच होतीं. पण कित्येक सुधारून बुद्धिमान झालीं. दोन्हीं अनुमानें संभाव्य दिसतात, पण अमुकच खरें असा निश्चय होणें नाहीं.

अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांनीं पृथ्वींतील सर्व मनुष्यांचे तीन वर्ग केले

आहेत. पहिला काकेशिअन, दुसरा मांगोल आणि तिसरा निग्रो. आशियाखंडांतील काकेशस पर्वतापासून गंगानदीपर्यंत जो प्रदेश आहे त्या प्रदेशांतील लोक, यूरोपांतील लोक, आफ्रिकाखंडाच्या उत्तरेकडील लोक इतके पहिल्या वर्गांत आहेत असें मानतात. आशियाखंडाच्या पूर्वेकडील लोक व अमेरिकेंतील लोक दुसऱ्या वर्गांत गणिले जातात. आफ्रिकेंतील काळया रंगाचे व राठ केंसांचे लोकांचा तिसरा वर्ग समजतात. कित्येक जाति अशा आढळतात कीं, वर सांगितलेल्या तीन वर्गांपैकीं कोणत्याच वर्गांत त्यांची गणना करितां येत नाहीं. प्राणी व वनस्पति यांप्रमाणें मनुष्यांमध्येंहि अनेक तऱ्हा आढळतात.

मनुष्याच्या उत्पत्तीचा जसा थांग लागणें नाहीं, तसा मनुष्यें पूर्वीं पृथ्वीच्या कोणत्या प्रदेशांत रहात होतीं याचाहि शोध लागणें कठीण पडतें. प्रत्येक धर्मशास्त्रांत वेगळालीं स्थानें सांगितलीं आहेत. आपल्या पुराणप्रसिद्ध ऋषींचे आश्रम, व पुरातन राजांचीं राज्यें आर्यावर्तांत म्हणजे हिमालय आणि विंध्य पर्वतांच्या मधल्या प्रदेशांत होतीं, म्हणूनच या प्रदेशास आर्यावर्त हें नांव प्राप्त झालें आहे, तथापि मूलस्थान अमुकच असें निश्चयात्मक ठरवितां येत नाहीं. इतर धर्मपुस्तकांतहि तीं जेथें जेथें प्रवृत्त झालीं तेथील आसपासच्या प्रदेशांत मनुष्यांचीं मूलस्थानें सांगितलीं आहेत.

अलीकडील विद्वानांनीं मनुष्यांचीं मूलस्थानें तीन मानिलीं आहेत. काकेशन वर्गांतलीं मनुष्यें, काळ्या समुद्रापासून हिंदुस्थानाच्या पूर्व बाजूपर्यंत जो प्रदेश आहे, त्यांत होतीं असें म्हणतात. दुसऱ्या वर्गांतील लोकांचे पूर्वज पूर्वेकडे तिबेटाच्या पलिकडे कोबी नांवाच्या मैदानाच्या जवळच्या पर्वतांत होते. आणि आफ्रिकेंतील चंद्रपर्वताजवळ प्राचीन निग्रो लोक रहात होते, असें अनुमान करतात. अमेरिकाखंड फार दिवस ओसाडच असावें असें मानिलें आहे.

हे सर्व विद्वानांच्या कल्पनांचे तरंग आहेत. तूर्त आपणांस अनेक ठिकाणीं राहून तेथें जुने झालेले लोक दिसतात; याकरितां ते तेथें कोणीकडून आले याचा विचार निश्चित होत नाहीं.

इतर गोष्टींप्रमाणें मनुष्यांची फार प्राचीनकाळीं काय स्थिति असावी याचा निश्चय करितां येत नाहीं. मनुष्यांच्या वेगळाल्या स्थिति दृष्टीस पडतात, त्यांवरून अर्वाचीन सृष्टितत्त्ववेत्ते, चार स्थितींत मनुष्यें असावीं असें अनुमान करतात. १ फलमूलाशी ( फळें मुळें खाऊन राहणारे ). २ व्याध ( पारधीनें उपजीविका करणारे ). ३ धनगर, आणि ४ कृषीवल ( ह्म० शेतकी करणारे ). प्रत्येक देशांतील लोक, पहिल्या स्थितींत असून क्रमाक्रमानें सुधारत एकेक स्थिति टाकून सांप्रतच्या अवस्थेस आले आहेत, असें विद्वान् लोक अनुमान करतात. पण ऐतिहासिक प्रमाण कांहींच सांपडत नाहीं. आपल्या आपण सुधारलेल्या लोकांचीं उदाहरणें बहुशः आढळत नाहींत. प्रत्येक देशांत सुधारणा बहुशः बाहेरून येते, व कित्येक रानटी लोक पूर्वीं सुधारलेले असून निकृष्टावस्थेंत आले असावे असाहि अनुभव आहे. कितीहि प्राचीन पुस्तकें पाहिलीं तरी त्या वेळच्या मनुष्यांस नांगर, खोरें, कुदळ, कोयता वगैरे आवश्यक आउतें माहित होतीं असें दिसतें. कोठेंहि पाहिलें तरी शेतकी पहिल्यापासूनच आहे असें दिसतें. मनुष्यें पशुस्थितींत होतीं अशी कल्पना करोत, पण कितीहि मागें विचार करीत गेलें तरी मनुष्यें समुदायानें राहणारीं, मालमत्ता बाळगणारीं व लहान साहान कायदे अथवा नियम व सरकार यांच्या अमलांत वागणारींच आढळतात. त्यांच्याहि पूर्वीं कधीं मनुष्यें कंदमूळावर उपजीविका करून स्वतःचें रक्षण करून रहात असतील असेंहि अनुमान करितां येईल; तथापि फार प्राचीन काळापासून सुधारणा होऊन मनुष्यें शेतकी करूं लागलीं, आणि देशांत मोठमोठालीं राज्यें उत्पन्न झालीं. एकंदर इतिहासावरून

दिसून येईल कीं, विद्या, चांगले कायदे, व न्यायी सरकार, असल्याशिवाय देशांतील लोकांस सुख होत नाहीं.

आजपर्यंत सुधारणेसंबंधी चांगल्या ज्या गोष्टी आपण ऐकितों त्या सर्व काकेशन वर्गातल्या लोकांत झाल्या आहेत. सर्व प्रकारच्या विषयांवर उत्तमोत्तम ग्रंथ त्यांतच आढळतात. तत्त्वज्ञान, राजनीति, धर्म यांचे अनेक प्रकार त्या वर्गांत सांपडतात.

---

## चीन देशाविषयीं थोडी माहिती.

चीन देश फार प्राचीन काळापासून सुधारलेला आहे. या देशांत राज्यस्थापना होऊन तीन हजारांवर वर्षे झालीं असावीं असा विद्वान लोक सुमार करतात. यापेक्षांहि प्राचीन काळच्या गोष्टी चिनी लोकांच्या इतिहासांत सांपडतात. परंतु चीन देशांतील सुद्धां विद्वान लोक त्यांस पौराणिक गोष्टींप्रमाणें कल्पित कादंबऱ्या समजतात.

प्रथम मध्यएशियाच्या मैदानांतून चीन देशाकडे लोक गेले असावे असा विद्वान लोकांचा अदमास आहे. त्या लोकांनीं तार्तरी देशाच्या सीमेवर शेन्सी म्हणून प्रांत आहे, तेथें वसाहत केली. नंतर ते हळुहळु सर्व चीन देशभर पसरले. या लोकांनीं फोही यास आपला राजा केलें; असें चीन लोकांच्या इतिहासांत लिहिलें आहे. हा मोठा सद्गुणी होता. यास लोक ‘ देवपुत्र ’ असें म्हणत. हा किताब चीन देशचे राजे अद्याप धारण करतात.

मोठा यू म्हणून ख्रिस्ती शकापूर्वीं सुमारें दोन हजार वर्षांच्या सुमारास चीन देशांत एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. या राजाचा मात्र खरा इतिहास आढळतो. फोही या नांवाचा राजा खराच होऊन गेला असेल तर, याच्या वेळेपासून किती काळ गेल्यानंतर, यु राजा झाला हें बरोबर कळत नाहीं. मिसर देश जेव्हां भरभराटींत होता त्यावेळेस चीनदेशहि सुधारलेला होता

असें मानण्यास बहुत कारणें आहेत, तथापि या दोन्ही राष्ट्रांचें परस्पर दळणवळण होतें किंवा नाहीं हें ठरवितां येत नाहीं. चीन लोकांच्या पुष्कळ रीतीभाती प्राचीन मिसरदेशच्या लोकांप्रमाणें आहेत. फोही याच्या मागून सात राजे झाले असें चीन लोकांच्या जुन्या ग्रंथांत लिहिलें आहे. या सर्वांस दिव्य ज्ञान होतें. यांनीं मूळच्या रानटी लोकांस कलाकौशल्य शिकवून त्यांची सुधारणा केली.

चीन देशांतील फार व उपयुक्त कला म्हटलें ह्मणजे ह्या दोन होत. एक शेतकी व दुसरी रेशीम विणणें. चिनी लोक पूर्वींपासून शेतकीवर उपजीविन करतात. त्यांच्या देशांत तुतीचीं झाडें फार असल्यामुळें तेथें रेशमाचे किडे फार, यामुळें चीन देशांत बहुतकरून सर्व कपडे रेशमाचेच असत. एका प्राचीन चीन देशच्या बादशहाच्या राणीनें प्रथम चिनी लोकांस रेशीम विणण्यास व रंगविण्यास शिकविलें असें सांगतात. तसेंच फोही याच्या मागून झालेला राजा शिनांग यानें आरंभीं त्यांस शेतकीचें काम शिकविलें. या उभयतांच्या सन्मानार्थ चिनी लोक अद्याप वार्षिक उत्साह करतात.

प्राचीन काळापासून आजपर्यंत चिनी लोकांत शेतकीच्या धंद्यास मोठी प्रतिष्ठा आहे. वसंतऋतूमध्यें नवीन वर्षारंभाचा मोठा उत्साह करतात; त्या वेळेस बादशहा स्वतः शेतांत नांगर धरून पेरणी करतो. या कामास चीन देशांतील बहुतकरून कोणताहि राजा आळस करीत नाहीं. यामुळें चीन देशांत शेतकऱ्यास मोठा मान मिळतो. एकादा शूर योद्धा अथवा श्रीमान व्यापारी यापेक्षां चिनी लोकांत शेतकऱ्याची मोठी प्रतिष्ठा आहे. लिहिणें, वाद्यें वाजविणें, धातूंचा रस करणें, पूल बांधणें, इत्यादि सर्व कला चिनी लोकांस प्रारंभीं बादशहांनीं शिकविल्या, अशा कथा चीन देशांत आहेत, पण बादशहा स्वतः कसे शिकले हें कोठेंहि सांगितलेलें नाहीं. होआंगटी बादशहानें आपल्या राणी-

स, लोकांस रेशीम विणण्याचें काम शिकविण्यास सांगितलें अशी कथा आहे. परंतु तिला ही कला कशी आली याविषयीं कोठेंहि आधार सांपडत नाहीं, हें चमत्कारिक आहे. होआंग्टी यानेंच अरण्यांत शिकारीस जाण्याकरितां होकायंत्राची कल्पना काढिली असें म्हणतात. ही गोष्ट खरी असो किंवा खोटी असो, तथापि इतकें खरें आहे कीं, चिनी लोकांस होक्याची युक्ति फार प्राचीन काळापासून माहित आहे.

फोहीच्या वंशांतील शेवटले दोन राजे याऊ व शन, हे सर्व राजांमध्यें फार शहाणे असें मानिलें आहे. चीन देशांतील पुष्कळ कायदेकानू या दोघांनीं रचलेले आहेत असें ह्मणतात. शन राज्याच्या वेळेस सर्व चीन देश जलमय झाला होता असें लिहिलें आहे. यू हा या वेळेस मुख्य प्रधान होता. त्यानें मोठ्या चातुर्यानें पाट काढून पाणी काढून दिलें त्यामुळें जमीन पुनः सुपीक झाली. यामुळें यू याची मोठी कीर्ति झाली. तो मोठा गुणवान्‌हि होता; यामुळें शन बादशहानें, आपल्या मागून यू यानें गादीवर बसावें असें ठराविलें. आपल्या मागून गादीवर बसण्याचा अधिकार राजानें पाहिजे त्यास द्यावा; असा चीन देशांत कायदा आहे.

मोठा यू याच्या वेळेस यांगत्सेकिआंग या नदीपर्यंत उत्तरेकडील सर्व प्रदेशांत चीनच्या बादशहाची सत्ता स्थापित झाली. बादशहांनीं आपल्या घराण्यांतील पुरुषास पुष्कळ लहान लहान प्रांतांचा अधिकार दिल्यामुळें लहानसान मांडलिक राज्यें पुष्कळ होतीं. परंतु त्या सर्वांवर बादशाहाचा अधिकार असे. या वेळेस दक्षिण प्रदेशांत थोड्याशा रानटी लोकांची मात्र वस्ती होती.

मोठा यू याच्या मागून चीन देशांत पुष्कळ राजे झाले. दिवसेंदिवस देशांत वसाहत पुष्कळ होऊन सुधारणा वाढली. या सर्व राजांनीं आपापल्या राज्याचीं वर्णनें विद्वानांकडून लिहवून ठेविलीं आहेत. परंतु या ग्रंथांत ग्रंथकर्त्यांनीं कल्पित गोष्टी फार

लिहिल्या आहेत, असें दिसतें. कनफ्युशस याच्या ग्रंथावरून जो चिनी लोकांचा प्राचीन इतिहास कळतो तो मात्र विश्वसनीय आहे, असें विद्वान लोकांचें मत आहे. कनफ्युशस हा एक सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीं चीन देशांत महान् तत्ववेत्ता होऊन गेला.

कनफ्युशसच्या वेळेस चीन देशांत व्यवस्थित राज्यस्थापना होऊन दीडहजारांवर वर्षें झालीं होतीं. शेतकी वगैरे निर्वाहास आवश्यक अशा गोष्टी सर्व लोकांस चांगल्या येत होत्या. शेतकरी फार सुखी होते. मांडलिक राजे आपापल्या प्रजेपासून जमिनीचा वगैरे सारा घेऊन बादशहास खंडणी देत. कनफ्युशस याच्या वेळेस, शेतकरी लोक, जमिनीच्या साऱ्याबद्दल शेतांत पिकणारे पदार्थच देत असत. तथापि चीन देशांत पूर्वींपासून सोनें, रुपें, तांबें, लोखंड, शिसें वगैरे धातूंचीं नाणीं होतीं असें सांगतात. अलीकडे तांब्यांचें नाणें मात्र प्रचारांत फार आहे. पूर्वीं एक प्रकारच्या रुप्याच्या पत्र्याचा व्यवहारांत उपयोग करीत. हा पत्रा घेऊन बाजारांत कांहीं जिन्नस आणण्यास गेलें ह्मणजे दुकानदार जिनसाच्या किमतीइतका त्याचा तुकडा बेतानें कापून घेई. चिनी लोकांत संख्या मोजण्याचें एक चमत्कारिक यंत्र आहे. त्याचा ते लोक अद्याप व्यवहारांत उपयोग करतात. एका पेटींत कांहीं तारा बसवून त्यांत निरनिराळ्या रंगाच्या गोट्या ओंवलेल्या असतात. त्याचे वेगळाले भाग पाडून, पहिल्या भागांतील गोट्या एकं, दुसऱ्यांतील दहं याप्रमाणें चिनी लोकांस या यंत्राच्या योगानें भराभर मोजतां येतें. शिनांग बादशहानेंच हें यंत्र नवीन सुरू केलें असें ह्मणतात.

चीन देशांत दुपारच्या वेळीं शहरांतून बाजार भरण्याची चाल आहे. शिवाय धान्य वगैरे विकण्याकरितां कायमचीं दुकानेंहि पुष्कळ असतात. लागवड झालेल्या जमिनीपलीकडे मोठमोठालीं कुरणें आहेत, त्यांत मेंढ्यांचे कळप चरत असतात. चीन

देशांत मोठालीं अरण्यें पुष्कळ, व त्यांत व्याघ्रादि हिंसक पशूहि फार आहेत. त्यांस मारण्याकरतां वसंतऋतूमध्यें बडे लोकसुद्धां शिकारीस जातात.

चीन देशांत शिकारीचें अथवा युद्धाचें मुख्य हत्यार म्हटलें ह्मणजे तिरकमटा. यामुळें तीर मारण्यांत तेथील लोक हुशार असतात. तरी त्यांच्या अंगीं युद्धकौशल्य किंवा शिपाईपणा हीं नाहींत. चिनी लोकांस विद्येची आभिरुचि फार आहे. ते शिपाईपणापेक्षां विद्येला विशेष मान देतात. त्यांच्या लोकांत, रणांत युद्ध करणाऱ्या वीरापेक्षां शेतांत काम करण्याची विशेष अब्रू आहे. तथापि लहानलहान लढाया नेहमीं चाललेल्या असतात. अगदीं शांतता अशी देशांत क्वचित् असते.

चिनी लोक मुलांच्या विद्याभ्यासाकडे फार लक्ष देतात. प्रत्येक तालुक्यांत एक सार्वजनिक शाळा असली पाहिजे असा त्यांचा कायदा आहे. आठ वर्षांपासून मुलांस विद्या शिकविण्यास तेथें लोक पाठवितात. तेथें लिहिणें, वाचणें, गणित इत्यादि विषय आणि आईबापाशीं, गुरूशीं, वडील माणसांशीं, आधिकारी लोकांशीं, बरोबरीच्यांशीं व लहानांशीं कसें वागावें, वगैरे गोष्टी शिकवितात. तसे जुन्या ग्रंथांतील उत्तम उत्तम नीतिपर कविता तेथें शिकवितात. नवीन शाळा स्थापन करण्याच्या वेळेस चिनी लोक मोठा थाट करतात. या समारंभाच्या वेळेस प्रांताचा सुभेदार मुलांला व्याख्यान देऊन गुरूची आज्ञा पालन करणें आणि विद्याभ्यास करणें, इत्यादि गोष्टींचें महत्व यांच्या मनांत पूर्णपणें ठसवून देतो. संपत्ति व प्रतिष्ठा मिळविण्यास चिनी लोकांत विद्येसारखें दुसरें कोणतेंहि साधन नाहीं. पंधरा वर्षांचें वय झाल्यावर बुद्धिमान् मुलें असतील त्यांस मोठ्या विद्यालयांत पाठवितात. तेथें तीं, कायदे, राज्यनीति इत्यादि विषयांचा अभ्यास करतात. या विद्यालयांतले गुरु मोठे विद्वान् असतात. ते राज्यप्रकरणीं सर्व माहिती विद्यार्थ्यांस करून देतात. या वि-

द्यालयांत हुषारी मिळविल्याशिवाय, सरकारी नौकरी कोणासहि मिळत नाहीं.

सर्व कलांपेक्षां लेखनकलेस चिनी लोक फार चहातात. ही कला त्यांच्या देशांत फार प्राचीनकाळापासून माहित आहे. चिनी लिपि फारच कठीण आहे, तरी, ज्यास लिहितां वाचतां येत नाहीं असा शेतकरीसुद्धां चीन देशांत क्वचित् आढळेल!

चीन देशांत बायकांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे रेशीम वळणें. राजघराण्यांतल्या स्त्रिया देखील हें काम करतात. पूर्वींपासून तेथें रेशीम फार उत्पन्न होतें. यामुळें शेतकरीसुद्धां रेशमी कपडे रोज वापरीत असत. राजघराण्यांतील पुरुष ज्याप्रमाणें शेतकीला उत्तेजन देत आले, त्याप्रमाणें राजस्त्रिया पूर्वींपासून रेशीमकामास उत्तेजन देतात. राजवाड्याजवळील आरामाच्या बगीच्यांत सुद्धां तुतीचीं झाडें लावून, राणी व इतर स्त्रिया रेशमाचे किडे बाळगितात. रेशीम तयार करण्याची युक्ति निघाल्यापासून प्रतिवर्षीं या गोष्टीचा उत्साह करतात. राजेसुद्धां रेशमाकडे फार लक्ष देतात. कित्येक राजांनीं असे कायदे केले होते कीं, अमुक जमीन ज्याची असेल त्यानें अमुक तुतीचीं झाडें लाविलींच पाहिजेत. श्रीमान् व गरीब सर्व लोक रेशमाचे कपडे पांघरतात; तरी त्यांमधें भेद फार असतो. श्रीमंतांच्या पोशाकावरून सोनेरी अथवा रुपेरी वेलबुट्टी काढलेली असते. कित्येक धंद्यांच्या मनुष्यांच्या पोशाकावरून वेगळालीं चिन्हें असतात. विद्वानांच्या पोशाकावरून एका पक्ष्याचें चित्र काढतात. लष्करी मनुष्याच्या पोशाकावर वाघ काढलेला असतो. वर सांगितलेल्या कितीएक चाली अगदीं बुडत चालल्या आहेत, तरी कित्येक अद्याप पूर्वींप्रमाणें चालू आहेत.

---

## कनफ्युशस.

कनफ्युशस हा चीन देशांत मोठा विख्यात तत्वज्ञानी आणि

कायदे करणारा होऊन गेला. हा राजघराण्यांतील पुरुष होता. चीन देशाच्या उत्तरेकडील लू या प्रांतांत याचा जन्म झाला. ज्या वेळेस ग्रीस देशाची राजधानी आथेन्स येथें प्रख्यात कायदे करणारा सोलन झाला त्याच वेळेस चीन देशांत कनफ्युशस झाला असावा असा विद्वान लोक तर्क करतात. कनफ्युशस बालपणा-पासून मोठा अभ्यासी असे. त्यानें विश्रांतीचा कालसुद्धां ग्रंथ वाचण्यांत घालवावा. यामुळें थोड्याच वयांत विद्वन्मालिकेंत त्याची गणना झाली. एकुणिसावे वर्षीं त्याचें लग्न झालें, व त्यास एक पुत्रहि झाला. तथापि संसारसुखांत विशेष न गढतां कायदे वगैरे ग्रंथ करण्याकडे त्यानें आपला सर्व वेळ लाविला. याची बुद्धिमत्ता व सद्गुण हीं पाहून राजानें याची जन्मभूमी लू प्रांत याच्या सुभेदारीवर यास नेमिलें. याप्रमाणें राजकीय कामांत शिरल्यामुळें लोकांच्या मनाची स्थिति, राज्याची व्यवस्था, इत्यादि गोष्टींची सुधारणा करण्यास काय केलें पाहिजे याचा बारकाईनें पुरता विचार करण्याची संधि त्यास सहज सांपडली.

एकंदर देशस्थिति मनांत आणून कनफ्युशस सुधारणा कर-ण्यास प्रवृत्त झाला. त्यानें धर्मसंबंधीं पुष्कळ व्याख्यानें दिलीं. सद्गुण व सद्वर्तन हे त्याच्या व्याख्यानांचे मुख्य विषय असत. हीं व्याख्यानें लोकांस इतकीं आवडलीं कीं, थोड्याच काळांत तीन हजार शिष्य त्याचे अनुयायी झाले, आणि त्यानें स्थापित के-लेल्या संप्रदायाप्रमाणें वागूं लागले. लू येथील राजानें याची कीर्ति ऐकून त्यास मुख्य प्रधान नेमिलें; त्यामुळें कनफ्युशस पु-ष्कळ दिवस राज्यकारभारांत गुंतला होता. असें सांगतात कीं, कनफ्युशस प्रधान होता त्या वेळेस कोणाचें सोनें रस्त्यांत पडलें असलें तरी त्यास मालकाशिवाय कोणी हात लावीत नसे. ही अतिशयोक्ति दिसते. कारण, हल्लीं हिंदुस्थानांतील लोक असें ह्मणतात कीं, इंग्रजांच्या राज्यांत काठीला सोनें बांधून जावें. मुसलमानांच्या राज्यांची तुलना करून पाहतां हें अलंकारिक

भाषण खरें आहे, त्याचप्रमाणें कनफ्युशस याच्या अमलाची गोष्ट समजावयाची. पूर्वीपेक्षां याच्या कारकीर्दींत चीन देशांत फार बंदोबस्त झाला असावा; हें या ह्मणण्यावरून निर्विवाद सिद्ध होतें.

कांहीं दिवसांनीं प्रधानकीच्या वस्त्रांचा त्याग करून, थोड्याशा प्रियमित्रांसहवर्तमान कनफ्युशस तत्वज्ञानाच्या अभ्यासाकडे लागला. त्यानें राजनीति आणि धर्मशास्त्र यांजवर उत्तम ग्रंथ लिहिले आहेत, त्यांवरून त्याचें नांव चीन देशांत अमर झालें आहे. कनफ्युशस याचीं वचनें चीन देशांत अद्याप पूर्णपणें मान्य आहेत. या वाचनांमध्यें उत्तम नीति सांगितली आहे. कनफ्युशस याचे अनुयायी, एक देव सर्व जगाचा उत्पादक आहे असें मानतात. चिनी लोक धर्मशास्त्राप्रमाणें कनफ्युशस याच्या ग्रंथांचा अभ्यास करतात. मनुष्यांनीं परस्परांशीं कसें वागावें, आईबाप, वडील, अधिकारी यांचा आज्ञाभंग करूं नये इत्यादि विषयांचें विवरण या ग्रंथांत केलें आहे. कनफ्युशस यानें राजधर्मांत असें सांगितलें आहे कीं, प्रजेनें राजाची आज्ञा पित्राज्ञेप्रमाणें पाळावी व तसेंच राजानें पोटच्या पोराप्रमाणें प्रजेवर प्रीति करावी. लोकांच्या घरगुती वागणुकीविषयीं सुद्धां कनफ्युशस यानें वचनें केलीं आहेत, त्यांत लहानानें वडिलांशीं, कनिष्ठानें श्रेष्ठांशीं, कसें वागावें, इत्यादि प्रकार बारकाईनें सांगितले आहेत.

कनफ्युशस याचे बहुतेक ग्रंथ नीतिशास्त्रावर आहेत, तरी त्यानें दोन इतिहासाचीं पुस्तकें लिहिलीं आहेत. एक आपल्या पूर्वींच्या इतिहासावर आणि दुसरें आपल्या वेळच्या इतिहासावर. पहिलें, देशांतील दंतकथा आणि दरबारी कागदपत्र यांच्या आधारानें लिहिलेलें आहे. शिवाय त्यानें जुन्या कवितांच्या संग्रहाचें एक पुस्तक केलें. त्यांत बहुतेक जुन्या कविता घेतल्या आहेत. हा ग्रंथ चीनदेशांतील सर्व विद्वान् लोक शिकतात.

त्याचप्रमाणें त्यानें एक जुन्या कायद्यांच्या संग्रहाचा ग्रंथ केला आहे. या ग्रंथाची चिनी लोकांत अद्याप फार मान्यता आहे.

कनफ्युशस त्र्यहात्तरावे वर्षी मरण पावला. त्यानें आपलें सर्व आयुष्य लोकहिताच्या उद्योगांत घालविलें. सुमारें चोवीसशें वर्षें होत आलीं तथापि अद्याप सर्व चीनदेशभर कनफ्युशस यास पूज्य मानितात. महमद इत्यादिकांप्रमाणें, मी अवतारी आहें, असें कनफ्युशस यानें कधींहि म्हटलें नाहीं, तरी तो मेल्यावर चिनी लोक त्यास देवाप्रमाणें मानूं लागले. कनफ्युशस याचीं पुष्कळ देवालयें चीनदेशांत आहेत. कनफ्युशस याचे वंशज पुष्कळ आहेत, त्या सर्वांस याच्या कुळांत उत्पन्न झाल्याबद्दल काहींएक प्रकारचे विशेष हक्क आहेत. कनफ्युशस याच्या वेळेस लौक्यून ह्मणून एक ढोंगी बावा झाला होता. त्यानें एक ढोंग-मत प्रवृत्त केलें त्यांत, किमया, जादु वगैरे पुष्कळ खोटे प्रकार होते. कित्येक राजांनीं या मतास आश्रय दिला. परंतु हल्लीं त्यास कोणी मानीत नाहीं.

---

## चीन देशांतील मोठी भिंत.

कनफ्युशस याच्या पाठीमागें दोनतीनशें वर्षेंपर्यंत चीन देशांत नेहमीं बंडाळी चालली होती. लहानसहान राजांच्या लढाया नेहमीं सुरू असत. त्या मोडण्यासारखें बादशाहांतहि सामर्थ्य नव्हतें. शेवटीं चिहोआंगटी ह्मणून एक राजा झाला. हा मोठा शूर होता. यानें सर्व मांडलिक राजांस जेर करून, आपल्या सत्तेंत ठेवण्याचा बेत केला, आणि त्याप्रमाणें सर्व राजांस जिंकून चीन नांवाचें प्रसिद्ध राजघराणें स्थापित केलें. यामुळेंच देशास चीन हें नांव प्राप्त झालें असें म्हणतात. सुमारें दोन हजार वर्षां-पूर्वी हा राजा होऊन गेला.

स्वदेशांत शांतता करून चिहोआंगटी यानें तार्तर लोकांचा पराभव करण्याचा निश्चय केला. चीन देशांत येऊन तार्तर

लोक नेहमीं बंडाळ्या करीत असत. या तार्तर लोकांनींच यूरोप खंडांत प्राचीनकाळच्या सर्व राष्ट्रांस बहुत उपद्रव दिला होता. यांस युरोपियन लोक हुन्स अथवा सिथिअन्स असें ह्मणत. हे लोक घरेंदारें करून रहात नसत. ते नेहमीं मध्यएशियांतील देशांत फिरून पारध व लूट यांवर आपला निर्वाह करीत. चिनी लोकांस यांपासून मोठें भय असे. या लोकांचा उपाय चालूं नये ह्मणून बादशहानें उत्तरेच्या बाजूस जाड, भरींव, फोडतां न येण्यासारखी, व उंच चढतां न येण्यासारखी अशी भिंत बांधण्याचा बेत केला. ही अवाढव्य भिंत तडीस नेण्यास पुष्कळ क्रूरत्वाचे व जुलमाचे उपाय योजावे लागले असतील यांत संशय नाहीं. कामास पुरे इतके मजूरदार मिळावे ह्मणून राजानें असा हुकूम केला होता कीं, देशांतील सर्व मजुरांपैकीं तृतीयांश मजूरांनीं या भिंतीच्या कारखान्यांत कामावर राहिलेंच पाहिजे. त्यांस जीव वांचण्यास अन्न मिळण्यापुरती मात्र मजूरी मिळेल. पूर्वबाजूस समुद्रापासून पश्चिमेस शेनशी प्रांताच्या शेवटापर्यंत भिंतीची लांबी एकंदर पंधराशें मैल आहे. ही भिंत मोठमोठाल्या उंच पर्वतांवरून, व खोल दऱ्यांतून नेलेली आहे; आणि कित्येक ठिकाणीं नद्या लागल्या तेथें कमानी काढून त्यांवरून भिंत नेली आहे. हिची रुंदी इतकी आहे कीं, साहा घोडेस्वारांस समोरासमोरून सहज धांवत जातां येईल. मधून मधून सारख्या अंतरावर मजबूत बुरुज बांधलेले आहेत त्यांत नेहमीं पाहरा असे. ही भिंत बाहेरच्या बाजूनें दगड व मजबूत पक्क्या विटा लावून अगदीं निर्भेद्य केली आहे. इतकें असून हें विलक्षण विस्तीर्ण काम पांच वर्षांत तयार झालें! मिसर देशांतील मनोरे वगैरे जगांत कांहीं अतर्क्य आश्चर्यकारक वस्तु आहेत; त्यापैकींच ही भिंत आहे.

## सुखाचें साधन.

सुस्वभाव हें सुखप्राप्तीचें मुख्य साधन होय. कोणी ह्मणेल कीं, स्वभाव चांगला असणें कोणाचे स्वाधीन नाहीं, तो जन्मतः असेल तसा असेल. कांहीं अंशीं हें बोलणें खरें आहे; तथापि अभ्यासानें स्वभाव चांगला करतां येतो. संसारांतील सर्व वस्तूंमध्यें चांगलेपणा व वाईटपणा दोन्हीहि आहेत. जो मनुष्य नेहमीं वाईटपणाकडे लक्ष देतो, त्याचा स्वभाव वाईट होतो. त्यामुळें त्यास सुख होत नाहीं. जो नेहमीं चांगुलपणाकडे मात्र लक्ष देतो त्याचा स्वभाव चांगला होऊन त्याचें मन सर्वदा संतुष्ट असतें. त्यामुळें त्याच्या जवळच्या सर्व मनुष्यांस सुख होतें.

एका शहरीं रामराव आणि कृष्णराव दोघे गृहस्थ राहत होते. उभयतांहि मोठ्या कुळांतले असून श्रीमान् व शिकलेले असे होते. प्रथमतः त्यांचा स्वभाव सारखाच होता. पण पुढें वेगळाल्या संवयी लागून दोघांचाहि स्वभाव एकमेकांच्या उलट झाला. कोणताहि पदार्थ पाहिला ह्मणजे त्याचे दुर्गुण तेवढे पाहावयाचे ही संवय रामरावास लागली. कोणी कांहीं बोलला आणि त्याचें भाषण कितीहि चांगलें असलें तरी त्यांतील चुका असतील तेवढ्या त्यानें काढाव्या. अशा स्वभावाविषयीं एके ठिकाणीं ह्मटलें आहेः—

अज्ञः प्रवदतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाशुभाः ॥
दोषवद्वाक्यमादत्ते पुरीषमिव सूकरः ॥ १ ॥

**अर्थ**—डुकर सर्व पदार्थ सोडून विष्टा ग्रहण करितो, त्याप्रमाणें बोलणाऱ्या पुरुषांचीं भाषणें ऐकून दोषयुक्त वाक्य असेल तेवढें मूर्ख घेतो.

कोणीं एकादें नवें पुस्तक केलेलें रामरावानें पाहिलें ह्मणजे त्यांतील उत्तम भाग असेल त्याविषयीं कांहीं न बोलतां वाईट असेल तेवढा मात्र तो फुगवून दाखवी. त्यानें एकादें चित्र पा-

हिलें ह्मणजे वाईट असेल तेवढें लागलेंच त्यानें अगोदर सांगावें. त्याच्या घरांत सर्व वस्तु होत्या तरी कोणीं, कसें काय आहे, असें विचारिलें ह्मणजे एकादी वस्तु नसेल तेवढी सांगून रडगाणें लावावयाचें. कोणाच्या घरीं जेवावयास गेला तरी एकादा पदार्थ नासलेला असेल तेवढ्याविषयीं त्यानें बोलावें. त्यापाशीं सहज कोणी गोष्टी सांगत बसलें तरी दिवसभर त्यानें संकटांच्या व धोक्यांच्या गोष्टी सांगाव्या. याप्रमाणें होतां होतां त्याचा स्वभाव अगदीं उलट झाला; त्याचें तोंड नेहमीं उदास दिसूं लागलें शेवटीं तो व त्याचें भाषण कोणास आवडेनासें झालें. यामुळें त्याचे इष्टमित्रहि कमी झाले.

कृष्णरावाचा स्वभाव अगदीं उलट होता. तो नेहमीं उल्हासयुक्त असे. त्यावर एक दें संकट आलें ह्मणजे यापेक्षां मोठें आलें नाहीं, असें मानून तो ईश्वराचे उपकार मानी. मंडळींत किंवा एकांतीं कोठेंहि तो असला, तरी त्याचें अंतःकरण स्वस्थ असे. कोणत्याहि वाईट मनुष्याविषयीं गोष्ट निघाली तरी त्याच्या अंगीं एकादा तरी लहानसहान गुण असेल त्याविषयीं त्यानें बोलावें. तो कोठें भिकार जागेंत बसलेला असला तरी त्यानें सृष्टीचा चमत्कार पाहून आनंदित व्हावें. कोणीं कांहीं बोलला तरी त्यांत गुण असेल तेवढ्याचें त्यानें ग्रहण करावें. अशा स्वभावाविषयीं एके ठिकाणीं म्हटलें आहे.

प्राज्ञः प्रवदतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाशुभाः ॥
गुणवद्वाक्यमादत्ते हंसः क्षीरमिवांभसः ॥ १ ॥

अर्थ—हंस, पाणी आणि दूध यांच्या मिश्रणापासून दूध मात्र घेतो. त्याप्रमाणें शहाणा मनुष्य लोकांच्या भाषणांतून गुणयुक्त वचन असेल तेवढें ग्रहण करतो.

कृष्णरावानें एकादें पुस्तक पाहिलें तर त्यांत चांगला भाग असेल तेवढ्याचें त्यानें वर्णन करावें. चित्र पाहिलें तरी त्यांत जेवढें खुबीदार असेल तेवढ्याचें वर्णन करावें. कोठें जेवावयास

गेला तरी जे चांगले पदार्थ झाले असतील त्यांची स्तुति करावी. अशा संवयीनें त्याचा उत्तम स्वभाव होऊन तो सर्वांस आवडूं लागला. त्यामुळें त्यास पुष्कळ मित्र झाले

---

## राजा आणि पंडित.

एका राजाचे घरीं एक मोठा पंडित होता. तो मोठा विद्वान् असल्यामुळें राजानें त्यास मोठें वेतन देऊन पदरीं आश्रित ठेविलें होतें. पंडित मोठा चतुर व वक्ता असल्यामुळें त्याच्या संभाषणापासून राजास आनंद होई. आपला यजमान संपूर्ण ऐश्वर्ययुक्त असून सर्वकाळ ऐहिक सुखांत घालवितो, परलोकसाधनाकडे अगदीं लक्ष देत नाहीं; हें पाहून त्या पंडितास फार वाईट वाटे. त्यानें राजास याविषयीं पुष्कळदां सांगितलें, परंतु पालथ्या घागरीवर पाणी. शेवटीं पंडितास असें वाटलें कीं, अशा विषयसुखनिमग्नाच्या पदरीं राहण्यापेक्षां घरीं रहावें हें बरें. असें मानून राजानें द्रव्य पूर्वीं दिलें होतें तेवढें घेऊन कांहीं कोस लांब खेडेगांवीं त्याचें घर होतें तेथें गेला. बरेच दिवस झाले तरी पंडितबावा परत येत नाहींत, असें पाहून राजानें त्यास बोलावणें पाठविलें. त्यावर आह्मांस तुमच्या आश्रयाची गरज नाहीं, असें त्यानें सांगितलें. तें ऐकून पुनः राजानें निरोप पाठविला कीं आश्रयाची गरज नसेल तर राहूं नका, परंतु एकवार भेटून जा. असा निरोप गेल्यावर पंडित आला. पंडित आल्यावर राजा त्यास म्हणाला, पंडितबावा, तुह्मी आमचे पिढीजात आश्रित. तुमचे वडील आमच्या वडीलापांशीं होते. आह्मीं गादीवर बसल्यापासून तुह्मांस मोठ्या इतमामानें पदरीं बाळगिलें आहे. आमच्या उजव्या हातास तुमचें पान, वस्त्रपात्र चाहिल तें. जी जी वस्तु तुह्मांस पाहिजे ती आह्मीं कधीं नाहीं ह्मटली असें आह्मांस स्मरत नाहीं. मोठ्या एकाद्या शास्त्रार्थाच्या प्रसंगाशिवाय आह्मी तुह्मांस कांहीं काम सांगत नाहीं. असें असून तुह्मी आमच्या आ-

श्रयाची गरज नाहीं, असें उत्तर सांगून पाठवितां हें मोठें आश्चर्य आहे. हें कृतघ्नपणाचें उत्तर आहे. हा कृतघ्नपणा तुमच्या विद्वत्तेस योग्य नाहीं, येवढें सांगण्याकरितांच बोलाविलें.

हें भाषण ऐकून पंडित ह्मणाला, म्यां विशेष काय केलें ? तुमच्याप्रमाणें माझी वागणूक आहे. तुमचें आचरण वाईट आहे असें जर तुह्मांस वाटत नाहीं, तर माझें तरी कां वाटावें ? सर्वशक्तिमान परमेश्वरानें दयेनें तुह्मांस इहलोकीं सुख दिलें आहे. शरीरसंपत्ती, ऐश्वर्य, विद्या, संतति, सत्ता वगैरे सर्व गोष्टी परमेश्वरानें तुह्मांस दिल्या, असें असून सर्व दिवसांत क्षणभर सुद्धां तुह्मी त्याचें स्मरण करीत नाहीं, ही तुमची मोठी कृतघ्नता नव्हे काय ? हें ऐकतांच राजाचें अंतःकरण विव्हळ होऊन डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. तेव्हांपासून तो परमेश्वराचें ध्यान, पूजन करूं लागला.

---

## मातापितरांविषयीं प्रीति.

गुरु शिष्यास ह्मणतो—मुला, परमेश्वरानें मनुष्यास बुद्धि देऊन ज्ञानप्राप्ति करून घेण्याचीं साधनें सृष्टीमध्यें ठेविलीं आहेत. पहा, ते झाडावरचे पक्षी कसे आपल्या पिलांचें रक्षण करतात ? पहा, ती मादी कशी अंड्यांस जपते ? पक्क होण्याकरितां ती त्यांस पंखाखालीं घेऊन उडविते. अंडीं फुटून लहान लहान पिलें झाल्यावर त्यांस चोंचीनें खाऊं घालते. यावरून ईश्वराचा उद्देश स्पष्ट दिसतो, तो असा कीं, आईबापांनीं मुलांचें रक्षण करावें, आणि मुलांनीं त्यांवर प्रीति करावी.

पितृभक्ति हें मोठें पुण्यसाधन आहे. मातापितरांनीं बाळपणापासून तुझें रक्षण केलें आहे, त्यांवर प्रीति कर. त्यांची आज्ञा मान. त्यांस योग्य मान दे. ह्मातारपणीं त्यांस जप. त्वां असें केलें, ह्मणजे तुझीं मुलेंही याप्रमाणें करतील.

---

## असत्य भाषण.

असत्य भाषण करण्यांत मनुष्याचा कांहीं तरी नफ्याचा उद्देश असतो. खरी स्थिति सांगितली असतां तत्काळ जें कांहीं नुकसान होईल, तें टाळावें म्हणून मनुष्य खोटें बोलतो. परंतु वास्तविक त्यापासून किती अहित आहे, हें त्यास समजत नाहीं. त्यामुळें शेवटीं त्याचें फार नुकसान होतें.

खोटें बोलणाराची लबाडी कधींना कधीं तरी बाहेर पडतेच. लबाडी बाहेर पडल्यावर त्याच्या खऱ्या बोलण्यावर सुद्धां कोणी भरंवसा ठेवीत नाहीं, ही मोठी हानि नव्हे काय ? एकदां खोटें बोलल्यावर ती लबाडी छपविण्याकरितां त्यास पुष्कळदां खोटें बोलावें लागतें. त्यामुळें त्याची लबाडी समजण्यांत येते. बहुशः अपराध छपविण्याकरितां मनुष्य खोटें बोलतो.परंतु त्यापासून त्याचा उद्देश सिद्धीस न जातां त्याच्या हातून खोटें बोलण्याचे मात्र अधिक अपराध होतात. केवळ ऐहिक दृष्ट्या पाहिलें तरी अपराध झाला असतां तो कबूल करणें यांत विशेष हित आहे.

खोटें बोलण्याचें मुख्य कारण भित्रपणा हें उघड आहे. खरी हकीकत सांगितली असतां किंचित् अहित होईल तें सोसण्याचें धैर्य अंगीं नसल्यामुळें मनुष्य खोटें बोलतो, हा त्याचा नीचपणा होय.

वाणीरूप जी ईश्वराची अमोलिक देणगी, जिच्या योगानें मनुष्यास मनुष्यपणा आला आहे, ती असत्य भाषणानें विटाळणें हें फारच मोठें पाप होय. घर, आळी, गांव, शहर, राष्ट्र या सर्व गोष्टींचा पाया सत्य आहे. एका मनुष्यानें सत्य सोडिलें, त्याचें पाहून दुसऱ्यानें सोडिलें, असें होऊन जगांत असत्य माजलें तर सर्व व्यवहार सुरळित चालावयाचे नाहींत यामुळेंच मनूनें सांगितलें आहे:—

वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिःसृताः ॥
तां तु यः स्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः ॥ १ ॥

अर्थ—सर्व व्यवहार वाणीपासून उत्पन्न झाले. ते वाणीच्या योगानें चालतात. अशा वाणीप्रत जो चोरतो, ( असत्य भाषण करतो ) तो सर्व वस्तु चोरणारा होय.

दुटप्पी बोलणें हें खोटें बोलण्यासारखेंच आहे. त्याचा मुख्य उद्देश दुसऱ्यास फसविणें हा होय. द्व्यर्थी शब्द बोलून मनांत एक अर्थ असून दुसऱ्यास भलताच समजविणें हें खोटें बोलण्यासारखेंच पाप आहे. कधीं कधीं केवळ मान हालविण्यानें अथवा नुसतें हूं ह्मटल्यानें सुद्धां खोटें बोलण्याचा परिणाम होतो.

अमुक गोष्ट अमुक प्रकारानें करीन असें एकाद्यास सांगून तें वचन मोडून त्याप्रमाणें न करणें यास विश्वासघात ह्मणतात. हाहि खोटें बोलण्याचा भेद आहे. याकरितां आपलें कसेंहि लहानमोठें वचन असलें तरी, तें नियमानें पाळावें. असें करील तोच प्रामाणिक मनुष्य होय.

---

## दुर्दैव.

जगाच्या स्थितीवरून असें दिसतें कीं आपणास वाटतील तशा गोष्टी घडून याव्या, असें करणें मनुष्याच्या स्वाधीन नाहीं. कधीं कधीं मोठमोठ्या साधूंवर देखील आनिवार्य संकटें येतात. याविषयीं बहुतांनीं बहुत प्रकारचे तर्क केले आहेत. कोणी ह्मणतात कीं, हें पूर्वजन्मार्जित पातकाचें फळ होय. जे पूर्वजन्म मानीत नाहींत, ते म्हणतात कीं हा मनुष्य स्वर्गसुखास पात्र झाला किंवा नाहीं याविषयीं त्याच्या अंतःकरणाची परीक्षा पाहण्याकरितां ईश्वर त्यावर अशीं संकटें आणितो. यांपैकीं काय खरें असेल तें असो, याविषयीं येथें विशेष लिहीत नाहीं. कारण, असे प्रसंग बहुशः फारच थोडे असतात. लक्षपूर्वक पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, आपल्या दुराचरणामुळेंच विपत्ति प्राप्त झालेल्या मनुष्यांचीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील. एकाद्या मनुष्यास दुखणें येऊन जरा प्रकृति बिघडली कीं, तो

लागलाच दैवास दोष लावूं लागतो, दुसऱ्याचा हेवा करतो, व देवाच्या घरीं न्याय नाहीं असेंहि ह्मणतो. अशा मनुष्यास प्रकृति बिघडण्याच्या कारणाविषयीं प्रश्न केला असतां हल्लींचें दुखणें येण्यासारखें माझ्या हातून आजपर्यंत कांहींएक वाईट कृत्य झालें नाहीं, हा केवळ ईश्वरी क्षोभ होय, असें त्याच्यानें प्रामाणिकपणानें छातीवर हात ठेऊन सांगवेल काय ? आरोग्यरक्षणास आवश्यक अशा आहारविहाराच्या नियमानें तो वागता, तर त्यावर असा प्रसंग आला असता काय ? यथेच्छ आहारविहार करून अशी स्थिती प्राप्त झाली तर, त्यानें दैवास कां दोष लावावा ? आणि ईश्वरास कां अन्यायी ह्मणावें ? रोग व विपत्ति हीं ज्यांस प्राप्त झालीं आहेत अशा मनुष्यांच्या स्थितीचा शोध केला असतां असें कळेल कीं, बहुतेकांस आळस, अधाशीपणा, दुर्व्यसन, वगैरे गोष्टींपासून अशी स्थिति प्राप्त झाली यांत संशय नाहीं. हजारों रोगी व दुःखी पाहिले असतां, केवळ नाशिबानें ज्यास अशी वाईट स्थिति प्राप्त झाली आहे, असे फारच थोडे सांपडतील. अल्पवयांतच कित्येकांचीं मुखें टवटवी जाऊन म्लान झालेलीं, कित्येकांस ऐन उमेदींतच क्षयाची भावना झालेली, असे लोक दृष्टीस पडतात. पण बहुशः हीं सर्व दुःखें त्यांनीं मूर्खपणानें व दुराचरणानें आपणाला प्राप्त करून घेतलेलीं असतात. असें असूनहि ते ईश्वरास दोष देतात.

कित्येक शरीरानें दृढ असतात. पण अठरा विस्वे दारिद्य त्यांच्या पाठीस लागलेलें असतें. नेहमीं ज्या त्या कामांत निराश होतात. बरकत येत नाहीं. अशा मनुष्यांनीं पूर्वींपासून आपल्या आचरणाचा विचार केल्याशिवाय एकाएकीं दैवास दोष देऊं नये. आळस, गर्व, राग, दुर्व्यसन यांच्या योगानें त्यांनीं आपला कल्याण करून घेण्याचा काल कधींच घालविला नसेल काय ? आपण मौजा मारून काळ घालवावा आणि लोक श्रमानें व सदाचरणानें वागून आपणांपेक्षां अधिक सुखी झाले ह्मणजे

नशिबास दोष लावावा हा केवढा मूर्खपणा आहे ? सर्वांशीं नसलें तरी बहुतांशीं आपलें कल्याण करून घेण्याचें मनुष्याच्या स्वाधीन आहे. एका कवीनें म्हटलें आहे:—

यात्यधोधो व्रजत्युच्चैर्नरः स्वैनैव कर्मणा ।
कूपस्य खनिता यद्वत्प्रासादस्येव कारकः ॥

**अर्थ**—मनुष्य आपल्या कर्मानेंच उच्च किंवा नीच स्थितीस जातो; जसें विहीर खणणारा खणीत खणीत खालीं खालीं जातो. आणि वाडा बांधणारा मजल्यावर मजला चढवीत वर वर जातो.

मनुष्याचा कांहींएक दोष असल्याशिवाय जगांतील सर्व वस्तु त्यास प्रतिकूल होतील असें कधीं व्हावयाचें नाहीं. ईश्वरभक्ति, सदाचरण, उद्योग, सत्स्वभाव, जितेंद्रियता, सदसद्विचार, प्रामाणिकपणा, हीं सुखप्राप्तीचीं निश्चित साधनें आहेत. जे मनुष्य विपत्तींत असतात त्यांच्या अंगीं वरील गुण नसतात, एवढेंच त्यांच्या दुःखाचें मूळ कारण होय. आपला अपराध दुसऱ्यावर घालावा हा मनुष्याचा स्वभावच आहे. याकरितां ज्या वेळेस दुसरा कोणी सांपडत नाहीं, त्या वेळेस दैवास दोष लावावयाचा. मनुष्य प्रथम सदसद्विचार सोडतो. सदसद्विचार सुटला ह्मणजे दुराचरण करतो. दुराचरण केलें ह्मणजे दुःख प्राप्त होतें. असें झालें ह्मणजे मग ईश्वरास दोष लावून आणखी पाप करतो. सुख प्राप्त झालें ह्मणजे तें मात्र आपल्या शाहाणपणानें असें समजावयाचें. दुःख होईल तेवढें मात्र ईश्वरानें दिलें असें ह्मणावयाचें. वास्तविक पाहतां उलट स्थिति आहे. सुख मात्र ईश्वराच्या कृपेनें प्राप्त होतें, आणि दुःख आपल्या दुराचरणानें होतें.

वर सांगितलेल्या गोष्टी केवळ व्यक्तीस लागू आहेत असें नाहीं; राष्ट्राचेंहि तसेंच आहे. हाडवैर पडून अनेक लढाया होऊन देशांचे देश धुळीस मिळतात. मोठमोठालीं सैन्यें परस्परांच्या अंगावर जाऊन रणभूमिवर रक्ताच्या नद्या उत्पन्न करतात! शिवशिव, काय अनर्थ हे !! हे अनर्थ ईश्वर आणितो, असें ह्म-

णतां येईल काय ? लाखों माणसें मारून रक्ताच्या नद्या वाहविण्यास ईश्वरानें एकाद्या शांत सुपीक देशावर सैन्य पाठविलें आहे काय ? मनुष्यांच्या दुर्गुणाशिवाय या अनर्थास दुसरें काय कारण आहे ? राजांची महत्वाकांक्षा, प्रधानांचीं भांडणें, धर्माचा खोटा अभिमान बाळगणाऱ्यांचा मतलबीपणा, वगैरे गोष्टींनीं जगांत किती अनर्थ झाले आहेत ? अशा गोष्टींस ईश्वरी क्षोभ ह्मणणें हें किती वेडेपणाचें काम आहे ? मनुष्यें सदाचरणानें वागतील तर हे अनर्थ जगांतून समूळ नाहींतसे होतील. याकारितां दुःख झालें असतां ईश्वरास दोष न देतां, त्यावर भरंवसा ठेवून सदाचरणानें वागावें, हाच सुखाचा उत्तम मार्ग होय.

---

## शांति.

'मूर्ति तितक्या प्रकृति' अशी एक ह्मण आहे, ती अक्षरशः खरी आहे. या अफाट जगांत एका स्वभावाचीं दोन मनुष्यें आजपर्यंत कोणास आढळलीं नाहींत. प्रत्येक माणसाचा स्वभाव वेगळा, त्याची रुचि वेगळी, अशा या विचित्र जगांत वागण्यास मनुष्याच्या अंगीं शांति अवश्य पाहिजे; नाहीं तर त्यास इतरांशीं वागतां यावयाचें नाहीं. राजापासून रंकापर्यंत कोणत्याहि लहानमोठ्या स्थितींत माणूस असला तरी त्यास आपल्या कुटुंबांतलि माणसांशीं व लोकांशीं वागलें पाहिजे; तेव्हां अर्थात् शेंकडों वेळां आपल्या मनासारखें न होऊन रागाचे प्रसंग येणार. पदरच्या माणसांनीं मूर्खपणा केला, मित्रानें स्नेह सोडला, चाकरांनीं आज्ञाभंग केला, लोकांनीं अपमान केला, वरिष्ठांनीं छळ केला, दुष्टांनीं निंदा केली, वगैरे शेंकडों प्रसंग सर्वांस आहेत. यांपैकीं एकहि प्रसंग आला नाहीं, असा एकहि दिवस तापट मनुष्याच्या आयुष्यांत सांपडणें कठीण. तापट मनुष्याचें अंतःकरण नेहमीं क्षुब्ध असतें. मन शांत ठेविल्यानें काय सुख होतें, याचा त्यास मुळींच अनुभव नाहीं. चाकरमाणसें, शेजारीपाजारी, बायकामुलें, वगैरे ज्यांपासून

आनंद व्हावयाचा, तींच त्याचें अंतःकरण क्षुब्ध करण्यास कारण होतात. आरोग्य, संपत्ती, ह्या ज्या ईश्वराच्या अमोलिक देणग्या त्यांपासून सुद्धां त्यास सुख नाहीं. एवढेंसें कांहीं बिनसलें कीं, झाला अंगाचा तिळपापड, अशी स्थिति झाली ह्मणजे दिवसभर मग कोणत्याहि गोष्टीपासून त्याचें मन आनंदित होत नाहीं. कित्येक वेळां रागाचीं कारणें फार क्षुल्लक असतात, परंतु याच्या रागीट स्वभावामुळें तीं त्यास मोठीं दिसतात. त्यामुळें हा आपल्या सुखास मुकतो. थोडी शांति धरील तर त्यास किती सुख होईल? तो आपण होऊन आपलें मन यःकश्चित् हलक्या माणसांच्या स्वाधीन करतो. एकाद्या रागीट मनुष्यास इतकें वारंवार काय रागावतां; असें विचारिलें तर तो ह्मणतो, काय; मी दगड आहें काय? मनुष्याच्यानें असा अपमान, असा दांडगेपणा, कसा सोसवेल? गोष्ट खरी. पण इतका ज्याचा स्वभाव तापट असेल, त्यानें लोकांस एकदम सोडून रानांत जाऊन राहावें हें बरें. लोकांशीं वागतां येत नाहीं तर मुळींच संबंध ठेवूं नये हें चांगलें. लोकांत राहिलें कीं, भांड्याला भांडें लागावयाचेंच. आकाश स्वच्छ असलें तरी एकाद्या वेळेस ढग येऊन वादळ व्हावयाचेंच. त्याप्रमाणे जगांत चांगले मनुष्य पुष्कळ असले, तरी दांडगे, लोभी, अविचारी, कृतघ्न, मतलबी, असे लोक सर्व ठिकाणीं आहेत. ते या संसारवृक्षाचे कांटेच समजावयाचे. शांति धरून संसारांत अवश्य प्राप्त होणाऱ्या अडचणी सोसून जो पार पडून जाईल, तोच मनुष्य ह्या उत्तम शब्दाचा वाच्य होय.

ज्या क्षुल्लक कारणापासून रागावून आपण संतापतों त्याचा शांत मन करून विचार केला असतां, असें कळेल कीं, त्यांत कांहींच अर्थ नाहीं. आपल्या वेडेपणानें त्यापासून आपली हानि झाली. कांहीं वेळ शांति धरिली तर ज्याच्या मूर्खपणानें आपणास राग यावयाचा, त्याचें मन त्यास खाऊं लागतें. असें

आहे तर मग लागलेंच आपण रागावणें हें वाईट नव्हे काय ! लोक मूर्खपणानें वागले, म्हणून त्यापासून आपल्या मनाची स्वस्थता मोडणें हें त्यांच्या अपराधाबद्दल आपण शिक्षा भोगणें आहे. यासाठीं लोकांत राहून ज्यांस सुखानें काळ घालविणें असेल त्यांनीं शांति धरण्याची संवय केली तितकी थोडीच. जेथें शांति नाहीं, तेथें दुःखाचा प्रवेश लवकर होतो. जेथें शांति आहे, तेथें सुखाचा वास सतत असतो.

---

## क्षमा.

क्षमा शस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति ।
अतृणे पतितो वन्हिः स्वयमेव प्रशाम्यति ॥ १ ॥

अर्थ—क्षमाशस्त्र ज्याच्या हातांत आहे, त्याचें दुर्जन काय करील ? गवत नाहीं अशा जागीं पडलेला अग्नि आपल्या आपण विझतो.

क्षमा हा गुण मनुष्यांच्या अंगीं अवश्य पाहिजे, ज्यानें जन्मांत कोणाचा अपराध केला नाहीं, त्यानें दुसऱ्याचे अपराध सोसले नाहींत तर चालेल; परंतु असा मनुष्य कोण आहे ! मुद्दाम किंवा न कळून ज्याच्या हातून जन्मांत दुसऱ्याचें कांहीं वाईट झालें नाहीं, असा मनुष्य बहुशः सांपडणें कठीण. अशी स्थिति आहे तर क्षमा धारण करणें हें मनुष्याचें कर्तव्य होय. मनुष्याचे अंगीं क्षमा नसेल, तर संसारांत किंबहुना जगांत फारच अनर्थ होतील. दुसऱ्यानें केलेल्या अपराधांबद्दल त्याची खोड मोडावयाची, असें मनांत आणिलें तर जगांत दुःख फार वाढेल. एकानें अपराध करावा, दुसऱ्यानें त्याबद्दल त्याचा सूड उगवावा, पुनः पहिल्यानें आपले स्नेही मदतीस आणून त्यांस आणखी पीडा करावी. असें होतां होतां मोठाल्या लढायापर्यंत येऊन रक्ताचे पूर वाहण्याचे प्रसंग येतील. मनुष्याच्या सर्व मनोविकारांमध्यें सूड उगविण्याची इच्छा ही फारच घातुक होय.

हिच्या योगानें शत्रूची हानि होतेच असा कांहीं नियम नाहीं, परंतु इच्छा करणाऱ्याचा मात्र तोटा आहे. या इच्छेमुळें त्यास दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीपासून सुख होत नाहीं. दुसऱ्याच्या पीडेनें जी मनुष्यांची हानि होते, तिजपेक्षां तीबद्दल सूड उगविण्याच्या इच्छेनें अधिक होते. शत्रूच्या पीडेनें जो मनांत संताप उत्पन्न होतो, त्यापेक्षां सूड उगविण्याच्या इच्छेनें अधिक मनः–क्षोभ होतो. क्षमा हें साधुत्वाचें मुख्य लक्षण होय. आजपर्यंत जगांत जे साधु होऊन गेले, त्यांच्या अंगीं क्षमा असल्यामुळेंच त्यांचें साधुत्व प्रसिद्धीस आलें. ज्या मानानें मनुष्याच्या अंगीं क्षमा अधिक त्या मानानें तो अधिक श्रेष्ठ; व जितकी अंगीं क्षमा कमी, तितका मनुष्य अधिक नीच. असें सर्व देशांतील लोक समजतात. क्षमेच्या योगानें शत्रु देखील मित्र होतात. मातापितरें, गुरु, राजा, इत्यादिकांच्या अंगीं क्षमा नसेल, तर त्यांच्या हातून आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें जाणार नाहीं. किंबहुना, ज्याच्या अंगीं क्षमा नाहीं, त्यास सदाचारानें वागून स्वर्गप्राप्तीची योग्यता आपल्या अंगीं आणणें ही गोष्ट अशक्य होय.

---

## सद्गुण.

सद्गुणांच्या योगानें मनुष्य लोकांत पूज्य व प्रिय होऊन स्वर्गास जाण्यास योग्य होतो. याकरितां सद्गुण ह्मणजे काय हें सर्वांनीं पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे. सद्गुणांचें सामान्य लक्षण ह्मणजे परहित व सत्य भाषण करणें हें होय. सद्गुणांपासून स्वतःचें व जगांतील सर्व मनुष्यांचें हित होतें. सद्गुणी मनुष्य दुसऱ्याचें दुःख पाहून दुःखी होतो आणि तें निवारण करण्यास झटतो. तो स्वतः न्यायानें वागून इतरांस सदाचरणाचें वळण लावितो. त्यापासून इतरांचें बहुत हित होतें, सद्गुणी मनुष्याचें मन सर्वदा सुखी व शांत असतें. सुख व शांति हीं दुसऱ्या कोणत्याहि वस्तूनें प्राप्त

व्हावयाचीं नाहींत. सद्गुणापासून होणारें सुख आपल्या स्वाधीन आहे. संसारांतील इतर सुखें परतंत्र आहेत. ऐश्वर्य, सत्ता, मोठेपणा, ह्या गोष्टींचें अन्यायानें सुद्धां लोक हरण करूं शकतील. परंतु सद्गुणांपासून होणाऱ्या सुखाचें कोणासहि हरण करितां येणार नाहीं. याकरितां सर्वांनीं आपल्या अंगीं सद्गुण वाढविण्यास झटावें हें योग्य होय. सद्गुणी मनुष्यास दारिद्र्य आलें तरी त्याचें अंतःकरण स्वस्थ असतें. आपल्या हातानें कांहीं वाईट कृत्य घडलें नाहीं, हें मनांत येऊनच त्याच्या दुःखाचा उपशम होतो. त्याचें मन त्यास खात नाहीं, त्यामुळें तो सर्वदा आनंदी असतो.

---

## सभ्यपणा.

सभ्यपणा मनुष्यांच्या अंगीं अवश्य पाहिजे. ऐश्वर्य, विद्या हीं मिळविण्याचें मनुष्यांच्या हातीं नाहीं; तथापि सभ्यपणानें वागणें हें सर्वांच्या स्वाधीन आहे. सभ्यपणाचे योगानें लहान मोठ्या सर्वांस मनुष्य आवडतो. दांडगेपणानें मनुष्याचें कांहीं हित होत नाहीं. कित्येक मतलबी लोक सर्वांपासून सभ्य ह्मणून घेण्याकरितां, कोणीं कांहीं ह्मटलें तरी मान डोलवितात. वास्तविक पाहतां हा खरा सभ्यपणा नव्हे; हा मोठाच दुर्गुण आहे. यापासून एकंदर लोकांची मोठी हानि आहे. द्रव्यादि बाह्य गुणांच्या योगानें ज्यांस अडाणी लोक श्रेष्ठ मानितात, अशा लोकांनीं असा गोड स्वभाव धरिला ह्मणजे खऱ्याखोट्याची निवड नाहींशी होते. असें झाल्यानें पुष्कळ मनुष्यांच्या हातून कुकर्म घडतें. जग गुणदोषमिश्रित आहे; तर सर्व गोष्टींसच चांगलें ह्मणणें हें मोठें पाप आहे. नीतिप्रवर्तकांनीं क्षुद्र मनुष्यांचें भय न धरितां, योग्यास योग्य आणि वाईटास वाईट ह्मटलें पाहिजे. नाहीं तर नीतीचें शुद्ध स्वरूप राहणार नाहीं. आपणास भला ह्मणून घेण्याकरितां, तोंडपुजेपणा करणें हा खरा सभ्यपणा नव्हे, तर जो सत्याचा अपलाप करीत नाहीं, कोणास न भितां जें योग्य असेल तेंच

करतो, तोच खरा सभ्य होय. सद्गुण आणि सभ्यपणा यांचा विरुद्धपणा नाहीं. किंबहुना ते एकच आहेत, असें ह्मटलें तरी चालेल. दुसऱ्याच्या शरीरास किंवा मनास पीडा न देणें हें सद्गुणाचें व सभ्यपणाचें आचरण आहे. दुसऱ्यास संकटांत पाहून त्यावर दया करणें, कोणीं अपराध केला असतां क्षमा करणें, लीनता, शांति, हे गुण सभ्यपणा मिळविण्यास अवश्य पाहिजेत. केवळ वस्त्रपात्राची ठाकठिकी, बोलण्याचालण्यांत बेतबात, एवढ्यानेंच सभ्यपणा येतो असें नाहीं. कित्येक वेळां तर लबाड मनुष्य लोकांस फसविण्याकरितां ह्या बाह्य गुणांचें मुद्दाम धारण करतात, तथापि त्यांचा खरा स्वभाव उघाडीस येतोच. हे गुण अंतःकरणापासून स्वभावतःच उत्पन्न झाले असतील तर फार शोभतात. कित्येकांच्या अंगीं सभ्यपणा नसून ढोंगानें ते तो धारण करितात, व त्यावरून त्यांस थोडा तरी मान मिळतो. ह्यावरून जगांत सभ्यपणा सर्वांस प्रिय आहे, असें सिद्ध होतें.

खरा सभ्यपणा अंगीं येण्यास चांगला स्वभाव व विद्या हीं दोन कारणें आहेत. शक्तीप्रमाणें दुसऱ्यांवर दया करणें, दुसऱ्यांस पिडा न करणें, नम्रपणानें बोलणें, परोपकाराविषयीं तत्पर असणें, मित्रांशीं सलगीनें वागणें, दुष्टांची संगति टाकणें, सुजनांशीं भलेपणानें वागणें, ताब्यांतील माणसांस ममतेनें वागविणें, शिक्षेचा प्रसंग आल्यास ती बेतानें करणें, उपकार केला तरी डौल न मिरविणें, आपण ह्मणतों तेंच खरें असा हट्ट न धरणें, मतभेद पडला तरी शांतपणानें वाद करणें, क्षुल्लक कामाकरितां हट्ट न धरणें, दुसऱ्यांस मोडून काढणें किंवा दोष देणें यांविषयीं उत्सुक नसणें, भांडण मिटवून समेट करण्यास झटणें, विनाकारण दुसऱ्याच्या कारभारांत हात न घालणें, दुसऱ्यांचीं गुह्यें जाणण्यास उत्सुक नसणें, यथाशक्ति दुसऱ्यांच्या दुःखांचा उपशम करणें, विनाकारण लोकांवर भार न घालणें, विद्याधनाचा गर्व न वाहणें, व सर्वांशीं मिळून मिसळून राहणें, हीं खऱ्या सभ्यपणाचीं लक्षणें होत.

# भाषण आणि लेखन.

सर्व प्राण्यांमध्यें मनुष्य ज्या गुणांनीं श्रेष्ठ झाला आहे, त्या सर्वांमध्यें भाषणशक्ति हा मुख्य गुण होय. मनुष्यास ज्ञान अवश्य पाहिजे हें खरें, परंतु तेंच ज्ञान भाषणाशिवाय प्राप्त होत नाहीं, व प्राप्त होऊन भाषणशक्ति गेली तरी त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. रानटी व सुधारलेले या सर्व देशांतील माणसांस बोलतां येतें; पण उभयतांच्या भाषणांत फार भेद असतो. तसेंच सुधारलेल्या देशांतसुद्धां उत्तम बोलणारे असे फारच थोडे असतात. लिहिणें हा एक बोलण्याचाच प्रकार आहे. बोलण्यांत आपण ऐकणारांस साक्षात् आपला भाव कळवितों; लिहिण्यानें त्यांस परंपरेनें कळवितों. ज्याच्या योगानें वक्त्याच्या किंवा लिहिणाऱ्याच्या मनांतील भाव पूर्णपणें श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या मनांत उतरतो, तें बोलणें किंवा लिहिणें उत्तम होय.

बोलणें किंवा लिहिणें चांगलें येण्यास पुष्कळ गोष्टी अवश्य आहेत. त्यांपैकीं कित्येक ईश्वरदत्त असतात; त्या अंगीं नसल्यास प्राप्त व्हावयाच्या नाहींत. कित्येक श्रमसाध्य असतात. बोलणें किंवा लिहिणें चांगलें येण्यास प्रथमतः भाषा शुद्ध आली पाहिजे. भाषा येण्यास तिच्या व्याकरणाची चांगली माहिती पाहिजे. केवळ भाषा शुद्ध येणें एवढेंच पुरे नाहीं, ती लिहितांना किंवा बोलतांना समयोचित शब्द योजिले पाहिजेत. प्रसंगास अनुकूल असे शब्दार्थालंकार केले पाहिजेत. विद्वान् , प्रतिष्ठित, सभ्य ज्या पद्धतीवर बोलत असतील त्या पद्धतीचें भाषण असलें पाहिजे. वाक्यरचना चांगली पाहिजे. कित्येक गुण बोलणाराच्या अंगीं असावे लागतात ते लिहिणाऱ्याच्या अंगीं नसले तरी चालतात. जो श्रोत्यांचे नेत्र व कर्ण हीं इंद्रियें आपणाकडे वळवून घेईल तो उत्तम वक्ता खरा. श्रोत्यांचे नेत्र ओढून घेण्यास रसास अनुकूल असे अंगविक्षेप वक्त्यास करितां आले पाहिजेत. कान ओढून घेण्यास त्याचा स्वर मधुर असला पाहिजे. हे

दोन्ही गुण कांहीं अंशीं स्वाभाविक आहेत; व कांहीं अंशीं श्रमसाध्य आहेत. हे गुण लिहिणाऱ्याच्या अंगीं असण्याची गरज नसते. तथापि कित्येक गोष्टींविषयीं लिहिणारास जपलें पाहिजे, त्या गोष्टींत वक्त्यास लक्ष पुरवावें लागत नाहीं, लेखकाचा मजकूर पुष्कळ वेळ लोकांपुढें असतो; याकरितां उपक्रम, उपसंहार, पूर्वापरसंबंध इत्यादि गोष्टींकडे लेखकाचें विशेष लक्ष असलें पाहिजे. उत्तम वक्ता आपल्या चातुर्यानें श्रोत्यांच्या मनांवर भूल उत्पन्न करून त्यांस आपणाकडे वळवितो, तसें ग्रंथकाराचें होत नाहीं. वाचकांच्या मनांत जितक्या शंका येण्याचा संभव आहे त्या सर्वांचें निवारण लेखांत झालें पाहिजे. असें असेल तरच ग्रंथकाराचा भाव बरोबर लोकांस कळेल.

---

## मर्यादा.

मर्यादा पाळावी निजशिव गुरुचोचि पाय रीतीतें ।
सोडूं नये कवि ह्मणती साधुपदाचीच पायरी तीतें ॥१॥

मोरोपंत.

ज्या प्रसंगास व ज्या स्थळीं योग्य जें आचरण तें त्या प्रसंगास व त्या स्थळीं करणें यास मर्यादा ह्मणतात. प्रसंगास व स्थळास अयोग्य जें वर्तन त्यास अमर्यादा म्हणतात. मर्यादा हा गुण सर्व मनुष्यांचे अंगीं अवश्य पाहिजे. मर्यादा हा मनुष्याच्या चांगुलपणाचा पाया आहे. मर्यादा लहानपणापासून आईबाप व इतर घरातील माणसें यांनीं मुलांस शिकविली पाहिजे. मुलें, स्त्रिया, पुरुष, या सर्वांच्या अंगीं मर्यादा असणें अवश्य आहे. मनुष्य एकदा अमर्याद वागूं लागला ह्मणजे किती वाईट होईल याचा नियम नाहीं. सर्वांस त्याचा कंटाळा येऊं लागतो. त्यामुळें त्याचे दुर्गुण त्याच्या कानीं जात नाहींत. असें होऊन आपण करतों हें चांगलेंच, असें त्यास वाटून तो अधिकच फुशारतो. त्याच्या मूर्खपणास लोक हंसले तरी त्यास वाटतें कीं, माझी वागणूक पाहून

यांस आनंद होत आहे. कित्येक गोष्टी आपल्या संवयीच्या मंडळीमध्यें बसलें असतां बोलण्यास किंवा करण्यास हरकत नसते; त्या गोष्टी आपल्यापेक्षां वडील किंवा लहान यांच्या समक्ष करणें योग्य नसतें. वडिलांचा त्यापासून अपमान होतो, व लहानांच्या मनावर त्यांचा भलताच परिणाम होतो.

मर्यादा लहानांच्या किंवा गरिबांच्या अथवा स्त्रियांच्या अंगीं मात्र पाहिजे असें नाहीं. ती तरुण, म्हातारे, श्रीमंत या सर्वांच्या अंगीं पाहिजे. लहानपणापासून मुलास मर्यादेचा आळा नसला तर तो बिघडतो. तरुणपणीं किंवा वृद्धपणीं अंगीं मर्यादा नसल्यास प्रतिष्ठा राहत नाहीं, इतकेंच नव्हे, पण त्याचें वाईट वळण लहान मुलांस लागून तीं बिघडतात. श्रीमंतांच्या अंगीं मर्यादा नसेल तर त्यांचा रहावा तसा बोज व वजन राहणार नाहीं. गरीबांचें आचरण अमर्याद असेल तर त्यांस आश्रय द्यावा असें कोणास वाटणार नाहीं. स्त्री अमर्याद असली तर संसारांत कोणास सुख व्हावयाचें नाहीं. विद्यार्थी दांडगा असेल तर त्याचा अभ्यास चांगला होणार नाहीं. मुलें, विद्यार्थी, चाकर, स्त्रिया, यांनीं आपणाशीं मर्यादेनें वागावें अशी इच्छा असेल तर आईबाप, गुरु, धनी, पति, यांनीं आपण नीट वागून समर्याद आचरण करण्याचा त्यांस कित्ता घालून दिला पाहिजे. भिन्न देशांतले, भिन्न चालीचे, भिन्न धर्माचे लोक, एकमेकांत मिसळले म्हणजे मर्यादा आणि अमर्यादा यांची कित्येक गोष्टींत व्युत्क्रमस्थिति होऊं लागते. म्हणजे एका देशांतील लोकांच्या मतानें मर्यादा तीच दुसऱ्यांच्या मतानें अमर्यादा असें होतें. उदाहरण, नवरा आला असतां बायकोनें उठून उभें राहणें, आईबापांदेखत स्त्रीपुरुषांनीं परस्पर भाषण न करणें, ह्या दोन्ही गोष्टी आपण मोठ्या मर्यादेच्या समजतों, परंतु युरोपांतील लोक याला मर्यादेचें लक्षण न समजतां स्त्रियांस हिंदुलोक पशूप्रमाणें वागवितात याचें उदाहरण आहे असें म्हणतात. अशा ठिकाणीं दोघांनींही दुराग्रह सोडून योग्य रीतीनें वागणें हेंच योग्य

आहे. वास्तविक ज्या वाईट गोष्टी आहेत, त्यांचा वाईटपणा दुसऱ्यांकडून कळला तर तो टाकूं नये असें नाहीं. तसेंच ज्या गोष्टींत कांहीं वाईट नाहीं, केवळ मतभेद मात्र आहे, त्या गोष्टी विनाकारण दुसऱ्या लोकांच्या नादीं लागून टाकण्याची आवश्यकता नाहीं. त्या धरून चाललें तरी परकीय लोकांची अमर्यादा केली असें होत नाहीं. मर्यादा हा कुलीनपणाचा पाया होय. किंवा त्याचा अपरपर्याय आहे असें म्हटलें तरी चालेल.

---

## कालव्यय.

इहलोकीं सुखानें राहून मरणोत्तर स्वर्गास जावें अशी आपल्या अंगीं ज्यास योग्यता आणणें असेल, त्यानें व्यर्थ कालक्षेप न करण्याविषयीं फार जपलें पाहिजे. कालक्षेपासारखी दुसरी कोणतीच हानि नाहीं. काल हें सुख आणि परलोक मिळविण्याचें भांडवल होय. त्याचा जो दुर्व्यय करील त्याचें दिवाळें वाजल्याशिवाय राहणार नाहीं. जन्मास येऊन मनुष्यास इहलोक आणि परलोक दोन्ही साधावयाचे आहेत; याकरितां दोहोंच्याहि प्राप्तीकडे कालाचा व्यय केला पाहिजे. सर्वकाल संसाराच्या काळजींत घालवून परलोकास विसरतां कामा नये. संसारसुख भोगून शेवटीं परलोकसाधन करूं असें ह्मणून असंख्य लोक फसले आहेत. सुखाच्या ऐन भरांत असतांच कित्येकांस मृत्यूनें गांठिलें. कित्येक ह्मातारे झाले, परंतु ह्मातारपणीं इंद्रियें विगलित होऊन सुखोपभोगासहि असमर्थ झाले. अशांच्या हातून परलोकसाधन कोठून होणार? बालपणीं क्रीडा, तारुण्यांत विषयसुख, वार्धक्यांत अशक्तता, असें होऊन असंख्यात लोकांनीं मनुष्यजन्मासारखी देणगी व्यर्थ घालविली. ह्मातारपणीं कफवातपित्तांनीं मस्तक फिरून अगास कळा लागल्यावर ईश्वराकडे चित्त कोठून लागणार? व हातानें सत्कर्म कसें होणार? कोणतेंही सत्कृत्य करण्याचा प्रसंग आला असतां तो दवडूं नये. उद्यां,

हें फार वाईट आहे. यानें पुष्कळांस बुडावलें आहे. आज एक कृत्य करावयाचें आहे तें उद्यांवर टाकिलें तर आजचें एक व उद्यांचें दुसरें अशीं दोन उद्यां कशीं होतील? जो योग्य काळीं आपलें कर्तव्य करील तो या संसारसागरांतील तुफानांत कधीं सांपडणार नाहीं. कालव्यवस्था ही एक संसारमहानदी तरून जाण्याची नौका आहे. ज्याची कालव्यवस्था नीट नाहीं, त्याची फुटकी नाव. त्यावर केव्हां घाला येईल याचा नियम नाहीं.

मनुष्याच्या हातून व्यर्थ कालक्षेप होऊं नये यासाठीं लहानपणापासून त्याच्या मनांत कालाची किंमत ठसविली पाहिजे. काल किती त्वरित जातो, हें त्यास समजलें पाहिजे. बहुतकरून पुष्कळ लोकांस काळाची योग्यता बरोबर समजत नाहीं. प्रत्येक मनुष्यास आपणास आयुष्य पुष्कळ असावेंसें वाटतें. असें असून तें आयुष्य मनुष्यें व्यर्थ घालवितात हें केवढें आश्चर्य आहे? आयुष्य क्षणभगुर आहे. असें बहुतकरून सर्व लोक समजतात. असें असून तेच त्याचा असद्व्यय करतात, हें केवढें नवल आहे? पुष्कळ क्षुद्र वस्तूंचा माणसास लोभ असतो, परंतु ते काळासारख्या अमोलिक वस्तूचा हवा तसा उधळेपणानें खर्च करतात, हा मनुष्याच्या अंगीं मोठाच असंबद्धपणा आहे. तीन दिवसांचा उपाशी, पोट खपाटीस गेलेला भिकारी दृष्टीस पडला तरी, रुपयांच्या खुर्द्यातून एक पैसा त्यास देण्यास ज्यांच्या जिवावर येतें, असे मनुष्य शुष्क गप्पा मारून वर्षांचीं वर्षें फुकट दवडितात. जो वेळ व्यर्थ जाऊं न देण्यास जपत नाहीं, त्याचा संसार व्यवस्थित राहणार नाहीं, आळसानें तो आपणास अनेक शत्रु उत्पन्न करतो. सध्या हयगय करून तो पुढील पश्चात्तापाचें बीजारोपण करतो.

बाळपणीं आळस करून विद्याभ्यासादिक आवश्यक कर्तव्यें केलीं नाहींत ह्मणजे तारुण्यांत फटफजिती होऊन अनेक दुःखें प्राप्त होतात. ज्यानें तारुण्यांत नीतीनें वागून परोपकारादि स-

त्कर्मे केलीं नाहींत, त्यास वृद्धपणा आल्यावर यमयातना मनांत येऊन त्याचें अंतःकरण फार अस्वस्थ होतें. अंतकाळ संनिध येऊन आपणाजवळ पुण्यसंचय मुळींच नाहीं, हें मनांत येऊन त्यास फार दुःख होतें, हे सर्व व्यर्थ कालक्षेपाचे परिणाम होत. एक काळाची व्यवस्था नसल्यामुळें सर्व गोष्टींची अव्यवस्था होते. योग्य काळीं न केल्यामुळ कोणतीच गोष्ट धड होत नाहीं. जो व्यर्थ कालक्षेप करीत नाहीं, तो सर्व संकटांतून मुक्त होतो. कालरूप भांडवलाच्या व्यवस्थेपासून त्यास पुष्कळ नफा होतो. थोड्या आयुष्यांत तो पुष्कळ दिवस वांचण्याचा उपयोग करून घेतो. तो स्वतः इहपरलोक साधून इतरांचेंहि कल्याण करतो. भूतकाळ चांगला घालविल्यानें वर्तमानकाळीं आनंदित असून भविष्यत्काळाविषयीं निःकाळजी असतो. काळ इतका त्वरित आहे, तरी तो त्यास आपल्या स्वाधीन ठेवितो. कांहीं तरी तिचें स्मारक कृत्य केल्याशिवाय तो एका घडीसहि जाऊं देत नाहीं.

---

## संतोष.

संतोषमूलं हि सुखं दुःखमूलं विपर्ययः ॥—मनु.

संतोष हा एका प्रकारचा कल्पवृक्ष होय. कल्पवृक्षाप्रमाणें हा पाहिजे ती वस्तू देत नाहीं; तथापि इष्ट वस्तू प्राप्त झाली असतां जसें समाधान होतें, तसें याच्या योगानें मन निरिच्छ असल्यामुळें मनुष्यास प्राप्त होतें. संतोषानें इच्छिलेलें कार्य सिद्धीस जातेंच असा नियम नाहीं; तथापि कार्यहानि झाली असतां असंतोषी मनुष्यास जसें दुःख होतें, तसें संतुष्टास होत नाहीं. संतोषाच्या योगानें मन स्वस्थ असतें. संतोषी मनुष्य मनांत कुरकुर करून उगाच ईश्वरास दोष देत नाहीं. मला कोणत्या स्थितींत ठेवावें हें मजपेक्षां ईश्वरास अधिक समजतें, असें मानून तो सुखी असतो. संतोषी मनुष्य भलतीच महत्त्वाकांक्षा धरीत नाहीं. त्यास सदाचरणाचा मार्ग सोडण्याचा प्रसंग कधीं येत नाहीं.

संतोष हें सद्गुण संपादण्यास मुख्य साधन आहे. मनुष्यानें एकंदर आपल्या स्थितीचा पूर्ण विचार केला पाहिजे. पशुपक्ष्यांप्रमाणें रोजच्या रोज भक्ष्य पैदा करून निर्वाह करावा लागता तर आपली काय दुर्दशा झाली असती ! किंबहुना अशा स्थितींत मनुष्यासारख्या दुर्बल प्राण्याचें जीवनसुद्धां होणार नाहीं. ज्या कला आपण कधीं ऐकिल्या नाहींत, अशा कलांनीं उत्पन्न झालेले पदार्थ आपणास थोड्या श्रमानें अथवा थोड्या पैशानें सहज प्राप्त होतात, हें सुख लहान आहे काय ? हीं सर्व साधनें नसतीं तर आपणांस किती दुःख झालें असतें ? वास्तविक पाहतां निर्वाहास पाहिजे त्यापेक्षां ईश्वरानें मनुष्यास पुष्कळ दिलें आहे.

असंतोषी मनुष्यास केवढाहि लाभ झाला असतां तो आनंदी होत नाहीं, परंतु थोडासा नाश झाला तरी त्याचें मन अस्वस्थ होतें. तो नेहमीं आपणांपेक्षां जे अधिक सुखी दिसतात त्यांची स्थिती मनांत आणून आपणांस ती नाहीं ह्मणून दुःखी असतो. परंतु आपणापेक्षां फार वाईट ज्यांची स्थिती आहे, त्यांविषयीं तो कांहींच विचार करीत नाहीं. वास्तविक पाहतां मनुष्याच्या निर्वाहास लागणारें वस्त्रपात्र बहुशः सर्वांस मिळण्यासारखें असतें, परंतु त्याचा स्वभाव नेहमीं इतरांकडे पाहण्याचा असतो, यामुळें तो कधींच सुखी होत नाहीं.

कोटीची दौलत असूनहि मनुष्य संतुष्ट नसेल तर त्यास सुखी कोण ह्मणेल ? जो संतुष्ट तोच खरा सुखी होय. पदरीं श्रीमंती असली तरी सुख नाहीं असे पुष्कळ लोक आहेत. श्रीमंतांच्या पाठीमागें हजारो झटे असतात. बाहेरून वस्त्रपात्राची छानछुकी असली तरी तीपासून श्रीमंताच्या मनास विशेष सुख होतें असें नाहीं. एकंदरींत पाहतां गरीबीपासून होणाऱ्या दुःखापेक्षां श्रीमंतीपासून होणारीं दुःखें पुष्कळ व भयंकर होत. फार काय, पण श्रीमानाच्या मूर्खपणानें व हट्टानें राष्ट्रेंसुद्धां बुडालीं आहेत ! खरी संपत्ति ह्मटली म्हणजे संतोष ही, व असंतोष हें दारिद्र्य होय,

एका तत्वज्ञानें ह्मटलें आहे कीं, रात्रंदिवस अतिसुखाची इच्छा करणाऱ्यासारखा दुसरा कोणीच दुःखी नाहीं.

वस्तुतः प्रत्येकानें असा विचार करावा कीं आपणापेक्षां अधि॰ दुःखी असे जगांत पुष्कळ आहेत, त्यांपेक्षां आपली स्थिति चांगली आहे ही आपणावर ईश्वराची कृपाच होय. या विचारासारखें दुःखाचा उपशम करणारें दुसरें उत्तम साधन नाहीं. एका गलबतावरील खलाशी डोलकाठीवरून पडला, त्याचा पाय मोडला हें पाहून लोक हळूंहळूं लागले. तेव्हां तो ह्मणाला, अहो, जेथें सुख मानावयाचें तेथें तुह्मी हळहळतां कां? अहो बरें झालें, पायावर गेली; मान मोडून जीव जाता तर आज बायकापोरांस उपाशीं मरावें लागतें ना? कित्येक गरीब लोक श्रीमंताचा बाहेरील डामडौल पाहून त्यांस सुखी असें समजून उगीच आपणांस दुःखी असें मानितात. बरें; असे लोक ज्यांचा हेवा करतात त्यांची स्थिति आपणांस प्राप्त झाली असतां, सुखी होतात असेंहि नाहीं. ते लागलींच अपली पूर्वस्थिति विसरून आपणापेक्षां अधिक मोठे असतील त्यांचा हेवा करतात. वास्तविक पाहतां गरीबाच्या दृष्टीनें श्रीमंत जितके सुखी दिसतात तितके ते नसतात. गरीबांपेक्षां श्रीमंतांस संसारांत अडचणी थोड्या हें खरें, तथापि त्यांच्या स्थितीप्रमाणें त्यांस जीं दुःखें असतात त्यांपासून गरीब मोकळे असतात. त्या मानानें पाहिलें तर श्रीमंतांच्या व गरीबांच्या सुखांत जमीनअस्मानाचें अंतर असतें असें नाहीं. मोठमोठ्या राजकारस्थानी पुरुषांचीं मनें ज्याप्रमाणें सर्वकाळ लढाया, परचक्रें इत्यादि गोष्टींच्या योगानें उद्विग्न असतात, त्याप्रमाणें पोटापुरते श्रम करून निर्वाह करणाऱ्या गरीबांचीं नसतात. श्रीमंत रुप्याच्या ताटांत पंचपक्वान्नें खात बसला तरी त्यापेक्षां पत्रावळीवर भाजीभाकर खाणाऱ्या गरीबांस आपल्या जेवणापासून अधिक सुख होतें. गुडघ्याइतक्या परांच्या गादीवर निजणाऱ्या श्रीमंतापेक्षां घोंगडीवर निजणाऱ्या गरीबास चांगली

गाढ झोंप येते. श्रीमंताच्या स्थितीच्या दोन्ही बाजू गरीब पहात नाहींत; त्यामुळें ते हेवा करितात; वस्तुतः खरें सुख तेथें राहतें असें नाहीं.

संपत्ति नसल्यामुळें असंतुष्ट असणारे फार; याकरितां त्याविषयीं सांगितलें परंतु याशिवायहि आणखी असंतोषाचीं कारणें पुष्कळ आहेत. कित्येकांस आपणास मान बरोबर मिळाला नाहीं ह्मणून असंतोष होतो; कोणी लोकांनीं आपला उपमर्द केला ह्मणून खट्टू होतात; या सर्वांचें कारणही ते आपल्या स्थितीचा योग्य विचार करीत नाहींत हेंच होय. कित्येक वेळां तर असंतोषास कांहींच कारण नसतें. पुष्कळ लोक आपली योग्यता वाजवीपेक्षां जास्त समजतात; व त्या जास्त समजलेल्या योग्यतेप्रमाणें मान मिळाला नाहीं म्हणजे असंतुष्ट होतात. कित्येकांच्या अंगीं शांति नसल्यामुळें अंमळ कोणीं कांहीं बोललें तरी सहन न होऊन त्याचें मन असंतुष्ट होतें. ते सुद्धां आपल्या स्थितीचा पूर्ण विचार करीत नाहींत, असें म्हटलें पाहिजे. आपले हातून किती अपराध होतात, किती वाईट कृत्यें होतात, हें मनुष्यानें मनांत आणलें तर दुसऱ्याच्या यःकश्चित् अपराधानें मन क्षुब्ध करणें हा मूर्खपणा आहे, असें त्यास वाटेल. असंख्यात घोर अपराध करून ईश्वरानें आपली क्षमा करावी असें लोक इच्छितात, तेच दुसऱ्यानें लहानसा अपमान केला तरी मनांत खिन्न होतात; व अंगीं सामर्थ्य असल्यास कदाचित् त्याचा सूडसुद्धां उगवितात, हा मनुष्यजातीस लज्जा आणणारा दुर्गुण होय. या सर्व गोष्टींचें आदिकारण असंतोष हें होय. ज्याच्या अंगीं संतोष नाहीं, त्यापाशीं दया, शांति, हे सद्गुण कधीं रहावयाचे नाहींत.

वरील लेखाचें तात्पर्य आपली स्थिति सुधारण्यास कोणीं उद्योग करूं नये, अथवा कोणी मुद्दाम विनाकारण अपमान केला तरी सोसून घ्यावा, असें नाहीं. याचें तात्पर्य असें समजावयाचें कीं, कांहीं हित नसतां उगाच अंगीं दुर्गुण वाढविणारा असंतोष

सोडून सन्मार्गानें सतत उद्योग करून फलप्राप्तीचा भार ईश्वरावर ठेऊन संतोषवृत्ति धारण करतो, तोच इहलोकीं सुखी होऊन परलोक साधन करील.

## साक्रेतिस आणि लिआंदर.



लिआंदर हा साक्रेतिस ह्या प्रसिद्ध ग्रीसदेशांतील साधूचा वडील मुलगा होता. तो एके दिवशीं रागावून आईला अद्वा-

तद्वा बोलूं लागला. साक्रेतिसानें ही लज्जास्पद वर्तणूक पाहिली; तेव्हां तो शांतपणानें सयुक्तिक भाषण करून त्यास उपदेश करूं लागला—

**साक्रेतिस**—मुला, तुला कृतघ्नता ह्मणजे काय, हें माहीत आहे काय ?

**लिआंदर**—बाबा होय. मला कृतघ्नता ह्या शब्दाचा अर्थ माहीत आहे.

**सा०**—तुला कसा काय अर्थ माहीत आहे तो सांग पाहूं ?

**लि०**—योग्य वेळ आली असतां आपल्या हितकर्त्याचे उपकार न फेडणें ही कृतघ्नता, असें मला वाटतें.

**सा०**—तर मग, कृतघ्नता हा मोठा अन्याय होय.

**लि०**— होय. ह्यांत काय संशय ?

**सा०**—यावरून उपकार जसा जसा मोठा असेल त्या मानानें प्रत्युपकार न करणें हा मोठा अन्याय होईल.

**लि०**—योग्यच आहे.

**सा०**—तर मग, आईबापांचे मुलांवर जितके उपकार असतात, तितके जगांत दुसऱ्या कोणाचे तरी असतात काय ? आईबापांच्या श्रमानेंच मुलांची शरीरसंपत्ति चांगली राहते. त्यांच्या काळजीनेंच त्यांस विद्या प्राप्त होते. त्यामुळेंच मुलांस संपत्ति व सुख प्राप्त होतें व लोकांत प्रतिष्ठा होते.

**लि०**—बाबा, आपण ह्मणतां तें सर्व अक्षरशः खरें आहे, यांत कांहीं संशय नाहीं, पण काय करूं ? माझ्या आईसारख्या कजाग आईचा त्रास दिवसभर कोणाच्यानें सोसवेल ?

**सा०**—अरे, असें तिनें तुझें केलें तरी काय ?

**लि०**—तिचें तोंड फार कठीण. कोणाहि माणसाच्यानें सोसवणार नाहीं.

**सा०**—अरे, लहानपणीं त्वां तिचे जवळ किती कटकट केली असेल ? कितीदा उगीच पिरपिर लाविली असेल ? किती वेळ

एकसारखा तूं रडला असशील ? पाहिजे तसें बडबडावें, नाचावें, धांवावें, वगैरे तुझ्या बालपणच्या चेष्टांपासून तिला किती त्रास झाला असेल ? तुला दुखणें येई तेव्हां तिला किती वाईट वाटलें असेल ? किती काळजी करावी लागली असेल ? किती त्रास भोगावा लागला असेल ? या व इतर गोष्टींमुळें मुलांनीं कृतज्ञ होऊन मातापितरांवर प्रीति करणें हें त्यांचें कर्तव्यकर्म आहे. असें सर्व लोक मानितात. ज्याच्या मनांत भक्ति नाहीं, त्यानें बाह्योपचारानें मोठी पूजा केली तरी ती जशी ईश्वरास ग्राह्य होत नाहीं, त्याप्रमाणेंच जो पुत्र आईबापांवर प्रीति करीत नाहीं, त्याच्या हातून कोणतेंच सत्कृत्य व्हावयाचें नाहीं. त्याचें निःपक्षपाती व न्याय्य असें आचरण असणार नाहीं. ह्याकरितां मुला, शहाणा असशील तर रागानें आईला कडू भाषण बोलल्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करून त्याची क्षमा माग. तूं आईचा असा अपमान करतोस हें लोकांस कळूं देऊं नको. कारण, त्यापासून तुझा दुर्लौकिक होईल. अशा आचरणानें कोणी तुझ्याशीं मैत्री करणार नाहीं. तूं आपल्या आईबापांशीं देखील कृतघ्नपणानें वागतोस; असें कळलें तर तुजवर ममता कोण करील ? कारण तुझ्याशीं मित्रत्व केल्यानें अथवा तुझ्या उपयोगीं पडल्यानें आपलें हित आहे असें कोणासहि वाटणार नाहीं.

---

## जोनाथन् स्विफ्त.

ख्रिस्ती शकाच्या सतराव्या शतकांत जोनाथन् स्विफ्त नांवाचा मोठा ग्रंथकार इंग्लंदांत होऊन गेला. या ग्रंथकाराप्रमाणें लेखणीचें सामर्थ्य फारच थोड्यामध्यें असेल. उपरोधिक लिहिण्याच्या कामांत हा फार कुशल होता. धर्मसंबंधानें अथवा राजकीय संबंधानें मोठ्या मनुष्यांचे हातून राज्यांत जुलूम होऊं लागले ह्मणजे गरीबांचें कांहींएक चालत नाहीं. अशा प्रसंगीं राजा, प्रधान इत्यादिकांचे अपराध बाहेर काढण्यास उपरोधिक ग्रन्थ फार

उपयोगीं पडतात. एके समयीं असें झालें कीं, इंग्लंदच्या प्रधानांनीं ऐर्लंदांत एक प्रकारचें नाणें पाडण्यास एका मनुष्यास परवानगी दिली. या नाण्यापासून ऐरिश लोकांचा फार तोटा होता; हें पाहून स्विफ्त साहेबानें एका वर्तमानपत्रांत बिननांवी कांहीं पत्रें छापिलीं. या पत्रांत नवीन नाण्यापासून फार अन्याय होणार आहेत, व ऐरिश लोकांचा फार तोटा आहे, असें यानें सिद्ध करून दाखविलें. त्यामुळें इंग्लंदांत इतका गवगवा झाला कीं, प्रधानांनीं नाणें पाडण्यास दिलेला हुकूम रद्द केला. या पत्रांचा इंग्लंदांतील प्रधानांस इतका राग आला होता कीं, त्यांनीं हीं पत्रें लिहिणाऱ्यास धरून देणाऱ्यास मोठें बक्षीस मिळेल, असा जाहिनामा लाविला. हीं पत्रें स्विफ्त साहेबानें लिहिलीं आहेत, असें ऐर्लंदांत पुष्कळांस माहीत होतें, परंतु त्यास कोणी धरून दिलें नाहीं. हा ऐर्लंदांत इतका लोकप्रिय झाला कीं, त्यास मरेपर्यंत ऐर्लंदचा हितकर्ता असें सर्व ऐरिश लोक मानीत होते. कोणतीहि सार्वजनिक गोष्ट ऐर्लंदांत त्याच्या अनुमताशिवाय होत नसे. 'गलिवरचा प्रवास' ह्मणून यानें एक कल्पित ग्रंथ लिहिला आहे; त्यांत इंग्लंदांतील राजकीय व इतर प्रकरणीं अन्याय उत्तम रीतीनें अन्योक्तीनें वर्णिलेले आहेत.

स्विफ्त साहेबानें कांहीं स्फुट वाक्यें लिहिलीं आहेत, तीं फार चांगलीं आहेत, त्यापैकीं कांहींचें भाषांतर येथें लिहिलें आहे.

'तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून मूर्खांचें मन सुधारणें ह्मणजे वस्तऱ्यानें लांकडांचे ओंडे तोडण्यासारखें आहे.' आपल्या देशांतील विद्वान् भर्तृहरि याचीं अशा अर्थाचीं बहुत वचनें आहेत.

'साधारण शहाणपण जसें जगांत उपयोगीं पडतें, तसें तत्त्वज्ञान उपयोगीं पडत नाहीं. जसें नेहमीं सोनें खिशांत बाळगणाऱ्याचा खुर्द्याकरितां ठिकाठिकाणीं खोळंबा होतो.'

'विद्या ही पाऱ्याप्रमाणें आहे. पाऱ्याप्रमाणें ती कुशलाच्या हातांत असली तर हित करील; नाहीं तर उलटा नाश करील.'

'मनुष्यास जितकें शहाणपण कमी, तितका त्यास गर्व जास्त असतो.' भर्तृहरीचेंहि असेंच एक वाक्य आहे.

'एकंदरीनें नम्रतेपासून फार फायदा आहे. जो मनुष्य फुका डौल घालून ढोंग माजवितो, त्यास तें चालविण्याकरितां नेहमीं श्रम करावे लागतात. आपणांमध्यें शहाणपण असलें तर नम्रतेच्या योगानें तें अधिक दिसतें. नम्रतेच्या योगानें आपलें आज्ञान लोकांस दिसत नाहीं. नम्रतेच्या योगानें कसबीण लोकांस गरत दिसते, त्याप्रमाणें नम्र मनुष्य लोकांस शहाणा दिसतो.'

'ज्या गोष्टी लोकांनीं केल्या असतां आपण वाईट ह्मणतों, त्या आपण करणें ह्मणजे लोकांपेक्षां आम्ही मूर्ख आहों, असें कबूल करणेंच आहे.'

'आपली चूक पदरांत घेण्यास मनुष्यानें कधीं लाजूं नये. चूक कबूल करणें ह्मणजे कालच्यापेक्षां मी आज अधिक शहाणा झालों असें ह्मणणें आहे.'

'कामक्रोधादि मनोविकार आरंभीं मनुष्यास अधिक बळकट करतात, पण परिणामीं शक्तिहीन करतात.'

'रागावणें ह्मणजे दुसऱ्याच्या गुन्ह्याकरितां आपण शिक्षा भोगणें आहे.'

'शूर मनुष्य इतरांस हलकें मानितो, कारण, सूड घेण्याचें सामर्थ्य असून त्यांच्या अपराधांची क्षमा करून मी मोठा आहें, असें दाखविण्याचें त्याच्या हातीं आहे.'

'दुःखिताचें दुःख निवारण करणें यासारखें मनुष्यास करितां येईल असें दुसरें महत्कृत्य नाहीं. याच्या योगानें ईश्वराचें काम केल्याप्रमाणेंच होतें.'

'नास्तिक मनुष्य मूर्ख होय. तो मूर्खपणानें देवाची निंदा करतो, परंतु ढोंगी मनुष्य देवाची आणि धर्माची समजून उमजून थट्टा करतो. एकादा लुच्चा कर्जदार आपल्या धनकोस गोड गोष्टी सांगतो, पण त्याचा पैसा देत नाहीं. त्याप्रमाणें लो-

लोकांनीं चांगलें ह्मणावें ह्मणून हा भक्तीचें ढोंग करतो, पण हा ईश्वरास मुळींच भीत नाहीं.'

'शांतता करण्याकरितां लढाई करणें योग्य आहे, त्याप्रमाणें खरें कळविण्यांत मात्र वाद करणें वाजवी आहे. परंतु पारधी शिकारीस कोंडतात त्याप्रमाणें वाद करणारे बहुशः खरें दाबून टाकितात.'

(तुटे वादसंवाद तो हीतकारी—रामदास.)

'बेवारशी मालावर सर्व हक्क सांगतात, त्याप्रमाणें धर्मशास्त्राचें आहे. वादाचे वेळेस उभय पक्षांकडील लोक आपणास अनुकूल असा त्या वचनाचा अर्थ करतात.'

'जो नेहमीं लोकांच्या खोड्या काढितो तो दिवसेंदिवस नासत जातो.'

'लोकांपासून गमत्या ह्मणून घेण्याची इच्छा करणें, ह्मणजे मूर्खपणा करण्यास मोकळीक मागणें आहे.'

'कोणी मनुष्य अप्रबुद्ध आहे किंवा व्यंग आहे, ह्मणून त्यास मनुष्यांनीं हसूं नये. कारण, ह्या न्यूनता त्यास घालवितां यावयाच्या नाहींत.'

'जो दरिद्री मनुष्य कृतघ्न असतो, तो श्रीमंत झाला तर तसाच उदार होतो.'

'जो मनुष्य खोटें बोलतो, तो आपल्या डोक्यावर मोठें ओझें घेतो. कारण लबाडी झांकण्याकरितां त्यास आणखी पंचवीस लबाड्यांची योजना करावी लागते.'

'गरज पडेल तेव्हां क्षणांत शिकूं, असें ह्मणून कित्येक लोक कांहींच शिकत नाहींत.'

'संसारांत गर्व वाहणें हें नदीच्या पुरासारखें आहे. नदीचा पूर वाहून जातो. तसा पुष्कळ गोष्टींनीं आपला गर्व नाहींसा होतो, आणि तो पुराप्रमाणें पुन्हा येतो.'

'शहाणपणाचीं कृत्यें करणारे पुष्कळ सांपडतील. लुचेगि-

रीचीं कामें करणारे त्यांपेक्षां फार सांपडतील, पण उदार कृत्यें करणारे जगांत फारच थोडे आहेत.'

'सौन्दर्याकरितां स्त्रीवर प्रीति करणें, म्हणजे पैशाकरितां श्रीमंत मनुष्याशीं स्नेह करण्यासारखें आहे.'

'मानवी पशु इतर पशूंप्रमाणें संसाराचे जाळ्यांत सांपडतात आणि इंद्रियांचे स्वाधीन होऊन आपला नाश करून घेतात.'

'मनुष्य जितका अधिक वर्षे वांचेल तितका त्यास ईश्वराचा मोठेपणा व माणसांचा हलकेपणा अधिक कळेल.'

'मनमिळाऊ होण्यास रुभ्यपणा आणि लुचेगिरी हीं दोन्हीं अंगीं असावीं लागतात.'

'कोणींहि आपलें मत सांगितलें तरी आपला त्यास रुकार देणें हा बुद्धिमान् व शहाणा ह्मणवून घेण्याचा सोपा मार्ग आहे.'

'जे बायकांमध्यें गुण तेच पुरुषांचे अंगीं दोष होतात. फार चांगल्या बायकोचे गुण पुरुषांमध्यें असले तर त्यांस नादान ह्मणतील.'

'जे आपल्या हिताकरितां दुसऱ्यांस नेहमीं पीडा देतात, जे तिलप्राय उपकारास देखील पात्र नसतात, ते नेहमीं आपल्या नफ्याकरितां दुसऱ्यांचीं आर्जवें करून त्यांस त्रास देतात.'

'खोटें करण्यापेक्षां खोट्याची क्षमा करणें हें फार वाईट व भयंकर होय. कारण, यामुळें लबाडी वाढते.'

'सर्व लोक कृतघ्नतेची निंदा करतात. वस्तुतः कृतघ्नतेपेक्षां गर्वाची निंदा करणें योग्य आहे. मोठाच शठ असेल तो कृतघ्न होईल. परंतु जगांत बहुशः अशी चाल असते कीं, प्रत्येक दुसऱ्याचें हित करणाऱ्यास असें वाटतें कीं, मीं त्याच्या योग्यतेपेक्षां जास्त केलें. तसेंच प्रत्येक हित करून घेणारास असें वाटतें कीं, माझ्या योग्यतेपेक्षां यानें मला कमी दिलें.'

'फार गोड फळास पक्षी फार टोंचतात, त्याप्रमाणें फार चांगल्या मनुष्यास लुच्चांपासून फार पीडा होते.'

'ज्यांस मानसिक सुख घेण्याची शक्ति नाहीं, तेच विषय-सुखापासून आनंद पावतात.'

'ईश्वर किती शहाणा आहे, व मनुष्य किती मूर्ख आहे, हें बुद्धीनें ठरवितां यावयाचें नाहीं.'

यांतील कांहीं वाक्यांचें भाषांतर शब्दशः केलें आहे, व कांहींचें तात्पर्य मात्र दिलें आहे.

---

## सर विल्यम् जोन्स.



इंग्लिशांचें राज्य हिंदुस्थानांत झाल्यापासून जे कीर्तिमान् पुरुष इंग्लंडांतून आले, त्यांपैकींच वर लिहिलेला एक पुरुष समजला

पाहिजे. हिंदुस्थानच्या राजांशीं तह करणें, लढाई करणें वगैरे साक्षात् राज्यप्रकरणांशीं संबंध नसल्यामुळें इतिहासांत याचें नांव फार गाजलें नाहीं; तथापि अशा पुरुषाचें चरित्र मोठें उपदेशपर असतें, याकरितां त्याचा वृत्तान्त संक्षेपानें लिहिला आहे.

हा लंदन शहरांत सन १७४६ त जन्मला. त्याचा बाप गणितशास्त्रामध्यें हुशार असून सर ऐझाक् न्यूतन् गणितशास्त्रज्ञशिरोमणि याचा मित्र होता. जोन्स तीन वर्षांचा होण्यापूर्वींच त्याचा बाप मृत्यु पावला. त्याची आईहि मोठी सद्गुणी असून, गणितशास्त्र, नकाशे वगैरे काढणें, यांत हुशार होती. तिनें मुलास बालपणापासून विद्येची अभिरुचि लाविली. स्वतः ती त्यास शिकवीत असे.

जोन्स याची पाठ करण्याची शक्ति फार मोटी होती. तो शाळेंत असतां शेक्स्पियर या कवीचीं नाटकें पाठ ह्मणे. शाळेंत असतांच तो लातीन, ग्रीक, आरबी व हिब्रू, या भाषा शिकला. त्यानें आपल्या एकविसाव्या वर्षींच एशिया खंडांतील कवितांवर टीका लिहिल्या. इंग्लंदांत अशी चाल आहे कीं, यूरोपखंडांतील प्राचीनकाळीं व सांप्रतकाळीं सुधारलेल्या देशांत प्रवास करून आल्याशिवाय विद्या पुरी झाली असें समजत नाहींत. अध्ययन संपल्यावर बहुशः सर्व विद्वान् लोक यूरोपखंडांतले देश पाहून येतात. कित्येक बुद्धिमान असतात ते त्या देशांचीं वर्णनें लिहितात. व तेथें असतां त्या देशांतल्या भाषा शिकतात. या चालीप्रमाणें जोन्स साहेब सन १७६७ त युरोपखंडांतले देश पाहण्यास गेला; तेव्हां त्यानें जर्मन भाषेचा अभ्यास केला. पुढल्या वर्षीं तो इंग्लंदांत परत आला. त्या वेळेस इंग्लंदांत देनमार्कचा राजा आला होता. त्याजवळ फारशी भाषेंत हातानें लिहिलेलें नादीरशहाचें चरित्र होतें, त्याचा त्यास फ्रेंच भाषेंत तरजुमा करावयाचा होता, तें काम जोन्स यानें पतकरिलें. यांत त्यास मोठासा नफा नव्हता, व फ्रेंच भाषेंत राजास पसंत पड-

ण्यासारखें भाषांतर करण्याचें कामहि मोठें काठिण होतें. परंतु हें काम करण्यास योग्य मनुष्य इंग्लंदांत नाहीं ह्मणून तें काम राजानें फ्रान्स देशांत पाठविलें; अशी अप्रतिष्ठा होऊं नये ह्मणून त्यानें तें काम स्वीकारून मोठ्या श्रमानें एका वर्षांत सर्व पुस्तकाचें भाषांतर तयार केलें. तें राजास मान्य होऊन त्यानें जोन्स यास डेन्मार्कची राजधानी ‘कोपेनहेगेन’ येथल्या ‘रायल सोसायटी’ नामक सभेचा सभासद नेमिलें.

पुनः सन १७७० रांत यानें यूरोपखडांत प्रवास केला. या वेळेस त्यानें पुष्कळ भाषा शिकून गणित वगैरे विषयांचाहि चांगला अभ्यास केला. पुढें लंडनास परत आल्यावर यानें कायद्याचा अभ्यास केला. सन १७८३ या वर्षी त्याची कलकत्ता येथील सदर कोर्टाच्या मुख्य न्यायाधीशाच्या जाग्यावर नेमणूक झाली. एशिया खंडांतील देश पाहून तिकडील जुन्या भाषा शिकण्याची यास फार हौस होती, ती पूर्ण होण्याची सहज संधि आल्यामुळें तो मोठ्या आनंदानें कलकत्त्यास आला. या वेळेस वारन् हेस्तिंग्स हा गवरनर जनरल होता. त्याच्या मदतीनें सन १७८४ या सालांत बंगाल्यांत ‘एशियाटिक सोसायटी’ ह्मणून एक मंडळी स्थापित झाली. जोन्स याची विद्वत्ता पाहून या मंडळीनें त्यास अध्यक्ष नेमिलें. या मंडळीपासून हिंदुस्थानचें पुष्कळ हित झालें आहे. जुने लेख, प्राचीन ग्रंथ, प्राचीन इतिहास, यांचा जो शोध लागला आहे, त्यास मुख्यत्वेंकरून या मंडळीचे श्रम कारण होत. याच वर्षी जोन्स साहेब ब्राह्मणांच्या विद्येचें जें आद्यपीठ काशीक्षेत्र तें पाहण्यास मोठ्या उत्सुकतेनें गेला. नंतर त्यानें दोन वर्षें अभ्यास करून संस्कृत भाषेचें चांगलें ज्ञान संपादिलें. सन १७८५ या वर्षी ‘एशियाटिक मिसलनी’ या नांवाचें दुसरें एक मासिकपुस्तक कलकत्ता येथें निघूं लागलें. त्यांत जोन्स साहेब पुष्कळ मजकूर लिहीत असे. त्या पुस्तकांत फारसी भाषेंतील कितीएक कवितेचीं इंग्रजी भाषांतरें यानें छा-

पिलीं. सन १७८९ दांत यानें कालिदासकृत शाकुंतल नाटकाचें इंग्रजी भाषांतर केलें. याचा विद्याभ्यास नेहमीं सुरू होता. परंतु १७९४ वांत याच्या पोटांत रोग झाला. त्यापासून तो तारीख १७ एप्रिल रोजीं याच वर्षीं मरण पावला.

सर विल्यम् जोन्स याच्या वयाचा व विद्येचा विचार करूं लागलें म्हणचे मोठा अचंबा वाटतो. असे विद्येविषयीं तत्पर पुरुष जगांत फारच विरळा सांपडतात. यानें स्वभाषेंत बऱ्याच कविता केलेल्या आहेत त्यांपैकीं कांहीं फारच मनोवेधक आहेत. तो जसा मोठा विद्वान् होता, तसा मोठा नीतिमानहि होता. 'राज्य म्हणजे काय,' या नांवाची एक त्यानें लहानशी कविता केली आहे. तींत त्यानें असें म्हटलें आहे कीं, "मोठाले किल्ले, कोट, खंदक असल्यानें राज्य चांगलें होत नाहीं. तसेंच मोठालीं शहरें, बंदरें, आरमारें, राजवाडे, असले म्हणजे राज्य चांगलें झालें असें नाहीं. फार काय, पण केवळ बुद्धिमान मनुष्यांनीं सुद्धां राज्य चांगलें होत नाहीं, तर आपलें कर्तव्य व हक्क जाणून त्यांप्रमाणें वागणारे मनुष्य ज्या राज्यांत असतात, तेंच चांगलें राज्य होय."

जोन्स साहेब नेहमीं निःपक्षपातानें न्याय करी. ज्या लोकांचा आपण न्याय करतों, त्यांचे जुने कायदेकानू, रीतिभाती वगैरे यांची पूर्ण माहिती न्याय बरोबर होण्यास अत्यंत आवश्यक आहे, असें जाणून मनुस्मृति वगैरे पुष्कळ जुन्या ग्रंथांचें इंग्रजीमध्यें त्यानें भाषांतर केलें. पूर्वीं हिंदुस्थानांत साहेब लोक येत, ते हिंदु लोकांत विद्येचा प्रसार नाहीं, असें यूरोपांत प्रसिद्ध करीत. ग्रीक, लातिन, या जुन्या भाषांप्रमाणें संस्कृत भाषा सुधारलेली आहे, असें पूर्वीं यूरोपांतील लोकांस माहीत नव्हतें जोन्स साहेबानें शाकुंतल नाटकाचें भाषांतर केल्यामुळें संस्कृत ग्रंथांकडे युरोपियन विद्वानांचें लक्ष लागलें. शाकुंतल नाटकाचें भाषांतर हल्लीं यूरोपांतील सर्व भाषांत झालें आहे. हिंदु व

ग्रीक यांच्या पौराणिक व ऐतिहासिक कथेंत सादृश्य आहे, असें प्रथम जोन्स साहेबास समजलें. ग्रीकइतिहासकर्त्यांनीं 'सांड्रकोट्स्' ह्मणून हिंदुस्थानचा राजा होता, असें लिहिलें आहे, तो हिंदुस्थानांतला चंद्रगुप्त होय असें यानें ठरविलें. ही गोष्ट हल्लीं सर्वानुमतें अशीच ठरली आहे. संस्कृत भाषेस हल्लीं जो एवढा मान यूरोपखंडांत मिळाला आहे, त्यास कांहीं अंशीं सर विल्यम् जोन्स कारण आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सांप्रत यूरोपांतील विद्वान् लोक दहा दहा वीस वीस वर्षे संस्कृत भाषेच्या अभ्यासांत घालवितात.

सर विल्यम् जोन्स यास एकंदर २८ भाषा येत होत्या असें ह्मणतात, त्या भाषा येणेंप्रमाणें:—

१ इंग्रजी. २ लातिन. ३ ग्रीक. ४ फ्रेंच. ५ इतालिन. ६ आरबी. ७ फारसी. ८ संस्कृत. ९ स्पानिश. १० पोर्तुगीज. ११ जर्मन. १२ रुनिक. १३ हिब्रू. १४ बंगाली. १५ हिंदी. १६ तुर्की. १७ तिबेटी. १८ पाली. १९ पेल्हवी. २० देरी. २१ रशियन. २२ सिरिआक. २३ इथिओपिक. २४ कापतिक्. २५ वेल्श. २६ स्वीडिश. २७ डच. २८ चिनी.

यांपैकीं पहिल्या आठ त्यास उत्तम विद्वानांप्रमाणें येत असत दुसऱ्या आठ मध्यम येत असत. बाकीच्या बारांत त्याचा थोडाबहुत प्रवेश मात्र होता.

इंग्रजी लिपी आपल्या बालबोध लिपीप्रमाणें सुलभ नाहीं, तींतील कित्येक अक्षरांचे तीन चार उच्चार होतात, व कित्येक उच्चारांस एकापेक्षां अधिक अक्षरें आहेत, असा घोंटाळा असल्यामुळें प्रत्येक साहेब मनास मानेल त्या रीतीनें इकडले शब्द लिही, त्यावरून वाचणाराहि आपणास वाटेल त्याप्रमाणें उच्चार करी. असा गोंधळ होऊं नये ह्मणून संस्कृत लिपीच्या अमुक वर्णाबद्दल इंग्रजी लिपींतला अमुकच वर्ण लिहावा, असें जोन्स साहेबानें ठरविलें. ती रीत सर्वांस मान्य होऊन तीप्रमाणें मोठ-

मोठाले संस्कृत ग्रंथ हल्लीं इंग्रजी लिपींत छापितात. ते बिनचूक वाचितां येतात. या रीतीस 'जोनेशियन् सिस्टिम्' म्हणजे जोन्स साहेबाची रीत असें म्हणतात.

---

## एद्मंद् बर्क्.



आपला ज्यास कळवळा तो आपला मित्र होय. तो आपल्या ओळखीचा असो किंवा नसो, आपल्या जातीचा असो किंवा नसो, आपल्या देशांतला असो किंवा नसो, तथापि त्याविषयीं आपण कृतज्ञ असलें पाहिजे. आपल्यापासून ज्यास नफा होण्याचा संभव आहे, त्यानें आपलें हित केलें तरी आपण त्याचे उपकार मानिले पाहिजेत. परंतु जो निरपेक्षबुद्धीनें आपल्या हितासाठीं झटतो, त्याविषयीं आपण फारच कृतज्ञता दाखविली

पाहिजे. यावरून पाहतां, एद्मंद् बर्क, या दयाळु इंग्लंदांतील पुरुषाचे सर्व हिंदु लोकांनीं उपकार मानावे हें त्यांचें कर्तव्य होय.

बर्क साहेब मूळचा ऐर्लंदचा राहणारा. तो १७६० च्या सुमारास इंग्लंदांत आला. विद्वत्तेमुळ व सद्गुणांमुळें इंग्लंदांतील त्या वेळचे प्रसिद्ध विद्वान् डाक्टर जान्सन्, ओलिव्हर गोल्दस्मिथ्, एद्वर्द् गिबन् वगैरे विद्वानांत याची प्रसिद्धि झाली.

नंतर लॉर्ड राकिंघाम् त्या वेळचा मुख्य प्रधान याच्या योगानें तो राजकीय कामांत शिरला. तेव्हांपासून याच्या वक्तृत्वामुळें याची कीर्ति पसरत चालली. प्रथम यानें 'अमेरिकेंतील छापील कागदांबद्दल कायदा' या संबंधानें पार्लमेंत सभेंत भाषण केलें. या वेळेस इंग्लंदांत उत्तम वक्ता पित् साहेब असे. त्याची वक्तृत्वाविषयीं फार कीर्ति असे. बर्क् साहेब पूर्वी पार्लमेंत सभेंत बोलला नव्हता तरी, शेंकडों वेळ पार्लमेंत सभेंत भाषण केलेल्या पित् साहेबाची त्यानें प्रथमच बरोबरी केली. यामुळें तो मरेपर्यंत इंग्लंदांतील राजकीय पुरुषांत श्रेष्ठ झाला. इंग्लंदाविषयीं जितकी त्याच्या मनांत दया असे. तितकीच हिंदुस्थानाविषयीं असे. इंग्लिशांच्या दुःखानें जसें त्याचें मन दुःखित होई, तसेंच हिंदूंच्या दुःखानें होई. त्यापेक्षां हिंदुस्थानाची अधिक दया करणारा एकहि साहेब झाला नसेल. तो हिंदुस्थानांत कधीं आला नव्हता; तथापि त्यास हिंदुस्थानच्या इतिहासाची व हिंदुलोकांच्या रीतिभातींची इतकी माहिती होती कीं, आजपर्यंत कोणत्याहि शोधक साहेबास तशी नसेल. तो पार्लमेंत सभेंत बोले तेव्हां सर्व हिंदुस्थान त्यास डोळ्यांपुढें दिसत आहे असें लोकांस वाटे!

पार्लमेंत सभेंत चांगलीं भाषणें पुष्कळ वेळ होतात, परंतु वारन् हेस्टिंग्स् याच्या चौकशीच्या वेळेस जी ऐकणारांची गर्दी झाली ती फारच मोठी होती. इंग्लंदांतील बहुतेक सरदार, स्त्रियांसहित या वेळेस बर्क साहेबाचें भाषण ऐकण्यास आले होते. राणी स्वतः मुलांसहवर्तमान भाषण ऐकण्यास आली होती. असें

सांगतात कीं, पांच पौंद म्हणजे पन्नास रुपयेपर्यंत एका तिकिटाची किंमत वाढली होती. खटला चालू करण्याचे वेळेस यानें एकसारखें चार दिवस भाषण केलें. पुढें खटला सुरू असतांहि बर्क् साहेबानें पुष्कळ वेळ उत्तम भाषणें केलीं. हीं सर्व भाषणें छापलेलीं आहेत. वारन हेस्तिंग्स् याच्या पक्षाचे लोक इंग्लंदांत पुष्कळ असल्यामुळें त्यास शिक्षा झाली नाहीं.

अमेरिकेच्या संबंधानें बर्क् साहेबानें पार्लमेंत सभेंत जीं भाषणें केलीं आहेत तींहि फार उत्तम आहेत. अमेरिकेंतील प्रजेस इंग्लंदांतील प्रजेप्रमाणें वागवावें, पार्लमेंत सभेंत प्रतिनिधी पाठविण्यास त्यांस अधिकार असावा, त्यांजवर उगाच करांचें ओझें घालूं नये, ते इंग्लिश लोकच आहेत, त्यांस स्वतंत्रता म्हणजे काय हें पूर्णपणें माहित आहे, आपण त्यांस चरकांत धरूं लागलों तर ते मोकळे झाल्याशिवाय राहणार नाहींत, त्यांस आपल्याशीं भांडण्याचा प्रसंग द्यावा त्यापेक्षां आपणच त्यांस मोकळीक देऊन आपली प्रतिष्ठा ठेवावी यांतच भूषण आहे, त्यांनीं भांडून स्वतंत्रता मिळविल्यावर इंग्लंदाची प्रतिष्ठा राहणार नाहीं; असें बर्क् साहेबानें पार्लमेंत सभेमध्यें पुष्कळ वेळां आपलें मत प्रगट केलें. बर्क् साहेबाच्या मताप्रमाणें इंग्लिश सरकार वागतें तर अमेरिकेंतील इंग्लिश लोकांचें राज्य कदाचित् गेलें नसतें. तथापि कित्येक हट्टी प्रधानांनीं आग्रह धरल्यामुळें अमेरिकेंत छापील कागद, कर वगैरे इंग्लिश सरकारानें सुरू केले. त्यामुळें अमेरिकन लोकांनीं युद्ध करून इंग्लिश लोकांचें जूं फेंकून दिलें, आणि आपण स्वतंत्र झाले.

बर्क् जसा राज्यकारभारांत पूर्ण हुशार होता, तसाच पहिल्या प्रतीचा विद्वान् व नीतिमान् होता. त्यानें शास्त्रीय विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. सोप्या व सुरस भाषेनें विषय व्यक्त करून दाखविण्याची बर्क् साहेबाची शैली वाखाणण्यासारखी आहे.

"फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीविषयीं विचार," या विषयावर त्यानें एक ग्रंथ लिहिला आहे, तो फारच उत्तम आहे. तो ग्रंथ प्रथम छापिला तेव्हां, त्याची सर्व यूरोपखंडांत थोड्या काळांत प्रसिद्धि झाली.

बर्क् साहेबाच्या नीतिमान्पणाचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. सर्वांमध्यें श्रेष्ठ जो दातृत्वगुण तो त्यामध्यें पूर्णपणें होता. 'जो आपला निर्वाह करण्यासारखा शक्तिमान् आहे अशास धर्म करणें ठीक नाहीं' असें कित्येकांचें ह्मणणें आहे; हें बर्क् साहेबास अगदीं पसंत पडत नसे. तो असें ह्मणे कीं, आपला कृपणपणा लपविण्याच्या या सर्व सबबी आहेत. वस्तुतः ज्यास थोडाबहुत धर्म करणें असेल त्यास असली पोकळ चौकशी करण्याची गरज नाहीं. हें मत चांगलें किंवा वाईट याचा आम्ही येथें विचार करीत नाहीं, पण त्यावरून बर्क् साहेबाच्या मनाची योग्यता कळते. क्र्याब ह्मणून एक विद्वान् मनुष्य बर्क् साहेबाच्या वेळीं इंग्लंदांत होता. तो अगदीं दारिद्र्यावस्थेंत होता. त्यानें आपणास आश्रय देण्याविषयीं त्या वेळच्या श्रीमान् लोकांचीं पुष्कळ आर्जवें केलीं. पण कोणींहि त्यास मदत केली नाहीं. शेवटीं निराश होऊन त्यानें बर्क् साहेबास एक मनोवेधक पत्र लिहिलें. हें पत्र वाचितांच बर्क् साहेबाचें अंतःकरण दयार्द्र झालें. त्यानें क्र्याब साहेबास लागलींच आपले घरीं बोलाविलें आणि त्या दिवसापासून त्याचें आपल्या कुटुंबांतील मनुष्याप्रमाणें पोषण केलें. त्यामुळें क्र्याब साहेबाची विद्वत्ता प्रसिद्धीस येऊन त्यास पैसाहि पुष्कळ मिळाला.

बर्क् साहेबासारख्या मनुष्याचे गुण वर्णावे तितके थोडेच. अशा मनुष्यास मनुष्यरत्न असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. पृथ्वीच्या पाठीवर नुसते सद्गुणी, नुसते विद्वान, नुसते राज्यकारस्थानी, असे पुरुष पुष्कळ असतील परंतु बर्क् साहेबासारखे या सर्व गुणांचा आपणांमध्यें समावेश करणारे पुरुष फारच थोडे अस-

तील यांत संशय नाहीं. ज्यांस या लिहिण्याचा संशय वाटेल त्यांनीं बर्क् साहेबाचे ग्रंथ लक्षपूर्वक वाचिले तर त्यांचीहि याविषयीं खात्री होईल.

एद्मंद् बर्क् मोठा तत्त्वज्ञानी होता. त्याचे विचार फार खोल आहेत. त्यानें भव्य आणि सुंदर या विषयावर एक ग्रंथ लिहिला आहे, तो फार उत्तम आहे. या ग्रन्थांतील एक लहानसा उतारा मासल्याकरितां या लेखापुढें दिला आहे. याशिवाय इतिहास, राजनीति, इत्यादि विषयांवर त्याचे अनेक अत्युत्तम ग्रन्थ आहेत.

---

## सुख आणि दुःख.

नवीन पदार्थ दृष्टीस पडले म्हणजे मनुष्यांच्या चित्तवृत्ति चलित होतात, यास कारण त्यांची नवीनता हेंच केवळ म्हणतां येत नाहीं. तर, प्रौढ मनुष्यांच्या मनांत सुद्धां, नवीन पदार्थ पाहून, रागद्वेषादि मनोभाव उत्पन्न होतात, यास्तव, सुख किंवा दुःख उत्पन्न करण्यासारखा, नवीनतेशिवाय पदार्थांच्या अंगीं दुसरा कांहींतरी गुण अवश्य कल्पिला पाहिजे. सुख आणि दुःख हे दोन पदार्थ सर्वांस ठाऊक आहेत, असें आहे तरी त्यांचें लक्षण करणें अशक्य आहे. मनुष्यांस सुखदुःखाचा अनुभव वास्तविक होत असेल यांत संशय नाहीं. तथापि, सुखदुःख यांस नांवें देण्यांत ते बहुत चुका करतात, व त्याचें कारणहि भलतेंच सांगतात. कित्येकांचें असें मत आहे कीं, सुखाभाव हेंच दुःख व त्याचप्रमाणें दुःखाभाव हें सुख होय. वस्तुतः सूक्ष्म विचार केला असतां असें दिसतें कीं, सुखदुःखें अन्योन्यसापेक्ष नाहींत तर प्रत्येकास स्वातंत्र्यानें अस्तित्व आहे. स्वभावतः मनुष्याचें मन सुखी नाहीं व दुःखीहि नाहीं, तर उदासीन आहे असें दिसतें. अशा मनःस्थितीस उदासीनता असें म्हणतात. जेव्हां मनाची उदासीनता नाहींशी होऊन खरोखर सुख होऊं लागतें,

त्या वेळेस, पूर्वीं दुःख होतें असें नाहीं. पहा, अशा उदासीन मनःस्थितींत, जर आपण एकाएकीं, सुस्वर गायन किंवा वाद्य ऐकिलें; अथवा एकादें सुंदर चित्र पाहिलें, किंवा चकचकीत पाणिदार रंगाची वस्तु पाहिली, अथवा, गुलाबी अत्तराचा सुंगध घेतला, अथवा एकाएकीं श्रीखंडासारखा एकादा उत्तम पदार्थ खाल्ला, तर पूर्वोक्त ऐकणें, वास घेणें, रुचि घेणें या सर्वांपासून आपणास सुख होतें यांत संशय नाहीं; तथापि, विचार करून पाहतां, हें सुख होण्यापूर्वीं, आपणास कांहीं दुःख होतें असें म्हणतां येणार नाहीं. व तसेंच, हें सुख बंद होण्याबरोबर, एकाद्या खरोखर दुःखास आरंभ होतो असाहि कोणाचा अनुभव नाहीं. त्याचप्रमाणें अशा उदासीन स्थितींत मनुष्यास एकाद्यानें अकस्मात् गुद्दे मारले अथवा कांहीं कडू पदार्थ पाजला किंवा, एकाएकीं कर्कश शब्द ऐकून त्याचे कांटाळे बसले, तर, त्या वेळेस त्याचें एकादें वास्तविक सुख कमी होतें असें नाहीं, तथापि त्या त्या इंद्रियास त्यापासून साक्षात् दुःख होतें यांत संशय नाहीं. आतां कोणी म्हणेल कीं, या दुःखाच्या पूर्वीं सुद्धां सुख होतें पण तें फार सूक्ष्म असल्यामुळें त्याचा अनुभव येत नाहीं. परंतु दुःखामुळें तें अगदीं नाहींसें झालें तेव्हां त्याचा अभाव मात्र अनुभवास येतो. हें बोलणें सूक्ष्मतेविषयीं असेल परंतु अशी सूक्ष्मता सृष्टींत दिसत नाहीं. कारण सुखाच्या रूपानें ज्याचा अनुभव येतो त्यासच सुख म्हणणें योग्य आहे. व दुःखाविषयींहि तसेंच म्हटलें पाहिजे. यावरून सुख व दुःख हीं अन्योन्याश्रित आहेत असें कधीं म्हणतां येणार नाहीं, तीं दोन्हीं भावरूप असून परस्परनिरपेक्ष आहेत. सुख व दुःख, या दोघांचा अभाव म्हणजे उदासीनता, हे तीन्ही पदार्थ अगदीं वेगळे आहेत हें स्पष्ट आहे. यांतून कोणतेंहि एक दुसऱ्याच्या संबंधाशिवाय जाणतां येतें. समजा, रामाचें पोट दुखूं लागलें, तेव्हां अर्थात् तो दुःखांत आहे, इतक्यांत त्यास डाग दिला, तर त्यास अधिक दुःख

होईल यांत संशय नाहीं. तरी एकादें सुख नाहींसें झाल्यामुळें हें दुःख झालें असें म्हणतां येईल काय ? बरें पोटशूळास आपणास वाटेल तेव्हां सुख किंवा दुःख, असें पाहिजे तें नांव देतां येईल काय ?

---

## आळस.

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ॥

आळशी मनुष्याचें जन्म व्यर्थ होय. त्याच्यानें जगांत स्वहित किंवा परहित कांहींच होत नाहीं. आळशी मनुष्याची समजूत पहिल्यापासूनच चुकीची असते. त्यास वाटतें, आपणास उद्योगी नाहीं असें लोक म्हणतील तर ह्मणोत बिचारे; आपण तर स्वस्थ आहों. त्यास वाटतें उगाच दगदग करून शरीरास पीडा देणारे लोक मूर्ख, ते कधीं सुखी व्हावयाचे नाहींत. दोन दिवस आयुष्य आहे तों स्वस्थ बसावें हें चांगलें. वस्तुतः विचार केला तर या सर्व गोष्टीच त्यास प्रतिकूल होतात. मनुष्य आळशी झाला ह्मणजे त्याचा चांगलेपणा मिळविण्याचा मार्ग खुंटतो. नानाप्रकारचा मूर्खपणा त्याच्या अंगांत शिरतो. शेवटीं ज्या सुखासाठीं ह्मणून तो उद्योग सोडून देतो, त्या सुखास देखील अपात्र होतो.

आळशी मनुष्याचें शरीर किंवा मन यांची सुधारणा मुळींच होत नाहीं. मनुष्यस्थिति आणि सृष्टिनियम यांचा विचार केला असतां, असें दिसून येईल कीं, कोणतेंहि सत्कार्य किंवा महत्कार्य उद्योग आणि श्रम यांशिवाय व्हावयाचें नाहीं. उद्योग कधीं कधीं निष्फल होतो, ही गोष्ट खरी; तथापि उद्योग न केला असतां कांहींच व्हावयाचें नाहीं. अधिक बळकट असतो त्याचाच लढाईमध्यें जय होतो असा नियम नाहीं; तथापि अंगांत कांहीं बळ असल्याशिवाय कोणासहि दुसऱ्याशीं टक्कर देतां येणार नाहीं. विद्या शिकून मनाची सुधारणा करावयाची ह्मटली तरी शिक-

ण्याचे श्रम केले पाहिजेत. शरीरशक्ति वाढवावयाची ह्मटलें तरी व्यायामादि उपाय केले पाहिजेत. उगाच बसून कांहीं व्हावयाचें नाहीं. आळसानें शरीरास शैथिल्य येतें, त्याप्रमाणें मनाचाहि समंजसपणा कमी होऊन मोठा बुद्धिमान् मनुष्य अडाण्याप्रमाणें असमंजस होतो. भिन्नभिन्न मनुष्यांमध्यें ज्ञानादिकांच्या संबंधानें न्यूनाधिकभाव पुष्कळ दिसतो, तथापि तो स्वतःच उत्पन्न झाला आहे असें नाहीं; तर त्याचें कारण असें आहे कीं, ज्यांनीं आपली ज्ञानशक्ति उद्योगानें वाढविली, ते विद्वान्, पंडित, या विशेषणांस पात्र झाले; व ज्यांनीं आळसाच्या स्वाधीन होऊन अध्ययनाचा उद्योग केला नाहीं, ते तसेच राहिले. ईश्वरानें जी आपणांस बुद्धिशक्ति दिली आहे, ती आपण उद्योगानें वाढविणार नाहीं तर ती असून नसून सारखीच आहे. अंगीं नुसती बुद्धि असून उपयोग नाहीं. उद्योग करून जगांत ती उपयोगास आणली पाहिजे;नाहीं तर व्यर्थ. आजपर्यंत हजारों बुद्धिमान् पुरुष जन्मले असतील, त्यांस आळसानें घेरिलें नसतें तर तेहि इतरांप्रमाणें नांवारूपास आले असते. पण काय उपयोग ? अरण्यांत एखादें सुंदर फूल फुलावें आणि जागच्या जागींच मावळून गलित व्हावें; त्याप्रमाणें लोकांत राहून त्यांची अवस्था झाली.

दिवसेंदिवस मनुष्याची स्थिति चांगली व्हावी तसें न होतां आळशी मनुष्याच्या सर्व गोष्टी बिघडूं लागतात. लोकांत त्याची कोणी पर्वा करीत नाहीं. वाडवडिलांचें कांहीं द्रव्य जवळ असल्यास खर्चून जातें. एकंदर सर्व घोटाळा होतो. आळसापासून सुख आहे असें वाटलें तरी आळशी होऊं नये. निश्चलपणापासून कदाचित् क्षणभर सुख वाटत असेल, परंतु त्यापासून परिणाम फार वाईट होतात. आळसाच्या योगानें मनुष्याची सुधारणा होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यापासून उलटे त्याच्या अंगीं अनेक दुर्गुण जडतात. स्वभावतःच मनुष्याचें मन कधीं स्थिर रहात नाहीं. त्यास कांहीं तरी व्यवसाय पाहिजे. तें चां-

गल्या उद्योगाकडे लाविलें नाहीं तर भलत्याच व्यसनांकडे वळेल. दुर्गुणांचें मूळ आळस होय. प्रत्येक मनुष्यानें आपल्या अंगच्या दुर्गुणांच्या मूळाचा शोध केला तर त्यास आळसाशिवाय कांहीं सांपडणार नाहीं. अमुक वर्षीं अमुक महिन्यांत अमुक दिवशीं अमुक घटकेस एकाद्याच्या हातून प्रथमतः वाईट गोष्ट घडली; त्याच वर्षीं त्याच महिन्यांत त्याच दिवशीं त्याच घटकेस त्यास कांहीं तरी जरूरीचें काम असतें तर त्याच्या हातून अशी गोष्ट घडली नसती हें उघड आहे. कर्ममार्गाचें बीज हेंच आहे असें शोधक विद्वानांचें मत आहे. कर्ममार्गाचे उद्देश दोन; एक पुण्यसाधन आणि दुसरा पापनिवृत्ति. कित्येक कर्मे जीं व्यर्थ वाटतात, त्यांची पापनिवृत्त्यर्थ योजना आहे. देशांत संपत्ति फार असल्यामुळें रिकामे लोक फार असतात. त्यांवरून आपल्या लोकांत एक म्हणही पडली आहे; एकानें मिळवावें आणि दहानीं खावें. या रिकाम्या लोकांची सन्मार्गाकडे प्रवृत्ति व्हावी म्हणून कर्ममार्गाची योजना झाली.

वर सांगितल्याप्रमाणें एकाद्या वेळीं फुरसत सांपडल्यामुळें पापवासना मनांत उत्पन्न होऊन भलतेंच पापकर्म हातून घडतें. तर नेहमींच जो आळशी त्याची व्यवस्था काय होईल ? त्यास शेंकडों दुर्व्यसनें जडतील, आणि त्याच्या अंगचे सद्गुणांचें बीजसुद्धां भाजून टाकतील. आळसाचा एक परिणाम फार भयंकर आहे; तो हा कीं, त्याच्या योगानें दुर्व्यसनें लागून अनेक वाईट इच्छा अधिकाधिक उत्पन्न होऊं लागतात; व त्या मानानें इच्छा तृप्त करण्याचीं साधनें कमी होतात. उद्योगी मनुष्यास संपत्ति, योग्यता, सुख, यांची इच्छा झाली तर तो सत्कर्मानें उद्योग करून त्या वस्तु प्राप्त करून घेईल. आळशी मनुष्यासहि ह्याच इच्छा असतात, परंतु अंगीं पराक्रम नसल्यामुळें चांगल्या रीतीनें त्यास आपलें काम करितां येत नाहीं. मग लबाडी, लुच्चेगिरी करून आपल्या इच्छा पुरवूं पाहतो.

याच कारणानें जगांत अनेक गुन्हे उत्पन्न होतात. असे लोक असल्यामुळें उद्योगी व प्रामाणिक मनुष्यांस विनाकारण त्रास होतो. याच कारणामुळें श्रम करून पोट भरणाऱ्या प्रामाणिक प्रजेपासून कर घेऊन लोकांच्या रक्षणाकरितां, राजास चौक्या, नाकीं, शिबंदी, तुरुंग ठेवावे लागतात. आळशी मनुष्याचे दोन परिणाम होतात. एक, तो कांहीं श्रम न केल्यामुळें नीच स्थितीस पावून दारिद्र्यानें व दुःखानें व्यापून मरून जातो. दुसरा, आळशी मनुष्य जात्या बळकट असल्यास नानाप्रकारच्या लबाड्या व लुच्चेगिऱ्या करून लोकांस त्रास देऊन चोऱ्या चहाड्या करून, दरवडे घालून, वाटा मारून, सुखाची इच्छा करितो. बहुशः अशा प्रकारच्या लोकांनींच तुरुंग भरून गेले आहेत. फांशीं गेलेल्या लोकांत असेच पुष्कळ सांपडतील. हे आळसाचे व दुर्गुणांचे परिणाम प्रसिद्ध आहेत. हें पाहून तरी मनुष्यांनीं सावध असावें.

आळसापासून दुर्गुण जडतात हें एकीकडे ठेविलें तरी त्यापासून तिळमात्र सुख प्राप्त होतें असें म्हणतां येणार नाहीं. कोणी म्हणेल कीं, अमुक गोष्ट केली आहे तिचें काय होईल, अमुक काम योजिलें आहे त्याचें कसें होईल, अशा उद्योगी मनुष्यास काळज्या व दगदगी असतात, तशा आळशी मनुष्यास मुळींच नसतात. तो निःकाळजी स्वस्थ असतो, हें तर अगदींच खोटें आहे. आळशी मनुष्यासारखी काळजी व अस्वस्थपणा कोणासच नसतो. सतत श्रम केल्यानें मनुष्य स्वस्थ नसतो हें खरें, तथापि श्रम केल्यानंतर जी विश्रांति मनुष्य घेतात तीपासूनच खरें सुख व स्वस्थपणा आहे. तीच खरी विश्रांति होय. वास्तविक पाहतां आळसासारखें उत्साह, सुख व स्वस्थपणा यांचा नाश करणारें दुसरें कांहींच नाहीं. जो श्रम करीत नाहीं त्यास विश्रांति म्हणजे काय हें कधीं कळणार नाहीं. मन नेहमीं सत्कार्यांत गुंतलेलें असल्याशिवाय मनुष्य सुखी

असणार नाहीं. स्वहिताच्या उद्योगांत जें सुख असतें, तें स्वहितांत नाहीं. विश्रांति गोड लागते खरी, पण केव्हां ? श्रम केल्यानंतर. फार वेळ मन निरुद्योगी ठेविलें तर त्याची ग्राहकशक्ति कमी होते. शेवटीं ज्या विश्रांतीपासून आळशी मनुष्य सुखाची इच्छा करीत असतो, ती विश्रांतीच त्यास त्रासरूप होते. जगांत ज्यांस थोडाबहुत अनुभव आहे, त्यांनीं विचारपूर्वक पाहिलें तर त्यांस कळेल कीं, आळशी मनुष्यांपेक्षां उद्योगी मनुष्यांस अधिक सुख होतें. घरीं, दारीं, मंडळींत, कोठें असला तरी, आळशी मनुष्य मंद व उदास असतो. उद्योगी मनुष्यांच्या अंगची तरतरी व आनंदवृत्ति त्याच्या अंगीं नसते. आळशी मनुष्याचा लोकांस त्रास येतो, आणि उद्योगी मनुष्य सर्वांस आवडतो.

वर सांगितल्याप्रमाणें आळसापासून फार तोटे आहेत, हें मनांत आणून सर्वांनीं योग्य उद्योग करावा. आळसाचा प्रवेश न होऊं देण्याविषयीं सर्वदा सावध असलें पाहिजे. कामाच्या वेळा बांधून नेमलेल्या वेळीं नेमलेलें काम काळजीनें करून परमेश्वरानें इहपरलोक साधण्याची जीं अनेक साधनें आपणांस दिलीं आहेत, त्यांचा उपयोग करावा. उदरनिर्वाहाकरितां सर्वांस उद्योग तर करावा लागतोच; तथापि निर्वाहास पुरे इतकें काम करून ज्यांस पुष्कळ वेळ सांपडेल असे पुष्कळ लोक आहेत. अशा वेळेस करण्याकरितां नेहमीं कांहीं तरी एखादें चांगलें काम जवळ असावें. दुःख व दारिद्र्य यांचें मूळ आळस व सुख व संपत्ति यांचें मूळ उद्योग; हें सर्वदा ध्यानांत ठेवावें. सर्वांनीं आपल्या निर्वाहापुरताच उद्योग करावयाचा असें मनांत आणलें असतें तर आज ज्या सुखांत आपण आहों तें सुख आपणांस कधीं प्राप्त झालें नसतें. निर्वाहापेक्षां अधिक उद्योग करणारे लोक ज्या देशांत फार होतात, तोच देश उदयास येतो. प्राचीन काळचे आर्यलोक निर्वाहापुरताच उद्योग करणारे असते तर, त्यांच्या

देशास परदेशाच्या लोकांपासून सुवर्णभूमिका हें नांव प्राप्त झालें नसतें. पाणिनि, गौतम,कणाद, कपिल, जैमिनि, व्यास, वाल्मिकि कालिदास, इत्यादि आर्य या विशेषणास पात्र असे जे ग्रंथकार ते केवळ पोटभरू असते तर आज मोक्षमुल्लर यांसारख्या रसिक युरोपियन लोकांच्या मनांत प्राचीन आर्य लोकांविषयीं प्रेम-पाझर सुटला असता काय? कोलंबसासारखे पुरुष निर्वाहावर लक्ष देणारे असते तर, अमेरिकेचा शोध लागून जग असें अलंकृत झालें असतें काय? शिवाजी स्वसुखाकडे पाहणारा असता, तर मराठ्यांस मुसलमानांपासून कोण सोडविता? मराठ्यांचें राज्य हा शब्द तरी उत्पन्न झाला असता काय? अस्तु. अशीं उदाहरणें लाखों सांपडतील. आजर्यंत जगांत विद्या, शौर्य, इत्यादि गुणांनीं जे पुरुष उदयास आले, त्यांच्या प्रसिद्धीचें आदिकारण शोधून काढूं लागलों तर मोठा उद्योग याशिवाय दुसरें सांपडणार नाहीं. दुसरीं कारणें असलीं तरी तीं गौण होत. केवळ स्वहिताचाच उद्योग करणारा मनुष्य आळशी नसला तरी त्याचा उद्योग मांजराच्या दुग्धप्राप्तीच्या उद्योगाप्रमाणेंच होय. प्रामाणिकपणानें आपला निर्वाह करून जो कांहीं तरी थोडा परहितासाठीं उद्योग करतो, तोच खरा उद्योगी होय.

---

## नम्रता.

अंगीं नम्रता असणें हें शहाणपणाचें चिन्ह होय. 'विद्या ददाति विनयम्' असें वाक्य आहे. यावरून असें समजलें पाहिजे कीं, ज्याच्या अंगीं नम्रपणा आहे, त्याच्या मनावर मात्र विद्येचा परिणाम झाला. दैववशात् अंगीं मोठें शौर्य असलें किंवा एकादी मोठी विद्या साध्य झाली तथापि तिजविषयीं गर्व न करितां एकंदर जगाची स्थिति पाहिली असतां आपण किती क्षुल्लक आहों असें मनांत आणून नम्र असतो तोच खरा विद्वान होय. जगांत आजपर्यंत जे खरे विद्वान होऊन गेले ते सर्व या प्रकारचे

होते. इंग्लंद देशांत सर ऐझाक न्यूतन म्हणून एक मोठा अप्रतिम तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानें ज्योतीष, गणित इत्यादि शास्त्रांत अनेक नवीन शोध केले,त्यास लोक विद्वान ह्मणूं लागले तेव्हां त्यानें सांगितलें कीं, 'एकंदरींत विश्वाच्या मानानें पाहिलें तर समुद्रकिनाऱ्यावर जे असंख्य वालुकाकण आहेत, त्यांतल्या एकाइतकें सुद्धां अद्याप माझें ज्ञान झालें नाहीं.' पूर्ण शहाणपणा परमेश्वराशिवाय कोणाच्याच अंगीं नाहीं; परंतु जो आपली खरोखर योग्यता किती आहे हें समजतो, तोच जगांत मोठा शहाणा होय. जगांत भांडणें, कज्ये, युद्धें,लढाया, वगैरे जे अनर्थ होतात, त्यांस कारण, लोक आपली खरी योग्यता समजत नाहींत हें होय. एका जुन्या पंडितानें ह्मटलें आहे कीं, सर्व विद्यांचा उद्देश मनुष्यानें आपणास ओळखावें हा होय. स्त्रिया, पुरुष, वृद्ध, तरुण, या सर्वांच्या अंगीं नम्रता अवश्य पाहिजे. नम्रतेच्या योगानें दुर्गुण झांकले जातात. सद्गुणांस दुप्पट शोभा येते. अंगीं लीनता नसली तर कितीही शास्त्रें पढलीं तरी व्यर्थ. जो लीन झाला त्यानेंच विद्येची रुचि घेतली असें समजावें. त्यासच ज्ञानापासून मोठा लाभ होईल.

---

## बालाभ्यास.

बालाभ्यास पाहिजे, असें ह्मणतात, तें अक्षरशः खरें आहे. तारुण्यासारखा ज्ञान संपादण्यास कोणताच काल नाहीं. ज्यांस बाळपणीं शिक्षण मिळालें नाहीं, अथवा शिक्षणाची सोय असतां ज्यांनीं ती व्यर्थ घालविली, त्यांस पुढें किती पश्चात्ताप होतो, कोणतीहि गोष्ट समजून घेण्यास ते किती अयोग्य असतात, चार शहाण्या लोकांत बसलें ह्मणजे त्यांची कशी फजिती होते, याचा सर्वांस अनुभव आहेच. बालपण हें कुंभाराच्या मातीच्या गोळ्यासारखें आहे. मातीचा गोळा चांगला ओला आहे तोंपर्यंत त्याचें कुंभारास पाहिजे त्या आकाराचें मडकें करतां

येतें; परंतु वाळून त्याची विरी गेल्यावर हात लावावा तेथें तुकडा पडून त्याचें कांहीं होत नाहीं. असें होऊन पुनः ती माती उपयोगीं पडत नाहीं. त्याप्रमाणें लहानपणीं योग्य अभ्यास न केल्यामुळें बुद्धि एकदा मंद झाली ह्मणजे पुढें त्या मनुष्यास कांहींच समजत नाहींसें होतें. अमुक विषय लहानपणीं अमुक वेळेस अमक्यापाशीं शिकत होतों, त्या वेळेस आपणास भराभर समजत होतें, त्या वेळेस यांत कांहीं कठीण नाहीं असें वाटे; परंतु आतां कांहीं ध्यानांत येत नाहीं असें ह्मणणारे पुष्कळ सांपडतील. परंतु उपयोग काय? वाळलेल्या मडक्याचा कांठ कोठून लवणार?

लहानशा बीपासून मोठा वृक्ष होतो, त्याप्रमाणेंच बालाभ्यासाचीं दहाबारा वर्षें आहेत; तीं जर चांगली घालविलीं तर मनुष्यास पाहिजे तो उद्योग मोठेपणीं करितां येईल. ज्ञान अनंत आहे, त्याचें संपादन जन्मांत संपणार नाहीं. मोठेपणीं इतर व्यवसायांत पुष्कळ वर्षें जातात. तशींच बालपणीं गेलीं ह्मणून काय झालें? असें ह्मणतां येत नाहीं. बालपणीं पुष्कळ अभ्यास करून शिकणें संपवावयाचें असें नाहीं, कारण, असें तर होणेंच नाहीं. परंतु बालपण हा बीजारोपणाचा काल आहे. पेरणीच्या वेळेस बीं पेरलें नाहीं तर पुढें पाऊस चांगला लागला तरी हंगाम चांगला कशानें होणार? शेतांत एक धान्य विपुल पिकलें तर त्याच्या योगानें दुसरें आपणास पाहिजे तें मिळवितां येतें. त्याप्रमाणें लहानपणीं पुष्कळ अभ्यास करून एकच विद्या मनुष्य शिकलेला असला तरी तीपासून अशिक्षित मनुष्यांपेक्षां त्याच्या मनास अधिक ग्राहकता येते. मनुष्य वयानें कितीही मोठा झाला तरी विद्येशिवाय त्याचें बालत्व जात नाहीं. ज्ञानाचा प्रकाश मनोमंदिरांत प्रविष्ट झाल्याशिवाय तमोनाश कधीं व्हावयाचा नाहीं. विद्येशिवाय मनुष्याची विचारशक्ति व न्यायबुद्धि वाढत नाहीं. शहाण्यांनीं लिहिलेले ग्रंथ वाचून मनुष्याचे अंगीं श-

हाणपण येतें. भिन्नभिन्न मनुष्यांमध्यें शहाणपणाचा कमजास्तपणा दिसतो; त्याचें मुख्य कारण बहुशः त्यांमधील विद्येची न्यूनाधिकता हें होय. एक मनुष्य ज्ञानाच्या योगानें अनेकांस ताब्यांत आणितो.

अज्ञानाची गोष्ट पहा किती वाईट आहे ती ! कोलंबस अमेरिकेंत असतां त्याजबरोबरच्या लोकांच्या दुर्वर्तनामुळें तेथील रानटी लोकांचा युरोपियन लोकांवरून भाव उडाला. ते त्यांस पीडा देऊं लागले, तेव्हां कोलंबसानें ज्ञानाची युक्ति लढविली. त्यास ज्योतिषशास्त्र उत्तम येत होतें, त्यावरून उद्यां खग्रास सूर्यग्रहण आहे,हें त्यास एके दिवशीं कळलें. तेव्हां तो त्या अज्ञानी लोकांस ह्मणाला, पहा बरें, विचार करा; आह्मी तुह्मांस सांगत आहों कीं, आह्मी देवाचीं माणसें आहों, आह्मांस त्रास देऊं नका. असें असतां तुह्मीं आह्मांस त्रास दिला; त्यावरून देव फार रागावला आहे. उद्यां तुमचा देव सूर्य मुळींच उगवणार नाहीं हें भाषण ऐकून त्यांसहि आश्चर्य वाटलें. दुसरे दिवशीं पाहतात, तों खरेंच सूर्य कोठेंहि दिसेना. तेव्हां ते लोक घाबरून कोलंबसाच्या पायां पडून देवाचा राग घालवा असें ह्मणूं लागले. कोलंबसास लागत होते त्या सर्व पदार्थांच्या राशी त्यांनीं त्यापुढें घातल्या. ग्रहण सुटण्याच्या सुमारास कोलंबसानें त्यांस सांगितलें कीं, पुन तुह्मी आह्मांस त्रास देऊं नका; आतां मी देवाचा राग शमवितों. नंतर कांहीं वेळानें सूर्य रोजच्या सारखा दिसूं लागल्यावर ते लोक सुखी झाले, आणि कोलंबसाशीं बंद्या चाकराप्रमाणें वागूं लागले. पहा, अज्ञान्यांवर ज्ञानाचा काय प्रभाव तो !

मनुष्याच्या मनास कांहीं तरी व्यवसाय पाहिजे; ज्यास विद्या नाहीं, त्याचे बहुतेक व्यवसाय दुर्गुणांकडे वळणारे होतात. त्यांस रिकामपणा पुष्कळ सांपडतो, त्यामुळें तो दुर्गुणी व दुःखी होतो. अंगीं विद्या असली ह्मणजे शिकणें, शिकविणें, वाचणें, वगैरे

कांहीं तरी उद्योग पाठीमागें असतोच. त्यामुळें दुर्गुणांचा प्रवेश न होतां, सदाचरण व सुख यांची वृद्धि होते.

सर्व अवस्थांमध्यें तारुण्यावस्था विद्या शिकण्यास फारच योग्य होय. कारण, त्या वेळेस मनुष्याचें मन संसाराच्या काळजीनें अस्पृष्ट असतें. इतर गोष्टींकडे लक्ष पुरविण्याची गरज नसते. पाठ करण्याची शक्ति फार चांगली असते. बुद्धि विद्यांची मूलतत्वें शिकण्यास योग्य असते. हेंच मूलतत्वांचें शिकणें मोठेपणीं शुष्क वाटतें. त्यामुळें त्यापासून होणाऱ्या फलास लहानपणीं अभ्यास न करणारे मुकतात. लहानपणीं मन शुद्ध असतें, त्यामुळें जें सांगितलें त्याचा ठसा त्यावर चांगला उठतो. मोठा मनुष्य कांहीं शिकूं लागला म्हणजे त्याचे मनांत दुसऱ्या प्रकारचे अनेक तरंग उत्पन्न होऊन त्यास मुख्य विषय समजत नाहीं. ग्रहण केलेला विषय पुष्कळ वेळ ठेवण्याची योग्यता लहानपणीं असते. अंगीं वयाचा लहानपणा असल्यामुळें कोणासहि विचारून आपलें अज्ञान घालविण्यास अडचण नसते. वयानें मोठे झालेले कित्येक अडाणी मनुष्य, हंः ही एवढीशी गोष्ट यास समजत नाहीं. असें लोक ह्मणतील ह्मणून आपलें अज्ञान झांकून हृदयरूप फडताळांत घालून कुलुपांत ठेवितात.

सदाचरणाची संवय लागण्यासहि लहानपण हा उत्तम काल आहे. लहानपणींच सदाचरण चांगलें ही गोष्ट हृदयांत बिंबली असली तर पुढें मनुष्यांचें मन बिघडण्याची विशेष भीति नाहीं. इहलोकच्या सदाचरणानें परलोकीं सुख होतें, त्याप्रमाणें तारुण्यांत योग्य रीतीनें वागलें असतां, ह्मातारपणीं मनुष्य सुखी होतो. याकरितां साधूंचें वचन आहे, जेणेंकरून ह्मातारपणीं सुख होईल तें पूर्ववयांत करावें. परलोकीं सुख होईल असें बालपणापासून मरणापर्यंत आचरण करावें.

पूर्वे वयसि तत्कुर्याद्येन वृद्धः सुखं वसेत् ॥
यावज्जीवेन तत्कुर्याद्येनामुत्र सुखं वसेत् ॥ १ ॥

## परमेश्वरावर भरंवसा.

या जगांत मनुष्यासारखा निराधार प्राणी कोणीच नाहीं. क्षणोक्षणीं शेकडों महाविपत्ति प्राप्त होण्यास तो पात्र आहे. त्यावर कोठें केव्हां संकट प्राप्त होईल याचा नियम नाहीं. ज्यांचा तिलमात्र संभव नाहीं अशा विपत्ती त्यास एकाएकीं प्राप्त होतात. त्या त्यास निवारितां येत नाहींत. कित्येक प्रसंगीं पुढें विपत्ति येणार असें कळलें तरी मनुष्याच्या हातीं तिचें निवारण करण्याचें सामर्थ्य नसतें. अशा स्थितींत मनुष्य आहे तर त्यास ईश्वरावर भरंवसा ठेवण्यासारखें दुसरें सुखसाधन कोणतेंच नाहीं. या विश्वरूप खेळाचा सूत्रधार परमेश्वर आहे. त्याच्या इच्छामात्रें-करून सर्व होतें. मनुष्यास सुखदुःख त्याचे सत्तेनें प्राप्त होतें. सदाचरणानें वागतात त्यांस तो कधीं विसरत नाहीं. मनुष्याचें हित कोणत्या रीतीनें करावें हें त्यास पूर्णपणें कळतें. असा विचार करून जो या गोष्टी आपल्या मनांत बिंबवील त्यास विपत्ति प्राप्त झाल्या तरी तो त्यांच्या योगानें कधीं दडपून जाणार नाहीं. जो या प्रकारचा विश्वास परमेश्वरावर ठेवीत नाहीं, त्याचें अंतःकरण सर्वदा चिंताक्रांत असतें. परमेश्वराच्या ठायीं विश्वास ठेवणाऱ्यांचे अंगीं स्वाभाविक नम्रता असते. आपण किती दुर्बळ आहों, ईश्वराच्या इच्छेशिवाय आपल्या हातून कोणतेंहि सत्कृत्य घडावयाचें नाहीं, असें समजून तो आपल्या अंगच्या विद्या, शौर्य, इत्यादि गुणांचा गर्व करीत नाहीं. अंगीं गर्व नसल्यामुळें सर्व लोकांस तो आवडतो, अर्थात् सर्व लोक त्याचे मित्र होतात. जो परमेश्वरावर भरंवसा न ठेवितां मी अमुक करीन तमुक करीन असें मानितो, त्याचें अंतःकरण सर्वदा अस्वस्थ असतें, एवढेंच नाहीं, परंतु एकादें त्याचें कृत्य तडीस गेलें ह्मणजे मी मोठा पराक्रमी समजून गर्व वाहूं लागतो. गर्विष्ठ झाला ह्मणजे लोकांस नकोसा होतो. याप्रमाणें परमेश्वरावर विश्वास ठेविल्यानें केवळ पारात्रिकच लाभ आहेत असें

नाहीं, त्यापासून अनेक ऐहिकहि लाभ आहेत. परमेश्वरावर विश्वास ठेवणारा मनुष्य सर्वदा शांत व उल्हासयुक्त असतो. ख-या सुखाचें साधन दुसरें कांहीं त्रिभुवनांत सांपडावयाचें नाहीं. याकरितां एका भगवद्भक्त विद्वानानें ह्मटलें आहे; सर्व शास्त्रें शिकलों, त्यांचा पुनः पुनः विचार केला, त्यांपासून एकच सिद्धांत ठरतो तो हा कीं सर्वदा परमेश्वरावर भरंवसा ठेवून वागावें.

---

## सृष्टिनिरीक्षण.

ह्या अफाट जगांत तिलमात्र अशी जागा नाहीं कीं, तेथें सर्वज्ञ सर्वशक्तिमान् परमेश्वराचें चातुर्य पहावयास सांपडणार नाहीं. विषयासक्त मनुष्यांस परमेश्वराचें ज्ञान होणें फार कठिण आहे; तथापि मनुष्य थोडा विचार करून सृष्टिरचनेकडे पाहील तर त्यास तींतील चमत्कार व सृष्टिकर्त्याचें चातुर्य यांचें आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. मनुष्य किती कां अडाणी असेना, त्यानें थोडें लक्ष पुरविलें पाहिजे. असें केलें तर ईश्वराची अगाध करणी पाहून त्याच्या चित्तास समाधान झाल्याशिवाय राहणार नाहीं. ईश्वरभक्ति एकीकडे ठेवून केवळ सुखाचा विचार केला तरी इतर गोष्टींपासून जें सुख होतें, त्यापेक्षां सृष्टिचमत्कारांच्या अवलोकनापासून मोठें सुख होईल यांत संशय नाहीं. सृष्टिसौंदर्यापासून जें सुख होतें तें शुद्ध सुख असतें. संसारांतील विषयसुख बहुधा दुःखस्पृष्ट असतें तसें हें नसतें.

भक्तिपुरःसर सृष्टिरचनेचा विचार केला तर फारच मोठें अप्रतिम सुख प्राप्त होतें. परमेश्वराचें महत्त्व मनांत येऊन मनाची स्थिति विलक्षण शांत व गंभीर होते. पहा, थोडा विचार केला तरी केवढाले चमत्कार मनांत येतात! नुसतें वर पाहिलें तर आकाशांत काय काय अद्भुत चमत्कार दृष्टीस पडतात! आपल्या प्रचंड तेजानें विश्व प्रकाशित करून सर्वांस सजीव करणारा असा नियमानें आकाशांत भ्रमण करणारा सूर्य; रात्रीस असंख्यात

नक्षत्रमालांनीं युक्त, शांत तेजोमय असा चंद्र; यांच्या लक्षपूर्वक अवलोकनापासून जें मनास सुख होतें, त्याची गणना कोण करील? तशीच मेघगर्जना, वादळ, हीं कोठें कांहीं नसतां एकाएकीं उत्पन्न होऊन सर्व जगास चकित करून टाकितात! यापेक्षां दुसरें कोणतें मोठें आश्चर्य आहे? पहा, आपल्या या भूगोलावरील चमत्कार तरी लहानसहान आहेत काय? केवळ समुद्राचें अगाधत्व आणि विस्तीर्णत्व हींच किती अद्भुत आहेत? वसंतादि ऋतूंचें नियमित येणें, त्यापासून जगास भिन्नभिन्न काळीं भिन्नभिन्न प्रकारची शोभा येणें, भिन्नभिन्न देशांतले भिन्नभिन्न प्राणी, मोठमोठीं राष्ट्रें उदयास येणें व लयास पावणें, या सर्व गोष्टी केवळ ज्याच्या इच्छामात्रेंकरून होतात त्याचें सामर्थ्य मनांत आलें असतां, जो आनंद होतो, त्यास कशाची उपमा देतां येईल?

वर सांगितलेल्या सृष्टिचमत्कारांचा विचार करून ईश्वराचें चातुर्य, कृपालुत्व व महत्व, मनांत आलें असतां, अंतःकरण भक्तिरसपूर्ण होऊन तल्लीन होणार नाहीं, असा कोण मनुष्य असेल? अनंत चमत्कारयुक्त अशा सृष्टींत केवळ पशुसामान्य इंद्रियसुख भोगण्याकरितां आपणांस परमेश्वरानें उत्पन्न केलें आहे, असें समजेल, त्यास नरपशु याशिवाय दुसरें काय नांव द्यावें? सृष्टिनिरीक्षण हें ईश्वरज्ञानास मोठें साधन होय. तद्द्वारा जो ईश्वरप्राप्तीचा उद्योग करील, तो इहपरलोकीं सुखी होईल.

## भूरचना.

पृथ्वीची रचना परमेश्वरानें फार चमत्कारिक केली आहे. वृक्षवनस्पत्यादि उत्पन्न होण्यास योग्य तजवीज केली आहे. तिजमध्यें इतका घट्टपणा ठेविला आहे कीं, मोठमोठे वृक्षसुद्धां तिच्या आश्रयानें उभे राहतात. इतकें असून तींत इतका शिथिलपणा आहे कीं तींत लहान झाडाच्याहि मुळ्या आंत जाण्यास व त्यांच्या योगानें पाणी आकर्षण करण्यास हरकत होत

नाहीं, इतका सैलपणा असून वाऱ्यानें ती कधीं उडत नाहीं. तसेंच सर्वप्रकारच्या वनस्पति व्हावयासाठीं तींत मातीचे अनेक भेद ठेविले आहेत. कोठें काळी माती, कोठें तांबडी, कोठें चिकट, कोठें भुसभुशीत, असे अनेक भेद आहेत. कित्येक ठिकाणीं विटा वगैरे इमारतींत सामान करण्याची व कित्येक ठिकाणीं मडकीं करण्याची मातीच पुष्कळ असते. काव वगैरे कांहीं मातीचेच प्रकार आहेत; त्यांचा रंगांच्या व औषधांच्या कामांत उपयोग करतात. पृथ्वीचा आकार गुळगुळीत नसून तीवर पुष्कळ डोंगर व दऱ्या आहेत, यांपासूनहि मोठा उपयोग आहे. कित्येक झाडें व जनावरें अशीं आहेत कीं, तीं डोंगराशिवाय दुसरे ठिकाणीं व्हावयाचींच नाहींत. तसेच कित्येक खनिज पदार्थ बहुतकरून डोंगरांत होतात. त्याचप्रमाणें झरे वगैरे उदकाचे प्रवाह डोंगरापासून उत्पन्न होतात. जमिनींत धोंडे आहेत, ते घरें बांधण्यास, चुना व कांच तयार करण्यास उपयोगी पडतात. धातूंचे उपयोग तर असंख्य आहेत. फार काय पण त्यांशिवाय मनुष्यांचें चालावयाचें नाहीं. संसारांतील कोणतीहि वस्तू घेतली तरी ती तयार करण्यास साक्षात् किंवा परंपरेनें तरी लोखंडादिक धातूंची गरज लागली नाहीं, अशी कोणती वस्तु आहे ? मीठ वगैरे निर्वाहास अवश्य लागणारे पदार्थ जमिनींत उत्पन्न होतात. फार काय, पण ज्वालामुखी, धरणीकंप, यांपासून अनेक अनर्थ होतात; तथापि त्यांपासूनहि मनुष्यांचे पुष्कळ नफे होतात. पृथ्वीच्या पोटीं जो अग्नी उत्पन्न होतो, तो ज्वालामुखीच्या द्वारें बाहेर न पडल्यास मोठाले अनर्थ होतील. कित्येक गोष्टींचा हेतु आपणांस कळत नाहीं, हें आपलें अज्ञान होय. सृष्टीचा विचार करून परमेश्वराचें चातुर्य मनांत आणते वेळेस प्रत्येक वस्तूचा स्वतंत्र विचार करितां कामा नये; परंतु एकंदरींत सर्वांचा उपयोग मनांत आणिला पाहिजे. कित्येक गोष्टी ज्या आपणांस अपकारक वाटतात, त्या वस्तुतः उपकारक असतात.

कित्येक व्यर्थ वाटतात, त्या आवश्यक असतात. कित्येक वस्तूंचा उपयोग आपणांस माहीत नसल्यामुळें त्या क्षुल्लक वाटतात. लोहचुंबकाचा दगड एखाद्या अडाणी माणसाच्या हातीं दिला तर अं: यांत काय आहे ? असें ह्मणून तो फेंकून देईल. परंतु जर त्यास कोणीं सांगितलें कीं, या दगडापासून होकायंत्राची युक्ति कळली, नौकानयनाची कला याच्या योगानें सुधारली, यामुळेंच अमेरिकाखंडाचा शोध लावितां आला, तर त्यास काय वाटेल ? ज्या कित्येक क्षुद्र वस्तूंस आपण अज्ञानानें तुच्छ मानितों, त्यांविषयींहि असेंच आहे. लक्ष्यपूर्वक जो पृथ्वीच्या रचनेचा विचार करील त्यास परमेश्वराच्या चातुर्याचें प्रत्यक्ष ज्ञान झाल्याशिवाय राहाणार नाहीं. पाश्चात्य विद्वानांनीं भूरचनेचें लक्ष्यपूर्वक अवलोकन करून नवीन भूगर्भशास्त्र उत्पन्न केलें आहे.

---

## समुद्र.

प्राचीन कालीं नौकानयनाची[1] कला माहीत नव्हती तेव्हां लोकांस समुद्र फार भयंकर वाटे. परमेश्वरानें ही पृथ्वीची मर्यादाच केली आहे असें वाटे. आपणास समुद्र दिसतो त्यापलीकडे आपल्या देशासारखा देश असून तेथें आपणासारखीं माणसें आहेत, असें कोणास तरी त्या काळीं वाटलें असेल काय ? समुद्र फार भयंकर वाटत होता, यांत आश्चर्य नाहीं; भय वाटण्यासारखें त्याचें स्वरूप आहे. वादळ होऊन पर्वतासारख्या लाटा उठूं लागल्या ह्मणजे किनाऱ्यावर उभें राहून समुद्राकडे पहाण्याससुद्धां भय वाटतें. समुद्र जितका भयंकर आहे तितकाच हितकारक आहे. आज जगाची जी इतकी सुधारणा झाली आहे, तिला मुख्य कारण समुद्रगमन होय. समुद्रगमन नव्हतें तेव्हां, जुन्या

---

१ याविषयीं माहिती "**नौकानयनाचा इतिहास**" या नांवाच्या पुस्तकांत आहे.

महाद्वीपांतील सर्व देशांतील लोकांस परस्परांच्या अस्तित्वाचें सुद्धा ज्ञान नसे. कित्येक धीट प्रवासी खुपकीनें लांबलांबचा प्रवास करीत; त्यामुळें कांहीं देशांतील लोकांस इतर देशांतील लोकांचें कर्णोपकर्णीं ज्ञान होई. तथापि आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या वस्तु त्यांस पाठवाव्या. आपणास न मिळणाऱ्या त्यांच्या देशांतून आणाव्या, वगैरे गोष्टी मुळींच नसत. कांहीं देशांत परस्पर व्यापार असे; परंतु तो थोडा असून करणें फारच कठिण असे. सांप्रत जगांतील बहुतेक सर्व देशांतील दुर्मिळ पदार्थ पाहिजे त्या देशांत मिळतात. पाहिजे त्या देशांत जाऊन तेथील लोकांच्या रीतिभाति पाहतां येतात. उपभोगाच्या वस्तूंप्रमाणेंच इतर देशांतून आपल्या देशांत ज्ञान आणितां येतें. या सर्व गोष्टींचें आदिकारण समुद्रगमन असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

समुद्राच्या कित्येक गोष्टी ध्यानांत आणण्यासारख्या आहेत. कित्येकांस वाटतें समुद्राचें पाणी गोड असतें तर बरें होतें, परंतु ही चूक आहे. समुद्राचें पाणी खारट असल्यामुळें आपणास आवश्यक जें मीट तें मिळतें. समुद्राचें पाणी खारट असल्यामुळें तें नासून त्यांत किडे पडत नाहींत. गलबतांच्या गतीसहि खारट पाणी अधिक हितावह आहे. समुद्राच्या पाण्याचा रंग सर्व ठिकाणीं सारखा नाहीं. समुद्रांतील प्राणी, झाडें, नद्यांच्या द्वारें त्यांत येणाऱ्या पृथ्वीवरील वस्तु, इत्यादिकांच्या योगानें पाण्याचा रंग बदलतो. समुद्र शांत असला म्हणजे पाणी चकचकीत दिसतें.

समुद्रास दिवसांतून दोनदां भरती व ओहटी येते. पौर्णिमा आणि अमावास्या यांच्या सुमारास भरती फार येते. भरती-ओहटीमुळें समुद्राचें पाणी चांगलें राहून गलबतें जाण्यासही फार उपयोग होतो.

समुद्राचें बाह्य स्वरूप जसें आश्चर्यकारक आहे, तसेंच त्याचें आंतील रूपहि विलक्षण आहे. पृथ्वीवर जसे अनेक पदार्थ, अनेक प्राणी आहेत, तसेंच समुद्रांतहि आहेत. जमिनीपेक्षां

समुद्रांत प्राण्यांच्या जाती कमी आहेत, परंतु त्यांची संख्या फार मोठी आहे. त्यांचें आयुष्य व आकार स्थलचरापेक्षां अधिक असतात, असें शोधक लोकांचें मत आहे. स्थलचरांमध्यें हत्ती मोठा आहे; परंतु समुद्रांत व्हेल नांवाचा मासा असतो त्याशीं तुलना केली तर हत्ती फार लहान आहे असें वाटेल. व्हेल मासा साठ सत्तर हात लांब असतो, आणि तो युरोपांतील ओक झाडाप्रमाणें शें दोनशें वर्षे वांचतो असें म्हणतात.

नौकागमनादिक जे वर उपयोग सांगितले त्यांपेक्षांहि समुद्रापासून मोठा उपयोग आहे. तो असाः—सूर्यकिरणांच्या उष्णतेनें समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन आकाशांत जाऊन तिचे ढग होतात, आणि ते पर्जन्याचे रूपानें खालीं पडतात. यामुळें सर्व स्थावरजंगम सृष्टीचें जीवन होतें. जमिनीप्रमाणेंच समुद्रांत डोंगर, खडक, झाडें, वगैरे रचना आहे. बेटें हीं समुद्रांतील पर्वतांचीं शिखरें आहेत, असें कित्येक लोकांचें म्हणणे आहे. समुद्रामध्यें नवेनवे चमत्कार नेहमीं दृष्टीस पडतात. यावरून असें वाटतें कीं, मनुष्यास माहीत नाहींत अशा हजारों अद्भुत गोष्टी समुद्रांत आढळतील.

सर्व भूगोलावर दोनतृतीयांशांवर समुद्र पसरला आहे. जमिनीचे जसे महाद्वीपें, खंडें, देश, प्रांत असे कृत्रिम विभाग मानिले आहेत, तसेच समुद्राचेंहि विभाग मानिले आहेत. समुद्राचे मुख्य विभाग चार मानिले आहेत. उत्तर महासागर, दक्षिणमहासागर, अतलांतिक महासागर व पासिफिक महासागर. या मुख्य व इतर समुद्रांच्या पोटविभागांचीं वर्णनें भूगोलशास्त्रांत सविस्तर सांगितलीं आहेत. वर सांगितलेले अनेक उपयोग मनांत आणूनच समुद्रास संस्कृतभाषेंत रत्नाकर हें नांव दिलें असावें.

---

## जनावरांची भाषा.

आपल्या मनास जें वाटतें तें दुसऱ्यास कळवितां यावें याकरि-

तां परमेश्वरानें मनुष्यांस वाणी दिली आहे. वाणीच्या योगानें मनुष्य सर्व प्राण्यांत श्रेष्ठ झाला आहे. वाणीच्या योगानें सर्व पृथ्वी आपलीशी करून इतर सर्व प्राण्यांस मनुष्यानें आपले बंदे चाकर करून टाकिलें आहे. हिच्याच योगानें जगांत विचार वाढून मनुष्याच्या अंगीं परमेश्वररूप जाणण्याची योग्यता आली आहे. इतर प्राणी वृक्षादी स्थावर पदार्थांसारखे उत्पन्न होतात, व लय पावतात. मनुष्य मात्र मी कोण, कोठून आलों, मला कोणीं उत्पन्न केलें, या विश्वाचा चालक कोण, वगैरे गोष्टींचा विचार करून परमेश्वरप्राप्ति करून घेतो. ही शक्ति त्यास वाणीपासून प्राप्त झाली आहे.

इतर प्राण्यांस वाणी नाहीं; परंतु तेही खुणांनीं व अव्यक्त शब्दांनीं आपल्या मनांतील उद्देश दुसऱ्यास कळवितात. लहान वासरूं घरीं ठेवून रानांत चरावयास गेलेली गाय परत आली म्हणजे दुरून हंबरूं लागते; तेव्हां तिचें वासरूं तिला गोठ्यांतून जबाब देतें. हें पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, मायलेकरें एकमेकांशीं बोलतच आहेत. कोंबडी फिरत असतां भक्ष्य सांपडलें ह्मणजे शब्द करून आपल्या पिलांस जवळ बोलाविते व तींही तिची इच्छा जाणून लवकर तिच्या जवळ जातात. ती दिसेनाशी झाली कीं, तीं लागलींच दुःखाचा शब्द करूं लागतात. कोंबडा कोंबडीशीं बागडत असतां शब्द करितो, व अनोळखी मनुष्य, कुत्रा, किंवा घार, धरून नेण्यास जवळ आली असतां ओरडतो, या दोन शब्दांत फार अंतर आहे. याचप्रमाणें कुत्रा वगैरे इतर प्राण्यांचेहि हर्षशोकांचे भिन्नभिन्न शब्द आहेत.

असो, सर्व विश्वाचा विचार करितां असें दिसून येतें कीं, वाणी ही परमेश्वरानें मनुष्यास सर्वांत श्रेष्ठ देणगी दिली आहे. शास्त्राभ्यास, ईश्वरगुणानुवाद, उपदेश, इत्यादि वाणीचीं आवश्यक कृत्यें न करितां जो तिचा वाईट उपयोग करितो, ह्मणजे

अपशब्दादिकांचें उच्चारण करितो, तो ईश्वराच्या घरीं मोठा पापी ठरेल यांत संशय नाहीं.

---

## भाषोत्पत्ति.

जिज्ञासा ( जाणण्याची इच्छा ) हा गुण परमेश्वरानें मनुष्याच्या अंगीं ठेविला आहे. याच्या योगानें जगांत अनेक मोठीं कार्यें उत्पन्न होतात. मोठमोठ्या उपयुक्त शास्त्रांचें आदिकरण जिज्ञासा होय. पदार्थांचे गुण कळल्यावर त्यांपासून जगास पुष्कळ उपयोग होतो; तथापि प्रथमतः तत्ववेत्त्यांचें लक्ष्य उपयोगाकडे नसतें, ते केवळ जिज्ञासेनेंच प्रवृत्त होतात. परमेश्वरानें सृष्टि उत्पन्न कशी केली याविषयीं प्राचीन काळापासून सुधारलेल्या सर्व देशांतील तत्ववेत्ते आपआपल्या ज्ञानवृद्धीच्या मानानें विचार करून आपल्या समजुतीप्रमाणें सिद्धांत करीत आले. सर्वांच्या सिद्धांतांत थोडाबहुत फरक आहे; तथापि परमेश्वरानें सृष्टिकर्ता एक प्राणी उत्पन्न केला; यापासून हा सगळा विस्तार आहे, या विषयीं सर्वांचें एकमतच आहे. आलीकडे युरोपांतील सुधारलेल्या देशांत जगाची पूर्वस्थिति जाणण्याविषयीं उत्कट इच्छा उत्पन्न झाली आहे. तीमुळें भूगर्भशास्त्र वगैरे अनेक विद्या उत्पन्न झाल्या आहेत. तिकडल्या विद्वान लोकांत मनुष्याच्या उत्पत्तीविषयीं दोन पक्ष झाले आहेत. शरीरच्छेदन करून तदंतर्गत मांस, अस्थि, स्नायु, मज्जा इत्यादिकांची परीक्षा करितां या संबंधानें कित्येक मनुष्यजातींच्या शरीररचनेंत परस्पर भेद दृष्टीस पडतो, त्यामुळें एका पक्षाचें ह्मणणें असें आहे कीं, हल्लींची सर्व मनुष्यें एकाच जातीचा विस्तार नव्हे; एकाच काळीं किंवा भिन्न काळीं कांहीं थोड्या स्थळीं मनुष्यें फार प्राचीन काळीं उत्पन्न झालीं; त्यांचा पुढें विस्तार झाला, या कारणानें शरीररचनेंत भेद आहे. एकाचा सर्व विस्तार हें जें प्राचीन आद्यग्रंथांचें ह्मणणें आहे तें त्या त्या देशाच्या संबंधानें मात्र खरें आहे; सर्व पृथ्वी-

च्या संबंधानें खरें नाहीं. दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें असें आहे कीं सर्व पृथ्वींतील मनुष्यें एकाच मूलाचा विस्तार आहे हें संयुक्तिक व संभवनीय दिसतें. कारण शरीररचनेंत भेद फारच थोड्या ठिकाणीं आढळतो; व तोहि मूल भेदामुळें नसून हवा, पाणी, भक्ष्य इत्यादिकांच्या भेदामुळें झालेला आहे.

वर मनुष्याच्या उत्पत्तीविषयीं जो जिज्ञासेचा प्रकार सांगितला तसाच भाषेच्या पूर्वस्थितिच्या जिज्ञासेचा आहे; तथापि हा सर्व देशांत सारखा नाहीं. प्राचीन काळीं भरतखंडांतील ऋषींचें भाषाचमत्काराकडे फारच लक्ष लागलें होतें. व्याकरण व व्युत्पत्ति या विषयांवरील त्यांचे ग्रंथ पाहिले म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें. शद्बांचें पृथक्करण करून त्यांनीं असें ठरविलें कीं संस्कृत भाषेंतील सर्व शद्ब क्रियावाचक धातूंपासून झाले. ( सर्व धातुजम् ) यामुळेंच बहुतेक संस्कृत शद्बांची धात्वर्थमूलक उत्पत्ति सांगता येते. हा जो शद्बांची धात्वर्थमूलक उत्पत्ति सांगण्याचा प्रकार त्यास "व्युत्पत्ति" ( वि+उत्पत्ति ) असें नांव पडलें. कालांतरानें कित्येक धातूंपासून उत्पन्न झालेलीं नामें मात्र भाषेंत राहून ते धातु नष्ट झाले, त्यामुळें, कित्येक शद्बांची व्युत्पत्ति सांगता येईना. तेव्हां कांहीं शब्द अव्युत्पन्नही असतात असें मानून कांहीं पंडितांनीं व्युत्पन्न आणि अव्युत्पन्न असे शब्दांचे दोन विभाग केले. तथापि सर्वांचें मत असें आहे कीं, मनुष्यांचें आद्यस्थान भरतखंड होय, व आद्यभाषा संस्कृत होय. जे भरतखंडांतील आर्यलोक राज्यादिलोभानें दुरदेशीं गेले ते आर्याचाररहित झाले; व विद्वान् आर्यांचा समागम नसल्यामुळें अशुद्ध बोलूं लागले, ते म्लेंच्छ म्हणजे अशुद्ध बोलणारे झाले. यामुळेंच पुष्कळ भाषांत पितृ, मातृ इत्यादि निकटसंबंधवाचक व द्वि, त्रि इत्यादि संख्यावाचक शब्द संस्कृत त्या त्या शब्दांचे अपभ्रंश आहेत.

आलीकडे युरोपांतील सुधारलेल्या देशांतील विद्वानांचें भाषा-

मूलशोधाकडे लक्ष्य फार लागलें आहे. त्यांचे असे पूर्वपक्ष आहेत कीं, ईश्वरानें मनुष्य उत्पन्न करून त्यास वाणी म्हणजे भाषणद्वारा मनोगत दुसऱ्यास कळविण्याची शक्ति दिली; असें प्राचीन ग्रंथांत सांगितलें आहे, तर ईश्वरानें दिलेली ती भाषा कोणती असावी. कारण प्राचीन अशा अनेक भाषा आढळतात व त्यांतही कालभेदानें पुष्कळ भेद आहेत. यावर कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, जगांत मनुष्याच्या सुखास साधनीभूत अशा अनेक कला आहेत, परंतु त्या ईश्वरानें मनुष्यांस एकदम दिल्या नाहींत, तर त्या बीजरूपानें त्याने प्रथमतः उत्पन्न केल्या. उदकसेचनादि मनुष्यश्रमानें अतिसूक्ष्म बीजाचा अतिविशाल वृक्ष होतो; पदार्थांमध्यें जे गुण ईश्वरानें ठेविले आहेत त्यांचें ज्ञान जसजसें वृद्धिंगत होत जातें तसतशा अनेक कल्पना होत जातात, त्याप्रमाणें भाषणशक्ति बीजरूपानें मनुष्यांत होती, तीच हळूहळू सुधारत बहुत कालानें भाषारूप पावली. याकरितांच फार प्राचीन भाषांची सुद्धां कालभेदानें अनेक रूपें आढळतात. ज्या रूपानें प्राचीन भाषा सांप्रतकाळीं आढळतात त्यांची पूर्व स्थिति काय असावी अशाविषयीं अनेक विद्वानांनीं अनेक तर्क केले आहेत. कित्येक म्हणतात, आरंभीं मनुष्यें केवळ पशुपक्ष्यांप्रमाणें अव्यक्तध्वनीच्या योगानें इंगित कळवीत असतील, नंतर सुधारणा होऊन व्यक्त वर्णोच्चार करूं लागलीं. नंतर वर्णसंयोग करून मनुष्यांनीं शब्द उत्पन्न केले. असे अनेक विद्वानांचे अनेक तर्क आहेत. तथापि सर्वांचा असा सिद्धांत झाला आहे कीं, संस्कृत वैयाकरणांनीं जे धातु म्हणून मानिले आहेत, तें भाषेचें मूळ होय. त्यापलीकडे भाषेची काय स्थिति असावी, याचा शोध लागत नाहीं. जगातील सर्व भाषांचें मूळ एक असून देशकालभेदानें एकाचीं अनेक रूपांतरें होऊन पुष्कळ भाषा अगदीं वेगळाल्या झाल्या. यत्न केला असता त्याचें एकमूलत्व सिद्ध करितां येईल. कित्येकांचें म्हणणें असें आहे कीं, भाषा पूर्वीं कशीहि उत्पन्न

झाली असली तरी एककाळीं किंवा भिन्नकाळीं कांहीं थोड्या वेगळाल्या ठिकाणीं उत्पन्न झाली. मनुष्याच्या शरीररचनेचा विचार केला ह्मणजे पृथ्वींतील सर्व मनुष्यांचें एक उत्पत्तिस्थान ह्मणतां येत नाहीं; त्याप्रमाणें भाषावयव जे शब्द त्यांच्या रचनेचा विचार केला ह्मणजे सर्व पृथ्वींतील भाषा एका एका मूळाचा विस्तार असें ह्मणतां येत नाहीं.

हल्लीं पृथ्वीवर सुमारें ९०० वेगळाल्या भाषा आहेत; त्यांचे मूळाच्या संबंधानें युरोपांतील विद्वानांनीं, आर्य, तुराणी आणि शमी, असे तीन वर्ग मानिले आहेत.

संस्कृत, झेंद, लातीन व ग्रीक, या व यांच्यापासून झालेल्या एशिआ व यूरोपखंडांतील भाषा व दुसऱ्या कित्येक भाषा आर्यवर्गांत येतात.

## संस्कृतभाषा.

सांप्रतकाळीं भूतलावर ज्या प्राचीन भाषा उपलब्ध आहेत त्या सर्वांत संस्कृत भाषा अतिप्राचीन होय, हें अर्वाचीन शोधक विद्वानांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. ऋग्वेदसंहितेइतकें प्राचीन पुस्तक जगांत दुसरें कोठें नाहीं; असें विद्वानांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. ऋग्वेदसंहितेची भाषा हें संस्कृत भाषेचें आद्य स्वरूप होय. त्याच्या पूर्वीं तिचें वेगळें स्वरूप होतें असें मानिलें तरी तें कसें होतें हें आतां सांगतां यावयाचें नाहीं. ऋग्वेदसंहितेच्या कालचे आर्यलोक त्या काळीं विद्या, कला इत्यादि सर्व गोष्टींत सर्व जगांत विशेष सुधारलेले होते, हें पुढें प्राचीन आर्यांचा इतिहास यांत लिहिल्यावरून स्पष्ट कळेल.

ऋग्वेदसंहितेपासून अर्वाचीन काव्यनाटकांपर्यंत संस्कृत भाषेंत जो ग्रंथसमूह सांपडतो त्याचे श्रुति, स्मृति, पुराण आणि इतर ग्रन्थ असे चार विभाग कल्पिले आहेत. यांपैकीं पहिला ह्मणजे श्रुति हा अति प्राचीन भाग होय. यापासून धर्माचें श्रवण

होतें ह्मणून यास श्रुति असें ह्मणतात. तसेंच यापासून धर्माचें ज्ञान होतें ह्मणून याला वेद असें ह्मणतात. हा ईश्वरप्रणीत ह्मणजे परमेश्वरानें केलेला आणि अनादि असें आर्यांचें मत आहे. ईश्वरप्रणीत याचा अर्थ असा आहे कीं, मनुष्याच्या ज्ञानास अगम्य असे जे स्वर्गादि विषय ते ज्यांत प्रतिपादित आहेत तो ग्रन्थ. असा ग्रन्थ, ईश्वरप्रेरणेशिवाय होणार नाहीं हें उघडच आहे. कोणी असें ह्मणेल कीं, पृथ्वींत जे आर्यधर्माशिवाय दुसरे धर्म आहेत त्यांस अनुसरणारे सुद्धां आपापलीं आद्य धर्म-पुस्तकें ईश्वरप्रणीत असें ह्मणतात. त्यावर शास्त्रज्ञांचें असें उत्तर कीं, भाषाशास्त्रावरून व इतिहासारून त्यांचें आधुनिकत्व स्पष्ट दिसतें व कित्येकांचे कर्तेंहि ज्ञात आहेत, यावरून तीं वास्तविक ईश्वरप्रणीत नसून तत्तद्धर्मप्रवर्तकांनीं श्रद्धादार्ढ्यार्थ त्यांस ईश्वरप्रणीतत्व सांगितलें आहे.

ईश्वरप्रणीतत्वाविषयीं दुसरें प्रमाण असें कीं, या वेदाचा ईश्वराशिवाय दुसरा कर्ता कोठें उपलब्ध नाहीं. आतां कोणी ह्मणेल कीं, असे कित्येक ग्रन्थ आहेत कीं, त्यांचे कर्ते कोण हें कळत नाहीं ह्मणून त्यांस ईश्वरप्रणीत ह्मणावें कीं काय ? यावर शास्त्रज्ञ उत्तर असें देतात कीं, लहान सहान सामान्य ग्रंथांच्या कर्त्यांचीं उपलब्धी नसली तरी अनेकज्ञानपरिपूर्ण सर्व आर्यधर्मा-धार जो वेदासारखा मोठा ग्रन्थ त्याचा कर्ता मनुष्य असल्यास तो अज्ञात राहील व अशा अज्ञात मनुष्यास लोक अनन्यभावें अनुसरतील हें संभवत नाहीं. आधुनिक विद्वान् प्रतिपादन करतात कीं, वेदाचा कर्ता मनुष्य असेल. तेच आणखी असेंहि ह्मणतात, कीं, जगांत पूर्वीं सुधारणा नव्हती, अलीकडे होत चालली आहे. हीं त्यांचीं दोन प्रतिपादनें एकमेकांस खोडून टाकतात. महाभारतांत कित्येक गोष्टींचे काल सांगितले आहेत, त्यावरून गणित करतां असें सिद्ध होतें कीं, सात हजार वर्षां-पूर्वीं भारतसंग्राम झाला. यावरून व इतर प्रमाणांनीं पहातां

निदान पंधरा हजार वर्षांपूर्वी वेदाची उत्पत्ति झाली असें मानलेंच पाहिजे. आधुनिक विद्वान वेद मनुष्यप्रणीत ह्मणतील तर पंधरा हजार वर्षांपूर्वी हल्लींपेक्षां अधिक विद्याप्रसार होता असें त्यांस कबूल केलें पाहिजे. कारण विद्याप्रसार विपुल असल्याशिवाय विशाल ज्ञानाचें वेदरूप भांडार कसें उत्पन्न होईल? आधुनिक विद्वानांचें ह्मणणें कीं, विद्याप्रसार हल्लीं विशेष आहे, हें खरें असेल तर पंधरा हजार वर्षांपूर्वी लोक अज्ञानांधकारांत असतील, तेव्हां सर्वज्ञ ईश्वराशिवाय वेदासारखा प्रमाणभूत ग्रन्थ कोण करील? याप्रमाणें आधुनिकांचे तर्क परस्परांस बाधक होऊन वेद ही अमानुषकृति आहे असें मानणेंच सयुक्तिक दिसतें असें शास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे. वेद ही अमानुषकृति आहे असें मानण्यास दुसरें असें कारण कीं, अतिप्राचीन काळीं झालेले मनुस्मृति, महाभारत इत्यादि ग्रन्थांतील ज्ञान वेदमूलक आहे असें ते ग्रन्थच ह्मणतात; परंतु वेदप्रतिपादित ज्ञान स्वतःप्रमाण होय, त्यास दुसऱ्या ग्रन्थाचें प्रमाण नाहीं. त्यास दुसरा आधार होता असें दाखवितां येत नाहीं. वेदाच्या अमुक भागाचे अमुक ऋषि द्रष्टे असें सांगितलें आहे, त्यावरून हे ऋषिच त्या त्या वेदभागांचे कर्ते असें कित्येकांचें ह्मणणें आहे; परंतु हें सयुक्तिक नाहीं असें शास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे. कारण स्मृतिकार अनेक असल्यामुळें ते जसा कित्येक विधिनिषेध स्थलीं स्वमतपरिपुष्ट्यर्थ किंवा मतभेदार्थ दुसऱ्या ऋषीचा नांवानें उल्लेख करतात तसें वेदांत दृष्टीस पडत नाहीं. अनेक कर्ते असते तर अशी गोष्ट अवश्य झाली असती. एकाद्या ग्रन्थकारानें पुष्कळ ग्रन्थ केले ह्मणजे तो कारणपरत्वें पुढील ग्रन्थांत आपल्या पूर्वीच्या ग्रन्थांचा उल्लेख करतो. याज्ञवल्क्य ऋषीनें धर्मशास्त्रांत योगाविषयीं उल्लेख करून माझ्या योगशास्त्रांत हें पाहावें असें म्हटलें आहे, त्याप्रमाणें यजुर्वेदांत ‘ ऋग्वेदांत हें सांगितलें आहे ’ असा उल्लेख वारंवार येतो. या व इतर अनेक प्रमाणांवरून वेद एक

कर्तृक असावा असें सिद्ध होतें. सांप्रतकाळीं छापखान्यावरून किंवा प्रकाशकांवरून ग्रन्थाची प्रसिद्धि होते, त्याचप्रमाणें ज्या ज्या ऋषींनीं त्या त्या विशेष वेदभागांतील कर्मादिकांचें अनुष्ठान केलें त्यांच्या नांवानें त्यांची प्रसिद्धि झाली हें स्वाभाविक आहे.

प्राचीनकाळचे ऋषि सर्व वेदराशीचें अध्ययन करीत. त्यांनीं विषयसंबंधानें वेदाचे चार भाग कल्पिले. त्यांस अनुक्रमें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद अशीं चार नांवें दिलीं, यांपैकीं प्रथम तीन हे आर्यांच्या मुख्य धर्मक्रिया जे यज्ञ त्यांस उपयुक्त आहेत. चवथ्याचा यज्ञकर्मानुष्ठानाशीं विशेष संबंध नाहीं, एवढ्यावरून प्राचीन ग्रन्थांत कोठें कोठें वेदत्रयी ह्मणजे तीन वेद असें म्हटलें आहे. सर्व वेदांमध्यें प्रतिपादित विषय तीन, कर्म, उपासना आणि ज्ञान. प्रत्येक वेदाचे मंत्र आणि ब्राह्मण असे दोन विभाग कल्पिले आहेत. मंत्रभागास संहिता असें ह्मणतात. यांत यज्ञमंत्रांचा संग्रह असतो. ब्राह्मण भागाचे दोन विभाग कल्पिले आहेत. ज्यांत यज्ञकर्मसंबंधाची विस्तृत चर्चा असते तो विभाग ब्राह्मण या शब्देंकरून प्रसिद्ध आहे. ज्यांत उपासना व ब्रह्मज्ञान यांचें प्रतिपादन आहे त्यास आरण्यक किंवा उपनिषत् असें ह्मणतात. प्राचीनकाळीं प्रत्येक वेदाचे अध्ययनसंप्रदायप्रवर्तक अनेक ऋषि होऊन गेले, त्यांच्या नांवांवरून प्रत्येक वेदाच्या अनेक शाखा झाल्या, त्यांपैकीं कित्येक प्रसिद्ध आहेत व कित्येक उच्छिन्न झाल्या. याप्रमाणें संस्कृत भाषेंतील ग्रन्थसमूहाचा जो अतिप्राचीन भाग त्याचें अतिसंक्षिप्त वर्णन झालें.

आतां दुसरा भाग स्मृति. या प्राचीन काळच्या ऋषींनीं वेदार्थाचें स्मरण करून केल्या, ह्मणून त्यांस स्मृति असें ह्मणतात. स्मृति दोन प्रकारच्या आहेत. सूत्रात्मक आणि श्लोकात्मक-सूत्रात्मक स्मृति प्राचीन आहेत. वेद नेहमीं शुद्ध रीतीनें ह्मणतां यावा. त्याच्या अर्थाचें सत्य ज्ञान निरंतर सारखें रहावें, त्यांत सांगितलेल्या कर्मांचें अनुष्ठान यथाविधि व यथाकालीं व्हावें

ह्मणून वेदांगें झालीं. वेदांगें सहा आहेत. तीं येणेंप्रमाणें.—१ शिक्षा, २ कल्प, ३ व्याकरण, ४ निरुक्त, ५ छंद, ६ ज्योतिष. शिक्षेमध्यें वेदमंत्रांचें उच्चारण कसें करावें हें सांगितलेलें असतें. शिक्षाग्रन्थ पाणिनि, शौनक इत्यादि ऋषींनीं केले. कल्प म्हणजे वर सांगितलेले शाखासंप्रदायप्रवर्तक जे ऋषि त्यांनीं केलेले यज्ञादि क्रिया व उपनयनादि संस्कार यांच्या अनुष्ठानांचें विस्तरशः प्रतिपादन करणारे ग्रन्थ. वेदघटकशब्दांचे खरे स्वर व अर्थ कळावे, वेदांत सामान्यरीतीनें मंत्र सांगितले आहेत त्यांत विशेषप्रसंगीं विभक्ति वचन यांचा भेद करून त्यांचा योग्य रीतीनें उपयोग करतां यावा, इत्यादि कारणांकरितां प्रकृतिप्रत्ययरूपानें शब्दांचें विवरण करून पाणिनीनें व्याकरणशास्त्र केलें. वेदमंत्रांचे अर्थ, देवता व योजना इत्यादि कळावीं ह्मणून यास्कऋषीनें निरुक्त केलें. वेदांतील ऋचांचे वेगवेगळाले छंद कळावे ह्मणून पिंगलानें छंदःशास्त्र केलें. वेदांत सांगितलेले याग यथाकालीं व्हावे ह्मणून गर्गमुनीनें ज्योतिःशास्त्र केलें. या आद्यग्रन्थांवर पुष्कळ टीकाग्रंथ होऊन कित्येक शास्त्रांचा विस्तार इतका झाला आहे कीं, त्यांच्या समग्र ग्रन्थांचें अध्ययन सर्व आयुष्यांत एका मनुष्याच्यानें होणार नाहीं.

यानंतर वेदप्रतिपादित धर्म व ईश्वर यांचें वास्तव ज्ञान व्हावें ह्मणून सहा दर्शनें ह्मणजे तत्त्वप्रतिपादक शास्त्रें उत्पन्न झालीं. तीं येणेंप्रमाणें.—१ सांख्य, २ योग, ३ न्याय, ४ वैशेषिक, ५ धर्ममीमांसा व ६ ब्रह्ममीमांसा. सांख्यशास्त्र कपिलमहामुनीनें केलें. योगशास्त्र पतंजलीनें केलें. न्यायशास्त्र गौतममुनीनें व वैशेषिक कणादमुनीनें केलें. धर्ममीमांसेचा कर्ता जैमिनिमुनि व ब्रह्ममीमांसेचा कर्ता व्यासमुनि. हे सर्व मुनि ईश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सच्चिदानंदस्वरूप, सर्वदुःखातीत आहे, वेद हा तत्कृत आहे, ह्मणून प्रमाण आहे, असें मानतात. यांनीं जीं त्या त्या शास्त्राचीं मूलभूत सूत्रें केलीं त्यांवर इतकीं

भाष्यें, वार्तिकें व टीका झाल्या आहेत कीं, बुद्धिमान् शतायु मनुष्याच्या हातून देखील त्या सर्वांचें पर्यालोचन होणार नाहीं.

धर्म, आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, नीति इत्यादि विषयांचें सविस्तर प्रतिपादन करणारे पद्यात्मक स्मृतिग्रन्थ मनु, याज्ञवल्क्य, व्यास, वसिष्ठ इत्यादि अनेक ऋषींनीं केले. या सर्वांत मनु आणि याज्ञवल्क्य यांचे ग्रन्थ विशेष विस्तृत असून सर्वमान्य झाले आहेत. मनुस्मृतीच्या नुकत्याच सात टीका छापून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यावरून मनुस्मृतीस आर्यलोक केवढा मान देत आले हें स्पष्ट कळेल.

आतां तिसरा ग्रन्थसमूह पुराणें. हीं अठरा आहेत, हीं सर्व व्यासानें केलीं; यांत सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय यांचें वर्णन, देवदैत्यांचें वर्णन, प्राचीन राजांच्या भक्तिज्ञानवैराग्यपर कथा, कर्म,उपासना, ज्ञान यांचें निरूपण, इतिहास इत्यादि गोष्टी येतात.

चवथा विभाग इतर ग्रन्थ. याचाहि प्राचीनकाळापासून भरणा होत आला आहे; यांतहि वैद्यशास्त्र, शिल्पशास्त्र, यासारख्या अत्यंत उपयुक्त विषयांवर चरक, सुश्रुत, वाग्भट, वराहमिहिर अशा महापंडितांनीं अत्युत्तम ग्रन्थ केले आहेत. तसेंच मध्व, रामानुज, वल्लभ इत्यादिकांनीं केलेले अनेक मतग्रन्थ आहेत. तसेंच वाल्मिक्यादिकवींनीं केलेले काव्यादि ग्रन्थ व कालिदासादिकवींनीं केलेले नाटकादि ग्रन्थ येतात. यांशिवाय शाक्तमार्गादिप्रतिपादक अनेक तंत्रग्रन्थ आहेत. यांशिवाय वेदास ईश्वरप्रणीतत्व न मानणारे बौद्ध, जैन इत्यादिकांचेहि असंख्य ग्रन्थ आहेत. असा हा संस्कृतभाषाग्रन्थसमुद्र अपार, याचें वर्णन करावें तितकें थोडेंच. स्थलसंकोचामुळें याचें विशेष वर्णन येथें करतां येत नाहीं. मराठी वाचकांकरितां अति संक्षिप्त दिक्प्रदर्शन केलें आहे.

# प्राचीन आर्यांचा इतिहास.

स्वयंभू सर्वशक्तिमान् सच्चिदानंद परमेश्वरानें हें अनंतचमत्कारपरिपूर्ण जग उत्पन्न केलें. खसखशी ऐवढ्या वटबीजामध्यें जसा मोठा वटवृक्ष लीन असतो त्याप्रमाणें हें जग सृष्टिकालापूर्वीं नामरूपविरहित सत्स्वरूपानें परमेश्वरस्वरूपीं लीन होतें असें श्रुतीमध्यें सांगितलें आहे. जेव्हां परमेश्वरास सृष्टि करण्याची इच्छा उत्पन्न झाली, तेव्हां त्यानें प्रथमतः आकाश, त्यापासून वायू, वायूपासून अग्नि अग्नीपासून उदक, उदकापासून पृथ्वी, पृथ्वीपासून ओषधि, ओषधींपासून अन्न, अन्नापासून पुरुष याप्रमाणें सृष्टि उत्पन्न केली. असा सृष्टिक्रम यजुर्वेदाच्या तैत्तिरीयशाखेंत सांगितला आहे. सृष्टि निर्माण करण्याची इच्छा झालेल्या परमात्म्यास हिरण्यगर्भ असें ऋग्वेदाच्या आठव्या अष्टकाच्या सातव्या अध्यायाच्या सातव्या वर्गांत म्हटलें आहे. मन्वादिस्मृतिकारांनींहि हाच उत्पत्तिक्रम सांगितला आहे. यावरून भूतभविष्यवर्तमान सर्व वस्तु सर्वज्ञ सर्वशक्तिमान् परमेश्वरापासून उत्पन्न होतात असें आर्यांचें मत आहे; हें स्पष्ट होतें.

आतां आर्यांचें मूलस्थान कोणतें याविषयीं विचार करूं. ब्रह्मावर्ताजवळचे कुरुक्षेत्र, मत्स्यदेश, पांचालदेश, शूरसेनदेश, हे सर्व ब्रह्मर्षींचें स्थान होय. या देशांत जन्मलेल्या ब्राह्मणांपासून पृथ्वीतील सर्व लोकांनीं आपापले धर्म शिकावे, असें मनुस्मृतींत दुसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे. कुरुक्षेत्राचें वर्णन शतपथब्राह्मण, जाबालोपनिषत्, इत्यादिकांत सांपडतें. तसेंच, गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्रि, परुष्णि हीं भरतखंडांतील प्रसिद्ध नद्यांचीं नांवें ऋग्वेदांत सांगितलीं आहेत, व सिता ( पांढरी—गंगा ) आणि असिता ( काळी—यमुना ) ह्या नद्यांचा जेथें संगम होतो तेथें स्नान करतात ते स्वर्गास जातात, असें ऋग्वेदांत सांगितलें आहे; यावरून कुरुक्षेत्रादि देशच आर्यांचें मूलस्थान होय हें स्पष्ट आहे.

कित्येक असें म्हणतात कीं, आर्य लोकांस हिंदु असें ह्मणतात, यावरून ते दुसऱ्या देशांतून येथें आले असावे. पूर्वी जलप्रलय झाला, तेव्हां सर्व मनुष्यादिप्राणी उदकांत बुडून नष्ट झाले. काकेसस पर्वतावर एक पुरुष जिवंत राहिला; त्याची संतति वाढून तिचा एक भाग युरोपखंडांत गेला व दुसरा इराणांत आला; तेथें त्यांची पुष्कळ वसाहात झाल्यावर त्यांतील कित्येक लोक सिंधुनदाच्या दोन्ही तीरांस येऊन राहिले, ह्मणून त्यांस सिंधु असें म्हणतां म्हणतां कांहीं दिवसांनीं हिंदु असें म्हणूं लागले तेच हे भरतखंडांतील आर्य होत. भरतखंड हें त्यांचें मूलस्थान नव्हे. ही कल्पना सर्वांशीं संभवत नाहीं. तो जलप्रलय सर्व ठिकाणीं झाला असें नाहीं. याकरतां एकच पुरुष शेष राहिला असें म्हणतां येत नाहीं. सर्व ठिकाणीं जलप्रलय झाला असें म्हटलें तर एकच पुरुष प्रलयकालच्या उदकांत बुडाला नाहीं, याजवर विचारी मनुष्य विश्वास ठेवणार नाहीं.

तसेंच जे आर्यभिन्न लोक स्वदेश सोडून भरतखंडांत आले त्यांचा परिचय प्रथमतः सिंधुदेशांतल्या लोकांशींच झाला, त्यामुळें सर्व आर्य लोकांस, त्यांनीं तेंच नांव दिलें असावें अशीहि कल्पना संभवते. जलप्रलयाची गोष्ट अंशतः खरी आहे; कारण शतपथ ब्राह्मण, भारत, रामायण इत्यादि प्राचीन ग्रन्थांत मत्स्यावतारकथा वर्णिली आहे. जलप्रलयाच्या वेळेस मनु आपल्या परिवारासहवर्तमान नावेंत बसला, ती नाव परमेश्वरानें मत्स्यरूप घेऊन जलप्रलयांतून तारिली. नंतर जलप्रलयाचें संकट गेल्यावर मनु पुत्रपौत्रादिकांसहवर्तमान सुखी झाला. त्यापासून सर्व प्रजा उत्पन्न झाल्या म्हणूनच सर्व द्विपादप्राण्यांस, मनुज, मनुष्य, मानव हीं नांवें प्राप्त झालीं.

कित्येक असें म्हणतात कीं, मनूपासून मनुष्य झाले, मनु देवापासून झाला, देवाचें स्थान स्वर्ग होय, या गोष्टी वेदादिकांत सांगितल्या आहेत. यावरून असें सिद्ध होतें कीं, हिमालय पर्व-

ताच्या उत्तरेकडील प्रदेश हेंच आर्यांचें मूलस्थान होय; कारण तेथें तिबेट देश आहे, तिबेट हा स्वर्गवाचक त्रिविष्टप शब्दाचा अपभ्रंश असावा; हें ह्मणणेंहि बरोबर नाहीं. तिबेट हा त्रिविष्टप शब्दाचा अपभ्रंश मानला तरी आर्यलोक ज्यास स्वर्ग ह्मणतात तोच हा असें मानण्यासच आधार नाहीं. पृथ्वीहून स्वर्गलोक निराळा, ही गोष्ट श्रुति, स्मृति वगैरे सर्व प्राचीन ग्रन्थ, कोश, काव्यें नाटकें वगैरे अर्वाचीन ग्रन्थ यांत स्पष्ट सांगितली आहे. हिमालयाच्या उत्तरेकडील देशहि आर्यांचेच. तें आर्यभिन्नांचें वसतिस्थान नव्हे असें आर्य लोक मानतात. परंतु तीं पवित्र धर्मक्षेत्रें होत असें समजतात; कारण भारतादि ग्रन्थांत, श्वेतगिरी, कैलास, मानससरोवर, उत्तरकुरु, इत्यादिक स्थलांचें माहात्म्य तीर्थयात्रेच्या संबंधानें वर्णिलें आहे. या स्तुतिवचनांवरून, हीं क्षेत्रें हाच काय तो स्वर्ग, दुसरा देवनिवासरूप कोणताहि स्वर्ग नाहीं, असा श्रुतिसिद्धांत आहे असें मानतां येत नाहीं. कारण ब्रह्मदेवानें पृथ्वी उत्पन्न केली, स्वर्ग उत्पन्न केला, अशीं जीं श्रुतिस्मृतिवाक्यें आहेत तीं असंगत होतील. भरतखंडांतील प्रदेशास ब्रह्मावर्त, आर्यावर्त, ब्रह्मर्षिदेश अशीं अन्वर्थक नांवें मन्वादिकांनीं दिलीं आहेत. ब्रह्म ह्मणजे ब्राह्मण जेथें आवर्तते ह्मणजे उत्पन्न होतात तें ब्रह्मावर्त. आर्य जेथें उत्पन्न होतात तें आर्यावर्त. ब्रह्मर्षींचा जो देश तो ब्रह्मर्षिदेश. या अन्वर्थक नांवांवरून भरतखंड हेंच आर्यांचें मूलस्थान असें स्पष्ट होतें. "आब्रह्मभुवनाल्लोकाःपुनरावर्तिनोऽर्जुन । मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥" इत्यादि स्मृतींमध्यें तसेंच 'न स पुनरावर्तते,' इत्यादि श्रुतींमध्यें 'आवर्तते' याचा अर्थ उत्पन्न होतो असाच प्रसिद्ध असून आ उपसर्गपूर्वक वृत् धातूचा येणें असा अर्थ कल्पून, आर्य जेथें आले तें आर्यावर्त अशी कल्पना करणें अयोग्य होय. कारण 'ब्रह्मवर्तदेशांत जो परंपरेनें चालत आला,' 'या देशांत

उत्पन्न झालेला जो ब्राह्मण ' अशीं जीं मनूचीं वचनें त्यांची संगति लागणार नाहीं.

आतां ब्राह्मणादिजातिविचार हा प्राचीन किंवा अर्वाचीन आहे याचा विचार करूं. हा जातिविवेक प्राचीनच आहे असें ह्मटलें पाहिजे. कारण, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, या मुख्य चार जाति, मनूनें सांगितल्या आहेत. स्वजातीच्या विधिपूर्वक विवाहित स्त्रीपासून जो उत्पन्न होईल तो त्या जातीचा होय. विवाहाशिवाय स्वजातीच्या स्त्रीपासून किंवा विवाहित परजातीय स्त्रीपासून जे उत्पन्न होतात त्यांची संकीर्णजाति होय. ह्मणूनच ब्राह्मणापासून स्वजातीच्या अविवाहित स्त्रीशीं व्यभिचाराच्या योगानें झालेला तो अवावट होय; असें देवलानें सांगितलें आहे. तो शूद्रासारखा समजावा. त्याचा संस्कार करूं नये. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या तीन जातींस उपनयनादि संस्कार आहे ह्मणून त्यांस द्विजाति असें ह्मणतात. कारण एक त्यांचें गर्भापासून जन्म व दुसरें संस्काररूप जन्म ह्मणून ते द्विज किंवा द्विजाति होत. शूद्रांस संस्कार नाहीं ह्मणून ते एकजाति होत. जातिविवेक स्मृतींमध्येंच आहे, वेदांमध्यें नाहीं असें समजूं नये. कारण स्मृति ह्या वेदमूलकच आहेत व वेदांतहि ब्राह्मणादि जातिवाचक शब्द आले आहेत.

शक, यवन, चीन या जातिहि ब्राह्मणापासूनच झाल्या असें आर्यांचें मत आहे. मनूनें दहाव्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, कित्येक राजे राज्यलोभानें दूरदेशीं गेले त्यामुळें त्यांमध्यें उपनयनादि संस्कारांचा लोप झाला व त्या देशीं त्यांस धर्म सांगण्यास ब्राह्मणहि नसल्यामुळें ते शूद्र झाले. यावरून आर्य भाषा बोलणारे आणि म्लेंच्छभाषा बोलणारे सर्व लोक भरतखंडांतील लोकांपासूनच परंपरेनें उत्पन्न झाले असें सिद्ध होतें.

याविषयीं आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे ती ही कीं, शक, यवन इत्यादि लोकांच्या भाषांचा विचार केला तर

भाषेच्या आरंभीं उत्पन्न होणारे निकटसंबंधवाचक व संख्यादिकांचे वाचक जे शब्द ते पिता, माता, स्वसा, भ्राता, दुहिता, द्वि, सप्तन्, इत्यादि संस्कृत शब्दांचेच अपभ्रंश त्या त्या भाषांत त्या त्या अर्थांचे वाचक आढळतात. यावरून हे सर्व लोक आर्यकुलांतलेच असावे असें दिसतें. हीच गोष्ट वर सांगितलेल्या मनूच्या ह्मणण्यावरून सिद्ध होते. आणखी मनूनें दहाव्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, व्यभिचारानें, धर्माच्या अज्ञानानें, व स्वकर्माच्या त्यागानें अनेक संकीर्ण जाति उत्पन्न होतात. यावरून असें दिसतें कीं, शकयवनादि लोकहि मूळचे आर्य असून स्वधर्म व स्वकर्म यांच्या त्यागामुळें म्लेंच्छ झाले. यामुळेंच ब्राह्मणादि आर्यजन जेथें रहात नाहींत ते देश निंदित होत, असें वेदांत सांगितलें आहे.

आतां कोणी असा प्रश्न करील कीं, भरतखण्डांत आर्यलोकांची उत्पत्ति झाल्यास किती वर्षे झालीं ? या प्रश्नाचें उत्तर देणें अशक्य आहे. कारण आर्यांच्या उत्पत्तीच्या काळाचा निर्णय करण्यास प्रत्यक्ष प्रमाण नाहीं. अनुमान करण्यासहि निर्दोषहेतु सांपडणें कठीण. वेदामध्येंहि ब्राह्मणवाचक आर्य शब्द सांपडतो. जसें ऋग्वेदाच्या तिसऱ्या अष्टकाच्या सहाव्या अध्यायांत ‘ मीं आर्यांस भूमि दिली ’ असें म्हटलें आहे. यावरून ऋग्वेदाच्या प्रादुर्भावाच्या वेळेस आर्य प्रसिद्ध होते. तेव्हां त्यापेक्षांहि प्राचीन असें कांहीं प्रमाण आर्यांच्या उत्पत्तीविषयीं सांपडेल तर अनुमान करतां येईल, परंतु तसें प्रमाण सांपडत नाहीं.

हल्लीं आहे त्यापेक्षां शंभर वर्षांपूर्वीं कलाकौशल्यादिकांची सुधारणा कमी होती, यावरून फार प्राचीनकाळच्या लोकांत विद्या, शिल्प, कला, कौशल्य हें कांहीं नसून ते केवळ पशुतुल्य असतील असें कित्येक म्हणतात; परंतु तसें म्हणण्यास प्रमाण नाहीं. प्राचीन इतिहास जाणण्याचीं जीं साधनें आहेत त्या सर्वांत ऋग्वेद हा अतिप्राचीन होय असें सर्व पंडित कबूल करतात. त्या

वेदांत त्या वेळचे लोक विद्या, शिल्प, कला इत्यादिकांत प्रवीण होते. असें दाखविणारीं पुष्कळ प्रमाणें आहेत. लोकस्थितीचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, सर्व ठिकाणीं प्रथमतः मनुष्यांस अन्न, आणि आच्छादन यांची अपेक्षा उत्पन्न होते. हीं प्राप्त झाल्यावर त्यांस राहण्यास घर असावें असें वाटूं लागतें. अन्न, आच्छादन व घर हीं तिन्ही प्राप्त होऊन निर्वाह होऊं लागला म्हणजे, बायको, मुलें होऊन संसारसुख प्राप्त व्हावें अशी इच्छा होते. एक मनोरथ पूर्ण झाला म्हणजे दुसरा उत्पन्न होतो; अशी स्वाभाविक स्थिती असल्यामुळें, संसारसुखाच्या इच्छेनें मनुष्यें अनेक उद्योग करूं लागतात, ही स्थिती वर्तमानकाळीं दृष्टीस पडते. यावरून असें दिसतें कीं, हल्लींच्या मनुष्यांप्रमाणेंच पूर्वींचे लोकहि उद्योग करून अनेक कला उत्पन्न करीत होते. याविषयीं वेदांतील कित्येक प्रमाणें सांगतों. ऋग्वेदाच्या तिसऱ्या अष्टकाच्या, पहिल्या अध्यायांत "बैल सुखानें (नांगर) वाहोत, शेतकरी सुखानें नांगरोत" असें म्हटलें आहे. तसेंच ऋग्वेदाच्या पहिल्या अष्टकाच्या दुसऱ्या अध्यायांत "हे पृथ्वी, तूं (आम्हांस) कल्याणकारक, निष्कंटक राहण्यास स्थल देणारी अशी हो, आम्हांस विशाल गृह दे," असें म्हटलें आहे. या प्रकारच्या वेदवाक्यांचा विचार केला असतां त्या वेळचे लोक शेतकी वगैरे अनेक उद्योग करून धान्यादि निर्वाहाचे पदार्थ उत्पन्न करून, नगरांत, गांवांत, खेड्यांत असे रहात होते, असें सिद्ध होतें.

नगर, गांव ही व्यवस्था अर्वाचीन आहे असें समजूं नये. ऋग्वेदाच्या तिसऱ्या अष्टकाच्या सहाव्या अध्यायांत "यज्ञ करणाऱ्या दिवोदासास इंद्रानें दगडांनीं बांधलेलीं शंभर नगरें दिलीं" असें स्पष्ट वाक्य आहे. तसेंच कृष्णयजुर्वेदाच्या चवथ्या काण्डाच्या पांचव्या अध्यायांत "आम्ही बलवान्, तपस्वी, नष्ट शत्रु, असा जो रुद्र त्याची पुष्कळ स्तुति करतों, येणेंकरून आ-

मचीं माणसें, पशु हे सुखी राहोत. तसेंच ह्या गांवांत सर्व लोक सुखी निरुपद्रव राहोत" तसेंच ऋग्वेदाच्या पहिल्या अष्टकाच्या दुसऱ्या अध्यायांत "ऋभु अश्विनीकुमारांकरतां सुखकारक रथ करते झाले" असें म्हटलें आहे. या प्रकारचे त्या त्या शिल्पांचे त्या त्या कालीं अस्तित्व दाखविणारे दृष्टांत ऋग्वेदांत पुष्कळ आहेत. कृष्णयजुर्वेदाच्या संहितेच्या चवथ्या काण्डांत सहाव्या प्रपाठकांत संसारास उपयोगी अशा पुष्कळ वस्तु प्रार्थनापूर्वक मागितल्या आहेत, यावरून त्या वेळेच्या लोकांस पुष्कळ कला माहीत होत्या असें निःसंशय सिद्ध होतें. आकाशपुष्प, शशशृंग अशा कधींहि नसणाऱ्या खोट्या वस्तु कोणी मागणार नाहीं. अनेक वस्तूंच्या वर्णनावरून त्या त्या वस्तु निर्माण करण्याच्या उपयोगी अशा अनेक शिल्पक्रिया त्या वेळेस होत्या हें आपोआप सिद्ध होतें. प्राचीन किंवा अर्वाचीन काळीं एकादी वस्तु एकदम उत्पन्न झाल्याचा अनुभव नाहीं; तेव्हां त्या त्या वस्तु उत्पन्न करणारीं तीं तीं कारणें होतीं असा तर्क करणें अवश्य आहे.

ऋग्वेदाच्या तिसऱ्या अष्टकाच्या सहाव्या अध्यायांत "कोणी विकणाऱ्यानें पुष्कळ मोलाची वस्तु देऊन थोडें द्रव्य घेतलें" इत्यादि वाक्य आहे, व त्याच वेदाच्या पहिल्या अष्टकाच्या दुसऱ्या अध्यायांत "जो समुद्रांतील नौका जाणतो" असें म्हटलें आहे. तसेंच आठव्या अष्टकाच्या दुसऱ्या अध्यायांत "चांगली रक्षण करणारी, मोठी सुंदर, योग्य वेळीं जाणारी, सुरक्षित, उत्तम प्रकारेंकरून स्वस्थानीं पोंचणारी, चांगलें सुकाणूं जिला आहे अशी, कोणतेंहि व्यंग जिला नाहीं अशी, जिला पाणी आंत येण्यास छिद्र नाहीं अशी जी नौका" असें म्हटलें आहे. यावरून त्या वेळेस नौकागमन, व्यापार या गोष्टी प्रचारांत होत्या हें स्पष्ट आहे.

प्राचीन आर्यलोक युद्धकलेमध्येंहि प्रवीण होते याविषयीं पुष्कळ प्रमाणें आहेत. ऋग्वेदाच्या पांचव्या अष्टकाच्या पहिल्या

अध्यायांत "हे राजा, तूं लोखंडाचें चिलखत घालून रणांगणी चाललास ह्मणजे तुझें शरीर मेघासारखें दिसतें. तूं अक्षतशरीर असा जय पाव. हें चांगलें चिलखत तुझें रक्षण करो." इत्यादिक अर्थाच्या मंत्रांचे दोन वर्ग आहेत, त्यांत धनुष्य, बाण, योद्धे इत्यादि युद्धाच्या सामुग्रीचें वर्णन केलें आहे. तसेंच आठव्या अष्टकाच्या पांचव्या अध्यायांत "इन्द्र आमच्या निशाणावर असो; आमचे बाण जिंकोत; आमचे वीर विजयी होवोत. देवहो, आमचें युद्धांत रक्षण करा" असें म्हटलें आहे. यावरून त्या वेळच्या आर्यांचा रणांगणांतील उत्साह दिसून येतो.

ऋग्वेदाच्या चवथ्या अष्टकाच्या पहिल्या अध्ययांत असें ह्मटलें आहे कीं, "हे अग्ने शत्रूंस कोण बांधितात, कोण रक्षण करतात, कोण दान देतात, कोण तेजस्वी होतात, कोण असत्य भाषण करणाऱ्यास सत्य शिकवून रक्षण करतात, कोण सदुपदेश करून दुराचाऱ्याचें रक्षण करतात," अर्थात् तुझे भक्त, तसेंच ऋग्वेदाच्या चवथ्या अष्टकाच्या दुसऱ्या अध्यायांत "ज्याच्या यज्ञांत इन्द्र दुग्धादिमिश्रित सोमरस पितो, तो राजा आपल्या लोकांसहवर्तमान संचार करून शत्रूंचा नाश करतो, प्रजांचें रक्षण करतो" असें म्हटलें आहे. तसेंच कृष्णयजुर्वेदाच्या संहितेंत पहिल्या काण्डाच्या दुसऱ्या प्रपाठकांत राजसूययज्ञांतील रत्निहोम नांवाचें कर्म सांगितलें आहे. हें कर्म बारा दिवस करावयाचें असतें. पहिल्या दिवशीं ब्राह्मणाच्या घरीं, दुसऱ्या दिवशीं क्षत्रियाच्या घरीं जाऊन अमुक कर्म करावें, इत्यादि बारा दिवसांचीं कर्में सांगितलीं आहेत, त्यांत सहाव्या दिवशीं सेनापतीच्या घरीं, सातव्या दिवशीं सारथ्याच्या घरीं, आठव्या दिवशीं अन्तःपुरावरील अधिकाऱ्याच्या घरीं, नवव्या दिवशीं ग्रामाध्यक्षाच्या घरीं, दाहाव्या दिवशीं जामदारखान्यावरील अधिकाऱ्याच्या घरीं जाऊन अमुक कर्म करावें असें सांगितलें आहे. या प्रकारच्या वेदवाक्यांवरून त्या वेळचे आर्य मोठे तेजस्वी, प्रजापालनाविषयीं

दक्ष, दीनांवर दया करणारे, सन्मार्ग चालू करणारे, शूर, शत्रूंचा पराजय करणारे, सर्व सुखापेक्षां विजयसुख अधिक मानणारे, मोठे उदार असे होते, असें स्पष्ट दिसतें. वेदांत वर्णिलेलीं महत्कृत्यें विद्याचारहीन अशा हलक्या लोकांच्या हातून होण्याचा संभव नाहीं. तसेंच लोकांस उपद्रव देणारे चोर, चाहाड, लबाड, पाखण्डी यांस शिक्षा करून देशास पीडा देणाऱ्या क्रूर दुष्टांचें पारिपत्य करून, सन्मार्गानें चालणाऱ्या प्रजेचें आपल्या कुटुंबाप्रमाणें पालन करून स्वस्थ अन्तःकरणानें राजसूयादि यज्ञ करून देवांस संतुष्ट करणारे बहुत राजे ऋग्वेदादिकांत सांगितले आहेत. यावरून राजनीतिहि त्या वेळीं चांगली होती, असें सिद्ध होतें.

## परमेश्वरस्तोत्र.

विश्वस्रष्ट्या[1] नमूं आम्ही । विश्वपाल तुला नमूं ॥
विश्वसंहारका वन्दूं । तुला त्रिविधमूर्तिला ॥ १ ॥
वर्षांबु[3] एकरुचिही । अनेकरुचि होतसे ॥
अविक्रिय[4] गुणांनीं[5] तूं । अवस्था पावशी तसा ॥ २ ॥

---

१. कविश्रेष्ठ कालिदासानें स्वकृत रघुवंश महाकाव्यांत एके ठिकाणीं परमेश्वराचें वास्तवस्वरूप अत्युत्तम रीतीनें वर्णिलें आहे, त्यावरून हें स्तोत्र मराठींत येथें घेतलें आहे. मिथ्याभिमानी परधर्मी लोकांनीं आमच्या धर्मग्रन्थांतील पुर्वापरसंबन्धरहित वेंचे घेऊन आर्यलोकांस जगन्नियंत्या परमेश्वराच्या वास्तवस्वरूपाचें ज्ञान नाहीं असें दाखविण्याचे यत्न पुष्कळ वेळां केले आहेत. परंतु अन्तःकरण पक्षपातरहित करून पाहील त्यास कळेल कीं, आमच्या धर्मग्रन्थांत जसें ईश्वरस्वरूप वास्तविक वर्णिलें आहे त्यापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें वर्णिलेलें कोठेंहि आढळणार नाहीं. शब्दभेद असला तरी सर्व जगाचा चालक परमेश्वर सर्वशक्तिमान् एक आहे ही गोष्ट तत्त्वज्ञान्यापासून तों कवींपर्यंत सर्वांच्या पुढें जागृत आहे. तिचा विसर कधींच कोणास पडला नाहीं. कोणत्याही धर्मास किंवा धर्मपंथास अनुसरणारा असला तरी त्यास ही ईश्वरस्तुति मान्य होण्यासारखी आहे असें समजून हें साधें स्तोत्र येथें दिलें आहे. २. विश्वांतील सर्व वस्तूंच्या ठायीं उत्पत्ति, स्थिति, लय या तीन गोष्टी दिसतात त्या संबंधानें तुला, उत्पादक, पालक, संहारक, अशा अर्थाचीं, ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादि नांवें प्राप्त झालीं आहेत; पण या सर्व गोष्टी करणारा तूं एकच आहेस त्या तुला नमस्कार असो असा या श्लोकांत भाव आहे. यांत एक सच्चिदानंदस्वरूप परमात्मा विश्वव्यापक आहे हा वेदांतशास्त्राचा सिद्धांत सुचविला आहे. ३. पावसाचें पाणी. ४. विकाररहित. ५. सत्व, रज, तम, या प्रकृतीच्या तीन गुणांनीं जगांतील सर्व वस्तु सुखदुःखमोहात्मक आहेत. ईश्वर निर्वि-

अमेय मोजिशी लोकां । पुरविशी आशा निरिच्छ तूं त्यांची ॥
अजितहि जिंकिशि सर्वां । अव्यक्ता प्रकृति तूंचि व्यक्तांची ॥ ३॥

हृदयस्था तुला दूर । निरिच्छाळाहि तापस ॥
निर्दुःखही दयाळूळ । पुराणा म्हणती युवा ॥ ४ ॥
सर्वज्ञही तूं अज्ञात । स्वयंभू सर्वकारण ॥
स्वतंत्र सर्वशास्ता तूं । एकही सर्वरूप तूं ॥ ५ ॥
गाती तुला सात सामें । निजशी सात सागरीं ॥
सप्तार्चि हें तुझें वक्त्र । सप्तलोकाश्रया स्तवूं ॥ ६ ॥
चार अर्थां वितें ज्ञान । चार काळि युगें तशीं ॥
चारै वर्ण मनुष्याचे । निर्मिले त्वां चतुर्मुखा ॥ ७ ॥

---

कार असून या प्रकृतिगुणांनीं सविकार दिसतो असा सांख्यशास्त्राचा सिद्धांत यांत ध्वनित केला आहे. जगांत दोन विभाग चित् आणि जड. जड विभागाच्या सूक्ष्म रूपास सांख्यशास्त्रांत प्रकृति असें म्हटलें आहे. १. हे अस्पष्टा अदृश्या. २. मूळ. ३. दृश्याची.—जगाची. ४. प्राचीन. ५. तरुण. ६. यज्ञामध्यें सामवेदाच्या मंत्रांनीं ईश्वरस्तुति करतात. तीं रथंतरादिक सात सामें आहेत, त्यांस उद्देशून म्हटलें आहे. ७.पुराणांमध्यें सागराचे सात विभाग मानिले आहेत. त्या सर्वांस आधार तूंच असें तात्पर्य. ८. सप्तार्चि म्हणजे अग्नि हें ईश्वराचें मुख, कारण त्यांत आहुति दिली म्हणजे ईश्वरास पोंचते. कर्मकांडप्रतिपादक पूर्वमीमांसाशास्त्राचा सिद्धांत ध्वनित केला आहे. ९. मुख. १०. भूः इत्यादि सात लोक शास्त्रांत सांगितले आहेत. ११. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे पुरुषार्थ. १२. देणारें. १३. कृत, त्रेता, द्वापर, कली. १४ पंचमहाभूतांत सर्व सृष्टपदार्थांचा अन्तर्भाव होतो त्याप्रमाणें ज्ञान संपादन करणें, रक्षण करणें, भिन्न भिन्न ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या वस्तु अपेक्षित स्थलीं नेणें, व उपभोग्य पदार्थ उत्पन्न करण्याकरतां कृष्यादि श्रम करणें या चोहोंत सर्वलोकव्यवहारांचा अंतर्भाव होतो. यामुळें कितीहि संकरजाति

अभ्यासानियतें चित्तें । हृदयस्था तुला सदा ॥
तेजोमया शोधिति ते । योगी तूतें विमुक्तिला ॥ ८ ॥
अजाचे जन्म घे त्याचें । निष्कामहतशत्रुचें ॥
निद्राकालींहि जाग्याचें । तत्त्व कोणा कळे तुझें ॥ ९ ॥
घ्याया शब्दादि विषयां । कराया कठिणा तपा ॥
समर्थ तूं प्रजाप्राणी । उदासीन रहावया ॥ १० ॥
बहु मार्ग कथित असती । शास्त्रांनीं भिन्न भिन्न सिद्धीचे॥
परि ते येती तूतें । ओघ जसे, जलनिधीस गंगेचे ॥११॥
तुझ्या ठायीं चित्त ज्याचें । तुला अर्पिति कर्म जे ॥
वैराग्ययुक्त जे त्यां तूं । मोक्षमार्गासि दाविशी ॥ १२ ॥
प्रत्यक्षेंहि न जाणोंचि । भूम्यादि महिमा तुझा ॥
शब्दानुमानज्ञेया तूं । कळशील कसा नरां ॥ १३ ॥
देशी पवित्रता लोकां । स्मरणानेंचि सर्वदा ॥
येणें करूनियां होतें । गुणांचें पूर्ण वर्णन ॥ १४ ॥
समुद्राचीं जशीं रत्नें । भास्कराची जशी प्रभा ॥
तशीं तुझींहि चरितें । स्तुतिदूरचि ईश्वरा ॥ १५ ॥
लब्ध नाहीं असें प्राप्य । तुला कांहीं नसे प्रभो ॥
लोकप्रसाद हा हेतु । जन्मकर्मास या तुझ्या ॥ १६ ॥
महिमा गाउनि तुझा । पावे वाणी स्थिरत्व जें ॥
श्रम हेतु असे त्याला । न गुणांची प्रमेयता ॥ १७ ॥

**समाप्त.**

---

झाल्या तरी वर्णचतुष्टय मानण्यास बाध येत नाहीं. १. यांत योगशास्त्राचा सिद्धांत सुचविला आहे. विषयनिवृत्तिरूप अभ्यास करून स्वाधीन ठेविलेलें. २. ज्ञानस्वरूप. ३. मोक्षासाठीं. ४. सगुण आणि निर्गुण दोन उपासना शास्त्रांत सांगितल्या आहेत त्यांस उद्देशून ९ आणि १० हे श्लोक आहेत. ५. या पुस्तकांतील 'पितापुत्रसंवाद' हा विषय पहा. ६. इयत्ता, गणती.

# लोकोत्तर चमत्कार.

## सचित्र भाग १ ला.

श्वेतगज, शिंगाचीं मनुष्यें, १५०० रु. पुस्तक, पिंपांत राहणारा मनुष्य, बर्फाचा वाडा, चित्तविभ्रम, जलबिंदूंतलि सूक्ष्मप्राणी, तारबातमी, पक्ष्यादिकांचें युद्ध, बुद्धाचा दांत, दगडांच्या नद्या, राक्षसी गुलाब, मुंग्यांचा राक्षस, भविष्यकाळाचे ठोकताळे, नरमांसभक्षक लोक, २१ शें वर्षांचा वटवृक्ष, विजातीय कुत्रा, २२०॥ रु० शब्द, विमान, बर्फांत गढलेली बाई, खरा शूर, झाडावर चढणारे मासे, पुर्वयुगांतील प्राणी, स्वप्नसृष्टि, हातभर उंचीचीं माणसें, याप्रमाणें ह्यांत विषय आहेत. किं.ऽ१० आणे, टपालखर्च ऽ≈ आणे.

# संस्कृतकविपंचक.

( कालिदास, भवभूति, बाण, सुबंधु, दंडी.) कै. **विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत**. ह्यांतील निरूपण नव्या पद्धतीस अनुसरून केलें आहे. पाहिल्यानें प्रत्येक कवीच्या कालाचा निर्णय, पुढें त्याच्या ग्रंथांचा निर्देश व त्यांचें विवेचन आणि शेवटीं उत्कृष्ट स्थलांपैकीं कांहींचे उतारे [illegible] धरलेला आहे. यांत साऱ्या विषयाचा समावेश होउ[illegible]वाचकांस जें अपेक्षित आहे तें सर्व आलें आहे किं. १[illegible]

| | किं. | ट. |
|---|---|---|
| नौकानयन[illegible] ... ... ... | ·।≈ | ऽ– |
| भरतखंडा[illegible] ... ... ... | ·।· | ऽ॥· |
| सीता[illegible] .. ... ... | ऽ– | ऽ॥ |
| यशोदा[illegible] .. ... ... | ऽ≈॥ | ऽ॥ |
| सीतास्वयं[illegible] ... ... | ऽ≡॥ | ऽ॥ |
| चंद्रहासचो[illegible] ... ... | ऽ≡॥ | ऽ॥ |
| मुलींचें पहिलें पुस्त[illegible] ... ... | ऽ≈ | ऽ॥ |
| सुभाषितपद्यमाला. ... ... ... ... | ऽ≡ | ऽ॥ |
| सार्थ गणेशगीता. ... ... ... ... | ·।॥· | ऽ–॥ |

| | किं० | ट० |
|---|---|---|
| सार्थ शिवगीता. ... ... ... ... | ।॥। | ८—॥ |
| सार्थ लघु योगवासिष्ठसार. ... ... ... | ।॥। | ८— |
| विठोबा अण्णा दप्तरदार–चरित्र. ... ... | ।। | ८॥ |
| वैद्यक शार्ङ्गधर मराठी भाषांतरसहित. ... | २॥ | ।। |
| संगीत इंद्रसभा. डोंगरेकृत ... ... ... | ।। | ८॥ |
| ,, वेणीसंहार. ... ... ... ... | ।= | ८॥ |
| ,, रंगीनायकीण. ... ... ... ... | ।। | ८॥ |
| ,, मृच्छकटिक. ... ... ... ... | ।= | ८॥ |
| ,, वसंतोत्सव. ... ... ... ... | ॥। | ८॥ |
| ,, हरिश्चंद्र. सोनेरी बांधणी. सोकर बापुजी त्रिलोकेकर कृत ... ... ... ... | ।॥। | ८— |
| ,, सावित्री नाटक. साधी बांधणी ... ... | ।= | ८— |
| सुलभप्रसूति. ... ... ... ... ... | ८= | ८॥ |
| शिवलीलामृत गुटका रेशमी.... ... ... | ।= | ८— |
| शिवलीलामृत साधी बांधलेली प्रत. ... | ।।॥ | ८— |
| उदारदामोदर नाटक.. ... ... | १। | ।। |
| सीतागीत. ... . | ५— | ८॥ |
| रुक्मिणीहरणगीत. | ८— | ८॥ |
| अश्वधाटीप्रबोधिका. ... . | [illegible] | ८॥ |
| सासरची पाठवणी. माहेरचें [illegible] | | मा. |
| मुलीचा समाचार. सद्गुरु [illegible] | | |
| मुलींस सदुपदेश. [illegible] | | |
| श्रीरामदास स्वामीं [illegible] | | ॥। |
| सार्थ व सटीप दास [illegible] | | ५ |
| सार्थ व स[illegible] | | १.३। |
| माझें क[illegible] | | ।= |
| पंचतंत्रामृ[illegible] चष[illegible] ... [illegible]गोष्टी. | | ८= |
| मुलींचें पहि[illegible] पुस्तक साचे ... ... ... | | ८= |

## चीनचा इतिहास.

ह्यांत चिनी लोकांच्या रीतीभाति, आचार-विचार, राहणी, धर्मपद्धति, पाहुणचार, हे विषय मनोरंजक कादंबरीप्रमाणें अर त्यामुळें ह्या ऐतिहासिक पुस्तकाचें वाचन सहज होतें. किं आणे. ट. ख. १ आणा.

## सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

प्रथम गीतेचा श्लोक; मूळ ज्ञानेश्वरीच्या ओव्या; गीता कांचीं प्रत्याहिकें; प्रत्येक पृष्ठाखालीं कठिण शब्दांचे अर्थ व विस्तृत टीपा; कथानकें ओव्यांखालीं मोठ्या जाड टाईपा

**सरळ गद्यात्मक सुलभ अर्थ.**

ग्रंथारंभीं वेदांतपर मनोगत; ज्ञानेश्वराच्या कालांतील सिक माहिती, कलाकौशल्य व निवडक वर्णन ह्यांचें टिप सुपररायल अष्टपत्री बुकसांचा. पृष्ठांत कालम

साधे कागद कापडी बांधणी...किंमत रु० ३।

,, ,, रेशमी बांधणी... ,, ३॥ ,,

**जनार्दन महादेव गुर्जर.** **जनार्दन महादेव**

मु० पापुंड-पोष्ट पनवेल, बुकसेलर आणि

(Panvel) जि० कुलाबा. रामव

---

लहान मुलाकरितां

# डोंगरे यांचें बा

घेतांना तें त्यांचेंच असल्याबद्दल खात्री

अलीकडे बरेच लोक त्याची नक्क

बाटलीची किंमत १२ आणे. ट.

के. टी. डोंगरे आणि

# रंगवल्लिका.

रांगोळी व लेणीं काढण्याचें पुस्तक. आकृति २० आकृतींच्या ...नानें ठिपके किंवा रेषा दाखवून नंतर निराळी आकृति का...न ...रा दाखविली आहे. प्रत्येक आकृतीच्या खाली समज... ...शी माहिती लिहिलेली आहे. किं. ।०

स्त्रीगीतमाला—भाग १ ला गोरेसंतकृत सीतागीत किं. ८—

,, ,,भाग २ रा. .. ,, रुक्मिणीहरणगीत. ... ८—

,, ,,भाग ३ रा. उत्तम वोधपर व संगीताचें चालीवर ८—

कृष्णाचीं गाणीं— किं. ८—

# अमरकोश.

...श्लोक शब्दांची वर्णक्रम सूची ( इन्डेक्स ). पाकेट स चा ...आ प्रती २५।५० घेणारांस कमिशन मिळेल.

...रु श्रीमच्छंकराचार्य यांचें विस्तृत चरित्र. ... ... ।।।

...रामदासस्वामींचें समग्र चरित्र .. .. ... ।।।—

...पूर्व चतुष्क चरित्र मराठी भाषांतरासह ... १

...र सुधारून वाढविलेला नवीन आवृत्ति ... ।।

...ऊ पुडा १।२।३ प्रत्येकीं ... .. ८—

...स्वामींचे केरळकोकिळ एडिटरकृत भा...

...ग कर्मयोग प्रत्येकीं किंमत ८८ आणे.

...मींचे सद्गुरु भगवान रामकृष्ण परमहंस

...म वेदांत. ... ... ... ।।।—

...चीं पुस्तकें विकत मिळतील. अशीं

...त, पुस्तकांची यादी फुकट.

ज. ... गुर्जर.

दुकान ... नं. ...

मुंबई.